१०१२६१

मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर

साने गुरुजी

चंद्रभागेच्या वाळवंटी

कल्की अर्थात संस्कृतीचे भवितव्य

गीताहृदय

मंदिर प्रवेशाची भाषणे
व इतर

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर : साने गुरुजी

प्रकाशक

रिया पब्लिकेशन्स्

२५०, ब-३०, शितल बंगला,

नागाळा पार्क, कोल्हापूर.

मोबा. : ९४२२४२१५०२

अक्षरजुळणी

रावजी देसाई

मुखपृष्ठ

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक

ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

आवृत्ती

१५ ऑगस्ट, २०११

किंमत

रुपये २५०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

अनुक्रमणिका

१.	मंदिर प्रवेशाची भाषणे	....	५
२.	चंद्रभागेच्या वाळवंटी	....	४७
३.	कल्की अर्थात संस्कृतीचे भवितव्य	....	८९
४.	गीताहृदय	....	१६९

+++

मंदिर प्रवेशाची भाषणे

१. बंधुभगिनींनो,

आज तुमच्यासमोर मी का बरे उभा आहे? कोणत्या गोष्टी सांगायला का आलो आहे? थोरामोठ्यांचा कोणता संदेश द्यायला मी आलो आहे? मी काँग्रेसचा सेवक आहे. काँग्रेसच्या झेंड्याखाली स्वराज्यासाठी धडपडत असताना मरण यावे हीच एक इच्छा असणारा मी एक प्राणी आहे. आपण सारे स्वराज्यासाठी अधीर आहोत. हा देश स्वतंत्र व्हावा असे तुमच्यातील प्रत्येकाला वाटत आहे. हा देश दास्यातच खितपत पडावा असे म्हणणारा कोणीतरी करंटा असेल का? परंतु जे स्वराज्य आपण इच्छितो, ज्याच्यासाठी हजारो मेले, उद्या लाख मरतील त्या स्वराज्याचा अर्थ काय?

२. स्वराज्याचा अर्थ

स्वराज्यासाठी मरा, स्वातंत्र्यासाठी लढाई करायला निघा, असे मोघम म्हणून भागत नाही. तो काळ गेला. १९३० साली मी प्रथम जेव्हा सत्याग्रहाच्या चळवळीत सामील झालो तेव्हा उठा देशासाठी, उठा भारतमातेसाठी अशी राणा भीमदेव भाषणे करीत असे. क्षणभर लोकांच्या भावना उचंबळत. १९२४ मध्ये देशबंधू दास म्हणाले, ''स्वराज्य म्हणजे स्वराज्य. त्याची व्याख्या काय करायची?'' परंतु आज असे म्हणून चालणार नाही. हे स्वराज्य तुम्ही आणणार त्यात आमची स्थिती काय राहील हे प्रत्येकजण आज विचारील. तो विचारीत नसेल तर त्याने विचारले पाहिजे; तो विचारील असे केले पाहिजे.

३. शेतकऱ्यांचे स्वराज्य

खेड्यापाड्यांतून हिंडताना मी शेतकऱ्यांस सांगतो की, स्वराज्य तुमच्यासाठीच आणायचे आहे. शेतीची जमीन वाटून द्यायची आहे. ज्याप्रामाणे गोरे बकासुर नकोत. त्याप्रमाणे आपल्यातीलही नकोत. दिल्लीचा व्हाइसरॉय एका दिवसात सातशे रुपये घेतो. म्हणजे पाच हजारांचे अन्न एका दिवसात फन्ना करतो. म्हणून आपण त्याला बकासुर म्हणतो. परंतु आपल्यातही बकासुर आहेत. पाचशे एकर, हजार एकर जमीन उद्या एकेका जवळ राहाणार नाही. हिंदुस्थानातील सारी जमीन वाटली तर सव्वा ते दीड एकर एकेकाच्या वाटणीस येईल. स्वराज्यात २० की २५ एकर म्हणजे डोक्यावरून पाणी गेले अशी कोठेतरी मर्यादा घालू. बाकीची जमीन वाटून देऊ. तुम्हाला जमीन वाटून हवी असेल तर वाटून घ्या. परंतु असे करून प्रश्न सुटणार नाहीत. तुमच्या मुलांत उद्या का ती पुन्हा वाटायची? जमीन विकणे, विकत घेणे म्हणजे पापच. जमीन सर्वांच्या मालकीची. गावची जमीन गावच्या मालकीची. गावातील सर्व खपणाऱ्यांच्या मालकीची. ज्याला ज्याला श्रम करायचे असतील, त्याने त्या शेतावर करावे. तुम्ही काय ते ठरवा. स्वराज्यात वाटून हवी असतील तर वाटून मिळेल. गावच्या मालकीची हवी असेल तर तसे करू. संपूर्ण स्वराज्य आले म्हणजे या गोष्टी करायच्या आहेत. तोपर्यंत हा नवा कुळकायदा आहे. कुळाला दोन हिस्से उत्पन्न राहावे, धन्याला एक हिस्सा. काँग्रेस अशा रीतीने तुम्हा श्रमणाऱ्यांकडे येत आहे. शेतकऱ्यांचे स्वराज्य आणीत आहे.

४. कारखाने राष्ट्राच्या मालकीचे

ज्याप्रमाणे शेतकऱ्याला जमीन मिळेल त्याप्रमाणे कामगारही कारखान्यात सुखी होईल. मोठे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे होतील. कामगारांना पगारी रजा मिळेल. विमा उतरला जाईल. राहायला सुरेख चाळी, भरपूर पगार, कामाची शाश्वती, पुरेशी विश्रांती. मुलाबाळांच्या शिक्षणाची संधी. आजारीपणात दवा, असे कामगारांचे जीवन होईल, रक्तशोषण थांबेल.

शेतकरी आणि कामगार यांचे हे असे स्वराज्य आणायचे आहे. हे चित्र डोळ्यापुढे येऊन त्यांना आनंद होईल. अद्याप असे स्वराज्य आले नाही. अजून संपूर्ण सत्ता हाती नाही. कलेक्टरचा पगार ठरविण्याचाही अधिकार अद्याप आपणास

मिळालेला नाही. दिल्लीला वाटाघाटी होत आहेत. स्वराज्याचा नकाशा तयार होत आहे. घटना बनविली जात आहे. परंतु ही घटना तयार करण्यात सर्वांनी सहकार्य केले तर? सर्वांचे सहकार्य नाही म्हणून ही घटना आम्ही मानीत नाही, असे ब्रिटिश सरकार म्हणाले तर?

५. चलेजावची गर्जना

तर आम्हास पुन्हा आगीतून जावे लागेल. ''तुम्ही येथे आहात म्हणून आमचे जुळत नाही. तुम्ही चालते व्हा.'' अशीच पुन्हा घोषणा काँग्रेसला करावी लागेल. ते ते प्रांत बंड करून उठतील. ज्यांना ज्यांना ब्रिटिश सत्तेचा वीट आला असेल ते ते प्रांत आपापले स्वातंत्र्य जाहीर करतील. इंग्रजांच्या बाजूचे कोण ते दिसून येईल. शेवटचा लढा करू, तुम्ही तयार राहा. एकेका तालुक्यात अठरा वर्षांवरचे हजार तरी तरुण मरणाची शपथ घेतलेले संघटित असोत. उद्या मुंबई इलाख्याने स्वातंत्र्य पुकारले आणि या प्रांतातील पोलीसखाते स्वतंत्र मुंबई इलाख्यातल्याप्रमाणे वागायला तयार नसेल तर काँग्रेस म्हणेल ताबडतोब पन्नास हजार तरुण हवे आहेत, आपण मागणी पुरी केली पाहिजे. आयत्या वेळेस आकाशातून संघटना पडणार नाही. तयार राहा. गावोगाव सेवादले, तरुण संघटना बांधून ठेवा. काँग्रेसची हाक येईपर्यंत दारूबंदी, स्वच्छता, साक्षरता, अस्पृश्यनिवारण, हिंदुमुस्लीम ऐक्य इत्यादीत शक्ती वेचा.

६. अस्पृश्यांची काय स्थिती राहील?

बंधूनो, स्वराज्यात ज्याप्रमाणे शेतकरी, कामकरी सुखी व्हावेत असे आपण म्हणतो, त्याचप्रमाणे अस्पृश्यही सुखी व्हायला हवेत. त्यांना इतरांप्रमाणे जमीन मिळेल. कारखान्यात स्वाभिमानपूर्वक काम करता येईल. परंतु त्यांना शेतीवाडी मिळाली, काम मिळाले एवढ्याने सारे होईल असे नाही. अस्पृश्य बंधू विचारतात, ''स्वराज्यात आमची स्थिती कशी राहील ते सांगा.'' तुम्ही त्यांना काय सांगणार? १९४२ मध्ये चलेजावचा लढा सुरू झाला होता. त्याचवेळेस मुंबईस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एक भाषण झाले होते. त्या भाषणात ते म्हणाले, ''काँग्रेसचे पुढारी ब्रिटिशांना युद्धहेतू विचारीत असतात. मीही चलेजावच्या काँग्रेसच्या लढाईचे युद्धहेतू विचारीत आहे. जे स्वराज्य तुम्ही आणणार त्यात पाचसहा कोटी दलित जनता

अशीच माणुसकीस पारखी राहाणार ना? कोणाचे स्वराज्य तुम्ही आणू पाहता?'' असे त्यांनी विचारले होते. ब्रिटिशांनी हिंदुस्थानला युद्धाच्या खाईत ओढले. काँग्रेसने सांगितले, ''हे युद्ध लोकशाहीसाठी असेल तर या देशाला लोकशाही का देत नाही? हे युद्ध स्वातंत्र्यासाठी असेल तर आम्हाला स्वातंत्र्य का देत नाही?'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर काँग्रेसला तोच प्रश्न विचारतात.

७. कोणते उत्तर देणार?

इंग्रजांकडून स्वराज्य घेऊ तेव्हा घेऊ. संपूर्ण सत्ता हाती आल्यावर सर्वांना जमीन वाटून देऊ तेव्हा देऊ. परंतु जे स्वराज्य आपल्या कोट्यवधी बंधूंना आपण या क्षणी देऊ शकतो, ते आपण का देत नाही. स्वातंत्र्य दोन प्रकारचे आहे. आर्थिक नि सामाजिक. आर्थिक स्वातंत्र्य सोळा आणे सत्ता हाती आल्यावर आपण निर्मू शकू. परंतु सामाजिक स्वातंत्र्य या घटकेला आपण सर्वांना देऊ शकतो. ते देण्याच्या आड काही ब्रिटिश येत नाहीत. तुमच्या विहिरींवर हरिजनांनी पाणी भरले तर गोरा कलेक्टर किंवा गोरा गव्हर्नर का आड येत आहे? हे सामाजिक स्वातंत्र्य आपणच अडवून ठेवले आहे. मनाचा मोठेपणा असता तर एका क्षणात ते आपण दिले असते.

८. अनेकांचे प्रयत्न

गेल्या शतकात ही अस्पृश्यता जावी म्हणून अनेकांनी प्रयत्न केले. महात्मा जोतिबा फुले यांनी प्रथम पुण्यात आपल्या हौदावर हरिजनांना पाणी भरू दिले. त्यांनी त्यांच्यासाठी शाळा काढल्या. त्यांनी निंदा, अपमान, बहिष्कार सारे सहन केले.

''तरीच संत व्हावे, जग-बोलणे सोसावे.''

हे मुक्ताबाईचे थोर चरण त्यांना माहीत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी छात्रालये काढून खूप खटपट केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अनेक हरिजनांना उच्च शिक्षण दिले; विलायतेत पाठविले. प्रध्यापक माटे यांनी धडपड केली. हिंदुस्थानभर आर्य समाजाचे प्रयत्नही चालू होते, चालू आहेत. परंतु अस्पृश्यता जाईना. लाखो खेड्यापाड्यांतून ती अजून तशीच आहे.

९. १९३२ मधील महात्माजींचा उपवास

आणि शेवटी १९३२ मध्ये महात्माजींनी उपवास केला. स्पृश्य हिंदू समाजापासून अस्पृश्य समाजास कायमचे पारखे करण्याचा इंग्रजी डाव होता. महात्माजींना वेदना झाल्या. ते म्हणाले, ''हिंदू धर्मावर हा कायमचा कलंक राहील. हिंदू धर्माने आपल्या अनुदारपणामुळे आपल्या कोट्यवधी बंधूंना एका क्षणात दूर केले असे इतिहास सदैव सांगत राहील. आम्ही अस्पृश्यता लवकर घालवू. तुम्ही अस्पृश्य बंधू कायमचे दूर करू नका. नाहीतर मी उपवास करीन.'' ब्रिटिश ऐकेनात. महात्माजींचे अग्निदिव्य सुरू झाले. शेवटी पुणे करार झाला.

१०. दहा वर्षे

महात्माजींनी करारानंतर पुन्हा २१ दिवस उपवास केला. ते म्हणाले, ''हरिजनांच्या सेवेसाठी लाखो रुपये लोक देतील. परंतु माझ्या उपवासाने मी आध्यात्मिक भांडवल देत आहे.'' तुमची, आमची सर्वांची हृदये या कामात रंगावी अशी महात्माजींची उत्कट इच्छा होती. १० वर्षांत ही अस्पृश्यता जाईल अशी त्यांना आशा होती. परंतु दहाची पंधरा वर्षे झाली. आपणास काय दिसत आहे? किती मंदिरे उघडली? किती विहिरी मोकळ्या झाल्या? हाटेल्स, खाणावळी यातून मोकळेपणाने त्यांना जाता येते का? भाड्याने राहावयाला घर मिळते का? कोणते उत्तर द्याल? आज बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''पुणे करार रद्द करा.'' तुम्हाला राग येतो. त्यांना चर्चिलला तर केली तार तुम्हाला घुस्सा येतो. परंतु प्रेम मिळावे म्हणून तुम्ही काय केले आहे?

११. महापुरुषाची मान खाली

१९३१ मध्ये वर्तुळाकार परिषदेच्या वेळेस महात्माजी म्हणाले, ''डॉक्टर आंबेडकरांना माझ्यावर थुंकण्याचा हक्क आहे. कारण हिंदूंची पापे माझ्याही शिरावर आहेत.'' आज पुन्हा त्यांना आपण असेच म्हणायला लागणार का? डॉ. आंबेडकर गांधीजींना जर म्हणाले, ''चला, लाखो खेड्यापाड्यांतून आणि दाखवा शिवाशिवी गेली का'' गांधीजी काय म्हणतील? त्यांना आशा होती की स्वातंत्र्योन्मुख हिंदी राष्ट्र अस्पृश्यता झपाट्याने दूर करील. परंतु आपण उदासीन राहिलो.

१२. राष्ट्राचा पिता

महात्माजी म्हणाले, या राष्ट्राचे तात घटनासमितीच्या वेळेस बोलताना जवाहरलालजी म्हणाले, ''आज महात्माजी कोठे आहेत? कोठे आहे तो राष्ट्राचा पिता? दूर नौखालीत ते अनवाणी अविश्रांत काम करीत आहेत.'' बंधूनो, जवाहरलालजींनी गांधीजींना ''तात'' म्हणून संबोधिले आणि शून्यांतून विश्व निर्माण करणारे, तुम्ही रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो अशी दिव्य वाणी बोलणारे, चलो दिल्ली, जयहिंद हा नवमंत्र देणारे ते नेताजी सुभाषचंद्र काय म्हणाले आहे माहीत? आझाद हिंद सैन्याची निर्मिती करून नेताजी म्हणाले, ''महात्माजी, तुम्ही राष्ट्राचे तात आहात, आशीर्वाद पाठवा.'' अशा या राष्ट्रपित्याची मान तुमच्या आमच्या उदासीनतेमुळे खाली व्हावी असे तुम्हास वाटते का? कशाला आपण महात्मा गांधी की जय म्हणावे? आपण सारे कामचुकार ठरलो.

१३. माझी बेचैनी

पूज्य विनोबाजींनी विचारले, ''हरिजनांसाठी काय केलेत हिशोब द्या.'' आम्ही कोणता हिशोब देणार? आणि आमचे ऐकणार तरी कोण? महात्माजींच्या उपवासाने आम्ही उठलो नाही. तेथे आम्ही लुंग्यासुंग्यांचे कोण ऐकणार? आपण उपवास करून मरावे असे मनात आले. इंग्रजीची गुलामगिरी जावी म्हणून आपण मरतो, मग आपल्याच भावांनी आपल्याच भावांवर लादलेली गुलामगिरी दूर करण्यासाठी का मरू नये? ३० वर्षांपूर्वी हुंड्याची चाल रद्द व्हावी म्हणून स्नेहलता नावाच्या एका बंगाली तरुणीने अंगावर रॉकेल ओतून बलिदान केले. एकेक दुष्ट रूढी नष्ट व्हावी म्हणून काहींनी मरावे असे मला वाटते. जुने गंजलेली कुलूप उघडत नसेल तर आत तेल घालतात. त्याप्रमाणे आपली गंजलेली हृदये उघडावी म्हणून काहींनी प्राणाचे तेल ओतले पाहिजे. काहींनी प्रचाराचा पाऊस पाडावा. काहींनी मरावे. आगाखान राजवाड्यात बंदीत असताना १९४२ च्या फेब्रुवारी महिन्यात महात्माजींचा उपवास सुरू होता. त्या उपवासातील त्यांचे शब्द तुम्हास माहीत आहेत? माझ्या कानांवर आले होते.

१४. हारकिरी करा

महात्माजी म्हणाले, "बाहेर लढा थांबवा. लोकांना काही करता येत नसेल तर त्यांनी मरावे. ब्रिटिश सत्तेचा वीट आला असेल तर व्हाइसरॉयच्या बंगगल्यासमोर जाऊन डोकी फोडून त्यांनी प्राण द्यावे. परंतु गुलाम होऊ नये. हाराकीरी भ्याडाची नसून शूराची असते हे जपान्यांनी जगास दाखविले आहे." असे ते तळमळीचे उद्‌गार होते. पूज्य विनोबाजींना हे उद्‌गार लिहून मी कळविले की अस्पृश्यतेची गुलामगिरी नष्ट करायला मला परवानगी द्या. आठ महिन्यांपूर्वी मी त्यांना विचारले, त्यांनी धीर धरायला सांगितले. कोठवर धीर धरायचा? कार्तिकी एकादशी जवळ येत होती. दिल्लीला हरिजन पुढारी जोगेन्द्र मंडल म्हणाले, "आम्ही हिंदुधर्म सोडून जाऊ" लीग पुढारी म्हणाले, "सारे आमच्या धर्मात या." हिंदुधर्माची ही विटंबना मला सहन होईना. परंतु स्पृश्य हिंदूंच्या अनुदारपणामुळे ही विटंबना होत होती. आपण प्राण फेकावे असे मनात आले. इतक्यात खानदेशचे एक थोर कार्यकर्ते श्री. सीतारामभाऊ चौधरी हिमायलयाची पायी यात्रा करून पंढरपूरचे मंदिर उघडावे म्हणून तेथे खटपटीस गेले होते. त्यांनी मला लिहिले, "तुम्ही आलात तर मला हिंमत चढेल. बळ चढेल. या." मी मनात म्हटले "माझ्याजवळ कोणते बळ? मी का बडवे मंडळीजवळ शास्त्रार्थ करीत बसू? द्रेवाजवळ सारी लेकरे जाणे ही का चर्चेची वस्तू? आपले प्राण हातात घेऊन उभे राहावे एवढेच आपले बळ." आणि मी उपवास सुरू केला. परंतु महर्षी सेनापती, भाई अच्युतराव, शिरुभाऊ लिमये, एस्. एम. जोशी, मधु लिमये या सर्वांनी मला गळ घातली. सहा महिने थांबा असे सेनापती म्हणाले. त्या पुण्यमूर्तीचे नको ऐकू तर कोणाचे? शेवटी उपवास पुढे ढकलून मी आज हिंडत आहे. सेनापतींच्या कृपाछत्राखाली आम्ही हिंडत आहोत. अस्पृश्यता दूर करा म्हणून सांगत फिरत आहोत. मी हिंडणार नव्हतो. कोठे तरी राम नाम म्हणत बसणार होतो. परंतु शेवटी बाहेर पडलो. परिणाम होवो, न होवो. तू सांगत जा, असे मी मनात म्हटले.

१५. पंढरपूरचा विठोबा

पंढरपूरचे मंदिर हरिजनांना मोकळे व्हावे म्हणून मी मरायला उभा राहिलो. पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचे हृदय. महाराष्ट्राच्या जीवनाची ही किल्ली. पंढरपूरची कळ

दाबली तर महाराष्ट्रभर प्रकाश पडेल असे मनात आले. पंढरपूर म्हणजे दक्षिणेची काशी. येथील पांडुरंगाचे मंदिर अति प्राचीन. जवळजवळ अडीच हजार वर्षांचे. बडवे मंडळी तेथे येऊनच दोन हजार वर्षे झालीत. बडवे मंडळी कर्नाटकातून आली. पंढरीचे वारकरी तिकडेही आहेत. कानात मकरकुंडले घालण्याची दक्षिणेकडचीच पद्धती. आद्य शंकराचार्य पांडुरंगाच्या दर्शनार्थ आले होते. त्यांनी पांडुरंगाष्टक स्तोत्र केले आहे. "देवा, कमरेवर हात ठेवून माझ्या भक्तांना संसारसागर कमरेइतकाच खोल आहे असे का तू दाखवीत आहेस." असे त्यांनी त्यात म्हटले आहे. पंढरपूर, बार्शी म्हणजे प्राचीन धर्मसंस्कृतीचा वसौटाधर्मसंस्कृतीचे माहेरघर. अंबरीष राजा बार्शीचाच. अंबरीषासाठी भगवान आला. पुंडलीकासाठी पंढरपूरचे परब्रह्म आले. असे प्राचीन पवित्र मंदिरच देवाच्या सर्व लेकरांना मोकळे व्हावे म्हणून मी उपवास सुरू केला होता.

१६. संतांचे कार्य

वारकरी पंथ सुरू होण्यापूर्वी जवळजवळ हजार वर्षे हे मंदिर प्रसिद्ध होते. पुढे संतांनी आणखी महिमा वाढविला. नामदेव, ज्ञानदेव उत्तरेची यात्रा करून आले. इस्लामी धर्म येत होता. मलबार किनाऱ्यावर तो कधीपासून आलेला होता. इस्लामी धर्मातील समतेचा परिणाम संतांच्या मनावर झाल्याशिवाय राहणार नाही. हिंदुधर्म उदार न होईल तर टिकणार नाही असे त्यांना वाटले असावे. मशिदीत सारे समान. हिंदुमंदिरात असे केव्हा होईल? असे विचार त्यांच्या डोक्यात आले असतील. तेव्हा पंढरपूरच्या वाळवंटात तरी भेदभाव, शिवाशिव नको असे त्यांनी ठरविले असावे. साऱ्या महाराष्ट्रातून विठ्ठलनामाचा गजर करीत येथे या. या वाळवंटात एकत्व अनुभवा. येथे परस्परांस भेटा, क्षेमालिंगने द्या. आणि नवीन प्रथा सुरू झाली, वाळवंट दणाणले, गजबजले. तुकारामांच्या अभंगात वाळवंटाचा अपार महिमा आहे.

"एकमेकां लोटांगणी येती रे
कठोर हृदये मृदु नवनीते
पाषाणा पाझर फुटती रे"

असे उचंबळून तुकोबा म्हतात.

१७. बंडखोर संत

संत बंडखोर होते. संस्कृतातील ज्ञान त्यांनी मराठीत आणले. संत कारुण्यसागर होते. झोपडी झोपडीत त्यांना ज्ञान न्यायचे होते, खरा धर्म न्यायचा होता. त्यांचा छळ झाला. ज्ञानेश्वरादिकांवर बहिष्कार. कुंभाराचे मडकेही त्यांना मिळू दिले नाही. तुकोबांचे अभंग इंद्रायणीत फेकण्यात आले. एकनाथी भागवत काशीच्या पंडितांनी गंगेत फेकले. संत मेल्यावर त्यांच्या पालख्या आपण उचलतो. परंतु ते जिवंत असताना त्यांचे आपण छळच केले. परंतु ते डगमगले नाहीत. वाळवंटात तरी त्यांनी भेदभाव नष्ट केला.

१८. पुढचे पाऊल

त्याच्या पुढचे पाऊल आपण नको का टाकायला? समाज पुढे जात असतो. नदी थबकली की संपली. समुद्राला मिळेपर्यंत ती पुढे जाणार. आपणही ''अवघाची संसार सुखाचा'' होईपर्यंत पुढे गेले पाहिजे. परंतु आपण पुढे गेलो नाही. पंढरपूरच्या वाळवंटात एकमेकांना भेटू. परंतु देवाजवळ अजूनही हरिजनांना जाता येत नाही. वारी करून घरी आल्यावर गावात शिवाशिव आहे ती आहेच. शेवटी पंढरपूर स्वत:जवळ आणायचे असते. एकनाथ म्हणतात:

''काया हे पंढरी, आत्मा हा विठ्ठल.''

शेवटी स्वत:च्या जीवनात सारे आणायचे असते. परंतु आपण संतांचा मागोवा घेत पुढे गेलो नाही. एखाद्या आईचे मूल पहिले पाऊल टाकते. ती शेजीला आनंदाने म्हणते, ''बाळ्याने आज पहिले पाऊल टाकले.'' परंतु चार महिने झाले तरी बाळ्या जर दुसरे पाऊल टाकीत नसेल तर मातेला का आनंद होईल? आपण सहाशे वर्षांत दुसरे पाऊल टाकले नाही. संतांनी वाळवंटांत सर्वांना जवळ घेतले. आपण मंदिरात सर्वांना घेऊ या. आपले हे वंशज असे कसे गतिहीन राहटे असे मनात येऊन संत तडफडत असतील, दु:खाने सुस्कारे सोडत असतील.

आपण का पूर्वजांच्यापेक्षा अधिक शहाणे असे कोणी विचारतात. आपण पुढच्या काळात असल्यामुळे आपणास पुढचे दिसते. बापाने लहान मुलाला खांद्यावर घेतले तर त्या लहान मुलाला बापापेक्षा अधिक दूरचे दिसेल. मुलगा जर बापाला म्हणेल, ''बाबा, ती तिकडून लॉरी येत आहे, दूर व्हा, मला दिसत आहे.'' तर बाप का

असे म्हणेल, ''गाढवा, मला शिकवतोस? मला दिसत नाही. तुला कशी दिसेल?'' आपण मागच्या पिढ्यांच्या खांद्यावर आहोत. आपण पुढचे पाहू शकतो. यात मागील पिढ्यांचा अनादर नाही. उलट पुढे न जाण्यात त्यांचा अनादर आहे. पायरीला नमस्कार करायला, परंतु तिच्यावर पाय ठेवून पुढे जायचे, उंच चढायचे. तेथेच घुटमळत नाही बसायचे. ती ती पिढी एकेक पायरी वर जात असावी. ध्येयमंदिराकडे जात असावी.

१९. काळाप्रमाणे बदल करा, नाहीतर मरा

आपण काळाप्रमाणे बदल करायला हवा. आजूबाजूची हवा पाहून वागावे लागते. तसे न करू तर मरू. थंडीचे दिवस आले तर आपण गरम पांघरू, उन्हाळ्याचे दिवस आले तर पातळ कपडे पेहरू. थंडीत उघडे बसू तर गारठून मरू. उन्हाळ्यात घोंगड्या पांघरू तर घामाघूम होऊन गुदमरून मरू. थंडीच्या दिवसांत कडक चहाचा घोट घ्याल. उन्हाळ्याचे दिवसांत थंड सरबत घ्याल. हवा बघून खाण्यापिण्यात. कपड्यालत्त्यातही आपण बदल करतो. मग डोक्यात नको का बदल करायला? १९४७ सालात वावरायचे आणि डोके का त्रेतायुगातील ठेवायचे? आज जगात नवीन विचारांची वादळे आहेत. समाजवादी क्रांतीचे नगारे वाजत आहेत. इन्किलाबची गर्जना होत आहे. समतेचा घोष होत आहे. अशा वेळेस तुम्ही आम्ही का शिवू नकोची तुणतुणी वाजवीत बसायचे? जरा काळ वेळ पाहा. आज सारी दुनिया जवळ येत आहे. सारे जग जणू तिमजली घर झाले आहे. अमेरिकेत काय बोलले जाते, काय होते, ते मुंबईत लगेच वर्तमानपत्राच्या कचेरीत आपोआप यंत्राने लिहिले जाते. दोन दिवसांत जवाहरलाल लंडनला गेले नि दोन दिवसांत पुन्हा दिल्लीला आले. २।। दिवसांत अमेरिकेत आता जाता येईल. अशा काळात आपण आहोत. बंधूंनो, दूर राहायचे हे दिवस नाहीत. डबकी करून बसण्याचे हे दिवस नाहीत. मोठी दृष्टी घ्या. विचारांत, आचारांत उदार दृष्टी आणा.

२०. यम नि नियम

धर्मांत दोन भाग असतात. यम नि नियम. यम म्हणजे कधी न बदलणारी शाश्वत सत्ये. खरे बोलावे, आत्मा अमर आहे, सर्वत्र आत्मतत्त्व पाहा– या तत्त्वांना यम

म्हणतात. ही तत्त्वे त्रिकालाबाधित असतात. प्रभू रामचंद्र, हरिश्चंद्र यांचा काळ असो. महात्माजींचा असो. त्याला सोडू नये हा निरपवाद सिद्धान्त आहे. यमात फरक कधी होत नाही. परंतु नियमात होत असतो. त्या त्या काळी समाजाला फरक करावे लागतात. चालीरीती बदलतात. लहानपणचे कपडे मोठेपणी अंगास येणार नाहीत. असे फरक आपण सदैव करीत होतो. म्हणून तर नाना स्मृती. श्रीशंकराचार्यांनी म्हटले आहे, ''अग्नी थंड आहे असे शेकडो श्रुती येऊन सांगू लागल्या म्हणून का प्रमाण मानायचे?'' पूर्वज फरक करणारे, बदल करणारे होते. स्वतंत्र बुद्धी वापरणारे होते.

२१. बंडखोर श्रीकृष्ण

एकदा एक शास्त्री मला म्हणाले, ''गीतेत 'तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते' असे म्हटले आहे. शास्त्राने सांगितल्यामुळे आम्ही अस्पृश्यता मानतो. दुष्टपणामुळे नव्हे.'' परंतु मी त्यांना म्हटले ''भगवान् जे शास्त्रप्रमाण सांगत आहेत ते तुमचे शिवाशिवीचे शास्त्र नव्हे. ते म्हणतात 'मया प्रोक्तं शास्त्रम्' मी जे शास्त्र तुला सांगितले ते प्रमाण मान. ते तर सारे बुरसटलेले धर्म झुगारून द्यायला सांगत होते.''

''सोडून सगळे धर्म एका शरण ये मज।।''

(सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज) असे ते म्हणत आहेत. ते वेदवादांचे धर्म त्यांना नको होते. श्रेष्ठकनिष्ठपणाचे धर्म त्यांना नको होते. समाजाच्या सेवेचे कोणतेही कर्म करणारा मुक्त आहे अशी त्यांनी महान शिकवण आहे. ''स्वकर्मकुसुमी त्यास पुजूनि मोक्ष मेळवी'' सेवेचे कोणतेही कर्म म्हणजे प्रभूची पूजा. श्रीकृष्णाच्या काळी ब्राह्मण, क्षत्रियांना वरचे स्थान होते. स्त्रियांना कमी मानू लागले होते. श्रीकृष्ण म्हणतात.

''स्त्रियो वेश्यास्तथाशूद्रस्तेऽपियान्ति परांगतिम्''

ते सर्वांना मोक्षाची दारे उघडीत आहेत. स्त्रिया, शेतकरी, कामकरी सर्वांना ते जवळ घेत आहेत. सेवेची जी जी कर्मे आपण कमी मानू लागलो ती ती भगवंतांनी स्वत: केली. राजसूययज्ञाच्या वेळेस धर्मराजा श्रीकृष्णास म्हणाला, ''देवा, तू कोणते काम करशील? येणाऱ्या थोरामोठ्यांचे स्वागत करशील?'' श्रीकृष्ण म्हणाला, ''नको. मी एक काम करीन. हजारो लोक जेवून उठतील. तेथे मी शेण

लावीन.'' पुरुष जेवून ओटीवर विडा चघळीत बसतात. बायका शेण लावतात. म्हणून का त्या तुच्छ? तर मग तेच काम मी करतो... आणि ते कर्म पवित्र आहे, थोर आहे असे जगाला दाखविती, असे श्रीकृष्ण मनात म्हणाले असतील. त्यांनी गायी चारल्या. गुराख्यांबरोबर ते जेवले, त्यांनी घोडे हाकले, त्यांचे खरारे केले. त्यांनी उष्टी काढून शेण लावले. महापुरुष सेवेची ती ती कर्मे पवित्र आहेत असे ती कर्मे स्वत: करून सिद्ध करतात. आपल्या महाराष्ट्राचे महर्षी सेनापती आहेत. त्यांचे दिव्य जीवन तुम्हाला माहीत आहे?

२२. सेनापतींचे पवित्र जीवन

१९०२ मध्ये त्यांनी जीवन हे देशार्थ म्हणून प्रतिज्ञा केली. १९०८ मध्ये ते हेरंब आणि मिर्झा तिथे बाँबविद्या पसरू लागले. पुढे अज्ञातवासात ते गेले. १९१३ मध्ये साडे चार वर्षांच्या अज्ञातवासानंतर ते प्रकट झाले. नगर जिल्ह्यातील आपल्या पारनेर गावी गेले. आणि तेथे सकाळी सहापासून दुपारी बारा वाजेपर्यंत ते भंग्याचे काम करू लागले. त्यांचे वडील तेथील प्रसिद्ध गणपतीच्या मंदिरातील पिढीजात पुजारी; लोकांनी वडिलांकडे तक्रार केली, ''तुम्ही गणपतीचे पुजारी; तुमचा मुलगा काय करतो बघा.'' वडिलांनी सेनापतीस सारे सांगितले. सेनापतींनी उत्तर दिले, ''बाबा, तुम्ही गणपतीच्या मूर्तीची पूजा करताना त्याची चौकट साफ करता. मी माझ्या गणपतीची चौकट साफ करतो. माझा गणपती केवळ मंदिरात नाही. तो सर्वत्र पसरलेला आहे. गावातील जनता म्हणजे माझा गणपती. त्या गणपतीची बैठक मी स्वच्छ करतो.'' थोर उद्गार! बंधूंनो, प्रभू तर सर्वत्र आहे. त्याच्या सेवेचे प्रत्येक कर्म पवित्र आहे. मी एकदा मागे एका गावी गेलो होतो. गटारे साफ होत होती. रस्ते स्वच्छ केले जात होते. मी चौकशी केली. तेव्हा कळले की गव्हर्नर येणार म्हणून साफसफाई. गव्हर्नर येण्यापूर्वी का गावात माणसे नव्हती? एकनाथांच्या मुलाने काशीहून गंगेची कावड आणली. तो पैठणला थांबला, पुढे रामेश्वरास तो जाणार होता. ती कावड तो रामेश्वरावर ओतणार होता. परंतु वाळवंटात तडफडणाऱ्या गाढवाला एकनाथांनी ती गंगा पाजली. मुलगा संतापला. परंतु त्याच्या स्वप्नात रामेश्वर येऊन म्हणाला, ''ती कावड मला पोचली.'' देव का फक्त वर काशीला आणि खाली रामेश्वरला होता?

मध्यंतरी हजारपंधराशे मैल का स्मशान होते? देव सर्वत्र आहे. त्याची सेवा करणे म्हणजे धर्म. सेवेची ती ती कर्मे पवित्र आहेत अशी श्रीकृष्णांची शिकवण.

२३. भंगी म्हणजे समाजाची आई

भंगी का तुच्छ? समाजाला स्वच्छतेच्या स्वर्गात ठेवणारा तो बंधू. तो का हीन दीन? त्याची आपण काळजी घ्यावी. त्याची सुस्थिती ठेवावी. त्याला मान द्यावा. भंगी म्हणजे समाजाची आई. आई लहान मुलाची वेटळी काढते. दात येत असले म्हणजे मुलास वरचेवर शौचास होते. आई सारे करते. किती खस्ता ती खाते. परंतु आपण का तिच्यावर बहिष्कार घालतो? ''माते, सारखे भंगीकाम करीत आहेस. तू बाहेर जा.'' असे का म्हणतो? का तिची सेवा पाहून सहस्र प्रणाम करतो?

२४. महात्माजी, सेनापती नि विनोबा

तुम्ही–आम्ही सेवाकर्मांना तुच्छ मानू लागलो की महापुरुष ती कामे हाती घेऊन ती पवित्र आहेत असे दाखवितात. सेवाग्रामला राहू लागल्यावर तेथील लोकांस महात्माजी म्हणाले, ''वाटेल तेथे शौचास नका बसत जाऊ'' परंतु कोण ऐकणार? शेवटी महात्माजी हातात पत्रा घेऊन झाडू घेऊन तेथे उभे राहात. ते म्हणाले, ''मी हुकूम करणारा नाही. सेवा करणारा आहे. 'चलेजाव'ची घोषणा करणारा महापुरुष हातात झाडू घेऊन उभा राहिला. तसेच सेनापती. बॉम्ब, पिस्तुल, तलवार हाती घेऊन ब्रिटिश सत्तेशी लढणारे सेनापती हातात झाडू घेऊन उभे राहतात. विनोबाजी रोज सकाळी एका गावात जाऊन भंगीकाम करतात. सेवामूर्ती आप्पासाहेब आज तेच करीत आहेत.त्यांनी मृत्य पशूही फाडून चामडे काढण्याचा धंदा पवित्र आहे, असे स्वत: करून दाखविले. मित्रांनो, ही सारी कर्मे पवित्र आहेत.

२५. ऋषीचा प्रणाम

समाजाची सेवा करणाऱ्या सर्वांना ऋषी उचंबळून प्रणाम करीत आहे. रुद्रसूक्तात ऋषी म्हणतो, ''कुंभारा, तुला प्रणाम; सुतारा, तुला प्रणाम, चांभारा, तुला प्रणाम,'' मी लहानपणी हे मंत्र शिकलो. मोठेपणी अर्थ कळू लागला. मी सुट्टीत गावी जाऊन शंकराच्या देवळात बसत असे. मला वेद शिकविणारे भटजी

"चर्मकारेभ्यो नमो"

चांभारा, तुला प्रणाम असे म्हणत शंकरावर अभिषेक करीत असत. मी त्यांना म्हणे, "तुम्ही चांभाराला प्रणाम करीत आहात. पंड्या चांभाराला आणू का मंदिरात?" ते रागावत. म्हणत 'तुला शिंगे फुटली.' मी म्हणे "तुम्ही म्हणता त्याचा असा अर्थ आहे. अर्थरूप होणे म्हणजे धर्म."

२६. ओठावरचा धर्म पोटात जावो

बंधुंनो, आपण मोठमोठी तत्त्वे बडबडतो. परंतु कृती मात्र उफराटी असते. ओठावरचा घास पोटात गेला नाही तर शरीर धष्टपुष्ट होईल का? त्याप्रमाणे जी तत्त्वे आपण बडबडतो ती कृतीत न आणू, जीवनात न आणू तर समाज समृद्ध होईल का? भगवान श्रीकृष्णांच्या या भूमीत आज सर्वत्र दुःख, दैन्य, दास्य आहे. त्यांच्या गोकुळात तर अपार आनंद होता.

२७. गोकुळाचा महिमा

गोकुळात प्रेमाचा पाऊस पडत होता. 'यारे यारे अवघे जण' अशी भगवंतांची हाक होती. तेथे भेदाभेदांची भुते नव्हती. भेदांचे वणवे श्रीकृष्णाने गिळून टाकले होते. नवीन पिढीच्या सर्व मुलांना त्याने एकत्र जेवायला बसवले. सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र मिसळून काला केला. त्याने अलग पंगती नाही बसवल्या. त्याचा पाट असा, त्याचा तिरका असला चावटपणा गोकुळात नव्हता. तेथे पेंद्याची भाकरी नि श्रीमंतांकडची पोळी एकत्र मिसळण्यात आली हाती. तो गोकुळातील काळ आठवा. आकाशातील देवांना त्याचा हेवा वाटला. आपापल्या बंगल्यात बसून अमृत भुरकून ते कंटाळले होते. ते वैभवाला, एकांडे शिलेदारपणाला कंटाळले. ते यमुनेच्या पाण्यातील मासे बनले. गोपाळबाळांच्या हातचे शितकण हात धुताना यमुनेच्या पाण्यात पडत ते मटकावून ते कृतार्थ होत. त्या एकेका शितकणात प्रेमाचा सागर होता, मधुरतेचा सिंधू होता. सर्वांना एकत्र जेववणारा कोठे तो गोपाळकृष्ण आणि अमक्यातमक्याकडे जेवला म्हणून बहिष्कार घालणारे आपण करंटे कोठे? कशाला रामकृष्णांची आपण नावे घ्यावी? कशाला ती नावे पवित्र मानता? मुलाबाळांना ठेवता? तो प्रभू रामचंद्र गुह कोळ्याला हृदयाशी धरी. शबरीची उष्टी बोरे खाई. जटायू पक्ष्याचे श्राद्ध करी.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

वानरांना, अस्वलांना जवळ घेई. आपण रामजन्म करतो, गोकुळ अष्टमीस कृष्णजन्म करतो. परंतु देव जन्मताच मरतो. आज भारतवर्षात देव नाही. जेथे भाऊ भावाची उपेक्षा करीत आहे, भाऊ भावाला शिवू नको म्हणत आहे, भाऊ भावाला जवळ घेत नाही, प्रेमाने कवळ देत नाही, पाणी देत नाही, तेथे कोठला धर्म?

२८. शंकराचे स्वरूप

आणि शिवशंकराची मूर्ती म्हणजे मला जणू अंत्यजाची मूर्ती वाटते. त्याच्या नेसू कातडे, हातात कपालपात्र, हाडांचे भांडे, अंगाला धूळ राख. कोणाचे आहे हे रूप? कोणाची मूर्ती? म्हणून महिम्न स्तोत्र रचणाऱ्याला ते दिसले. परंतु तुम्हा आम्हाला ते दिसले नाही. हरिजनांचा, सेवा करणाऱ्यांचा महिमा कळला नाही.

२९. दत्ताचे स्वरूप

आणि दत्ताची मूर्ती बघा! बरोबर कुत्री आहेत. कधी भणंग वेषाने हिंडत आहेत. त्याला भावार्थ लक्षात घ्या. देव सर्वत्र आहे. सर्व स्वरूपात आहे. तो बघा, माणसाला दूर नका करू. परंतु आपण सारे माणूसघाणे झालो.

३०. देवाजवळ तरी नम्र व्हा

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ‘‘देवांची भक्ती मनात असेल तर जातिव्यक्तीच्या नावाने शून्य कर.’’

‘‘तेथ जातिव्यक्ती पडे बिंदुले’’

परंतु देवासमोरही आपण जातीचे अहंकार मिरवितो. मुंबईहून मुलगा सुटाबुटात घरी यावा व एकदम आईला भेटायला जावा. आई म्हणेल, ‘‘तुझे खोगीर उतरून ये. तो जामानिमा ओटीवर काढून आत ये.’’ त्याप्रमाणेच ती जगन्माता म्हणेल, ‘‘अरे मी ब्राह्मण, मी मराठा, मी साळी, मी माळी हे बिल्ले छातीवर लावून माझ्याकडे येऊ नका. सारे विसरून या.’’ जेथे आपण सारा अहंकार विसरू असे एक तरी स्थान जगात असू दे. बैठकीत, बाजारात, कचेरीत तुझी ऐट आहे, घमेंड आहे. परंतु प्रभूसमोर तरी ती नको. तेथे धुळीतील कण हो. विरघळून जाणारे मातीचे ठिगळ हो, तेथेही अहंकार नेशील तर कसे व्हायचे?

३१. भेद दूर करा

तुकाराम महाराज म्हणतात:

जाळीन मी भेद । येथे प्रमाण तो वेद

मी सारे भेद झुगारीन. वेदांचा मला आधार आहे. आणि वेदांचा आत्मा त्यांच्याजवळ होता.

वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा
येरांनी वहावा भार माथां ।।

पोथ्यापुराणांची आझो दुसरे बाळगतील, घोकतील. परंतु त्यातील अर्थ आम्हा संतांजवळ आहे. भेदाभेद अमंगळ म्हणून ते म्हणतात. ज्या गावातील लोक परस्परांस प्रेम देणारे नाहीत, तेथे राहूही नये असे ते म्हणतात. जिकडे तिकडे त्यांना आत्मा दिसे. ''चल नारायण चल माझे घरी'', असे ते रस्त्यात भेटणाऱ्याला म्हणतात. सर्वत्र त्यांचा नारायण आहे. आपल्या सेनापतींचे असेच. मी एकदा पुण्यात त्यांना रस्त्यात भेटलो. त्यांनी माझा हात धरला. म्हणाले, ''चल जेवायला.'' मी म्हटले ''मी असा कसा येऊ.'' ''आपण असेल ते खाऊ.'' ते म्हणाले सेनापती मुक्त पुरुष आहेत. शर्वांना जवळ घेत आपण जाऊ या. कोठून आणलीत ही शिवाशिव? अद्वैताच्या या भूमीत का हे दुहीचे अपरंपार पीक? तुकाराम महाराजांनी एकाचा विटाळ माना म्हणून सांगितले आहे.

''छळीत जो खळ । त्याचा धरावा विटाळ''

जो कोणी दुष्ट छळीत असेल त्याला दूर उभे करा. परंतु त्यांचा तर आम्ही उदो उदो करीत असतो. काळाबाजार करून भावांना छळणाऱ्यांस गादीवर बसवितो. व्यापारी म्हणतात, ''आम्ही काँग्रेसला पाठिंबा देत आलो.'' काँग्रेसचे नाव काळाबाजार करून सर्वत्र तुम्ही बद्द केलेत. हेच का काँग्रेसप्रेम? लोक म्हणतात, ''काँग्रेसची राजवट, काळाबाजार कसा?'' हे शब्द ऐकून काळाबाजारवाल्या व्यापाऱ्यांना लाज वाटायला हवी. अशा दुष्टांचा वास्तविक विटाळ धरावा. लाचलुचपत खाणाऱ्यांचा, खोट्या साक्षी देणाऱ्याचा, दारूचे गुत्ते घालणाऱ्यांचा विटाळ धरावा. छळणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांचा, जमीनदारांचा, कारखानदारांचा, सावकारांचा विटाळ धरावा. परंतु समाजात त्यांना भाव, त्यांना स्थान आणि समाजाची सेवा करणाऱ्यांस मात्र दूर ठेवण्यात येते. हरहर म्हणे ते घाणेरडे आहेत.

बाबारे, तुझें कपडे स्वच्छ असतील. परंतु तुझा कोठा घाणेरडा आहे. सदैव तुला बद्धकोष्ठ. तुला पचत नाही. परंतु ते श्रमणारे राबणारे हरिजन. त्यांचे कोठे साफ आहेत. देहाची अंतशुद्धी त्यांच्याजवळच अधिक आहे आणि मनाचीही. कारण ते कुणाला लुबाडीत नाहीत. परंतु सफेद कपडे एवढीच ज्यांना स्वच्छता समजते, त्यांच्या अकलेचे दिवाळे निघाले असे समजावे.

३२. समानता धर्माचा आत्मा

समानता हा तर धर्माचा आत्मा. ख्रिस्ती मंदिरात सारे ख्रिस्ती जातात. मशिदीत सारे मुसलमान जातात. परंतु आपल्या मंदिरात सारे हिंदू जमू शकत नाहीत. सर्वांना येऊ दिले जात नाही. जेथे सारे जमू शकत नाहीत ते का देवाचे मंदिर? देवाजवळ सारे समान. ना कोणी बडा, ना छोटा; ना श्रेष्ठी ना कनिष्ठ. औरंगजेब एकदा शुक्रवारी नमाज पढायला उशिरा गेला. मशिदीत हजारो मुसलमान आधी आले होते. बादशहास पाहून सारे हटो हटो, जागा करून द्या म्हणून बोलू लागले. औरंगजेब संतापून म्हणाला, "कोणी हटू नका. जागच्या जागी बसा. येथे मी बादशहा नाही. तुम्ही प्रजा नाही. येथे एका अल्लासमोर आपण आहोत. मी उशिरा आलो आहे, दारात बसेन." मुसलमानी धर्मात ही समानता आहे. बाहेर कोणी अमीर असेल, फकीर असेल. परंतु मशिदीत तरी सारे समान. आपल्या देवळात आहे का ही स्थिती? तेथेही आपली भांडणे. श्रेष्ठकनिष्ठपणाचे वाद तेथेही सर्वांना प्रवेश नाही.

३३. काँग्रेस म्हणे सबगोलंकार करील

मागच्या निवडणुकीच्या पंढरपूरच्या भगिनीत काँग्रेस सबगोलंकार करील, तिला मत देऊ नका; मंदिरात महारामांगास घुसवील, तिला मत देऊ नका, असा प्रचार करण्यात आला. वास्तविक हिंदुमहासभाही अस्पृश्यता नकोच म्हणते. स्वातंत्र्यवीर सावरकर रत्नागिरीला असताना अस्पृश्यता नष्ट करीत होते. महाराष्ट्रात प्रथम संचारार्थ निघाल तेव्हा आधी सहभोजन करीत मग व्याख्यान, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. मुंजे, तात्यासाहेब केळकर, धर्मवीर भोपटकर सर्वांनी मागेच पंढरपूरचे मंदिर उघडावे म्हणून सह्या दिल्या आहेत. तात्यासाहेब तर १९१० पासून अस्पृश्यतानिवारण प्रतिपादीत आहेत. डॉ. मुंजे म्हणाले, "ब्राह्मणवस्तीत मी

हरिजनांस घरे देईन, परंतु परधर्मात जाऊ देणार नाही.'' हिंदुमहासभेचे असे मत असूनही वरील प्रचार केला. हुतात्मा श्रद्धानंद अस्पृश्यासाठी तडफडत. 'लिबरेटर' हे इंग्रजी साप्ताहिक त्यांनी सुरू केले. त्रावणकोर संस्थानात वैकोमच्या हरिजन सत्याग्रहात ते गेले होते. परंतु हिंदुमहासभेवर प्रेम करणाऱ्यांना स्वातंत्र्यवीर तरी कोठे पचत आहे? कोकणातील ब्राह्मण मंडळी घरीदारी घेताहेत का अस्पृश्यांना जवळ? आम्हांस काँग्रेस रुचत नाही; हिंदुमहासभा पचत नाही. म्हणजे ही मरणाची लक्षणे आहेत. काँग्रसला म्हणे मत नका देऊ. ती सबगोलंकार करील. सबगोलंकार यंत्राने कधीच केली आहे. एकाच गिरणीत ब्राह्मणापासून तो चांभारापर्यंत साऱ्या जातीचे लोक आहे. सारे धंदे बसले, नावाच्या जाती उरल्या, काप गेले, कानांची भोके राहिली. आज सारे सारे धंदे करीत आहेत. ब्राह्मणांनी कोणता धंदा करायला ठेवला आहे? आणि त्यात वावगे काय? लोकमान्य आपल्या मुलाला एकदा म्हणाले, ''चांभार झालास तरी चालेल. परंतु असे चांगले जोडे शिवीत जा की सारे तुझ्याकडे यावेत.'' कोणतेही कर्म अंतःकरणपूर्वक करा, ती प्रभूची, जनताजनार्दनाची पूजाच आहे.

३४. मातेची चार लेकरे

मी पंढरपूरला गेलो. तेथील बारीत हजारो भगिनींची सभा घेतली. त्यांना पुष्कळ गोष्टी सांगून शेवटी म्हटले, ''एखादी आई असावी. तिला चार मुले असावी त्यातील तीन मुले प्रेमाने आईजवळ बसली आहेत; परंतु ते भाऊ चौथ्या भावाला आईजवळ येऊ देत नाहीत. ''तू बाहेर तिकडे उन्हात उभा राहा. तू इकडे आलास तर दगड मारू'' असे ते म्हणत आहेत. तर आईचे हृदय कोणासाठी तडफडत असेल ह्याचे उत्तर द्या.'' भगिनी म्हणाल्या, गुरुजी, दूर असलेल्या लेकरांसाठी आई तडफडेल.'' तर मग देव का तुमच्याहून कमी प्रेमळ आहे? तो तर चंद्राहून शीतळ आहे. कारुण्यसागर आहे.'' नारद म्हणतात,

''स तु निरतिशय प्रेममयः''

तो प्रेमस्वरूप आहे. तुम्ही स्पृश्य त्या जगन्मातेजवळ प्रेमाने बसता. हरिजनास दूर ठेवतो. त्या विठाई माउलीस काय वाटेल? त्यांना का माझ्याजवळ जाऊ देत नाही असे नाही का त्या विश्वंभराला वाटणार? देवाची लेकरे देवाजवळ जाऊ देत. तुमच्या

मंदिराला मंदिरपणा येईल. तेथे तुमच्या अहंकाराची मूर्ती नसून प्रभूची मूर्ती आहे हे सिद्ध होईल.''

३५. माणसाला दूर करणाऱ्याजवळ देव नसतो

थोर कवी रवींद्रनाथ यांनी एक सुंदर गोष्ट कवितेत लिहिली आहे. एक पुजारी देजपूजेसाठी जात असतो. सावळा आहे तो. हातात पूजेचे ताट आहे. धूपदीप, फुले, उदबत्त्या, कापूर सारे आहे. आपल्या पाठोपाठ कोणी तरी येत आहे असे त्याला वाटते. तो मागे वळून बघतो. ''कोण रे तू? हो दूर. शिवाशिव, सावली पडेल. हो दूर. मी सोवळा आहे. हो दूर. तिकडे चालता हो.'' असे म्हणत तो मंदिरात येतो. परंतु त्याला मंदिरात देवाची मूर्ती दिसत नाही. ''करा रे हाका रे, वाजवारे नगारे, देवाची मूर्ती कोणी चोरली. धावा धावा.'' असे तो ओरडतो. चारी दिशांनी लोक येतात, धावतात. त्या पुजाऱ्याला ज्याला हिडीसफिडीस करून घालवलेले असते, त्याच्याजवळ सर्वांना मूर्ती दिसते. ''पकडा त्या हरामखोराला. तो बघा मूर्ती घेऊन जात आहे. केव्हा गेला मंदिरात? पकडा.'' असे म्हणून सारे धावतात. तो चोर सापडत नाही. ते थकतात. इतक्यात चोर अस्पृश्य होतो. कोठे कोठे गेला? पाताळात गेला की आकाशात? सारे वर खाली चोहोंबाजूस टकमक बघू लागतात. इतक्यात सारे चतुर्भुज सावळी मूर्ती त्यांना दिसते. ते लोटांगण घालतात. ''देवा, तू इकडे कोठे?'' ते विचारतात. ''मी तुमच्या मंदिरातून चाललो. त्या माणसाला 'हो दूर हो दूर' असे हा पुजारी म्हणत होता. त्या माणसात का मी नव्हतो? माणसाला दूर हो म्हणणारा देवालाच दूर हो म्हणत असतो. म्हणून मी चाललो.''

साने गुरुजी

३६. प्राणिमात्राची सेवा म्हणजेच प्रभूची पूजा

बंधूंनो, सर्वांत तुच्छ वस्तू म्हणजे माती, दगडधोंडा. त्या मातीची मंगलमूर्ती बनवून आपण तिच्यात आपण प्रभूचे सौंदर्य बघतो. दगडाची मूर्ती करून तिच्यात प्रभूला बघतो. मग या चैतन्यमय माणसात तो का पाहात नाही? वड पिंपळ पाहून, तुळस उंबर पाहून, तुम्ही नमस्कार करता. परंतु माणसाला का दूर लोटता? मानवाचा अव्हेर करणाऱ्याला कोठला देव?

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय सातारा

११५४१ दाखल नं. ____ ग्रंथानुक्रमांक ४८२६
किंमत २५.०० पाने २५६

३७. दुधाचा अभिषेक

लहानपणी मी देवदर्शने घेत शाळेत जायचो. मास्तरांनी छडी मारू नये म्हणून देवाच्या पाया पडून आम्ही जात असू. वाटेतच ही पाच देवळे होती. एके दिवशी गणपतीच्या मूर्तीवर आम्ही अभिषेक पाहिला. आईला घरी येऊन म्हटले, ''आई, आज गणपतीची चंगळ आहे. दुधाचा अभिषेक चालला आहे.'' ती म्हणाली, 'त्या जमीनदारांचा कोर्टात कब्जा चालू आहे. आपल्या बाजूने फैसला व्हावा म्हणून दुधाचा अभिषेक त्यांनी चालविला आहे.'' बंधूंनो, देवावर दुधाचा अभिषेक. परंतु घरच्या गायी-म्हशींची जो सेवा करतो, जो दिवसभर घरी काम करतो, त्या गड्याने जर सायंकाळी जाताना ''वैनी, चूळकाभर वाईच ताक देताव काय'' असे विचारे तर ''रोज रोज रे कोठून ताक?'' असे सांगण्यात येते. तो दुधाचा अभिषेक देवाला पोचेल का? माणसाला द्याल ते देवालाच पोचते. गाढवास गंगा पाजली, ती रामेश्वराला पोचली.

३८. वहिनी, तुमच्याकडे पोटभर जेवतो

आमच्याकडे लहानपणी गोपाळ गडी कामाला येई. तो ज्या दिवशी कामाला येई, त्या दिवशी आम्ही मोठी पत्रावळी त्यांच्यासाठी लावून ठेवीत असू. गोपाळाला तीन निठळ्यांचा भात लागे. आम्ही त्याला म्हणायचो, ''गोपाळ, किती जेवतोस.'' तो माझ्या आईला म्हणे, वहिनी, तुमच्याकडे येतो, त्या दिवशी पोटभर जेवतो.'' बंधूंनो, भावाबहिणीस उपाशी ठेवून, दूर ठेवून, तुच्छ मानून, देव मिळत नाही. स्वराज्यही नाही. ना स्वाराज्य, ना स्वराज्य. देवाचे राज्य नाही, येथलेही नाही.

३९. मातेची सेवा म्हणजे बंधुभाव

तुम्ही आपल्या आईला पैठणी आणलीत, परंतु भावंडांना वारभरही कापड आणले नाहीत तर आईला काय वाटेल? ती म्हणेल, ''मला रे कशाला? या लेकरांना का उघडी ठेवू? आधी त्यांना आणा रे कापड.'' आपण जयहिंद म्हणतो. वंदे मातरम् म्हणतो. जयहिंद म्हणजे ४० कोटी लोकांचा जय, वंदे मातरम् म्हणजे काय? तुम्ही कोट्यवधी बंधूंस दूर ठेवून आईला प्रणाम केलात तर तो आईला पोचेल का? तिला

रुचेल का? म्हणून रवींद्रनाथ म्हणाले, ‘‘वंदे मातरम् पुरे, वंदे भ्रातरं म्हणा. बंधुभाव आणा; भावांना जवळ घ्या. त्यांची प्रतिष्ठा वाढवा. यातच खरे आईचे समाधान.’’

४०. धर्म जोडतो, तोडीत नाही

धर्म हा जोडणारा असतो. तोडण्यासाठी तो नसतो. समाजाची धारणा ज्याने होते तो धर्म कोकणात घराचा जो आधारभूत खांब, आधारभूत तुळस, त्याला धारणा म्हणतात. धारणाची पूजा करतात, आंब्याचे टाळे बांधतात. कारण सारे घर त्यावर आधारलेले. धर्म म्हणजे सर्वांचा आधार. परंतु ज्या समाजात कोट्यवधी लोक दूर फेकलेले आहेत. तेथे का धारणाप्रधान धर्म शिल्लक आहे? तो समाज धर्महीन आहे. शतखंड झालेला तो असणार.

४१. हरिजनांस मशिदीत आधार

पूर्वखानदेशातील जळगाव शहरातील काही हरिजन एकदा मला म्हणाले, ‘‘गुरुजी, आम्ही रात्री कोठे झोपतो ते माहीत आहे? आम्हाला राहायला खोली मिळत नाही. शेवटी मुसलमान बंधूंच्या मशिदीत आम्ही झोपतो. तेथे जागा मिळते. दीड रुपया महिना मशिदीला आम्ही भाडे देतो. परंतु स्पृश्य हिंदू काय करीत आहेत?’’ त्यांचे शब्द ऐकून मला वाईट वाटले. आमच्यातील काहींना मुसलमानांचा राग येतो. परंतु आमच्या अस्पृश्य बंधूंस तेच आधार देतात. त्यांच्याच हॉटेलात, खानावळीत त्यांना जेवण मिळते. त्यांची मशीद तरी कृतार्थ झाली. तेथे तरी देवाची लेकरे देवाजवळ झोपली. परंतु जळगाव शहरात बळीराम मंदिर, विठ्ठल मंदिर कितीतरी असतील. रात्री देवाची एकटी मूर्ती तेथे असेल. परंतु आम्ही निराधार बंधूंनो येथे येऊन झोपा असे म्हणणार नाही. हरिजन मंदिरात आले तर यांची मंदिर बाटतील.

४२. मानवाहून पशूपक्षी तुम्हाला प्रिय

एकीकडे आमचे शास्त्रीपंडित, कीर्तनकार, प्रवचनकार चौऱ्यांशी लक्ष योनींनंतर मनुष्यजन्म मिळतो म्हणून सांगत असतात. हल्लीचे शास्त्रज्ञही तेच सांगतात. हळूहळू वाढत उत्क्रान्त होत शेवटी माकडांतून मनुष्य आला. परंतु साऱ्या

मानवेतर योनी आम्हाला घरी चालतील. घरात उंदीर वावरतात, मांजर खेळते, घरात ढेकूण, डास, पिसवा, पाली, घुशी सर्वांचे राज्य असते. तेथे पोपट असतो. कुत्रा बसतो. तेथे वासरे असतात. या पशुपक्ष्यांनी घर बाटत नाही. घरात ढेकूण आहेत म्हणून घर बाटले यासाठी घर कोणी सोडीत नाही.तोंडत पेरूची फोड धरून पोपटासमोर जाऊन "पोप्या घे" असे म्हणणारे लोक मी पाहिले आहेत. कुत्र्यांना आंघोळी घालून साबण लावून, पानाजवळ त्यांचे ताट मांडणारे लोक मी पाहिले आहेत. पोपट, कुत्रे यांच्यावर प्रेम करणाऱ्यांनो, आपल्या भावांवर प्रेम करायला कधी शिकणार?

४३. एक मुसलमान माता

आपण हरिजनांना मंदिरात घेत नाही म्हणून काही मुसलमानांसही वाईट वाटते. माझ्या या प्रचाराच्या खर्चासाठी मुसलमानांनीही मदत केली आहे. मोरवाडा येथे दोन-तीनशे रुपये मुसलमानांनी दिले. मोरवाड्यास १०५ वर्षांची एक मुसलमान माता होती. माझा मित्र तिच्याकडे गेला व म्हणाला, "अम्मा, माझे गुरुजी उपवास करणार आहेत. हरिजनांना पंढरपूरच्या मंदिरात जाता यावे म्हणून ते सर्वत्र प्रचार करीत हिंडत आहेत." ती माता म्हणाली, "आमच्या मशिदीत सारे मुसलमान येतात. तुमच्या मंदिरात सारे का नाही घेत? गुरुजी कहता है वह बात सच्ची हैं" त्या मातेने ५१ रुपये देणगी दिली. मी तिच्या पाया पडलो व म्हटले "अम्मा, मला दुवा दे. आशीर्वाद दे." ती वृद्ध माता म्हणाली, "बेटा, तेरा काम हो जायेगा." तिने मला जवळ घेतले. माझ्या डोळ्यात अश्रू आले. बंधूंनो, मुरबाड, डोंबिवली, अनेक ठिकाणी मुसलमानांनी, पठाणांनीही मदत दिली. तुमची हृदये कशी कठोर? दुसरेही तुमचा धर्म उदार व्हावा म्हणून प्रचारार्थ साहाय्य करतात. आणि तुम्ही का अनुदार राहाणार? हरिजनांना दूर लोटणार?

४४. बोहऱ्याने इमारत दिली

अमळनेला माझ्या मित्रांनी हरिजन विद्यार्थ्यांचे लहानसे छात्रालय चालविले आहे. परंतु कित्येक वर्षे नीट जागा मिळेना. काही महिन्यांपूर्वी एका बोहरी व्यापाऱ्याने

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सा...

एका मुसलमान बंधूने इमारत दिली. तुम्हा आम्हांस लाज वाटावी. कोट्यवधी हरिजनांस तुमच्याविषयी का प्रेम वाटावे?

४५. अस्पृश्यांना जणू कापून दूर फेकलेत

नौखालीत हिंदू मारले गेले. तुम्ही मुसलमानांवर संतापता. परंतु तुम्ही तुमच्या कोट्यवधी अस्पृश्य बंधूंना एका प्रकारे कापून दूर फेकले आहे. आंब्याचा काप काढावा, त्याप्रमाणे त्यांचा तुकडा करून तुम्ही त्यांना दूर फेकले आहे. एखाद्याने डोके उडवले तरी मी ते सहन करीन. परंतु तुम्ही हरिजनांचा आत्मा मारला आहे. त्यांचे मन मारलेत बुद्धी मारलीत, स्वाभिमान मारलात. हे घोर पाप आहे.

४६. आम्ही करवंटीतूनच पाणी पिणारी

एकदा उन्हाळ्याच्या सुट्टीत मी बोर्डीस होतो. दुपारी १०-११ च्या सुमारास भंग्याची एक मुलगी माझ्याकडे येऊन म्हणाली, "दादा पाणी वाढा." तिने करवंटी पुढे केली. मी तिला म्हटले, "करवंटी फेक. हात धू. ये. या तांब्याच्या भांड्यातून पाणी पी."ती पिईना. मी तिला समजावले. शेवटी ती पाणी प्यायली. आपण करवंटीतूनच पाणी पिणारी असे त्यांना वाटते. त्यांच्या रोमरोमी आपण गुलामी खिळविली आहे. तुम्हाला असे कोणी अंगणाच्या टोकाला उभे राहून करवंटीत पाणी पाजले तर? तुम्हाला काय वाटेल? अरे आत्मा सर्वांमध्ये आहे.

४७. धर्माचे सार

समर्थ म्हणाले:

आपणास चिमोटा घेतला । तेणे जीव कासावीस झाला
आपणांवरून दुसऱ्याला । ओळखीत जावे

मला कोणी चिमोटा घेतला तर मला दुःख होते, तसे दुसऱ्यांस चिमोटा घेता तर त्यालाही होते, हे ओळखणे म्हणजे धर्म. स्वतःला दुसऱ्याच्या स्थितीत घालून पाहा. म्हणजे त्यांची वेदना तुम्हांस कळेल.

४८. विवेकानंद रडले

विवेकानंदाहून गेल्या शतकात हिंदुधर्माचा थोर उपासक दुसरा कोण झाल? अमेरिकेत हिंदुधर्माचा त्यांनी विजयध्वज फडकावला. तो इतिहास वाचून आमच्या अंगावर मूठभर मांस चढते. परंतु तुमची शिवाशिवी का जगासमोर त्यांनी मांडली? तुमच्या धर्मातील उदात्त तत्त्वे त्यांनी दुनियेसमोर ठेवली. परंतु हिंदुधर्मातील दिव्यता जगाला सांगणारे विवेकानंद हिंदुधर्मातील अनुदारता पाहून एके दिवशी रडले. मित्रांनी विचारले, ''स्वामीजी का रडता?'' ते म्हणाले, हिंदू लोकांनी आपल्याच बंधूंना पशूच्या स्थितीत नेऊन ठेवले आहे. त्या पार्थसारथीच्या या देशात केवढे हे पाप?या लोकांना मी कसे वर आणू? म्हणून मी रडत आहे.'' बंधूंनो, विवेकानंदांची ही वेदना तुम्हाला कळते का? रामतीर्थ एकदा म्हणाले, ''आमच्या धर्माला 'शिवू नका' हे नाव द्यावे.'' त्या रामतीर्थांच्या उद्‌गारातील तीव्र दुःख तुम्हाला कळते का? वाईच्या प्राज्ञ पाठशालेतील थोर आचार्य नारायणशास्त्री मराठे, आज त्यांनी केवलानंद हे नाव घेतले आहे. थोर ब्रह्मचारी. विनोबाजी त्यांच्या पायाजवळ शिकले. माझा एक बाबा फाटक त्यांच्याजवळ शिकत होता. तो त्यांना म्हणाला, ''देव मिळावा म्हणून हिमालयात जावे असे वाटते.'' ते म्हणाले, ''हरिजनांची सेवा कर. त्यांच्या मुलांची ढुंगणे धू. तुला देव भेटेल.'' त्यांना का धर्म कळत नाही? धर्मासाठी, राष्ट्रासाठी त्यांना निदिध्यास. १९३१ मध्ये वाटोळ्या परिषदेच्या वेळेस लंडनमध्ये आमच्या पुढाऱ्यांचे आपसात जमेना. जगासमोर या देशाचे धिंडवडे होते. एके दिवशी नारायणशास्त्री जेवताना रडत होते. मुलांनी विचारले, ''आचार्य, अश्रू का?'' ते म्हणाले, ''भारताचे लंडन येथे चाललेले धिंडवडे वाचून डोळे भरून येतात. सुचत नाही.'' अशा नारायणशास्त्र्यांना का धर्म कळत नाही? आणि महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री, श्री. कोगजेशास्त्री, महामहोपाध्याय काणे सारे सांगतात की, अस्पृश्यता धर्माविरुद्ध आहे. श्री संत तुकडोजी महाराज, श्री गाडगेबुवा सारे अस्पृश्यता दूर करा सांगतात. श्री. तुकडोजी महाराज म्हणाले, ''हरिजनांना मंदिर उघडेपर्यंत मी मंदिरात जाणार नाही.'' असे तुम्हाला कोण धर्म शिकवणार? महात्माजींहून सत्याचा पुजारी कोणता आणायचा? त्यांचे श्वासोच्छ्वास म्हणजे वेद; त्यांचे बोलणे-चालणे म्हणजे शास्त्र; म्हणजे गीता. थोर महात्मे तुम्हाला हरिजनांना जवळ घ्या सांगत आहेत. आता अंत पाहू नका. अंत बघाल तर तुमचा अंत होईल.

४९. चोखामेळा

तो थोर भक्त चोखोबा. देवाच्या दर्शनासाठी तळमळणारा. ध्यानीमनी त्याला देव दिसतो आहे. त्याला स्वप्न पडते. विठाई माउलीने आपल्याला जवळ घेतले आहे. प्रभू आपल्या गळ्यातील तुळशीचा हार आपल्या घालीत आहे, असे त्याला दिसते. सासरहून मुलगी माहेरी यावी, आईने तिला जवळ घेऊन स्वत:च्या गळ्यातील हार तिच्या गळ्यात घालावा. तसे चोखोबाला दिसते. ''माझ्या गळ्यात देवाने हार घातला.'' असे आनंदाने मस्त होऊन तो सांगत सुटतो. बडवे त्याला मारतात. त्या चोंखोबाची वेदना कोण ओळखणार?

''ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा
काय भुललासी वरलिया सोंगा''

असे तो पुकारतो. परंतु आम्ही सारे बहिर्दृष्टी. हृदयाची श्रीमंती कोण ओळखणार?

५०. पंधरा हजार अस्पृश्य वारकरी

पंढरपूरला आषाढी कार्तिकीला पंधरा हजार अस्पृश्य वारकरी असतात. विठ्ठल विठ्ठल म्हणत शेकडो मैल पायी चालत येतात. खानदेश, वऱ्हाडकडून येतात. मद्यमांसास शिवत नाहीत. गळ्यात तुळशीची माळ. त्यांची घरे स्वच्छ असतात. त्यांच्या मुलींची नावे ऐका. एकादशी, तुळशी, गीता अशी त्यांच्या मुलींची नावे. पांढरपेशा मंडळींत मुलींचे नाव एकादशी ठेवल्याचे एक तरी उदाहरण आहे का? लीला, चंपू वगैरे तुमची नावे आहेत. परंतु एकादशी नाव ठेवणाऱ्या लोकांच्या मनात केवढी निष्ठा असेल! आाणे अशा निष्ठावंत भक्तिप्रेममय हजारो लोकांना मंदिरात प्रवेश नाही. बिचारे येतात. फक्त कळसाचे दुरून दर्शन घेऊन जातात. त्यांची वेदना कोणास कळणार? त्या विठ्ठलास काय वाटत असेल?

५१. विठोबास शुद्ध करतात

हरिजन देवळात गेले तर म्हणे देव बाटेल. हरिजन जवळ यावेत म्हणून देवाचे हृदय फाटत असेल. चोरून एखादा अस्पृश्य गेला असला तर? असे मनात येऊन बडवे

मंडळी यात्रेनंतर देवाला शुद्ध करतात? पवमानाचा अभिषेक करतात, हसावे की रडावे कळत नाही. अरे देवाला का कोणी शुद्ध करायचे? तो पतितपावन. तो सर्वांना शुद्ध करणारा. त्याला हे पुजारी शुद्ध करून घेतात. देवालाही शुद्ध करणारे हे जणू दुसरे महादेव! नळावरून बादली भरून आणून गंगेला शुद्ध करण्यासारखे हे हास्यास्पद आहे.

५२. देवाच्या रस्त्याने जाऊही देत नाही

भोर संस्थानात पालीला गणपतीचे मंदिर आहे. मंदिराकडे जाणाऱ्या एका रस्त्याने हरिजनांना जाऊही देत नाही. तुम्ही का आकाशातून पडलेत? एवढा माणूसघाणेपणा करून का धर्म मिळतो, देव मिळतो? साऱ्यांना एके दिवशी मरायचे आहे. मातीत जायचे आहे. कशाला अहंकार?

५३. मरणाचे स्मरण ठेवा

एका भांडखोर माणसाने एकदा एकनाथांस विचारले, "तुम्ही कसे शांत असता? अमच्याजवळ तिळभरही शांती नसते." नाथ म्हणाले, "ते सारे जाऊ दे. तू आठ दिवसांनी कदाचित देवाघरी जाशील." काय मी मरणार? आठ दिवसच राहिले?" असे म्हणून तो मनुष्य घरी गेला. शेजाऱ्यापाजाऱ्यांची तो क्षमा मागू लागला. ज्यांच्या ज्यांच्याजवळ तो भांडला होता, ज्यांना ज्यांना त्याने तुच्छ मानले होते, त्या सर्वांची त्याने क्षमा मागितली. बायकोची क्षमा मागतो. उगीच मारले म्हणून मुलांच्याही जवळ क्षमा मागतो. एके दिवशी नाथ त्यांच्यांकडे आले, त्या माणसाने विचारले, "आली का वेळ? भरली का घटका?" नाथ म्हणाले, "ते मला काय माहीत? परंतु हे तुझे आठ दिवस कसे गेले? कितीजणाजवळ भांडलास?" तो म्हणाला, नाथ, कसले भांडण नि काय? समोर सारखे मरण होते. सर्वांची क्षमा मागत होतो. "नाथ म्हणाले, "आम्ही नेहमी मरणाचे स्मरण ठेवतो. सर्वांना प्रेम देतो. कशाला अहंकार? भंडणे?" बंधुंतो, हरिजनांना दूर ठेवून तुच्छ तुम्हाला का मोक्ष मिळणार आहे? स्वत:ला उच्च मानता, परंतु दुसऱ्यास तुच्छ मानून स्वत:ला उच्च समजणाऱ्यास गीतेने आसुरी म्हटले आहे.

५४. फक्त उच्चवर्णीयांसाठी

मुंबईच्या मुंबादेवीच्या मंदिरावर फक्त स्पृश्यांसाठी अशी पाटी आहे. निर्मळ येथील शंकराचार्यांच्या समाधीच्या मंदिरावर असेच मागे लिहिलेले असे. हल्ली पुसलेले आहे. ज्या शंकराचार्यांनी अद्वैत शिकविले ते शंकराचार्य हा क्षुद्र पसारा पाहून, हा भदांचा बुजबुजाट बघून रडत असतील. घरांवरून फक्त उच्चवर्णीयांना भाड्याने देणे अशा पाट्या असतात. हाटेल, खानावळी यांवरही अशा पाट्या असतात. तुम्ही सारे आज गुलाम आहात. साऱ्या जगात अस्पृश्य झाला आहात. एडिंबरो येथील हॉटेलवर ''कुत्र्यांना आणि हिंदी लोकांना मज्जाव'' अशा पाट्या असत.

५५. तुमची पापे फळत आहेत

आपण पेरले त्याचे फळ भोगीत आहोत. आपण स्वतःच्या बंधूंस गुलाम केले. साऱ्या जगात आज आपण गुलाम अहोत. आपण अस्पृश्यांना महारवाड्यात दूर ठेवले. आज दक्षिण आफ्रिकेत साऱ्या हिंदी लोकांना तेथील गोरे लोक महारवाड्यात राहा म्हणत आहेत. गोरे म्हणतात, ''आमच्या वस्तीत तुम्ही नाही राहाता कामा; आमच्या बाजारात तुमचा बाजार नका मांडू.'' आम्हाला राग येतो. अमेरिकेतील सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या सभेपुढे दक्षिण आफ्रिकेत हिंदी लोकांवर होणाऱ्या अन्यायाची बाजू मांडण्यासाठी विजयालक्ष्मी पंडित गेल्या. न्यायमूर्ती छगला गेले. पंडित जवाहरलाल नेहरूंनी हे शिष्टमंडळ पाठविले. जगाच्या न्यायासनासमोर हिंदी प्रतिनिधींनी दक्षिण आफ्रिकेवर फिर्याद लावली. परंतु दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांचा पुढारी म्हणाला, ''आम्ही बोलून चालून परके. तुमची आमची भाषा एक नाही. धर्म, संस्कृती, चालरीत सारे निराळे, आम्ही गोरे तुम्हाला निराळे राहा म्हणून सांगतो, तुम्ही रागावता. तुमच्या नाकाला मिरच्या झोंबतात. तुम्ही आमच्यावर ताशेरे झाडता, शिव्याशाप वाहता. परंतु तुमच्या पायाखाली काय जळत आहे ते पाहा. तुम्ही तुमच्या अस्पृश्य बंधूंना कसे वागविता? त्यांना विहिरीवर पाणी तरी भरू देता का? भाड्याने घर देता का? देवाजवळ तरी त्यांना जाता येते का? खानावळीत, हॉटेलात त्यांना सन्मानाने बसता येते का? कोट्यावधी स्वतःच्या बांधवांस तुम्ही गुलाम जणू केले आहे आणि आमच्यावर तोंडसुख घेता?'' बंधूंनो, स्मटस् साहेबांस काय उत्तर द्याल?

५६. गुळमुळीत उत्तर

विजयालक्ष्मींनी गुळमुळीत उत्तर दिले, ''आम्ही अस्पृश्यता हे भूषण मानीत नाही, ती लवकर जावी म्हणून आमची खटपट आहे. काँग्रेस मंत्रिमंडळे कायदे करीत आहेत, परंतु तुम्ही तर दक्षिण आफ्रिकेत कायदा करून आम्हीच असेच वागणार असे दिमाखाने सांगत आहात.'' असे उत्तर देण्यात आले. परंतु या उत्तराने समाधान नाही होत. त्या गोऱ्याला असे जर सांगता आले असते की, ''चल हिंदुस्थानात, हिंडूनच बघ गावन् गाव. सर्वत्र समता आहे. अस्पृश्यता नावालाही नाही.'' तर किती छान झाले असते, भारताची मान उंच झाली असती.

५७. राष्ट्राची मान खाली आहे

परंतु आज राष्ट्राची मान खाली आहे; महात्माजींची मान खाली आहे. कशाला आपण जगतो? आपल्या आचरणाने देशाची मान जे खाली करतात ते देशद्रोही आहेत. आपण सारे देशद्रोही आहोत. येथील अन्न आपण खातो, तेथील हवा घेतो, पाणी पितो, परंतु देशाची मान खाली करतो. या देशात जगायचा तुम्हा आम्हांस काय अधिकार?

५८. डॉ. आंबेडकर जगासमोर जाणार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''मीही जगातील राष्ट्रांच्या प्रतिनिधींसमोर जाऊन अस्पृश्यांना कशी वागणूक मिळते ते सांगतो.'' वर्तमानपत्रात हे ज्या दिवशी आले त्या दिवशी मी अत्यंत दुःखी झालो. परंतु एक गृहस्थ मला वर्तमानपत्र हातात धरून म्हणाले, ''गुरुजी,हे आंबेडकर आता युनोपुढे जाणार.'' तो मनुष्य हसून म्हणाला. माझे हृदय रडत होते. साऱ्या देशाचे हसे होणार होते. त्या गृहस्थाला त्याचाही आनंदच वाटत होता! स्पृश्य हिंदूंनी एका दिलाने उठून डॉ. बाबासाहेबांस म्हटले पाहिजे होते, ''बाबासाहेब, झाले गेले विसरा. परंतु जगासमोर जाऊ नका. हिंदुस्थानचे नकोत धिंडवडे. ही घ्या सामाजिक समता. येऊ देत सारे मंदिरात. येऊ देत घरीदारी. या सारे विहिरीवर, तळ्यावर. या सारे हॉटेलात, खानावळीत. आपण भाऊ भाऊ होऊ. प्रेमाने राहू.'' परंतु असे कोण म्हणतो? आपणास हृदयच राहिले नाही.

५९. राजकीय मतभेद निराळे

आणि अस्पृश्यता राजकारणासाठी दूर करायची असे नाही. हरिजनांचे एखादे बोर्डिंग काढून त्यांना काँग्रेसचे सभासद करायला नका जाऊ. गांधी सप्ताहात झाडू मारून त्यांना तेवढ्या भांडवलावर तिरंगी झेंड्याखाली आणण्याची धडपड नका करू. राजकीय मतभेद ही निराळी गोष्ट आहे. हिंदुमहासभा व काँग्रेस यांचे राजकीय मतभेद आहेत. परंतु ते का एकमेकांस अस्पृश्य मानतात? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राजकीय मते निराळी असतील, परंतु म्हणून का अस्पृश्यता नष्ट नाही करायची? अस्पृश्यता हा सामाजिक, धार्मिक अन्याय आहे. हा तत्काळ नष्ट केलाच पाहिजे.

६०. आपण एक सत्ता ओळखतो

आपण बंधुभाव ओळखीत नाही. धर्माचा आत्मा जाणत नाही. मानवतेशी आपण पारखे झालो आहोत. आपण सत्ता ओळखतो. दंडुक्यासमोर मान लववितो. मुसलमान बंधू तुमच्या विहिरीवर पाणी भरू शकतात. तुमच्या ओटीवर बसतात. तुम्ही त्यांना प्रेमाने सुपारीपान देता. परंतु हरिजन मात्र तुम्हाला चालत नाही. तुम्ही मुसलमानांस येऊ देता, हे चांगले आहे. परंतु त्यांनाही हा हक्क तुम्ही प्रेमाने दिलेला नाही. मुसलमान येथे शेकडो वर्षे राज्यकर्ते होते. त्यांनी तो हक्क मिळविला. सत्तेसमोर तुम्ही वाकलेत.

६१. लिनलिथगो

त्या लिनलिथगोला अहमदाबादच्या एका प्रख्यात वैष्णव मंदिरात चांदीच्या चौरंगावर बसविण्यात आले. ज्या लिनलिथगोच्या कारकिर्दीत हजारो लोक गोळीबारात ठार झाले, चिमुरे झाली, बंगालमध्ये लाखो लोक किड्यामुंगीप्रमाणे दुष्काळात मेले, ज्याच्या कारकिर्दीत महात्माजींची उपवासात नाडी सुटली होती, आणि बरे वाईट झाले तर त्यासाठी ज्याने चंदन आणून ठेवले, तीन दिवस देशाला ती बातमीही कळू नये म्हणून ज्याने बंदोबस्त केला होता, परंतु ती बातमी आलीच तर हिंदुस्थानला तत्काळ कळावी म्हणून ढाळीत ज्याच्या कारकिर्दीत जयप्रकाश बुलेटिन लिहून ठेवीत होते, असा तो लिनलिथगो! परंतु त्याला आमच्या मंदिरात

चांदीच्या चौरंगावर बसविण्यात आले. त्याच्यावर चौऱ्या धारण्यात आल्या! दक्षिणेकडच्या अनेक मंदिरांतून शेकडो साहेब गेले. त्यांनी खांबांचे, देवांचे फोटो घेतले. परंतु भक्तिभावाने येणारा हरिजन! त्याला तेथे मज्जाव! हा का धर्म?

६२. अनुदारपणामुळे संकट

धर्मवीर विश्वासराव डावरे मला म्हणाले, ''तुमच्या उपवासाने हिंदुधर्मावर संकट येत आहे. तुम्ही गुजराथेत जा उपवास करायला. डाकूरचे मंदिर उघडायला जा. येथे का?'' मी त्यांना म्हटले, ''मी महाराष्ट्रातला आहे म्हणून येथे उपवास. संतांनी गुजराथी भाषेत लिहिले नाही म्हणून का त्यांना नावे ठेवाल? ज्ञानेश्वर, तुकाराम येथे होते. त्यांनी येथल्या लोकांसाठी लिहिले. गुजराथची अब्रू गुजराथी सांभाळतील. हिंदुधर्मावर मी नाही संकट आणीत. तुमचा अनुदारपणा आणीत आहे.'' बंधूंनो, आपण आपल्या अनुदारपणाने हिंदू धर्माची अपार हानी केली आहे. कोट्यवधी लोक आपण घालवून बसलो. गेल्या शंभर वर्षांत कोटी दीड कोटी लोक ख्रिस्ती धर्मात गेले. का? तुमच्या आमच्या अनुदारपणामुळे. नाशिकजवळ शरणपूर म्हणून वसाहत आहे. ख्रिश्चन धर्मास शरण गेले त्यांची ही वसाहत. ते नाव ऐकूनच मान खाली होते.

६३. काश्मीरातील सत्यकथा

पंडित जवाहरलालांनी ''भारताचा शोध'' म्हणून एक महान ग्रंथ नगरच्या किल्ल्यात असताना लिहिला. त्या पुस्तकात पुढील सत्यकथा त्यांनी दिली आहे. जवळजवळ पाऊणशे वर्षांपूर्वीचीच गोष्ट. काश्मीरातील मुसलमानांचे पुढारी महाराजांना जाऊन म्हणाले, ''आम्ही मूळचे सारे हिंदू रजपूत, आम्हाला पुन्हा हिंदू धर्मांत घ्या.'' महाराजांनी काशीच्या पंडितांना शास्त्रार्थ विचारला. पंडित म्हणाला, ''अब्रह्मण्यम्'' लाखो बंधू तुम्हाला पारखे झाले. तुमच्या संकुचितपणाचे फळ.

६४. नौखालीतील धडा

नौखालीत प्रथम स्पृश्य हिंदू मारले गेले. नंतर अस्पृश्यही. आपण एकाच बोटीत बसलो आहोत हे मागून जिवंत असणाऱ्यांस कळले. स्पृश्य अस्पृश्यांच्या मदतीसाठी

गेले नाहीत, अस्पृश्य स्पृश्यांसाठी गेले नाहीत. दोघे मारले गेले. आज त्यांचे डोळे उघडले आहेत. ''टाईम्स'' लिहितो, ''पूर्व बंगालमध्ये आज अस्पृश्यता राहिली नाही.'' आधारगृहांतून स्पृश्यास्पृश्य एकत्र जेवत आहेत. हरिजन भगिनींच्या हातचा स्वयंपाक भद्रलोकांना चालत आहे. कलकत्त्याच्या सव्वीस शास्त्रीपंडितांनी पत्रक काढले. ''आजपर्यंत अस्पृश्यता ठेवली. पाप केले. यापुढे अस्पृश्यता नको. अस्पृश्य बंधूंस घरी दारी, मंदिरात, तळ्यावर, विहिरीवर सर्वत्र येऊ दे.'' भद्र लोकांचे डोळे उघडले. एका आर्य समाजी प्रचारकाने म्हटले, ''शंभर वर्षे आर्य समाज जे सांगत आला ते नौखालीतील हत्याकांडाने पटले.'' नौखालीच्या हत्याकांडाचा अर्थ अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून उपवास करणाऱ्या गुरुजींना फक्त महाराष्ट्रात कळला असे नवयुगात लेखमाला लिहिणाऱ्याने म्हटले आहे. बंधूंनो, कलकत्त्यातील शास्त्रीपंडितांचे डोळे उघडे. परंतु आपल्याकडे काय आहे? मुंबईत यज्ञ करणारे पंडित अस्पृश्यता धार्मिक आहे म्हणून म्हणत आहेत. आमचे विश्वासराव डावरे हरिजनांस मंदिरात येऊ देणे म्हणजे अब्रह्मण्यं म्हणत आहेत. डोळे उघडण्यासाठी नौखालीच्या हत्याकांडासारखी का भीषण इंजेक्शनेच मिळायला हवीत?

६५. शतखंड राष्ट्र

आपण अलग अलग राहिलो नि मेलो. बापू गोखले एकटे लढतात. तिकडे वसईला शिंदे एकटे लढतात. मग होळकर एकटे लढतात. सारे पराभूत होतात. गुलाम होतात. अरे सारे एक व्हा. डबक्यात नका बसू. अठरापगड जाती म्हणजे भारतमातेचे अठरा हात आहेत. देवीला अठरा हात आपण उगीच नाही दिले. परंतु अर्थ कोण बघतो. आपण सारे आंधळे आहोत.

६६. सागरे सर्व तीर्थानि

पूर्वज सांगत, ''समुद्रात सारी तीर्थे आहेत का?'' काय आहे त्यात अर्थ? ते म्हणत ''संगमावर आंघोळ करा. नदी पवित्र माना.'' का? सारे प्रवाह जेथे जमतात तेथे पावित्र्य आहे. समुद्रात सारे प्रवाह येतात. तेथे सारीच तीर्थे. नदीही अनेक प्रवाह घेऊन बनते. म्हणून तिला गती. खोली. ती सागराकडे जाते, आपण नदीत, समुद्रात डोकी बुडवतो. परंतु डोकी खोकीच राहतात. ही नदी सारे प्रवाह घेऊन मोठी झाली, हा

समुद्र अनंत प्रवाह घेऊन अनंत झाला, सारखा उचंबळत आहे, असा विचार डोक्यात येऊन सारे मानवी प्रवाह जवळ घ्यायला आपण तडफडावे. या भारतात एक मानवी प्रवाहांचे तीर्थक्षेत्र होवो असे रवींद्रनाथ म्हणत. परंतु आपण या देशाला शतखंड केले आहे. जातीची लहानमोठी डबकी, हिंदुमुसलमान दूर राहिले. हिंदुहिंदूंत किती डबकी. ब्राह्मण, मराठे, माळी, साळी–शेकडो प्रकार. मला एकदा एकाने विचारले, ''गुरुजी, तुम्ही कोब्रे का?'' माझ्या लक्षात येईना. को, ब्रा म्हणजे कोकणस्थ ब्राह्मण. कोब्रा या शब्दाचा इंग्रजी अर्थ नागोबा. मी म्हटले ''होय बाबा, मी कोब्राच.'' जातीच्या पलीकडे पाहण्याची दृष्टीच नाही. तू कोठे जेवलास, तू कोठे पाणी प्यायलास, याहून महत्त्वाची जणू जगात दुसरी वस्तूच नाही. बंधूंनो, ही सारी डबकी फोडा. डबकी झाली तर हिवताप, डास, मरण. या देशात भेदांची डबकी माजवली. राष्ट्रावर प्रेतकळा आली. ज्या देशातील लोक एकमेकांवर डोळे वटारतात, शिंगे उगारतात, त्याच्या पाठीवर मृत्युदेव येऊन बसतो. यमाचे वाहन हेला आहे. याचा हाच अर्थ. फोडा डबकी. एक विशाल मानवी प्रवाह करा. जातिभेदांचे बुजबुजाट पुरे.

६७. डावा उजवा हात

एक शास्त्री म्हणाले, ''अहो गुरुजी, सर्वत्र एक ब्रह्म आहे. एक आत्मा आहे हे खरे असले तरी सर्वच भेद आहेत. या शरीरातच पाहा. उजवा हात पवित्र. डावा हात अपवित्र. तसेच समाजात.'' मी त्यांना म्हटले, ''डावा हात अपवित्र म्हणून का कापून फेकून दिलात? डावा हात सकाळी गंमत करतो, परंतु माती लावून, साबण लावून धुतला की झाले. त्या हातावरच राखुंडी घेऊन दात घासता. त्या हातावरच चुन्याचे बोट फासून तंबाखू चोळता. त्या हातानेच पाणी पिता. जेवताना डावा हात दुखू लागला तर उजवा हात धावतो. डाव्या हाताला दुःख झाले तर दूरचे वरचे डोळे रडू लागतात. सर्व शरीरात एक प्राण आहे. एका नाडीचे ठोके पडत आहेत. राष्ट्रांतील सर्व जातिजमाती म्हणजे राष्ट्रपुरुषाचे अवयव. सर्वांमध्ये एक प्राण हवा. एक नाडी हवी. हरिजनांना पाणी मिळत नसेल तर तुमचे डोळे ओले व्हायला हवेत. हरिजनांना घरे नसतील तर तुमच्या हृदयाला घरे पडायला हवीत. उगीच काहीतरी बोलू नका. धर्माची टिंगल करू नका, व्यर्थ कोट्या करून लोकांना झुलवू नका, फसवू नका. तुमचा होतो खेळ, राष्ट्राचा जातो प्राण. तुम्ही हसाल, परंतु तुमच्या धर्माचेही हसे होते.

६८. थोडी नम्रता शिका

बंधुंनो, जगाला जवळ घ्याल, तर देव तुमच्याजवळ येईल. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

''येथ विद्वत्व पऱ्हा सांडिजे। येथ व्युत्पत्ति आवधी विसरिजे
जै जगा धाकुटे होइजे। तैं जवळीक माझी।।''

तुमचे विद्वत्व, तुमचे पांडित्य विसरून देवाजवळ जा. साऱ्या जगासमोर नम्र व्हाल तर देव तुमच्याजवळ आहे. तुकाराम महाराज म्हणतात :

नम्र झाला भूतां। तेणे कोंडिले अनंता

जो प्राणिमात्रासमोर नम्र होईल, तो विश्वंभराला हृदयात कोंडून ठेवील.

ज्ञानेश्वर म्हणतात :

''तें झडझडून वाहिला निघ। इये भक्तीचिये वाटे लाग
तैं पावसी अव्यंग। निजधाम माझे.''

ही सारी क्षुद्र जळमटे दूर करा. खरी भक्ती हृदयात येऊ दे. मानवावर, प्राणिमात्रावर प्रेम म्हणजेच भक्ती. ''पादोऽस्य विश्वा भूतानि'' हे सारे प्राणी म्हणजे जणू प्रभूचा चरण. प्रभुचरणभक्ती म्हणजे भूतमात्रांवर प्रेम. तसे कराल तरच ते अव्यंग निजधाम मिळेल. सर्वांचा संसार सुखी करणारे स्वराज्य तेव्हाच मिळेल. ऐहिक मोक्ष वा पारलौकिक मोक्ष सर्वांवर प्रेम करण्यानेच लाभेल. असे संत पुन्हा पुन्हा सांगतात. परंतु ऐकतो कोण?

६९. घरोघर ब्रह्मज्ञान

तुकाराम महाराज म्हणतात, ''बोलणे फोल झाले। डोलणे वाया गेले.'' आमच्या ओठांवर मोठमोठी वचने, देवता सर्वत्र आहे. जळी स्थळी काष्ठी पाषाणी सर्वत्र तो आहे. आजीबाईंपासून पंडितांपर्यंत सारे असे म्हणतील. परंतु माणसाला दूर ठेवतील. म्हणुन तुकाराम म्हणाले,

''घरोघर अवघे झाले ब्रह्मज्ञान, द्या रे एक कण जरी नीरे''

घरोघर वेदांताची चर्चा आहे. सर्वत्र ज्ञानेश्वरीवर प्रवचने, कीर्तने आहेत. परंतु एक कणभर शुद्ध ब्रह्मज्ञान असेल तर द्या असे तुकाराम महाराज म्हणतात. बडबड

म्हणजे ब्रह्मज्ञान नव्हे. अंत:करणात उत्तरोत्तर सहानुभूती वाढणे म्हणजे ब्रह्मज्ञानाचा उदय.

७०. देवासमोर म्हणे अडसर घाला

कोणी पंडित म्हणतात, ''पंढरपूरच्या विठोबाच्या पायावर आजपर्यंत स्पृश्य डोई ठेवीत आले. अस्पृश्यांना आत घ्यायचे असेल तर एक लाकूड आडवे बसवू. तेथपर्यंत सर्वांनी यावे. देवाच्या पायांना कोणीच स्पर्श करायचा नाही असे करू.'' परंतु असे करण्यात काय स्वारस्य? त्या पांडुरंगाच्या समचरणांचा हा अपमान आहे. आजपर्यंत स्पृश्य जो आनंद घेत आले, तो त्यांचाही जाणार. केवळ अस्पृश्यांना तो मिळू नये म्हणून! अरेरे! केवढी ही अढी! केवढा हा प्रभुद्रोह, बंधुद्रोह. देवाजवळ जाण्यात कसली तडजोड. तेथे कसल्या अटी घालता? हृदय उचंबळून येऊन म्हणा की या सारे पांडुरंगाजवळ. भेटा त्या प्रभूला. त्याच्या गुळगुळीत चरणांवर ठेवा डोके. परंतु आमचे हृदय उचंबळतच नाही. आम्ही शुष्क आहोत. आमचा वेदांत जड आहे, नीरस आहे, हृदयशून्य आहे. ती एक पांडित्याची बाब आहे, चर्चेची वस्तू आहे. वेदांत आणि जीवन यांची आम्ही फारकत केली आहे. म्हणून विवेकानंद संतापाने म्हणाले, ''हिंदुधर्माप्रमाणे उदार तत्त्वांचा दुसरा धर्म नाही. आणि हिंदुलोकांप्रमाणे अनुदार लोकही दुसरे नाहीत.'' कबीर म्हणाला, ''घरोघर वाचत पोथी। नजर न आवे आतमज्योति'' घरोघर गीताभागवत वाचीत आहेत, परंतु परमात्मा कोणालाच दिसत नाही. अद्वैत हे जीवनात अनुभवण्याचे शास्त्र आहे.

७१. मोकळेपणाने द्या

तुमच्या अस्पृश्यबंधूंस सामाजिक, धार्मिक स्वातंत्र्य देत असाल तर ते मोकळ्या मनाने द्या. हृदय भरून येऊ द्या. When I give I give all. मी द्यायला लागलो म्हणजे सारे देतो असे एका अमेरिकन कवीने म्हटले आहे. मेघ भरून येतो. सारे देऊन निघून जातो. हजारो वर्षांचे पाप दूर करायचे आहे. हजारो वर्षांची भूक दूर करायची आहे. एक दाणा नका फेकू. पोटभर जेवण द्या. त्यात शोभा आहे. उदारता आहे. सुंदरता आहे. दिलदारी आहे.

७२. कायदे मतमोजणी

कोणी म्हणतात मते द्या. कोणी म्हणतात कायदे करा. मला यात राम नाही वाटत. सारे चौकटीत नका बसवू. हृदय म्हणून वस्तू आहे की नाही? देवाजवळ सर्वांना येऊ द्यायचे की नाही यासंबंधी मते काय मागता? हा का बाजार आहे? आणि कायद्याने केलेत तरी ते यांत्रिक होणार. त्याचा सर्व जीवनावर प्रकाश नाही पडणार. आपण उचंबळून, भक्तिप्रेमाने, बंधूप्रेमाने भावांना जवळ घेऊ या. वनवासी रामास भेटू या. जीवनात परम आनंद आणू या.

७३. आर्थिक प्रश्न

कोणी म्हणतात, "तुमच्या मंदिरात कोण येणार आहे? हरिजनांचे अडले नाही. त्यांची आर्थिक स्थिती सुधारा, म्हणजे सारे नीट होईल." हजारो वारकरी पंढरपूरला येतात. त्यांना का देवाच्या दर्शनाची तहान नाही? आणि त्यांना तहान असो नसो. माझ्या मंदिराला मंदिरपणा यावा म्हणून ते सर्वांना मोकळे करू दे आणि मी मंदिर मोकळे केले म्हणजे माझे घर, माझे हॉटेल, खानावळ, तळे, विहीर सारे मोकळे होईल. मंदिरात आलास तरी चालेल परंतु माझ्या घरी नको येऊ असे आपण म्हणणार नाही. देवाहून काही आपण मोठे नाही? मंदिरे उघडली म्हणजे मनोरचना बदलेल. नुसती आर्थिक स्थिती सुधारून प्रश्न सुटत नाही. श्रीमंत महारांनाही कोणी ओटीवर घेत नाही, अशी उदाहरणे मला माहीत आहेत. दहा-पंधरा रुपये भाडे द्यायला तयार असलेल्या हरिजनांस जागा कोणी देत नाही. मुंबईच्या गिरणीतील सर्व कामगारांची एकच आर्थिक स्थिती. परंतु गिरणीत स्पृश्य एकीकडे भाकर खायला बसतात; अस्पृश्य एकीकडे. दोघांचे नळ निराळे, केवळ आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे स्पृश्य लोक अस्पृश्यांना जवळ घेतीलच असे नाही.

७४. शिक्षणानेही नाही

अस्पृश्य बंधू शिकले सवरले तरीही आम्ही त्यांना जवळ घेऊच असे नाही. शाळांतील हरिजन शिक्षक-बंधूभगिनींस राहायला जागा मिळत नाही. स्वत:

बाबासाहेब आंबेडकर बॅरिस्टर होऊन आले, तरीही त्यांना दूर बसवीत. असे कटू अनुभव आहेत. याचा अर्थ हरिजनांची आर्थिक स्थिती सुधारू नये, त्यांना शिक्षण मिळू नये असा नाही. परंतु मुख्य गोष्ट आमच्या मनोरचनेत फरक व्हायला हवा.

७५. म्हणून हा उपवास

ही मनोरचना बदलावी म्हणून माझी धडपड म्हणून हा उपवास. पंढरपूरचे मंदिर उघडणे म्हणजे एक प्रतीक आहे. ते मंदिर उघडणे म्हणजे आपली सर्वांची हृदये उघडणे. सर्वत्र हरिजनांना मोकळेपणे येऊ देणे. घ्या त्यांना घरात, बसवा जवळ. तुमच्या पानाजवळ त्यांची पाने मांडा, आता कोणाचा अपमान नका करू, सर्वांची जेथे प्रतिष्ठा तेथे धर्म आहे. तेथे स्वातंत्र्य आहे.

७६. धीर माझ्या मना। नाही आता नारायणा

मी तर अधीर झालो आहे. अस्पृश्यता नष्ट होईल नाही तर मी नष्ट होईन. प्रत्येक वेळेस का महात्माजींनीच प्राण हाती घ्यावे? आम्हा किड्यांचे काय काम? आम्ही निघावे मरायला. बंधूंनो, माझी तुम्हाला प्रार्थना आहे. अस्पृश्यता एका क्षणात दूर करा. आता उशीर नको. विलंब नको. काळ तुम्हाला नेणारच आहे ओढून. परंतु आपण होऊन विचाराने आधीच तसे वागणे यात पुरुषार्थ आहे. शहाणपण आहे.

सकलांचे पाया माझे दंडवत
आपुलाले चित्त शुद्ध करा
तुका म्हणजे हित होय तो व्यापार
करा काय फार शिकवावे।।

'शिकवावे' हा तुकाराम महाराजांचा शब्द आहे. मी शिकविणारा नाही. मरणारा आहे. दुसरे मी काय करू?

''शेवटची विनवणी। संतजनी परिसावी
विसर तो न पडावा। माझा देव तुम्हांसी
आता फार सांगू काय। अवघे चरणांस विदित
तुका म्हणजे पडतो पाया। करी छाया कृपेची।।''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

तुम्हा सर्व बंधुभगिनींच्या मी पाया पडून विनवीत आहे. हिंदुधर्माला उजळा द्या. या थोर धर्मातील तत्त्वे कृतीत आणा. या प्रेमधर्माची, बंधुभावाची मला भीक घाला. पाठिंबा द्या. मी एकटा काय करू?

निराधार आम्ही तुझाचि आधार
अमृताचि धार तुझे नांव ।।
तुझा म्हणुनिया आलो तुझे दारी
मी तव भिकारी भीक घाली ।।
भीक घाली थोडी थोडी तरी राया
पडतो मी पाया दया करी ।।

तुमचा पाठिंबा हाच माझा आधार. अमक्या गावाने पाठिंबा दिला असे कळताच मला अमृत मिळते. कोठेही गेलो की लोक म्हणतात, "गुरुजी, दूध घ्या." परंतु मला दुधातुपाची तहान नाही. अस्पृश्यता निवारणाच्या कामी सक्रिय पाठिंब्याची मला तहान आहे. तो आधार मला द्या. मी तुमचा, तुमच्यातीलच. तुमचा लहान भाऊ. मी तुमच्याजवळ भिक्षा मागत आहे. प्रेमधर्माची भिक्षा. तुमच्या पाया मी पडतो. ही भिक्षा मला घाला. नाही म्हणू नका. महाराष्ट्रातील हजारो गावी, हजारो सभांतून, हजारो हात वर झाले. ही गोष्ट मी पंढरपूरच्या बडवे मंडळींस सांगेन. तुम्ही सह्याही द्या. छापील कागद तुमच्याकडे येतील. मंदिरप्रवेशास अनुकूल अशा लाखो सह्या आम्ही बडवे मंडळींसमोर ठेवू. श्री संत तुकडोजी महाराज म्हणाले, "५ लाख सह्या आम्ही गोळा करतो." बडवे मंडळींस आम्ही म्हणू, "हा पुरावा घ्या. मंदिर उघडा. देवळाजवळ सारी लेकरे जाऊ देत. आता विलंब नको. अंत पाहू नका." तरीही ते अंत पाहणार असतील तर मी माझे प्राण हातात घेऊनच उभाच आहे. प्रभूच्या मनात असेल तसे होईल. शेवटी तुम्ही आम्ही कोण?

मारी नाड तमारे हाथे
प्रभु सांभाळ जो रे।

देवा, तूच त्राता, तूच मातापिता. माझी नाडी तुझ्या हातात. हिंदू धर्माची, समाजाची तुला लाज. या थोर राष्ट्राची नाडी तुझ्या हातात. परंतु मला आशा आहे. हे महान मंदिर उघडेल. महाराष्ट्राच्या सर्व जीवनात निर्मळ प्रकाश येईल. एकदा पंढरपूर मोकळे झाले की साऱ्या महाराष्ट्रातील घरे, मंदिरे, विहिरी, तळी, हॉटेल्स, खानावळी

मोकळी होतील. अरे विठोबाजवळ सारी जाऊ लागली. येऊ द्या सारे आता ओटीवर. भरू देत सारे पाणी. बसू देत पंक्तीत. असा प्रेम-धर्म सर्वत्र येईल. मी आशेने आहे. महाराष्ट्रात लाट येत आहे. गावोगाव मंदिरे उघडत आहेत. खानदेशात कितीतरी मंदिरे खुली झाली. कुऱ्हे वगैरे गावी नावासही अस्पृश्यता नाही. साताराही पुढे जात आहे. ठाणे जिल्ह्यात वाडे, जव्हार, मोखाडा, मुरबाड, बदलापूर अनेक ठिकाणी मंदिरे उघडली. जंजिरा मुरुडला सारी मंदिरे उघडली. बातम्या रोज येत आहेत आणि मद्रास प्रांतातही हजार हजार वर्षांची प्राचीन महान मंदिरे मोकळी होत आहेत. राजगोपालाचारी म्हणाले, ‘‘दिल्लीत घटनासमितीत आम्ही दंग आहोत. परंतु दक्षिणेकडे सामाजिक क्रांतीची थोर लाट येत आहे. तिकडे आम्ही कानाडोळा करता कामा नये. थोर कार्य होऊन राहिले आहे.

७७. मंदिरे उघडणे साधी गोष्ट नाही

मंदिर-प्रवेश ही प्राणमय वस्तू आहे. काही सुशिक्षितांस काही वाटो, स्पृश्य समाज मंदिर जिव्हाळ्याची वस्तू मानतो. तेथे हरिजनांस तो येऊ देऊ लागला की सारी दारे मोकळी होतील. ही मास्टर की आहे. गुरुकिल्ली आहे. बंधूंनो, तुम्ही ही येणारी लाट पाहा. सर्व हिंदुस्थानभर सामाजिक समतेची ही तुफानी लाट घों घों करून येत आहे. नागपूरकडचे रामटेकचे प्रसिद्ध मंदिर उघडण्यासाठीही उपवास, प्रचार सारे प्रयत्न सुरू आहेत. आपण सारी शक्ती एकवटू या. निवडणुकीच्या वेळेस आमचा केवढा प्रचार असतो! किती मोटारी, कर्णे, वक्ते, स्वयंसेवक, किती पत्रके, प्रचाराचा आम्ही पाऊस पाडतो. परंतु अस्पृश्यता निवारणार्थ असा प्रचारांचा पाऊस का पाडीत नाही? ही का क्षुद्र वस्तू आहे. अस्पृश्यता नष्ट करा हा मंत्र सर्वत्र दुमदुमला पाहिजे.

७८. उठा विद्यार्थ्यांनो, सेवादलांनो

महाराष्ट्रातील सर्व तरुणांना माझी हाक आहे. एक क्षणभरही ही अस्पृश्यता सहन करू नका. तुम्ही संघातले असा वा दलातले असा. अस्पृश्यता नष्ट करण्यात मतभेद शक्यच नाही. सेवादल तर आघाडीवर आहे. २६ जानेवारीस हजार ठिकाणी सेवादल सैनिकांनी सहभोजने केली. सेवादल राष्ट्राची छकले सांधील अशी मला

आशा आहे. विद्यार्थ्यांनो, सुटीतून गावोगाव जा. एकेका तालुक्यात दहादहाची टोळी करून जा. पत्रके, चित्रे घेऊन जा. गाणी, पोवाडे घेऊन जा, गा गाणी, करा सभा, वाचून दाखवा, पत्रके चिकटवा, भिंतीवर चित्रे, हजारो सह्या गोळा करा. हरिजन मुलांत मिसळा. खेळा. तेथे जेवा. गाणी गा. ऐक्याचा, बंधुभावाचा, समतेचा महान मंत्र घेऊन सर्वत्र जा. तारणारा तो तरुण अशी तरुण या शब्दाची व्युत्पत्ती आहे. अस्पृश्यतानिवारणाची संजीवनी घेऊन या राष्ट्रास तारा. ही शिवाशिवी गेली की पुष्कळसे काम सोपे होईल. हिंदुमुस्लिम ऐक्याचाही प्रश्न त्यातून वाढीस लागेल. एकमेकांपासून उच्चनीचपणाच्या भ्रामक कल्पनांनी आपण दूर दूर बसलो. साऱ्या देशाचे त्यामुळे वाटोळे झाले. एकदा सर्वांना घ्यायला निघालात, निर्धाराने, उचंबळून निघालात की नवीन मंगल प्रभात येईल. प्रचंड लाट आणा आणि हजारो वर्षांचा अन्याय, हेपाप धुऊन काढा.

७९. नवयुगाचे स्वागत करा

नूतन स्वातंत्र्याचे, नवीन युगाचे स्वागत करायला निर्मळ नि सतेज असा भारत उभा राहो. सर्व प्रकारच्या गुलामगिरीचे भस्म करून सर्वांगीण स्वातंत्र्याचे स्वागत करायला हवा प्राचीन महान भारत उभा राहो. जवाहरलालांनी नवभारताचे रम्य उदात्त चित्र रेखाटले. त्या नव्या युगाच्या स्वागताला अस्पृश्यांना हृदयाशी धरून, अस्पृश्यता दूर करून, भाऊ भाऊ होऊन उभे राहा. मी अधिक काय सांगू? तुमची हृदये उचंबळून आली आहेत, असं तुमचे डोळे सांगत आहेत. वनवासी रामाला जवळ घ्यायला तुम्ही अधीर झाला आहात. चला तर त्यांच्याजवळ. त्यांना जवळ घेऊ नि सुखी होऊ.

✦✦✦

चंद्रभागेच्या वाळवंटी

१. आजचा युगधर्म

हिंदुधर्म आहे, तोवर मंदिरं राहणार. या मंदिराला मंदिरपणा यायला हवा असेल, तेथील मूर्तीला देवपण हवे असेल, तर देवाच्या सर्व लेकरांना तेथे जायला वाव हवा. देवाचा प्रकाश सर्वांसाठी, त्याची हवा सर्वांसाठी, त्याचा पाऊस सर्वांसाठी, त्याचप्रमाणे देवाचे मंदिरही सर्वांसाठी, देवाची मूर्ती सर्वांसाठी. जेथे सर्वांना जात येत नाही, ती देवाची मूर्ती नसून आपल्या अहंकाराची, वर्णाभिमानाची ती मूर्ती आहे. गीतेच्या सोळाव्या अध्यायात म्हटले आहे की, ''आढ्योऽभिजन वानस्मि'' म्हणणारा आसुरी वृत्तीचा समजावा. जो कोणी म्हणेल की, मी ''अभिजतवान्'' मोठ्या कुळातील, तो आसुरी वृत्तीचा. कोणी तुच्छ नाही, उच्च नाही. समाजसेवेची सारी कर्मे करणारेही पवित्र आहेत आणि ती कर्मे न करणारेही पवित्र आहेत. हिंदुधर्माची ही खरी थोरली. हा मोठेपणा. म्हणून समाजाच्या सेवेची अनेक कर्मे करून लोक मुक्त झाले.

निर्गुण निराकाराला आम्ही सगुण रूप दिले. मूर्तीसमोर उभे राहून तिच्यात विश्वंभर बघायचा आणि मूर्तीत देव बघायला शिकून सर्व मानवी मूर्तीत, सर्व चराचरात देव बघायला शिकायचे. सर्वांत तुच्छ वस्तू म्हणजे दगड. त्या दगडातही आम्ही परमेश्वराचे पावित्र्य नि सौंदर्य बघायला शिकायचे हे त्यातील रहस्य. दगडाच्या मूर्तीतही देव बघणारे अधिक चैतन्यमय माणसात नाही का बघणार? तुकाराम महाराज म्हणतात –

''जिकडे तिकडे देखें उभा।
अवघा चैतन्याचा गाभा।।

मूर्तिपूजा करून शेवटी या अनुभवाकडे यावयाचे, तर त्या मूर्तीजवळही आम्ही सर्वांना जाऊ देत नाही. अरे, ती विश्वंभराची ना मूर्ती? का तुझ्या अहंकाराची मूर्ती? मूर्तिपूजेतील थोर गोडी आम्ही विसरलो, आणि तिथेही भेद उभे केले.

परमेश्वराची स्तुती करताना म्हणावयाचे, ''त्वमेव माता पिता त्वमेव।'' आणि त्या आईजवळ तिची लेकरे जाऊ लागली म्हणजे त्यांना दूर लोटावयाचे! हा का धर्म? त्या जगाच्या आईजवळ तिची लेकरे का जाऊ शकत नाहीत? याचा अर्थ आपणाजवळ खरा धर्म राहिला नाही? निव्वळ थोतांड शिल्लक राहिले आहे. अस्पृश्यांचा हा प्रश्न हजारो वर्षांचा जुना आहे. आमच्या धर्मामध्ये उच्चनीच अशा प्रकारचे भेद नाहीत. गीता तर म्हणते, ''जो दुसऱ्याला नीच समजतो, तुच्छ समजतो तो स्वत:च राक्षस आहे.'' ''आढ्योऽमिजनवानास्मि कोऽन्याऽस्ति सदृशो मया।'' ''माझ्यासारखा मोठा कोण?'' असे म्हणणारे राक्षस आहेत, असे गीता सांगते.

संतांनीही हेच सांगितले. इतरत्र तुम्ही तुमचा अहंकार ठेवा, पण परमेश्वराजवळ तरी जातपात विसरून एकरूप होऊन जा, असा संतांचा संदेश आहे. वारकरी पंथ सहाशे वर्षांचा जुना आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, चोखोबा यांनी सर्वांना समानतेने या पंढरीच्या वाळवंटावर आणले. म्हणून त्या विठ्ठल मंदिरापेक्षाही हे चंद्रभागेचे वाळवंट मला श्रेष्ठ वाटतो. कारण येथे भेदाभेद नाही. येथे हरिजन असो, मराठा असो, ब्राह्मण असो, कोणी असो, या चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये सर्व समान. म्हणूनच या वाळवंटाचा महिमा अगाध आहे. आजपर्यंत आमच्या धर्मातील संत अन्यायाविरुद्ध झगडत आले आहेत.

अशा या पुण्यवान नगरीमध्ये संतांनी सर्वांना एकत्र आणले. प्रत्येक बंड करूनच संतांनी मार्ग काढला आहे. ज्ञानेश्वरांनी संस्कृतातील गीता प्राकृतात आणली. यावेळी सनातन्यांनी त्यांना विरोध केला. धर्माचे सार, ''आबाल सुबोध'' असे करण्याचा ज्ञानेश्वरांनी प्रयत्न केला. ''स्त्री शूद्र प्रतिभे सामावलें'' असे ज्ञानेश्वरीत म्हटले आहे. माणसाला जगण्यासाठी भाकरी पाहिजे. त्याप्रमाणे ज्ञानाची व विचारांची भाकरीही मिळाली पाहिजे.

नारदमुनींनी त्यांच्या स्मृतीमध्ये म्हटले आहे, ''श्रुणवन्तु सर्वे अमृतस्य पुत्रा:'' याचा अर्थ असा की, कोणी तुच्छ नाही, कोणी उच्च नाही. धर्माच्या दृष्टीने सर्व एकसारखे आहेत. अहंकाराचा पडदा आपल्या डोळ्यापुढून दूर केलात तर खऱ्या

धर्माचा आत्मा तुम्हाला सापडेल, असे वेद म्हणतो. "अनहं वेदनं सद्धि अहंवेदनमापद:" असे म्हटले आहे. वेद सर्व धर्मांना ईश्वराजवळ नम्र होण्यासाठी सांगतो. हे सर्व वारकरी पंथाने प्रचारात आणले.

"सतु निरतिशय: प्रेममय" असे परमेश्वराविषयी म्हणतात. ईश्वर प्रेमाचा सागर आहे. तुम्हाला परमेश्वर भेटावा, असे वाटत असेल तर प्रेमळ बना. दुसऱ्याला प्रेम द्या. प्रेमाला कृतीत प्रकट व्हावयाची इच्छा असते. प्रेमाचे काहीतरी प्रतीक हवे. मग ते रुक्मिणीचे तुलसीदल असो, द्रौपदीचे भाजीचे पान असो, शबरीची बोरे असोत, सुदाम्याचे पोहो असोत. काहीतरी बाह्य चिन्ह हवे. प्रेम सर्वस्व दानासाठी अधीर असते. दिल्याशिवाय प्रेमाला चैनच पडत नाही.

परमेश्वर सच्चिदानंद स्वरूपी आहे. सद् म्हणजे प्रेम आणि चित् म्हणजे सत्य. आणि आनंद म्हणजे जीवनामध्ये प्रेमभाव, ज्ञान आणा, आनंद आणा. सर्वत्र आत्मा बघायला शिका. हेच ज्ञान आणि हेच ब्रह्मज्ञान हे जाणा.

लहान मुलांना हे ब्रह्मज्ञान उपजतच असते. त्यांची सर्व प्राणिमात्रावर माया असते; पण आपण त्यांना मागे खेचतो. सर्व प्राणिमात्रांवर दया करणे; सर्वांना सारखे लेखणे हा ब्रह्मज्ञानाचा आत्मा आहे. बृहन् म्हणजे मोठा. ब्रह्मज्ञान म्हणजे मोठी दृष्टी. अशा या ब्रह्मज्ञानाच्या आधारावर हरिजनांना जवळ घेणे हे आपले धर्मकर्तव्य आहे. कोट्यवधी भावांना दूर ठेवण्यात स्वधर्म नाही आणि स्वराज्य तर नाहीच नाही! "प्रभवार्थाय भूतानां" ही धर्माची व्याख्या आहे. त्या दृष्टीने सात कोटी भावांना दूर ठेवून आनंदप्राप्ती होणार नाही. संध्येमध्ये आपण म्हणतो, "सर्वेषांमविरोधेन ब्रह्मकर्मसमारभंत" सर्वांना श्रेष्ठ समजणे हाच आजचा युगधर्म आहे. धर्माचा आत्मा बदलणार नाही; पण रूढी, आचारविचार, चालीरीती बदलाव्याच लागतात. कालमानाप्रमाणे चालीरीतीत बदल केला नाहीत तर नष्ट व्हाल.

आम्ही गोलंकार करतो आहोत, असे सनातनी म्हणतात. पण या सबगोलंकाराचा अर्थ सर्वांना एकत्र घेणे असाच आहे. वर्णाश्रमधर्माप्रमाणे चला असे आजचे आमचे विरोधी शास्त्री कधीकधी आम्हाला सांगतात; पण वर्णाश्रम राहिलाय कोठे? सर्वांनी आपापले व्यवहार सोडले आहेत. ब्राह्मणांनी वैश्याचे कर्म करण्यास सुरुवात केली आहे. शाळेमध्ये हरिजन शिक्षकाचे काम करतात. कोठे राहिला वर्णाश्रम? पण वर्णाश्रमाचा अर्थच वेगळा आहे. वर्ण म्हणजे रंग. आपापल्या बुद्धीचा

रंग बघून काम करणे म्हणजे वर्णाश्रम पाळणे असे आहे. हाच त्याचा खरा अर्थ आहे. सबगोलंकार आजच्या जगात आम्ही करतो आहोत, ही जी सनातन्यांची कल्पना आहे, ती चुकीची आहे. यंत्रयुगाने सबगोलंकार केला, आम्ही नाही.

आज आपण सर्व गिरणीचा कपडा वापरतो. कोठे गेले विणकर? घरांच्या वर पत्र घालतो. राहिली का कुंभारांची जात? अशा परिस्थितीमध्ये वर्णाश्रम राहूच शकत नाही. परंतु याही गोष्टीला आपल्या धर्माला मान्य आहेत. धर्माचे सर्वांत मोठे तत्त्व हेच आहे की, कोणतेही समाजसेवेचे काम करणारा पुरुष कधीही अपवित्र नसतो. आजपर्यंतचा इतिहास हा त्याचा दाखला आहे. सेना न्हावी न्हाव्याचा धंदा करून पावन झाला. चोखोबाची बाग प्रत्यक्ष विठोबा राखी. सजन कसायाची घडी करण्यासाठी परमेश्वर धावला. सर्वांना मुक्त करण्यासाठी परमेश्वर धावला आहे. हाच आमच्या धर्माचा महिमा आहे. परमेश्वर आपल्या सर्व भक्तांसाठी धावतो. जनाबाईंबरोबर दळण दळतो, नामदेवाच्या शिंपीकामात मदत करतो, कबीराबरोबर शेले विणतो, तो परमात्मा सर्वत्र आहे. सर्वत्र परमात्मा पाहणे हेच खरे तत्त्वज्ञान आहे. आपल्या देवीला अठरा हात आहेत. अष्टदशभुजा म्हणतात तिला. त्यायोगे परमेश्वराने असे दाखवून दिले आहे की, अठरा पगड जाती या जणू परमेश्वराचे हातच आहेत आणि म्हणून समाजसेवेचे काम पवित्र आहे. फक्त अंत:करण ओतून ते करा म्हणजे झाले. परंतु आम्ही धर्माप्रमाणे वागतच नाही. आम्हाला धर्माचा अर्थ मुळी कळतच नाही.

सर्वांना हृदयाशी धरावयास शिकणे यातच धर्माचा आहे. यातच स्वराज्याचा अर्थ सामावलेला आहे. ''सर्वेऽ अपि सुखिनः सन्तु सर्वे संतु निरामयाः'' अशी आपल्या धर्माची इच्छा आहे, ही आपल्या धर्माची शिकवण आहे; पण आपण आजपर्यंत आपल्या धर्मबांधवांना दूर ठेवत आलो आहोत. लहानपणी आमच्याकडे समसू नावाचा एक माझ्या वडिलांचा मुसलमान मित्र येई. त्याला सुपारी मीच कातरून देत असे. पण गावचा महार आला तर त्याची सावलीही घेणे आम्ही पाप समजू. या गोष्टीची आता आठवण झाली म्हणजे असे वाटते, की मी शंभर वेळा जरी मेलो, तरीही ते पाप नाहीसे होणार नाही. आपल्या धर्मबांधवांना दूर ठेवण्यात धर्म नाही. तो निव्वळ माणूस घाणेपणा आहे. आम्ही ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय या वर्णाच्या लोकांनी धर्म सोडला. पण शूद्रांनी अजूनही सोडला नाही. त्यांनी आपला प्राचीन धर्म चालूच

ठेवला आहे. ब्राह्मण नोकऱ्या करू लागले. त्यांनी ब्रह्मकर्म टाकले, वैश्यांनी विलायती माल विकायला सुरुवात करून राष्ट्राची राखरांगोळी करून टाकली. क्षत्रियांनी तलवार धार लावून तयार ठेवावयाच्याऐवजी बोथट करून घेतली. पण सेवेचे काम ज्या हरिजन बांधवांच्याकडे आपण प्राचीन काळापासून सोपवून ठेवले आहे, ते आजतागायत करीत आले आहेत. सत्यार्थाने तेच खरे हिंदुधर्माचे आहेत आणि याबद्दल त्यांना बक्षीस काय? तर त्यांना आम्ही दूर ठेवायचे? आम्ही आमची कर्मे टाकून दिली, पण आम्हा धर्मभ्रष्टांना मंदिरात प्रवेश आहे. परंतु धर्माप्रमाणे चालणाऱ्या हरिजनबंधूंना मंदिरात प्रवेश का नसावा? लोकमान्यांनी तर आपल्या मुलाला सांगितले की, ''बाबारे, तू चांभाराचे दुकान घाल, पण नेकीने व्यवहार कर.'' त्यांना कधी चांभाराचा धंदा अपवित्र वाटला नाही. कारण तोही एक समाजसेवेचाच धंदा आहे. गुणकर्म विभागश: म्हणजे वृत्तीप्रमाणे काम करणे, हे लक्षात आणल्यास आपणस आपल्या धर्माचा उदारपणा दिसून येईल.

जवाहरलालजींनी आपल्या ''भारताचा शोध'' या पुस्तकात लिहिले आहे, काश्मिरची एक गोष्ट. १८६४ साली काश्मिरमधल्या मुसलमानांनी डेप्युटेशन नेऊन तेथल्या राजाला आम्हाला हिंदू करून घ्या, अशी विनंती केली. त्याने काशीच्या पंडितांचा सल्ला घेतला. ते म्हणाले, ''अब्रह्मण्यम्'' संपले. आमच्या धर्मात येण्यासाठी तळमळणारे आमचेच बंधू दूर लोटले गेले. विचारांची आणि विकारांची क्षुद्रता-भेदाभेद हा धर्माचा अपमान आहे. देवाजवळ सर्वांनी जाणे हा सहजधर्म आहे! त्याची चर्चा करणे, हे बुद्धीचे दिवाळे निघाल्याचे द्योतकच आहे. आईजवळ आईच्या लेकरांनी जावे किंवा न जावे ही चर्चातीत गोष्ट आहे. या बाबतीत चर्चा हा मानवजातीचा अपमान आहे.

पूर्वी काशीयात्रेला जायचे म्हणजे मृत्युपत्र करून ठेवावे लागे. आता आठ हजार मैलांवरचा माणूस अडीच दिवसांमध्ये इथे येतो. जगातली कोणतीही बातमी सर्वत्र अर्ध्या मिनिटात कळविता येते. काळ बदलत चालला आहे, याची जाणीव ठेवा. आम्ही सप्तशृंगीला गेलो होतो. तेथे हजारो पायऱ्या. त्या पायऱ्यांना भाविक नमस्कार करीत. पण पुढे जाण्यासाठी, ध्येयाकडे जाण्यासाठी तिच्यावरच पाय ठेवून पुढे जात. त्याप्रमाणे मागच्या पिढ्यांना वंदन करून आपण पुढचा मार्ग आक्रमू. नदी जर थांबली तर तिचे डबके बनेल. आपली संस्कृतीही आघाता-प्रत्याघाताने पवित्र बनत आली

आहे. सोने जाळून जसा त्याचा कस वाढतो. एका काळात स्मृतीच्या संमतीने मुलींच्या मुंजी होत. आज होतात का?

चौऱ्यांशी लक्ष येनींनंतर श्रेष्ठ मावन जन्म प्राप्त होतो, असे म्हणतात. त्या सर्व चौऱ्यांशी लक्ष योनी तुम्हाला घरादारात, देवळात चालतात, पण ज्याला श्रेष्ठ मानवजन्म प्राप्त झाला आहे असा एखादा हरिजन तुमच्या घरात किंवा देवळात आला की, देऊळ किंवा घर वाटते. कुत्र्यामांजरावर प्रेम करणाऱ्या तुमच्या हृदयात माणसाविषयी प्रेमभाव नाही का निर्माण होत? गीतेमध्ये म्हटले आहे–

''अवजानन्ति मांमूढा;
मानुषिं तनुमाश्रितम्''

माणसाच्या शरीरात असलेल्या परमेश्वराची लोक अवहेलना करतात. मी सर्व प्राणिमात्रात आहे, हे जाणत नाहीत. तुकाराम म्हणतात–

''जे जे भूत ते ते जाण भगवंत''

केवढी विशाल दृष्टी–परमेश्वर म्हणजे प्रेमसागर. परमेश्वराला पाहणे म्हणजे प्रेममय होणे. म्हणजेच भक्ती. ज्ञानेश्वर महाराज म्हणत–

भक्तीचे वाटे लाग
तै पावसी अव्यंगधाम–

प्रेममय बना, म्हणजेच तुम्हाला सुखशांतीचा ठेवा सापडेल. परंतु हरिजनांना आजपर्यंत तुम्ही दूर ठेवीत आला आहात. हॉटेलात गेले तर त्यांची वेगळी कपबशी, त्या वेगळ्या अस्वच्छ कपातून तुम्ही परमेश्वरालाच चहा पाजीत आहात. सर्व चराचरसृष्टीत भरलेला परमेश्वर का त्यांच्यात वास करीत नाही? म्हणून मी म्हणतो की अस्पृश्यांना जवळ घेतलेत की, परमेश्वर जवळ येईल. खरा स्वधर्म येईल.

नौखालीत हत्याकांड सुरू झाले. महाराष्ट्रात कोणी म्हणू लागले, ''बदला घ्या.'' मी मनात म्हणे, ''नौखालीचा हा धडा नव्हे. द्वेषाची लाट आणण्याऐवजी प्रेमाची लाट आणून हरिजनांस जवळ घेणे, हा या हत्याकांडाचा धडा आहे. बंगालनेही तोच धडा घेतला. तिकडील सव्वीस शास्त्रीपंडितांनी अस्पृश्यता निवारण करा म्हणून पत्रक काढले. टाईम्सनेही लिहिले की, बंगालमध्ये आज अस्पृश्यता नाही. हा नौखालीचा धडा आहे. अस्पृश्य वस्तीतील किंकाळी ऐकून स्पृश्य धावले नाहीत. स्पृश्यांची किंकाळी ऐकून अस्पृश्य धावले नाहीत. दोघे अलग राहिले. दोघे

मेले. अलग राहणे म्हणजे मरणे ही गोष्ट पूर्व बंगालमधील हिंदू समजले आणि त्यांनी अस्पृश्यता आज नष्ट केली.

थोर पंडित अस्पृश्यतेला आधार नाही, असे सांगत आहेत. आणि त्या त्या काळाला अनुरूप स्मृती लिहिल्या जात आहेत. एका ऋषीचे मत दुसऱ्या ऋषीच्या मतास मिळत नाही. कारण त्या त्या स्मृती त्या त्या विशिष्ट काळच्या. गेली हजार दीड हजार वर्षे आम्ही नवीन विचार केला नाही. नवीन स्मृती लिहिली नाही. जुन्या स्मृती पढत बसलो. भाष्यांवर भाष्ये रचीत बसलो. स्वतंत्र बुद्धी जणू मेली. डॉ. केतकर लिहितात, ''स्वतंत्रबुद्धी असती तर मुसलमानांसही आम्ही आमच्यात घेऊन त्यांचा एक सांप्रदाय मान्य केला असता.'' परंतु संग्राहक व कालानुसार फरक करणारी बुद्धीच गेली. लोकमान्य टिळक म्हणाले होते, ''मला एक स्मृती लिहायची आहे.'' त्या महापुरुषाला वेळ मिळाला नाही. त्यांनी लिहिली असती तर का तीत त्यांनी शिवाशिव घातली असती? काळाप्रमाणे बदल करणे यात धर्मता आहे. ही धर्मताच मेली. म्हणून तुम्हा–आम्हाला मरणकळा आली. आणि शेवटी स्मृतिपेक्षा श्रुतीलाच महत्त्व. या श्रुतीसुद्धा ''अग्नि थंड आहे म्हणून म्हणतील, तर मी मानणार नाही'', असे आद्य शंकराचार्य म्हणतात. म्हणून शेवटी ''आत्मा सर्वत्र आहे. तो पाहा. तुझ्याप्रमाणे सर्वांना सुखदु:ख आहे, मान आहे, स्वाभिमान आहे. कोणाला हिडीसफिडिस करू नको. सर्वांची प्रतिष्ठा सांभाळ.'' यातच धर्मसार येऊन जाते. कारण हा ''प्रत्यक्षावगम धर्म'' आहे. शेवटी समर्थही म्हणतात–

''आपणांस चिमोटा घेतला।
तेणें जीव कासावीस झाला।
आपणावरून दुसऱ्याल। ओळखीत जावें।।

हे ज्याला कळले त्याला धर्म कळला; त्याला तत्त्वज्ञान कळले, स्वराज्याचा अर्थ कळला.

गीतेतील शास्त्रप्रामाण्य कोणते? ''इति गुह्यतम शास्त्रमिद मुक्त मयावद्य'' अरे, तुला मी हे शास्त्र सांगत आहे, असे भगवान म्हणतात. भगवंतांनी सांगितलेले हे शास्त्र शिवाशिवीचे नव्हे. सर्वांना मोक्ष देणारे हे शास्त्र. आपापली कामे नीट करा नि मुक्त व्हा, असे सांगणारे हे शास्त्र. आपापल्या गुणाप्रमाणे कर्मे करा. सेवेची सर्व कर्मे

पवित्र. इतर सटरफटर सर्व धर्म भगवंतांनी त्याज्य मानिले. पहिल्या अध्यायात अर्जुन "कुलधर्म, जातिधर्म" सतरा धर्म पुढे मांडतो. माझ्या मते,

"सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज."

या चरणात या सर्वांना उत्तर आहे. हे सारे क्षुद्र धर्म, बुरसटलेले धर्म, अहंकारजन्य धर्म फेकून, मी सांगतो तो धर्म मान असे भगवान सांगत आहेत आणि तो धर्म म्हणजे–

"स्वकर्मपणा तमथ्यर्य सिद्धिं
विन्दति मानवः"

हा होय. परंतु हा थोर धर्म आम्ही विसरलो. ही कर्मे अपवित्र असे म्हणत बसलो. परंतु माझा गोपाळकृष्ण हातात सुदर्शनही घेतो. शेणगोळाही घेतो. जगाला गीता देतो आणि गाईही चारतो. हिंदुधर्माची ही भव्यता आहे.

रूढी म्हणजे माझा धर्म नव्हे. सहानुभूती म्हणजे माझा धर्म. मी प्रेमधर्माचा उपासक आहे. खरी धर्मवृत्ती सर्वांतच असते. रशियातही या महायुद्धात लाखो लोक चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करीत. मानवप्राणी जोवर आहे, तोपर्यंत कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात धर्म राहणारच. तो उत्तरोत्तर उदात्त होत जाईल.

एका विचारवंताने फ्राईड या प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञास विचारले, "तुम्ही धर्म अफू म्हणता, परंतु मनुष्यप्राणी लाखो स्थित्यंतरातून आला. सृष्टीच्या क्रांति-उत्क्रांतीचे परिणत फळ म्हणजे मनुष्य. पाणी, झाडे-माडे, पशुपक्षी यातूनच मनुष्य आला. लाखो योनींचे हे ठसे मानवी मनावर आहेत. विशाल सहानुभूतीच्या माणसास या विश्वाविषयी प्रेम वाटते. कारण या सर्वांतून तो आला आहे. एकेकाळी तो तृणात होता, फुलात होता, पाखरात होता, पशूत होता, ताऱ्यात होता, वाऱ्यात होता. तो विश्वात उभा राहतो. सर्वत्र त्याला स्वतःचे रूप दिसते. ही सारी माझी. "वृक्षवल्ली आम्हा सोयरें वनचरें" असे त्याला वाटते. हा अनुभव शास्त्रीय आहे. ते अनंत ठसे जागे होतात. आणि हे विश्वप्रेमाचे संगीत सुरू होते. ही भावना भ्रम नव्हे. अफू नव्हे. ही भावना म्हणजे धर्म." फ्राईड लिहितो, "या दृष्टीने मी धर्माचा विचारच केला नाही." खरी गोष्ट हीच आहे. धर्माची अनुभूती म्हणजे सर्वत्र एकतेचा थोर अनुभव. या धर्माचा मी पुजारी आहे. आणि हिंदुधर्माची थोरवी यातच आहे. अद्वैत, भेदांमध्ये अभेद पाहण्याची दृष्टी, सर्वत्र आत्मा बघ, जळीस्थळी परमात्मा आहे, असे घोषणारा हा हिंदुधर्म आहे. अनेक साधुसंतांनी हे अनुभव घेतले. हा प्रेमधर्म त्यांनी शिकवला.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

हिंदुधर्माचे हे खरे विशुद्ध स्वरूप, ते प्रकट व्हावे, असे मला वाटते. हिंदुधर्म म्हणजे का शिवाशिवी, रूढींचे गाठोडे? माझ्या या सात-सात कोटी भावांनी कंटाळून कंटाळून सोडून जातो हिंदू धर्म म्हणावे आणि आम्हाला त्याचे दुःख वाटू नये? स्वामी विवेकानंद, रामतीर्थ यांनी हिंदुधर्माची थोरवी जगास पटवली. ती कशाच्या जोरावर? हिंदुधर्माची उदारता प्रकट व्हावी म्हणून. धर्म म्हणजे समुद्रात आंघोळ करणे नव्हे, वडावर जाणे नव्हे. धर्म म्हणजे दुसऱ्याच्या भावना ओळखायला शिकणे, इतरांचे सुखदुःख पाहणे, त्यांच्याशी एकरूप होणे.

+++

२. ‘काया हे पंढरी आत्मा हे विठ्ठल’

पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचे हृदय. महाराष्ट्राच्या जीवनाची ही किल्ली. पंढरपूरची कळ दाबली तर महाराष्ट्रभर प्रकाश पडेल.

पंढरपूर म्हणजे दक्षिणेची काशी. येथील पांडुरंगाचे मंदिर अति प्राचीन. जवळजवळ अडीच हजार वर्षांचे. बडवे तेथे येऊनच दोन हजार वर्षे झाली. बडवे मंडळी कर्नाटकातून आली. पंढरीचे वारकरी तिकडेही आहेत. कानात मकरकुंडले घालण्याची दक्षिणेकडचीच पद्धती. आद्य शंकराचार्य पांडुरंगाच्या दर्शनार्थ आले होते. त्यांनी पांडुरंगाष्टक स्तोत्र केले आहे. ‘‘देवा, कमेवर हात ठेवून माझ्या भक्तांना संसारसागर कमरेइतकाच खोल आहे. असे का तू दाखवीत आहेस?’’ असे त्यात त्यांनी म्हटले आहे. पंढरपूर, बार्शी म्हणजे प्राचीन धर्मसंस्कृतीचा वसौटा. धर्मसंस्कृतीचे माहेरघर. अंबरीष राजा बार्शीचाच. अंबरीषसाठी भगवान आला, पुंडलिकासाठी पंढरपूरचे परब्रह्म आले. असे हे प्राचीन पवित्र मंदिरच देवाच्या सर्व लेकरांना मोकळे व्हावे, म्हणून मी उपवास सुरू केला होता.

वारकरी पंथ सुरू होण्यापूर्वी जवळजवळ हजार वर्षे हे मंदिर प्रसिद्ध होते. पुढे संतांनी आणखी महिमा वाढविला. नामदेव-ज्ञानदेव उत्तरेची यात्रा करून आले. इस्लामी धर्म येत होता. मलबार किनाऱ्यावर तो कधीपासून आलेला होता. इस्लामी धर्मातील समतेचा परिणाम संतांच्या मनावर झाल्याशिवाय राहणार नाही. हिंदुधर्म उदार न होईल तर टिकणार नाही, असे त्यांना वाटत असावे. मशिदीत सारे समान. हिंदू मंदिरात असे केव्हा होईल? असे विचार त्यांच्या डोक्यात आले असतील, तेव्हा पंढरपूरच्या वाळवंटात तरी भेदभाव, शिवाशिव नको असे त्यांनी ठरविले असावे.

साऱ्या महाराष्ट्रातून विठ्ठलनामाचा गजर करीत येथे या. या वाळवंटात एकत्व अनुभवा. येथे परस्परांस भेटा. क्षेमालिंगने द्या. अशी नवीन प्रथा सुरू झाली. वाळवंट दणाणले, गजबजले. तुकारामाच्या अभंगात वाळवंटाचा अपार महिमा आहे.

"एकमेकां लोटांगणी येती रे
कठोर हृदये मृदू नवनीते
पाषाणा पाझर फुटती रे,"

असे उचंबळून तुकोबा म्हणतात.

संत बंडखोर होते. संस्कृतातील ज्ञान त्यांनी मराठीत आणले. संत कारुण्यसागर होते. झोपडी झोपडीत त्यांना ज्ञान न्यायचे होते. खरा धर्म न्यायचा होता. त्यांचा छळ झाला. ज्ञानेश्वरादिकांवर बहिष्कार, कुंभाराचे मडकेही त्यांना मिळू दिले नाही. तुकारामाचे अभंग इंद्रायणीत फेकण्यात आले. एकनाथी भागवत काशीच्या पंडितांनी गंगेत फेकले. संत मेल्यावर त्यांच्या पालख्या आपण उचलतो, परंतु ते जिवंत असताना त्यांचे आपण छळच केले, परंतु ते डगमगले नाहीत. वाळवंटात तरी त्यांनी भेदभाव नष्ट केला.

त्याच्या पुढचे पाऊल आपण नको का टाकायला? समाज पुढे जात असतो. नदी थबकली की संपली. समुद्राला मिळेपर्यंत ती पुढे जाणार. आपणही अवघाची संसार सुखाचा होईपर्यंत पुढे गेले पाहिजे. परंतु आपण पुढे गेलो नाही. पंढरपूरच्या वाळवंटात एकमेकांना भेटू, परंतु देवताजवळ हरिजनांना अजूनही जाता येत नाही. वारी करून घरी आल्यावर गावात शिवाशिव आहे ती आहेच. शेवटी पंढरपूर स्वत:जवळ आणायचे असते. एकनाथ म्हणतात–

"काया हे पंढरी आत्मा हा विठ्ठल"

शेवटी स्वत:च्या जीवनात सारे आणायचे असते. परंतु आपण संतांचा मागोवा घेत पुढे गेलो नाही. एखाद्या आईचे मूल पहिले पाऊल टाकते. ती शेजारणीला आनंदाने म्हणते, "बाळाने आज पहिले पाऊल टाकले." परंतु चार महिने झाले तरी बाळ दुसरे पाऊल टाकीत नसेल तर मातेला का आनंद होईल? आपण सहाशे वर्षांत दुसरे पाऊल टाकले नाही. संतांनी वाळवंटात सर्वांना जवळ घेतले. आपण मंदिरात सर्वांना घेऊया. आपले हे वंशज असे कसे गतिहीन करंटे, असे मनात येऊन संत तडफडत असतील. दु:खाने सुस्कारे सोडत असतील.

आपण का पूर्वजांपेक्षा अधिक शहाणे असे कोणी विचारतात. आपण पुढच्या काळात असल्यामुळे आपणास पुढचे दिसते. बापाने लहान मुलाला खांद्यावर घेतले तर त्या लहान मुलाला बापापेक्षा अधिक दूरचे दिसेल. मुलगा जर बापाला म्हणेल, "बाबा, ती तिकडून लॉरी येत आहे. दूर व्हा. मला दिसते आहे." तर बाप का असे म्हणेल, "गाढवा, मला शिकवतोस? मला दिसत नाही. तुला कशी दिसेल?" आपण मागच्या पिढ्यांच्या खांद्यावर आहोत. आपण पुढचे पाहू शकतो. यात मागील पिढ्यांचा अनादर नाही. उलट पुढे न जाण्यात त्यांचा अनादर आहे. पायरीला नमस्कार करायचा, परंतु तिच्यावर पाय ठेवूनच पुढे जायचे, उंच चढायचे. तेथेच घुटमळत बसायचे नाही. ती ती पिढी एकेक पायरी वर जात असावी. ध्येयमंदिराकडे जात असावी.

आपण काळाप्रमाणे बदल करायला हवा. आजूबाजूची हवा पाहून वागावे लागते. तसे न करू तर मरू. थंडीचे दिवस आले तर आपण गरम पांघरू. उन्हाळ्याचे दिवस आले तर पातळ कपडे वापरू. थंडीत उघडे बसू तर गारठून मरू. उन्हाळ्यात घोंगड्या पांघरू तर घामाघूम होऊन गुदमरून मरू.

थंडीच्या दिवसांत कढत चहाचा घोट घ्याल, उन्हाळ्याचे दिवसात थंड सरबताचा घोट घ्याल. हवा बघून आपण कपड्यालत्त्यात बदल करतो, मग डोक्यात नको का बदल करायला? १९४७ सालात वावरायचे आणि डोके का त्रेतायुगातील ठेवायचे? आज जगात नवीन विचाराची वादळे आहेत. समाजवादी क्रांतीचे नगारे वाजत आहेत. इन्किलाबची गर्जना होत आहे. समतेचा घोष होत आहे. अशा वेळेस तुम्ही आम्ही शिवू नकाची तुणतुणी वाजवीत बसायचे? जरा काळ-वेळ पाहा. सारी दुनिया जवळजवळ येत आहे. सारे जग जणू तिमजली घर झाले आहे. अमेरिकेत काय बोलले जाते, काय होते, ते मुंबईत लगेच वर्तमानपत्राच्या कचेरीत आपोआप यंत्राने लिहिले जाते. बंधूंनो, दूर राहायच हे दिवस नाहीत. डबकी करून बसण्याचे हे दिवस नाहीत. मोठी दृष्टी घ्या. विचारात, आंचारात उदार दृष्टी आणा.

धर्मात दोन भाग असतात. यम नि नियम. यम म्हणजे कधी न बदलणारी शाश्वत सत्ये. खरे बोलावे, आत्मा अमर आहे, सर्वत्र आत्मतत्त्व पाहा- या तत्त्वांना यम म्हणतात. ही तत्त्वे त्रिकालाबाधित असतात. प्रभू रामचंद्र, हरिश्चंद्र यांचा काळ असो, महात्माजींचा असो. सत्याला सोडू नये हा निरपवाद सिद्धांत आहे. यमात फरक कधी होत नाही. परंतु नियमात होत असतो. त्या त्या काळी समाजाला फरक करावे

लागतात. चालीरीती बदलतात. लहानपणचे कपडे मोठेपणी अंगास येणार नाहीत. असे फरक आपण सदैव करीत होतो. म्हणून तर नाना स्मृती.

पूर्वत फरक करणारे, बदल करणारे होते. स्वतंत्र बुद्धी वापरणारे होते. एकदा एक शास्त्री मला म्हणाले, ''गीतेत तस्मात् शास्त्र प्रमाणं ते' असे म्हटले आहे. शास्त्राने सांगितल्यामुळे आम्ही अस्पृश्यता मानतो. दुष्टपणामुळे नव्हे.'' परंतु मी त्यांना म्हटले, ''भगवान जे शास्त्र प्रमाण सांगत आहेत. ते तुमचे शिवाशिवीचे शास्त्र नव्हे. ते म्हणतात, ''मया प्रोक्तं शास्त्रम,' मी जे शास्त्र तुला सांगितले आहे ते प्रमाण मान. ते तर सारे बुरसटलेले धर्म झुगारून द्यायला सांगत होते.''

''सोडून सगळे धर्म एका शरण ये मज'' सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज, असे ते म्हणत आंहेत. ते वेदवादांचे धर्म त्यांना नको होते. श्रेष्ठ, कनिष्ठपणाचे धर्म त्यांना नको होते. समाजाच्या सेवेचे कोणतेही कर्म करणारा मुक्त आहे, अशी त्यांची महान शिकवण आहे. ''स्वकर्म कुसूमी त्यास पुजूनी मोक्ष मेळवी.'' सेवेचे कोणतेही कर्म म्हणजे प्रभूची पूजा. श्रीकृष्णाच्या काळी ब्राह्मण, क्षत्रियांना वरचे स्थान होते. स्त्रियांना कमी मानू लागले होते. श्रीकृष्ण म्हणतात,

''स्त्रियो वेश्यास्तथा शूद्रस्तेऽपियान्ति परांगतिम्''

शेतकरी, कामकरी, सर्वांना ते जवळ घेत आहेत. सेवेची जी जी कर्मे आपण कमी मानू लागलो ती ती भगवंतांनी स्वतः केली. राजसूय यज्ञाच्या वेळी धर्मराजा श्रीकृष्णास म्हणाला, ''देवा, तू कोणते काम करशील? येणाऱ्या थोरामोठ्यांचे स्वागत करशील?'' श्रीकृष्ण म्हणाला, ''नको, मी एक काम करीन. हजारो लोक जेवून उठतील तेथे मी शेण लावीन.'' पुरुष जेवून ओटीवर विडा चघळीत बसतात. बायका शेण लावतात म्हणून का तुच्छ? तर मग तेच काम मी करतो आणि ते कर्म पवित्र आहे, थोर आहे असे जगाला दाखवतो, असे श्रीकृष्ण मनात म्हणाले असतील. गायी गुराख्यांबरोबर ते जेवले, त्यांनी घोडे हाकले, त्यांचे खरारे केले, त्यांची उष्टी काढून शेण स्वतः लावले. महापुरुष सेवेची जी जी कर्मे पवित्र आहेत, ती कर्मे स्वतः करून सिद्ध करतात. आपल्या महाराष्ट्राचे महर्षी सेनापती बापट आहेत. त्यांचे दिव्य जीवन तुम्हाला माहीत आहे?

समाजाची सेवा करणाऱ्या सर्वांना ऋषी उचंबळून प्रणाम करीत आहे. रुद्रसूक्तात ऋषी म्हणतो, ''कुंभारा, तुला प्रणाम; चांभारा, तुला प्रणाम.'' मी

लहानपणी हे मंत्र शिकलो. मोठेपणी अर्थ कळू लागला. मी सुटीत गावी जाऊन शंकराच्या देवळात बसत असे. वेद शिकवणारे भटजी 'चर्माकरेभ्यो नमो' – चांभारा तुला प्रणाम असे म्हणत शंकरावर अभिषेक करीत असत. मी त्यांना म्हणे, ''तुम्ही चांभाराला प्रणाम करीत आहात. पंड्या चांभाराला आणू का मंदिरात?'' ते रागावत. म्हणत, ''तुला शिंगे फुटली.'' मी म्हणे, ''तुम्ही म्हणता, त्याचा अर्थ असा आहे.'' अर्थरूप होणे म्हणजे धर्म.

बंधूंनो, आपण मोठमोठी तत्त्वे बडबडतो, परंतु कृती मात्र उफराटी असते. ओठावरचा घास पोटात गेला नाही, तर शरीर धष्टपुष्ट होईल का? त्याप्रमाणे ती तत्त्वे आपण बडबडतो, ती कृतीत न आणू, जीवनात न आणू तर समाज समृद्ध होईल का? भगवान श्रीकृष्णाच्या या भूमीत आज सर्वत्र दुःख, दैन्य, दास्य आहे. त्यांच्या गोकुळात तर अपार आनंद होता.

गोकुळात प्रेमाचा पाऊस पडत होता. ''यारे यारे अवघे जण'' अशी भगवंताची हाक होती. तेथे भेदाभेदांची भुते नव्हती. वणवे भेदाचे श्रीकृष्णाने गिळून टाकले होते. नवीन पिढीच्या सर्व मुलांना त्याने एकत्र जेवायला बसवले. सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र मिसळून काला केला. त्याने अलग पंक्ती बसवल्या नाहीत. याचा पाट असा, त्याचा तिरका, असला चावटपणा गोकुळात नव्हता. तेथे पेंद्याची भाकरी नि श्रीमंताची पोळी एकत्र मिसळण्यात आली होती. तो गोकुळातील काला आठवा. आकाशातील देवांना त्याचा हेवा वाटला.

आपापल्या बंगल्यात बसून अमृत ओरपून ते कंटाळले होते. ते वैभवाला, एकांडे शिलेदारपणाला कंटाळले. ते यमुनेच्या पाण्यातील मासे बनले. गोपाळकृष्णाच्या हातचे शितकण यमुनेच्या पाण्यात पडत. ते मटकावून ते कृतार्थ होत. त्या एकेका कणात प्रेमाचा सागर होता. मधुरतेचा सिंधू होता. सर्वांसह एक जेवणारा कोठे तो गोपाळकृष्ण आणि अमक्यातमक्याकडे जेवला म्हणून बहिष्कार घालणारे आपण करंटे कुठे? कशाला रामकृष्णाची आपण नावे घ्यावीत? कशाला ती पवित्र मानता? मुलाबाळांना ठेवता.''

तो प्रभू रामचंद्र गुह कोळ्याला हृदयाशी धरी. शबरीची उष्टी बोरे खाई. जटायू पक्ष्याचे श्राद्ध करी. वानरांना, अस्वलांना जवळ घेई. आपण रामजन्म करतो. गोकुळअष्टमीस कृष्णजन्म करतो, परंतु देव जन्मताच मरतो. आज भारतवर्षात देव

नाही. जेथे भाऊ भावाची उपेक्षा करीत आहे, भाऊ भावाला शिवू नको म्हणत आहे, भाऊ भावाला जवळ घेत नाही, प्रेमाने कवळा देत नाही, पाणी देत नाही, तेथे कोठला धर्म?

आणि शंकराची मूर्ती म्हणजे मला जणू अंत्यजाची मूर्ती वाटते. त्याच्या नेसू कातडे, हातात कपालमात्र, हाडाचे भांडे, अंगाला धूळ, रक्षा, कोणाचे आहे हे रूप? कोणाची मूर्ती म्हणून महिम्न स्तोत्रात म्हटले आहे की, देवा अमंगल स्वरूपातच मांगल्य आहे. महिम्न स्तोत्र रचणाऱ्याला ते दिसले, परंतु तुम्हा–आम्हाला ते दिसले नाही. हरिजनांचा, सेवा करणाऱ्यांचा महिमा कळला नाही.

आणि दत्ताची मूर्ती बघा! बरोबर कुत्री आहेत. कधी भणंग वेषाने हिंडत आहेत, त्यातील भावार्थ लक्षात घ्या. देव सर्वत्र आहे. सर्व स्वरूपात आहे. तो बघा. माणसाला दूर नका करू, परंतु आपण सारे माणूसघाणे झालो.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, देवाची भक्ती मनात असेल तर जाति–व्यक्तीच्या नावाने शून्य करा. ''तेथ जाति–व्यक्ती पडे बिंदुले.'' परंतु देवासमोरही आपण जातीचे अहंकार मिरवतो. मुंबईहून मुलगा सुटाबुटात घरी यावा व एकदम आईला भेटायला जावा. आई म्हणाले, ''तुझे खोगीर उतरून ये. तो जामानिमा ओटीवरून काढून आत ये.'' त्याप्रमाणे ती जगन्माता म्हणेल, ''अरे मी ब्राह्मण, मी मराठा, मी साळी, मी माळी हे बिल्ले छातीवर लावून माझ्याकडे येऊ नका. सारे विसरून या.''

जेथे आपण सारा अहंकार विसरू असे एकतरी स्थान जगात असूदे. बैठकीत, बाजारात, कचेरीत तुझे ऐट आहे. घमेंड आहे, परंतु प्रभुसमोर तरी ती नको. तेथे धुळीतील कण हो. विरघळून जाणारे मातीचे ठिपळ हो. तेथेही अहंकार नेशील तर कसे होईल?

तुकाराम महाराज म्हणतात, ''जाळीन मी भेद। येथे प्रणाम तो वेद– मी सारे भेद झुगारीन. वेदांचा मला आधार आहे.'' आणि वेदांचा आत्मा त्यांच्याजवळ होता,

''वेदांचा अर्थ तो आम्हासची ठावा।
येरांनी वहावा भार माथां ।।

पोथ्या–पुराणांची ओझी दुसरे बाळगतील; घोकतील. परंतु त्यातील अर्थ आम्हा संतांजवळ आहे. भेदाभेद अमंगळ म्हणून ते म्हणतात. ज्या गावातील लोक परस्परांस प्रेम देणार नाहीत, तेथे राहूनही नये असे ते म्हणतात. जिकडे तिकडे त्यांना

आत्मा दिसे. ‘‘चल नारायण, चल माझे घरी’’ असे ते रस्त्यात भेटणाऱ्याला म्हणतात. सर्वत्र त्यांचा नारायण आहे. आपल्या सेनापतींचे असेच. मी एकदा पुण्यात त्यांना रस्त्यात भेटलो. त्यांनी माझा हात हातात धरला. म्हणाले, ‘‘चला जेवायला.’’ मी म्हटले, ‘‘मी असा कसा येऊ?’’ ‘‘आपण असेल ते खाऊ.’’ ते म्हणाले. सेनापती मुक्त पुरुष आहेत. सर्वांना जवळ घेतात. कोठून आणलीत ही शिवाशिव? अद्वैताच्या या भूमीत का हे दुहीचे अपरंपार पीक? तुकाराम महाराजांनी एकाचाच विटाळ माना म्हणून सांगितले आहे.

‘‘छळीत जो खळ। त्याचा धरावा विटाळ।’’ जो कोणी दुष्ट छळ करीत असेल, त्याला दूर उभे करा, परंतु त्याचा तर तुम्ही उदोउदो करता.

समानता हा तर धर्माचा आत्मा. ख्रिस्ती मंदिरात सार ख्रिस्ती जातात. मशिदीत सारे मुसलमान जातात, परंतु आपल्या मंदिरात सारे हिंदू जमू शकत नाहीत. ते का देवाचे मंदिर? देवाजवळ सारे समान. ना कोणी बडा ना छोटा; ना श्रेष्ठ ना कनिष्ठ.

औरंगजेब एकदा शुक्रवारी नमाज पढायला उशिरा गेला. मशिदीत हजारो मुसलमान आधी आले होते. बादशहास पाहून सारे हटो, हटो करुन जागा द्या म्हणून बोलू लागले. औरंगजेब संतापून म्हणाला, ‘‘कोणी हटू नका. जागच्या जागी बसा. येथे मी बादशहा नाही. तुम्ही माझी प्रजा नाही. एका अल्लासमोर आपण आहोत. मी उशिरा आलो आहे. दारात बसेन.’’

मुसलमानी धर्मात ही समानता आहे. बाहेर कोणी अमीर असेल, फकीर असेल. परंतु मशिदीत तरी सारे समान. आपल्या देवळात आहे का ही स्थिती? तेथेही आपली भांडणे, श्रेष्ठ–कनिष्ठपणाचे वाद. तेथेही सर्वांना प्रवेश नाही. माणसाला दूर करणाऱ्याजवळ देव नसतो. थोर कवी रवींदनाथ यांनी एक सुंदर गोष्ट कवितेत लिहिली आहे. एक पुजारी देवपूजेसाठी जात असतो. सोवळा आहे तो. हातात पूजेचे ताट आहे. धूपदीप, फुले, उदबत्त्या, कापूर सारे आहे. आपल्या पाठोपाठ कोणीतरी येत आहे असे त्याला वाटले. तो मागे वळून बघतो, ‘‘कोण रे तू? हो दूर. शिवशील, सावली पडेल. दूर हो. मी सोवळा आहे. हो दूर. तिकडे चालता हो.’’ असे म्हणत तो मंदिरात येतो, परंतु त्याला मंदिरात देवाची मूर्ती दिसत नाही.

‘‘करा रे, वाजवा रे नगारे, देवाची मूर्ती कोणी चोरली. धावा, धावा.’’ असे तो ओरडतो. चारी दिशांनी लोक येतात, धावतात. त्या पुजाऱ्याने ज्याला हिडीस फिडीस

करून घालवलेले असते, त्याच्याजवळ सर्वांना मूर्ती दिसते. ''पकडा त्या हरामखोराला. तो मूर्ती घेऊन जात आहे. केव्हा गेला मंदिरात? पकडा'' असे म्हणून सारे धावतात. तो चोर सापडत नाही. ते थकतात. इतक्यात चोर अदृश्य होतो. कोठे गेला? पाताळात गेला की आकाशात? सारे वर-खाली, चोहोबाजूला टकमक बघू लागतात. इतक्यात समोर चतुर्भुज सावळी मूर्ती त्यांना दिसते. तो लोटांगण घालतात. ''देवा, तू इकडे कोठे होतास?'' ते विचारतात.

''मी तुमच्या मंदिरातून चाललो. त्या माणसाला हो दूर, हो दूर असा हा पुजारी म्हणत होता. त्या माणसात का मी नव्हतो? माणसाला दूर हो म्हणणारा देवालाच दूर हो म्हणत असतो. म्हणून मी चाललो.''

बंधूंनो, सर्वांत तुच्छ वस्तू म्हणजे माती, दगडधोंडा. त्या मातीची मंगलमूर्ती बनवून तिच्यात आपण प्रभूचे सौंदर्य बघतो. दगडाची मूर्ती बघून तिच्यात प्रभूला पाहतो. मग चैतन्यमय माणसात तो का पाहात नाही? वड, पिंपळ, उंबर पाहून नमस्कार करता, परंतु माणसाला का दूर करता? माणसाचा अव्हेर करणाऱ्याला कोठला देव?

धर्म हा जोडणारा असतो. तोडण्यासाठी तो नसतो. समाजाची धारणा ज्याने होते तो धर्म. कोकणात घराचा जो आधारभूत खांब, आधारभूत तुळई त्याला धारण म्हणतात. धारणाची पूजा करतात. आंब्याचे डहाळे बांधतात, कारण सारे घर त्यावर आधारलेले. धर्म म्हणजे सर्वांचा आधार. परंतु ज्या समाजात कोट्यवधी लोक दूर फेकले आहेत, तेथे का धारणाप्रधान धर्म शिल्लक आहे? तो समाज धर्महीन आहे. शतखंड तो झालेला असणार.

विवेकानंदांहून गेल्या शतकात हिंदू धर्माचा थोर उपासक दुसरा कोण असेल? अमेरिकेत त्यांनी हिंदुधर्माचा विजयध्वज फडकावला. तो इतिहास वाचून आमच्या अंगावर मूठभर मांस चढते. परंतु तुमची शिवाशिवी का त्यांनी जगासमोर मांडली?

तुमच्या धर्मातील उदात्त तत्त्वे त्यांनी दुनियेसमोर ठेवली. परंतु हिंदू धर्मातील दिव्यता सांगणारे विवेकानंद हिंदू धर्मातील अनुदारता पाहून एके दिवशी रडले. मित्रांनी विचारले, ''स्वामीजी, का रडता?'' ते म्हणाले, ''हिंदू लोकांनी आपल्याच बंधूंना पशूंच्या स्थितीत नेऊन ठेवले आहे. त्या पार्थसारथीच्या या देशात केवढे हे पाप? या लोकांना मी कसे वर आणू म्हणून मी रडत आहे.''

बंधूंनो, विकानंदांची ही वेदना तुम्हाला कळते का? रामतीर्थ एकदा म्हणाले, "आमच्या धर्माला शिवू नको हे नाव द्यावे." या रामतीर्थांच्या उद्‌गारातील तीव्र दु:ख तुम्हाला कळते का?

वाईच्या प्राज्ञ पाठ शाळेतील थोर आचार्य नारायणशास्त्री मराठे. आज त्यांनी केवलानंद नाव घेतलेले आहे. थोर ब्रह्मचारी, विनोबाजी त्यांच्या पायाजवळ शिकले. माझा एक मित्र बाबा फाटक त्यांच्याजवळ शिकत होता. तो त्यांना म्हणाला, "देव मिळावा म्हणून हिमालयात जावे,असे वाटते." ते म्हणाले, "हरिजनांची सेवा कर. त्यांच्या मुलांची ढुंगणे धू. तुला देव भेटेल."

त्यांना का धर्म कळत नाही. धर्मासाठी, राष्ट्रासाठी, त्यांना निदिध्यास. १९३१ मध्ये वाटोळ्या परिषदेच्या वेळी लंडनमध्ये आमच्या पुढाऱ्यांचे आपसात जमेना. जगासमोर या देशाचे धिंडवडे होत होते. एके दिवशी नारायणशास्त्री जेवताना रडत होते. मुलांनी विचारले, "आचार्य, अश्रू का?" ते म्हणाले, "भारताचे लंडन येथे चाललेले धिंडवडे वाचून डोळे भरून येतात. सुचत नाही."

अशा नारायणशास्त्र्यांना का धर्म कळत नाही? आणि महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री, म. म. काणे सांगतात की अस्पृश्यता दूर करा.

अस्पृश्यता धर्माविरुद्ध आहे. श्री संत तुकडोजी महाराज अस्पृश्यता दूर करा सांगतात.

श्री तुकडोजी महाराज म्हणाले, "हरिजनांना मंदिर उघडेपर्यंत मी मंदिरात जाणार नाही." अरे, तुम्हाला कोण धर्म शिकवणार? महात्माजींहून सत्याचा पुजारी कोणता आणायचा? त्यांचे श्वासोच्छ्‌वास म्हणजे वेद. त्यांचे बोलणे-चालणे म्हणजे शास्त्र, म्हणजे गीता. थोर महात्मे तुम्हाला हरिजनांना जवळ घ्या सांगत आहेत. आता अंत पाहू नका. अंत बघाल तर तुमचा अंत होईल.

तो थोर भक्त चोखोबा. देवाच्या दर्शनासाठी तळमळणारा. ध्यानी-मनी त्याला देव दिसतो. त्याला स्वप्न पडले. विठाई माउलीने आपल्याला जवळ घेतले आहे. प्रभू आपल्या गळ्यातील तुळशीचा हार आपल्या गळ्यात घालीत आहे, असे त्याला दिसते. सासरहून मुलगी माहेरी यावी, आईने तिला जवळ घेऊन स्वत:च्या गळ्यातील हार तिच्या गळ्यात घालावा, तसे चोखोबाला दिसले. "माझ्या देवाने हार घातला." असे आनंदाने मस्त होऊन तो सांगत सुटला. बडवे त्याला मारतात. त्या चोखोबांची वेदना कोण जाणणार?

''ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा
काय भुललासी वरलिया अंगा ।।

असे तो पुकारतो. परंतु आम्ही सारे बहिर्दृष्टी. हृदयाची श्रीमंती कोण ओळखणार?

एका भांडखोर माणसाने एकदा एकनाथास विचारले, ''तुम्ही कसे शांत असता? आमच्याजवळ तिळभरही शांती नसते.'' नाथ म्हणाले, ''ते सारे जाऊ दे. तू आठ दिवसांनी कदाचित देवाघरी जाशील.'' ''काय, मी मरणार? आठ दिवसच राहिले?'' असे म्हणून तो मनुष्य घरी गेला. शेजाऱ्या-पाजाऱ्यांची तो क्षमा मागू लागला. ज्यांच्या ज्यांच्याशी तो भांडला होता, ज्यांना ज्यांना त्याने तुच्छ मानले होते, त्या सर्वांची त्याने क्षमा मागितली. बायकोची क्षमा मागतो. उगीच मारले म्हणून मुलांच्याजवळही क्षमा मागतो. एके दिवशी नाथ त्याच्याकडे आले. त्या माणसाने विचारले, ''आली का वेळ? भरली का घटका?'' नाथ म्हणाले, ''ते काय मला माहीत? परंतु तुझे हे आठ दिवस कसे गेले? किती जणांजवळ भांडलास?'' तो म्हणाला, ''नाथ, कसले भांडण नि काय? समोर सारखे मरण होते. सर्वांची क्षमा मागत होतो.'' नाथ म्हणाले, ''आम्ही नेहमी मरणाचे स्मरण ठेवतो. सर्वांना प्रेम देतो. कशाला अहंकार? भांडणे?'' बंधूंनो, हरिजनांना दूर ठेवून का तुम्हाला मोक्ष मिळणार आहे. स्वतःला उच्च मानता, परंतु दुसऱ्यास तुच्छ मानून स्वतःला उच्च समजणाऱ्यास गीतेने आसुरी म्हटले आहे.

आपण बंधुभाव ओळखीत नाही. धर्माचा आत्मा जाणत नाही. मानवतेशी आपण पारखे झालो आहोत. आपण सत्ता ओळखतो. दंडुक्यासमोर मान लववितो. मुसलमान बंधू तुमच्या विहिरीवर पाणी भरू शकतात. तुमच्या ओटीवर बसतात. तुम्ही त्यांना प्रेमाने सुपारी, पान देता. परंतु हरिजन मात्र तुम्हाला चालत नाही. तुम्ही मुसलमानास येऊ देता हे चांगले आहे. परंतु त्यांनाही हा हक्क तुम्ही प्रेमाने दिलेला नाही. मुसलमान तेथे शेकडो वर्षे राज्यकर्ते होते. त्यांनी तो हक्क मिळवला. सत्तेसमोर तुम्ही वाकलात.

नदी सारे प्रवाह घेऊन मोठी झाली. हा समुद्र अनंत प्रवाह घेऊन अमर झाला; सारखा उचंबळत आहे, असा विचार डोक्यात येऊन सारे मानवी प्रवाह जवळ घ्यायला आपण तडफडावे. या भारतात एक मानवी प्रवाहांचे तीर्थक्षेत्र होवो, असे रवींद्रनाथ

म्हणत. आपण या देशाला शतखंड केले आहे. हिंदू-मुसलमान दूर राहिले. हिंदु-हिंदूत किती डबकी. ब्राह्मण, मराठे, साळी, माळी शेकडो प्रकार. जातीच्या पलिकडे पाहण्याची दृष्टीच नाही. तू कोठे पाणी प्यायलास, याहून महत्त्वाची जणू जगात दुसरी वस्तू नाही. ही सारी डबकी फोडा. डबकी झाली तर हिवताप, डास, मरण. या देशात भेदांची डबकी माजवली. राष्ट्रावर प्रेतकळा आली. ज्या देशातील लोक एकमेकांवर डोळे वटारतात, शिंगे उगारतात, त्यांच्या पाठीवर मृत्यूदेव बसतो. यमाचे वाहन रेडा आहे, याचा हाच अर्थ. फोडा डबकी. एक विशाल मानवी प्रवाह करा. जातिभेदाचे बुजबुजाट पुरे.

एक शास्त्री म्हणाले, ''अहो गुरुजी, सर्वत्र एक ब्रह्म आहे, एक आत्मा आहे, हे खरे असले तरी सर्वत्र भेद आहेत. या शरीरात पाहा. उजवा हात पवित्र. डावा हात सकाळी गंमत करतो, परंतु माती लावून, साबण लावून धुतला की झाले. त्या हातावर राखुंडी घेऊन दात घासता. त्या हातावर चुन्याचे बोट फासून तंबाखू चोळता. त्या हातानेच जेवताना पाणी पिता. डावा हात दुखू लागला तर उजवा हात धावतो. डाव्या हाताला दुःख झाले तर दूरचे वरचे डोळे रडू लागतात. सर्व शरीरात एक प्राण आहे. एका नाडीचे ठोके पडत आहेत. राष्ट्रातील सर्व जातीप्रजाती म्हणजे राष्ट्रपुरुषाचे अवयव. सर्वांमध्ये एक प्राण हवा. एक नाडी हवी. हरिजनांना पाणी मिळत नसेल तर तुमचे डोळे ओले व्हायला हवेत. हरिजनांना घरे नसतील तर तुमच्या हृदयाला घरे पडायला हवीत. उगीच काहीतरी बोलू नका. धर्माची टिंगल करू नका. व्यर्थ कोट्या करून लोकांना झुलवू नका, फसवू नका. तुमचा होतो खेळ, राष्ट्राचा जातो प्राण. तुम्ही हसाल परंतु तुमच्या धर्माचेही हसू होते.''

बंधूंनो, जगाला जवळ घ्याल तर देव तुमच्याजवळ येईल. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

''येथ विद्वत्त पऱ्हां सांडिजे । तेथे व्युत्पत्ती अवधी विसरिजे ।।
जे जगा धाकुटे होईं जे । ते जवळीक माझी ।।''

तुमचे विद्वत्व, तुमचे पांडित्य विसरून जगाजवळ जा. साऱ्या जगासमोर नम्र व्हाल, तर देव तुमच्याजवळ आहे.

तुकाराम महाराज म्हणतात,

''नम्र झाला भूतां । तेणे कोंडिले अनंता ।।

जो प्राणिमात्रासमोर नम्र होईल, तो विश्वंभराला हृदयात कोंडून ठेवील. ज्ञानेश्वर म्हणतात,

तै झडझडून राहिला निघ । इये भक्तीचिये वाटे लाग ।।
तै पावसी अव्यंग । निजधाम माझें ।।

ही सारी क्षुद्र जळमटे दूर करा. खरा धर्म हृदयात येऊ दे. मानवावर, प्राणिमात्रावर प्रेम म्हणजेच भक्ती. ''पादोऽस्य विश्वा भूतानि'' हे सारे प्राणी म्हणजे जणू प्रभूचे चरण. प्रभुचरणभक्ती म्हणजे भूतमात्रांवर प्रेम. तसे कराल तर ते अव्यंग निजधाम मिळेल. सर्वांचे संसार सुखी करणारे स्वराज्य तेव्हाच मिळेल. ऐहिक मोक्ष, पारलौकिक मोक्ष सर्वांवर प्रेम करण्यानेच लाभेल, असे संत पुन:पुन्हा सांगतात. परंतु ऐकतो कोण?

तुकाराम महाराज म्हणतात,

बोलणे फोल झाले । डोलणे वाया गेले ।।

आमच्या ओठांवर मोठमोठी वचने, देवता सर्वत्र आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र तो आहे. आजीपासून पंडितांपर्यंत सारे असे म्हणाले, परंतु माणसाला दूर ठेवतील. म्हणून तुकाराम महाराज म्हणाले,

घरोघर अवघे झाले ब्रह्मज्ञान
द्या रे एक कण जरी नीरें ।

घरोघर देवतांची चर्चा आहे. सर्वत्र ज्ञानेश्वरीवर प्रवचने, कीर्तने आहेत. परंतु एक कणभर शुद्ध ब्रह्मज्ञान असेल तर द्या, असे तुकाराम महाराज म्हणतात. बडबड म्हणजे ब्रह्मज्ञान नव्हे. अंत:करणात उत्तरोत्तर सहानुभूती वाढणे म्हणजे ब्रह्मज्ञानाचा उदय.

✦✦✦

३. चिंता करतो विश्वाची

रामदास स्वामींनी महाराष्ट्रभर मारुतीची उपासना रूढ केली म्हणतात. असे एकही गाव नसेल जेथे मारुतीचे लहानसे मंदिर नाही. आधी रामाचा जन्म, नंतर मारुतीचा. आधी ध्येय व मग त्यासाठी धडपडणारा जीव. हनुमंताचा केवढा महान आदर्श! शरीराने बलवान आणि बुद्धीनेही समर्थ. पुन्हा हे सारे कायिक व बौद्धिक बळ त्याने रामसेवेसाठीही दिले. आपले जीवन थोर ध्येयासाठी देणे म्हणजे मारुतीची उपासना. हनुमान जन्मला तोच लाल सूर्यबिंबाला मिठी मारायला उड्डाण करिता झाला. मारुतीचे उपासक समर्थ रामदास स्वामी लिहतात :

''उत्कट भव्य तें घ्यावें । मिळमिळीत अवघेंचि टाकावें ।।''

जीवनात मिळमिळीतपणा नको. परीक्षेत होईना काठावर पास अशी आज मुलांची वृत्ती. शंभरातील नव्वद मार्क मिळवीन अशी महत्त्वाकांक्षा नाही. कोणतेही कर्म असो. त्यात परमोच्च बिंदू गाठीन, अशी धडपड हवी. मिळमिळीत जीवनात राम नाही, ते मारुती हृदयाशी धरणार नाही. मारुतीच्या किती कथा! सीतामाई त्याला मोत्यांचा हार देते. तर तो एकेक मोती चावून बघतो. सीता म्हणते, ''हे रे काय?'' तो उत्तरला, ''त्यात राम आहे का बघत आहे.'' ती म्हणाली, ''तुझ्या हृदयात आहे.'' त्याने हृदयपाट उघडून आतील राममूर्ती दाखविली. ध्येयाचा ध्यास हवा माणसाला. कबीर म्हणतो,

''अंदर राम बाहर राम। जहाँ देखो वहाँ राम ही राम।।'' आतबाहेर राम. जेथे बघेन तेथे रामच राम.'' मारुतीला त्याची आई अंजनी भेटली. ती म्हणाली, ''अरे, तुझी स्तुती जो तो करतो. परंतु मी नाही करणार तुझी स्तुती.'' शेवटी रावणाचा संहार

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय,

करायला रामरायांना यावे लागले. रामाला श्रमवलेस. तूच का नाही रामाचे सारे काम करून टाकलेस.'' अशी अंजनी माता.

माघ महिन्यात वद्य नवमीला सज्जनगडावर दासनवमीला मोठा उत्सव होतो. नऊ दिवस उत्सव चालतो. समर्थ रामदासस्वामी माघ वद्य नवमीस निजधामास गेले. सज्जनगडावर समर्थांची कुबडी आहे. त्यांचा शिष्य कल्याण जो पाण्याचा हंडा भरून आणीत असे, तो हंडा तेथे आहे. समर्थांचा तांब्या तेथे आहे. गडाच्या पायथ्याशी उरमोडी नदी आहे. मराठीचे थोर ह. भ. प. लक्ष्मणराव पांगारकर सज्जनगडला दासनवमीच्या वेळेस जायचे, कीर्तन करायचे, रंगायचे. ''कुस्ना थमाल ले थमाल अपुल्या गार्यी। आम्ही आमुच्या घलासि जातो ले भाई.'' हे गाणे रसिक पांगारकर पुन:पुन्हा म्हणायचे. हल्ली तेथे उत्सवाची मजा येते की नाही, मला माहीत नाही. नऊ दिवस तेथे सर्वांना मुक्तद्वार जेवण असे. गादीवर असणारे महाराज दिवसभर सर्वांची वास्तपुस्त घेऊन रात्री जेवत. मी एक गोष्ट एकदा ऐकली होती. एकदा सज्जनगडावर असाच उत्सव होता. आणि गादीवर जे महाराज होते, त्यांचे रात्री एकाएकी पोट दुख्रू लागले. गडावर कोणी उपाशी नाही ना, म्हणून शोध सुरू झाला. तो कोणी एक गरीब मनुष्य भुकेलेला आढळला. त्याला जेवण देण्यात आले. लगेच महाराजांचे पोट थांबले. आज आपल्या देशात लाखो लोक अर्धपोटी असतील; परंतु कोणाचे पोट दुखते का? गरिबांच्या जीवनाशी समरस होणे सोपे नाही.

समर्थांचे चरित्र किती उदात्त! वयाच्या दहाव्या वर्षीच आईला म्हणाले, ''आई चिंता करतो विश्वाची.'' त्यांना सर्व समाजाची काळजी. मिळमिळीत जीवनाची त्यांना मनस्वी चीड. संसार करायचा तर नीट करा. भिकारड्यासारखा नका करू. त्यांची एक प्रसिद्ध ओवी आहे,

घालून अकलेचा पवाड
व्हावे ब्रह्मांडाहून जाड
तेथे कैचें आणलें द्वाड। करंटेपणा ।।

आपल्या विचाराने सर्व विश्वाला मिठी मारावी, क्षुद्रपणा सर्वांशी भांडणे या वृत्तीचा त्याग करावा. समर्थ सांगत ''रोज काहीतरी लिहा, काही तरी वाचा.'' त्यांच्या मठातून शेकडो हस्तलिखित ग्रंथ असत. समर्थांच्या समोर समृद्ध स्वराज्याचे

स्वप्न असे. ज्या स्वराज्यात विद्या आहे, कला आहे, असे स्वराज्य त्यांना हवे होते. ''पावन भिक्षा दे राम'' हे त्यांचे गाणे. राष्ट्राकार होऊन समर्थ प्रभूजवळ भिक्षा मागत आहेत. रुद्रसूत्रातील ऋषी ज्याप्रमाणे समाजाच्या सर्व गरजा मागत आहे, तसेच या पावन भिक्षेत आहे.

पंढरपूरचा विठोबा म्हणजे महाराष्ट्रीय जनसंघटनेचा मुका अध्यक्ष. तेथे सर्वांनी यायचे, भेटायचे आणि तेथील गोष्टी ऐकल्या म्हणजे अश्रू येतात. बडवे पुजारी पांडुरंगासमोर टाकलेले मोजतात, तेव्हा त्यांना कधीकधी कागद आढळतात. आशेने लिफाफे फोडावेत तो त्यात, ''देवा, पांडुरंगा, सासू छळते, नणंदा त्रास देतात, त्यांचेही प्रेम नाही. तुला दया. कोणाजवळ दु:ख सांगावे? तू मायबाप. म्हणून तुला सांगते.'' असे मजकूर आढळतात. तर एखाद्या पत्रात ''भाऊबंदांनी नाडले, का रे देवा असे व्हावे? मी काय पूर्वजन्मी पाप केले की, मी अन्नाला मोताद व्हावे नि माझ्या भाऊबंदांनी माड्यातून राहावे. माझी अब्रू तू राख. तुला चाड.'' असे दिसते. दुसऱ्याजवळ आपली दु:खे उगाळीत बसण्यापेक्षा कोणीतरी विश्वशक्ती आहे तिच्याजवळ दु:ख सांगावे, ही वृत्ती का क्षुद्र?

आषाढी एकादशी. पंढरपूरला मोठा सोहळा. लाखो लोकांची यात्रा. अनेक संतांच्या पालख्या येथे येतात. आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्र्यंबकेश्वराहून निवृत्तीनाथांची. अनेक पालख्या पंढरपूरला जातात. यंदा सज्जनगडाहून पालखी येणार आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी जो पंथ सुरू केला, त्याला वारकरी पंथ म्हणतात. समर्थांच्या संप्रदायाला धारकरी म्हणतात. परंतु हे दोघे पंथ परस्पराला पूरकच होते. वारकरी पंथाने महाराष्ट्रात एकता निर्माण करण्यास अपार मदत केली. पंढरपूरच्या वाळवंटात तरी भेदभाव दूर केला. महाराष्ट्रातून लाखो लोक एकत्र यायचे, पायी यायचे, नामघोष करीत यायचे. आपण सारे एक, एका राष्ट्राचे ही भावना बळावे. पुण्याहून या पालख्या जातात. केवढा सोहळा. लोक आंबे, केळी यांचा पालख्यांवर वर्षाव करतात. लहान मुले पारख्या करून, ग्यानबा-तुकाराम करीत या मिरवणुकीत सामील होतात. न्यायमूर्ती रानडे माहीत आहेत ना? पुण्याच्या सार्वजनिक ग्रंथालयाच्या इमारतीतून न्यायमूर्ती रानडे ती श्रद्धा, तो त्याग, ते भक्तिप्रेम पाहून सद्‌गदित झाले. त्यांचे डोळे भरून आले. ज्यांनी ही निष्ठा दिली ते किती थोर!

नवीन निष्ठा द्यावयाची असेल तर ती त्यागानेच देता येईल. पंढरपूरला एकदा एक वेश्याकन्या आली. बादशहाचे तिच्यावर प्रेम. ती म्हणाली, "पांडुरंगाला भेटून येते." आणि देवाच्या चरणांवर डोके ठेवले. असा त्याग पंढरपूरला ओतला गेलेला आहे. परंपरा उगीच नाही सुरू होत. कुत्र्यासही तूप देऊ पाहणारे नामदेव, कोठारे लुटवणारे दामाजी, विष्णुमय जगत पाहणारे तुकाराम, शांतिसागर एकनाथ आणि ती ज्ञान, वैराग्याची मूर्ती ज्ञानदेव सर्वांची पुण्याई पंढरपूरला ओतलेली. लाखो लोक तेथे जमतात. त्यांच्या श्रद्धेला हसू नका. तुम्ही त्यांच्यात मिसळा. नवीन विचार द्या. परंतु ते मानवधर्माने द्या. मारामारी, कत्तलीने देऊ नका. संतांनी हा मानवधर्म दिला. म्हणून ग्यानबा, तुकाराम हीच महाराष्ट्राची दैवते राहिली. हेच राष्ट्रपुरुष म्हणून महाराष्ट्र ओळखतो. कारण त्यांचा संदेश सकळ मानवांना सुखी करण्यासाठी होता. भेदांना दूर करून सर्वांमधील दिव्यता दाखविणारा त्यांचा संदेश होता. संतांची शिकवण आज अधिकच आवश्यक आहे.

+++

४. विवेकानंदांचा धर्म

४ जुलै ही स्वामी विवेकानंदांची पुण्यतिथी. १९०४ मध्ये स्वामी निजधामास गेले. चाळिशी संपली ना संपली तोच हा महापुरुष आपला दिव्य संदेश सांगून पडद्याआड गेला. विवेकानंदांचे मूळचे नाव नरेंद्र. विवेकानंद हे नाव त्यांनी पुढे घेतले. ते लहानपणापासून विरक्त वृत्तीचे. नवीन धोतर भिकाऱ्याला त्यांनी दिले. अति बुद्धिमान नि खेळकर. तालीम करायचे, कुस्ती करायचे. उत्कृष्ट गाणारे नि वाजवणारेही. तरुणांचे पुढारी असावयाचे. कॉलेजमध्ये सारे ग्रंथ वाचून काढले. त्या वेळेस केशवचंद्र सेन, रवींद्रनाथांचे वडील देवेंद्रनाथ वगैरे प्रसिद्ध धार्मिक मंडळी होती. त्यांची व्याख्याने विवेकानंद ऐकत.

त्यांनी या दोघांना, ''तुम्ही देव पाहिला आहे का?'' म्हणून विचारले. दोघांनी नकार दिला आणि याच वेळेस त्यांची रामकृष्ण परमहंसांची नि त्यांची गाठ पडली. नरेंद्राला बघताच रामकृष्णांची जणू समाधी लागली. ''तुम्ही देव पाहिला आहे?'' या प्रश्नाला, ''हो, पाहिला आहे. मी तुझ्याजवळ बोलत आहे त्याहूनही अधिक आपलेपणाने मी त्यांच्याजवळ बोलतो.'' असे रामकृष्णांनी उत्तर दिले.

विवेकानंद आरंभी पक्के नास्तिक. "Let Mr. God come and stand before me" तो राजश्री ईश्वर कोठे असेल तर त्याने माझ्यासमोर यावे.'' असे ते म्हणायचे. परंतु रामकृष्णांनी त्यांच्या जीवनात क्रांती केली. निराळी साधना सुरू झाली. पुढे रामकृष्ण परमहंस देवाघरी गेले. मरायच्या आधी ते विवेकानंदांस म्हणाले, ''माझी सारी साधना मी तुला देत आहे.'' महापुरुषाने जणू मृत्युपत्र केले. रामकृष्णांच्या साधनेला तुलना नाही, देव मिळावा म्हणून त्यांची केवढी धडपड! अहंकार जावा

म्हणून भंगी बनले. स्त्री-पुरुष भेद जावा म्हणून स्त्रीचा पोशाख करून वावरले. एक दिवस गेला की, देवाला रडत रडत म्हणायचे, ''एक दिवस गेला आणि तू आला नाहीस.'' धनाची आसक्ती जावी म्हणून एका हातात माती नि एका हातात पैसे घेत नि म्हणत ''हीही मातीच आहे.'' नि गंगेत फेकीत. अशी ही अद्भुत साधना! अनेक वर्षांची. परमेश्वराचा साक्षात्कार सर्व धर्मांच्या द्वारा त्यांनी करून घेतला. मशिदीतही त्यांना प्रभू भेटला. चर्चमध्येही भेटला. सर्वधर्मसमन्वय त्यांनी केला. सर्व धर्म सत्य आहेत, ईश्वराकडे नेणारे आहेत, असे त्यांनी अनभवून सांगितले.

श्री रामकृष्ण परमहंस यांचा जन्मही एक ऐतिहासिक आवश्यकता होती. सारे जग जवळ येत होते. अशा वेळेस सर्व धर्मांचे ऐक्य शिकविणारा महापुरुष हवा होता. भारताला आणि जगाला अशा पुरुषाची जरुरी होती. भारतातही नाना धर्म. जोपर्यंत भारत विविधतेतील एकता ओळखून तद्नुरूप वागणार नाही, तोवर त्याचे नष्टचर्य संपणार नाही. स्वत: हे अनुभवून भारताने जगाला शिकवायचे आहे. भारताचे हे ईश्वरी कार्य आहे. श्री रामकृष्णांनी तो संदेश दिला. विवेकानंदांनी तो अनुभविला, शिकविला. गांधीजींनी त्याचा आणखी विस्तार केला. ते कार्य आणखी पुढे गेले.

स्वामी विवेकानंद रामनवमी, गोकुळाष्टमी या दिवशी उपवास करीत. त्याचप्रमाणे पैगंबराची जयंती, पुण्यतिथी या दिवशीही उपवास करीत. हिंदुधर्म सर्व धर्मांना आदरील. अमेरिकेतील सर्वधर्मपरिषदेत विवेकानंद म्हणाले, ''हिंदू धर्म विश्वधर्म होऊ शकेल. कारण तो माझ्यात सत्य असे मानीत नाही. इस्लाम, ख्रिश्चय धर्म, सर्वांमध्ये सत्य आहे असे तो मानतो. सत्याचे बाह्य आविष्कार निराळे. आतील गाभा एकच. ''एक: सत् विप्रा बहुधा वदन्ति'' हे महान ऐक्यसूत्र हिंदुधर्माने शिकविले आहे.

जगात सर्वत्र द्वेषमत्सर. एकीकडे दुनिया जवळ येत आहे तर हृदये मात्र दूर जात आहेत. अशा वेळेस तुमचा सर्वांचा आत्मा एकच आहे, अशी घोषणा करणारा प्रबळ पुरुष हवा होता. ही घोषणा अमेरिकेत शिकागो येथे स्वामींनी केली. सर्वधर्मपरिषदेत स्वामींची आधी दादच लागेना. परंतु एके दिवशी त्यांना संधी मिळाली. भगव्या वस्त्रातील ती भारतीय मूर्ती उभी राहिली आणि ''माझ्या बंधू-भगिनींनो,'' असे पहिलेच शब्द त्या महापुरुषाने उच्चारले आणि टाळ्यांचा गजर थांबेना. का बरे? त्या दोन शब्दांत कोणती जादू होती? त्यांच्या आधी जे जे व्याख्याते बोलून गेले, ते सारे

"Ladies and Gentleman सभ्य स्त्रीपुरुषहो'', अशा शब्दांनी आरंभ करीत. परंतु ही विश्वैक्याची मूर्ती उभी राहिली. सर्वत्र एकता अनुभवणारे ते डोळे, आपलीच आत्मरूपे पाहणारे ते डोळे, प्रेमसिंधूतून बुचकळून वर आलेले ते शब्द! त्या दोन शब्दांनी अमेरिकन हृदय जिंकून घेतले आणि मग ते अपूर्व व्याख्यान झाले. स्वामीजी विश्वविख्यात झाले आणि भारताचा विजयी सुपुत्र घरी आला. मायभूमीने अपूर्व स्वागत केले. विवेकानंद धर्ममूर्ती होते. परंतु त्यांचा धर्म रानावनात जा सांगणारा नव्हता. सभोवती दुर्दशा असताना हिमालयात कोठे जायचे?

महान फ्रेंच साहित्यिक रोमा रोलां याने विवेकानंदांवर एक उद्‌बोधक ग्रंथ लिहिला आहे. त्यात तो म्हणतो– "Vivekanand was first a nation-buklder then a religious reformer." विवेकानंद हे आधी राष्ट्रनिर्माते होते, मग धर्मसुधारक होते. विवेकानंदाचा धर्म राष्ट्राची उभारणी हा होता. भारतावर त्यांचे अपार प्रेम. ते म्हणतात, ''माझ्या बाळपणाचा पाळणा म्हणजे ही भारतभूमी; आणि माझ्या उतारवयातील मोक्षाची वारासणी म्हणजे हीच भारतमाता. तिचे सारे मला प्रिय आहे. ये पंडिता, तू मला प्रिय आहेस, कारण तू भारताचा आहेस आणि ये अज्ञानी बंधू, तूही मला प्रिय आहेस, कारण तू भारताचाच सुष्ट वा दुष्ट, ब्राह्मण वा चांडाळ, सारे मला प्रिय, सर्वांना मी हृदयाशी धरीन, सर्वांवर प्रेम करीन.''

भारताची दुर्दशा पाहून ते कासावीस होत. एकदा एका अमेरिकन कोट्यधीश कुबेराकडे ते होते. रात्री सुंदर पलंगावर ते निजले होते. तेथले ते वैभव, तो थाटमाट. स्वामीजींना झोप येईना. त्यांना सारखे रडू येत होते. उशी भिजून गेली. तो पलंग त्यांना निखाऱ्याप्रमाणे वाटू लागला. ते जमिनीवर झोपले. सकाळी मित्राने विचारले, ''उशी ओलीचिंब कशाने?'' ''मी रात्रभर रडत होतो. अमेरिकेत केवढे वैभव आणि भारतात पोटभर खायलाही नाही.'' ते एका पत्रात लिहितात, ''आपण हिंदुस्थानात पाप केले. त्या पार्थसारथी गोपाळकृष्णाच्या भूमीत स्त्रियांची, अस्पृश्यांची पशूहूनही वाईट स्थिती आपण केली आहे.'' अमेरिकेतील लोकांना ते म्हणायचे, ''कृपा करून हिंदुस्थानला मिशनरी नका पाठवू. मोठी मोठी धर्मतत्त्वे आईच्या दुधाबरोबर येथे मुलांना मिळतात. रस्त्यातील भिकारी महान धर्मतत्त्वे सांगणारी गाणी म्हणत जातात. मूठभर भिक्षा घेऊन सबंध हिंदुस्थानभर ते उदारधर्म ते पसरवीत असतात. भारताला तुम्ही संसार सुखी करणारे विज्ञान, पोटभर जगता येईल असे धंदेशिक्षण द्या.''

मार्गरिट इ नोबल या इंग्रजीबाई विवेकानंदांना लंडनमध्ये भेटल्या. ''मी तुमच्या देशासाठी काय करू शकेन?'' असे त्या ब्रह्मचारी विदुषीने विचारले. विवेकानंद म्हणाले, ''माझ्या देशातील मायभगिनीस शिकवायला या. कलकत्त्यात एखादी स्त्रियांची शाळा काढा.'' आणि निवेदितादेवींनी कलकत्त्यात येऊन शाळा काढली. विवेकानंदांनी १८९९ मध्ये रामकृष्ण मिशन संस्था काढली. ''आत्मनो मोक्षार्थ जगद्धितायच'' स्वत:साठी, मोक्षासाठी व जगाच्या हितासाठी ही संस्था होती. किंबहुना जगाच्या हितातच स्वत:चा मोक्ष असे ही संस्था सांगत असते. विवेकानंद एकदा बेलूर मठात संन्यास धर्मावर बोलताना म्हणाले, ''संन्यास म्हणजे मरणावर प्रेम. रोज परमसेवेत झिजायचे, तीळतीळ मरायचे. अशा मरणात मोक्ष असतो. देहाची आसक्ती नष्ट करणे, बारीक-सारीक कामातसुद्धा त्यागाची भावना जागृत ठेवणे म्हणजे संन्यास. एखाद्या क्षणी अत्युच्च विचारात रममाण होऊन सारे वैभव तृणवत दूर फेकाल तर दुसऱ्या क्षणी कचऱ्याची टोपली उचलून सारे स्वच्छ कराल.''

सेवेच्या द्वारा त्यांना मोक्ष हवा होता. निरपेक्ष, निरहंकारी सेवा. एकदा एक मुमुक्षू त्यांच्याकडे येऊन म्हणाला, ''मी दारे, खिडक्या बंद करतो. जप करतो. तरी देव भेटत नाही.'' तेव्हा म्हणाले, ''दारे, खिडक्या सताड उघडी टाक. तुझ्या खिडकीखालून रोज शेकडो प्रेते जात आहे. बघ. शहरात साथी आहेत. त्यांची सेवा करायला जा. औषध दे. रस्ते, गटारे स्वच्छ कर.'' स्वत: स्वामी प्लेगच्या नि कॉलऱ्याच्या दिवसांत कलकत्त्यात मित्रांसह सेवा करीत होते.

कोणी विचारले, ''पैसे खुंटले तर?'' स्वामी म्हणाले, ''बेलूरचा मठ विकीन. तेथील जमीन विकीन.'' त्यांना आसक्ती कसलीच नसे. महात्माजींनी हरिजन आश्रम नाही देऊन टाकला? महापुरुष वृत्तीने विरक्त असतात, अनासक्त असतात.

दरिद्र नारायण, हा महाशब्द प्रथम विवेकानंदांनीच उच्चारला. ''नारायण हवा असेल तर दरिद्री बांधवांची सेवा कर. आज नारायण दरिद्री आहे. जा त्याला सुखी कर.'' महात्माजींनी हा शब्द सर्वत्र नेला. ते जेव्हा दानार्थ हात पसरीत तेव्हा ''दरिद्री नारायणके वास्ते'' असे म्हणत.

विवेकानंदांना रडगाणे माहीत नव्हते. ज्ञानवैराग्याचा, अगाध ब्रह्मचर्याचा तो अद्भुत पुतळा! सामर्थ्याचे ते सिंधू होते. ते सिंहाच्या छातीचे होते. ते नेहमी म्हणत, ''मला एक हजार माणसे द्या, ती सिंहाच्या छातीची मात्र असू द्यात, मग भारताचा मी

कायापालट करीन. वेदान्त तुम्हाला सांगतो की, तुमच्यात परमात्मा आहे. त्याची चित्कळा, त्याचा अंश तुमच्यात आहे. मग तुम्ही खाली मान घालून का बसता? उठा नि पराक्रम करा. हिंदू धर्मात नाना भ्रष्ट गोष्टी शिरल्या. आपण पापी पापी म्हणत बसलो. हिंदुधर्माने हे दुबळेपणाचे तुणतुणे कोठून आणले? ते मोडून तोडून फेका. ''चिदानंदरूप: शिवोऽहम्'' ही तुमची घोषणा असू दे.'' ''नायमात्मा बलहीनेन लभ्य:'' - दुबळ्याला कोठला आत्मा?

''उपनिषदांचा अभ्यास तेजस्वी बनवितो. नेभळट नाही बनवीत. तुमचा स्वत:वर विश्वास नाही. त्याचा देवावर तरी कोठून बसणार? रडक्या, दुबळ्या आस्तिकापेक्षा स्वत:च्या कर्मशक्तीवर विश्वास असणारा नास्तिक बरा.''

स्वामींची अशी जळजळीत वाणी आहे. ते एकदा बंगाली तरुणांना म्हणाले, ''तुम्हाला देव पाहिजे? जा फूटबॉल खेळा. हसू नका. बलवान बना. उत्साही बना. लाथ मारीन तेथे पाणी काढीन ही शक्ती हवी.''

स्वामीजींनी मृतवत् पडलेल्या राष्ट्राला वीरवाणी ऐकविली. एकदा एका मिशनऱ्याजवळ वाद चालला होता. स्वामींनी त्यांचे सारे मुद्दे खोडून काढले. तरी तो हट्ट सोडीना. तेव्हा म्हणाले, ''आता हा सोटा पाठीत घालतो, म्हणजे ऐकशील.'' अशी ती मूर्ती होती.

त्यांची कीर्ती जगभर गेली. कलकत्त्यात त्यांचे अपार स्वागत झाले. हत्तीवरून मिरवणूक. तो गर्दीत त्यांना बाळपणीचा लंगोटीमित्र दिसला. त्यांनी एकदम खाली उडी मारली नि कडाडून भेटले.

विवेकानंदांच्या अशा शतस्मृती आहेत. ते महान जीवन आहे. त्यातून भारताला सदैव स्फूर्ती मिळेल. आज देश स्वतंत्र झाला आहे. परंतु फुटीर वृत्ती बळावत चालली आहे. अशा वेळी सर्व धर्मांच्या ऐक्याची मूर्ती जे विवेकानंद, त्यांच्यापासून आपणास अमर संदेश मिळत आहेत. भारताचा मोठेपणा कशात यासंबंधी ते म्हणतात, ''या देशाने कधी कोणावर आक्रमण केले नाही. हा या देशाचा मोठेपणा आहे, असे मला विचार करता करता वाटू लागते. सर्व धर्मांचा, संस्कृतींचा मेळ घालणे, जगाला प्रेमधर्माने राहायला शिकविणे हे भारताचे कर्तव्य आहे; परंतु आधी स्वत:च्या देशात हे अनुभवू या. देशात एकमेकांची काळजी घेऊ या.''

विवेकानंद म्हणतात, ''समता उत्पन्न करायची असेल तर विशेष हक्क नाहीसे व्हायला हवेत. हे विशेष हक्क नष्ट व्हावेत म्हणून व्यक्तीनेच नव्हे, एखाद्या राष्ट्रानेच नव्हे तर साऱ्या जगाने खटपट केली पाहिजे. पैशाचे दोन पैसे कसे करावे, ही अक्कल एखाद्याच्या अंगी उपजतच असणे स्वाभाविक आहे. परंतु तेवढ्यानेच तुडविण्याचा हक्क त्याला प्राप्त होतो की काय?''

श्रीमंत आणि गरीब यांच्यातील तेढ विकोपास जाऊ पाहात आहे. आपल्या अंगातील विशेष गुणांचा उपयोग दुसऱ्याला नाडण्याकडे करणे ह्यालाच विशिष्ट हक्क म्हणतात. हे राक्षसी हक्क नष्ट करण्यासाठी त्या त्या काळातील लोक लढत असतात. नीतिशास्त्राचा हाच रोख असतो. आपणही हे विशेष हक्क नष्ट करू तर विविधता राहूनही ऐक्य प्रवृत्ती वाढेल, साम्यावस्था वाढेल.

महात्माजींनी सर्वोदयाचा हाच मार्ग दाखविला. विशेष हक्क नष्ट केल्याशिवाय समता कोठून येणार? विवेकानंद तेच सांगत आहेत. हा गुणधर्मच आहे. याने जाऊ तर कल्याण आहे, नाहीतर हा देश रक्ताळ वातचक्रात सापडल्याशिवाय राहणार नाही.

+++

५. संत तुकाराम

श्री तुकाराम महाराजांची फाल्गुन वद्य द्वितीयेस पुण्यतिथी असते. या वर्षी त्यांची त्रिशत सांवत्सरिक पुण्यतिथी आहे. सर्वत्र सोहळा होणार आहे. मुंबई सरकार तुकारामांच्या गाथेचे स्वस्त प्रकाशन करणार आहे. द्वितीयेस तुकारामांची पुण्यतिथी आणि षष्ठीस नाथांची पुण्यतिथी. चार दिवसांच्या अंतराने दोन थोर संतांच्या पुण्यतिथी प्रतिवर्षी आपण पाळीत असतो.

''ग्यानबा तुकाराम'' हा जयघोष शेकडो वर्षे आपण घुमवीत आलो व जोवर मराठी भाषा आहे, महाराष्ट्र आहे, तोवर हा घोष घुमत राहील. विनोबाजी म्हणायचे, ''ज्ञानेश्वर गुरूप्रमाणे वाटतात. एकनाथ वडिलांप्रमाणेच तर तुकाराम आईप्रमाणे.'' त्यांची भाषा म्हणजे महाराष्ट्राला अखंड बोधामृत पाजणारी कामधेनूच होय.

संतांची जीवने म्हणजे मानवतेचा मोठा आधार. तुकारामांचे जीवन म्हणजे अखंड प्रयत्नवाद. रात्रंदिवस धडपड करून त्यांनी आपले जीवन प्रभुमय केले. गाथेतील अभंग निरनिराळ्या मनोवृत्तीचे दर्शक आहेत. तुकारामांना एकच वेड होते, एकच ध्यास होता–

ऐसे भाग्य कै लाहता होईन
अवघे देखे जन ब्रह्मरूप

ही त्यांची असोशी होती. सारे भेद गळावेत. सर्वत्र मंगलाची अनुभूती यावी हा त्यांचा अट्टाहास होता. परंतु हे सारे कसे साधायचे? कामक्रोध पदोपदी आड येतात. तो अनंत परमात्मा दूरच राहतो. मीपण मेल्याशिवाय सर्वांबद्दल प्रेम कसे वाटणार? भोगवासना मरायला हवी, स्वार्थ गळायला हवा. जीवनात संयम यायला हवा. विषयी

माणसाजवळ कोठून मोक्ष? जोपर्यंत जीवनात सद्गुणविकास नाही तोवर विनाशच आहे.

''अवगुणा हाती आहे अवघीची फजिती'' असे ते म्हणतात. ही गुणसंपदा जीवनात यावी म्हणून तुकारामा रात्रंदिवस रडले, धडपडले.

इंद्रयांची दीनें
आम्ही केलो नारायणें

आम्ही इंद्रियांचे, वासनांचे गुलाम. परम पुरुषार्थ कोठून प्राप्त होणार?

धीर माझ्या मना
नाही आतां नारायणा

असे ते करुण स्वराने म्हणतात. जीवन अजून शुद्ध होत नाही. म्हणून त्यांची कासावीशी होत असे. जीवनाचे सार काय? कशासाठी हे जीवन?

जन्मा आलियाचे फळ
अंगी लागो नेदी मळ

जीवनाला इवलीही घाण लागू न देणे हीच कृतार्थता.

सर्वांगे निर्मळ
चित्त जैसे गंगाजळ

जीवन गंगाजळाप्रमाणे अंतर्बाह्य निर्मळ व्हावे म्हणून त्यांची साधना होती. ते आशेने धडपडत होते. जर प्रयत्न खरा असेल तर काय कठीण

ओलें मूळ भेदी खडकाचे अंग
उद्योगासि सांग कार्यसिद्धी

असे ते म्हणतात.

याचसाठी केला होता अट्टाहास
शेवटचा दीस गोड व्हावा

शेवटचा क्षण तरी गोड होऊ दे. मरण समोर आले असता केवळ नित्संग वृत्ती असू दे. आतडे कुठे गुंतलेले नाही. सर्वांबद्दल प्रेम, सर्वांबद्दल समभाव. आणि जन्ममरणांतून सुटावे असे त्यांना वाटत नाही. पुन:पुन्हा जन्माला घाल, असे ते देवाला सांगतात. भगवान बुद्ध म्हणाले, ''एखादाही प्राणी दु:खी असेल तोवर मी पुन:पुन्हा जन्म घेईन.'' ज्याला भूतमात्र जोवर भगवंताचे रूप वाटते तो जगाला कंटाळेल कशाला?

त्याचे हात सेवेत सदैव आनंद मानतील.

तुकारामांना खरी आत्मस्थिती हवी होती. शब्दज्ञानाचा त्यांना कंटाळा होता.

घरोघर अवघे आले ब्रह्मज्ञान
द्या रे एक कण जरी नीरें

असे ते म्हणतात. भारतात ब्रह्मज्ञान अवघ्यांच्या तोंडी आहे, परंतु जीवनात मात्र त्याचा दुष्काळ. विवेकानंदानी एके ठिकाणी म्हटले आहे, ''हिंदुधर्मातल्याप्रमाणे उदात्त तत्त्वे अन्यत्र नाहीत, त्याचप्रमाणे त्या तत्त्वांशी विसंगत असे आचरण करणारेही अन्यत्र नाहीत.'' या शाब्दिक ज्ञानाने काय होणार?

बोलाचीच कढी बोलाचाचि भात ।
जेऊनियां तृप्त कोण झाला ।।

असे तुकाराम विचारतात.

हित व्हावे तरी दंभ दूर ठेवा

अशी त्यांची सांगी आहे. आपण श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्णात जन्मालो नाही हे बरे झाले, नाहीतर दंभ अंगी जडला असता असे ते म्हणातात.

बरें झाले कुणबी केलो
नाही तर दंभे असतो मेलो

समाजसेवेचे आवडीप्रमाणे कोणी कोणतेही काम करावे. समाजदेवाची त्या कर्मद्वारा नीट सेवा केली तर मोक्ष तुमच्या हातात आहे. श्रेष्ठकनिष्ठपणाची थोतांडे मिथ्या आहेत. यासाठी तर संतांना भागवत धर्माचा पुकारा केला. सारे एकत्र येऊ, देवाची लेकरे म्हणून राहू. ज्ञानेश्वरांनी महान ध्येय महाराष्ट्रासमोर ठेवले.

अवघाची संसार सुखाचा करीन
आनंदे भरीन तिन्ही लोक

ही त्यांची भव्य प्रतिज्ञा. ज्ञानेश्वरीच्या अखेरीस ते म्हणतात,

जो जे वंछील तो ते लाहो

सर्वांना सारे काही मिळो. अर्थात् जे चांगले आहे, मंगल आहे ते मिळो, कारण त्याच्या आधी त्यांनी म्हटले आहे–

दुरितांचे तिमिर जावो
विश्व स्वधर्मसूर्ये पाहो

पापाचा अंधार जाऊ दे. सारी मानवजात आपापल्या आवडीचे धर्म करू दे. म्हणजे मग सर्वांना सर्व मिळेल. तुम्ही निष्पाप सुखे आस्वादू नयेत, असे त्यांचे म्हणणे नाही. संत रानावनांत गेले नाहीत. जनतेत राहून त्यांनी उदात्त जीवनाचा आदर्श घालून दिला.

विधीनें सेवन
धर्माचे पालन

तुम्ही सुखोपभोगाला काही मर्यादा घाला. म्हणजे धर्माचे पालन केल्यासारखे होईल. गीता म्हणते–

धर्माऽ विरुद्धो भूतेषु
कामोऽस्मि भरतर्षभ

धर्माला अविरोधी अशी कामवृत्ती, तीही माझेच स्वरूप समज, असे भगवान म्हणतात. परंतु अविरुद्ध शब्द महत्त्वाचा आहे. जीवनात प्रमाणबद्धता ठेवणे म्हणजेच प्रसन्नता आणणे. गीतेत 'युक्ताहारविहारस्य' असे म्हटले आहे. ज्ञानेश्वरातील ओव्या प्रसिद्धच आहेत. मोजके बोला, मोजकी झोप घ्या, मोजके खा, अशा रीतीने त्या त्या इंद्रियांना प्रमाणात द्याल तर जीवनात प्रसन्नता वाढेल, जीवनात सुंदरता येईल, परमात्मा येईल.

संसार सोडून जायला नको. संसारच सुखाचा करायचा आहे. उद्योगधंदे करा, संपत्तीही मिळवा. परंतु संचय नको.

जोडोनिया धन उत्तम व्यवहारें
उदास विचारें व्यय करी

असे ते सांगतात. पैसा मिळवा, परंतु उत्तम व्यवहाराने मिळवा. काळ्या बाजाराने मिळवू नका. अरे समोरची जनता म्हणजेच देव. या देवाची वंचना करून कोणता देव मिळणार? तुकाराम पंढरपूरच्या विठ्ठलाचे भक्त.

तुझ्या नामाची आवडी
आम्ही विठो तुझी वेडी

असे ते म्हणतात. राजस सुंदर मदनाचा पुतळा असे त्या मूर्तीचे वर्णन करतात. परंतु ते मूर्तीच्या पलीकडे जाणारे. मूर्तीची पूजा करून सर्व मानवात, चराचरात ती पाहायला शिकायचे. नुसती देवाला फुले वाहून काय उपयोग?

तीर्थी धोंडी पाणी
देव रोकडा सज्जनीं

प्रत्यक्ष देव, जेथे सदाचार आहे तेथे आहे.

दया, क्षमा, शान्ति, तेथे देवाची वसती

असे ते म्हणातात.

जे का रंजले गांजलें, त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा

असे ते म्हणतात. अशी त्यांची शेकडो वचने आहेत. तुम्हाला देव मिळाला असेल तर तुमचे जीवन उदार होऊ दे. तुमचे वर्तन ही कसोटी.

भूमीचे मार्दव, सांगें कोंभाची लवलव

जमीन चांगली की वाईट ते तिच्यातून अंकुर वर कसा येतो, त्यावरून ठरवावयाचे. मनुष्य कसा वागतो यावरून त्याची धार्मिकता जाणायची.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकारामादी संतांनी पंढरपूरची वारी सुरू केली. साऱ्या महाराष्ट्रातून तेथे स्त्री-पुरुष येऊ लागले. एक प्रकारची एकता, मानवता फुलू लागली. तुकाराममहाराज पंढरपूरच्या वाळवंटातील सोहळ्याचे वर्णन करताना उचंबळून म्हणतात,

कठोर हृदये मृदु नवनीते
पाषाणां पाझर फुटती रे
एकमेकां लोटांगण येती रे।।

हा त्याला नमस्कार करीत आहे, तो याला करीत आहे. कठोरता गेली. हृदये प्रेमळ बनली. पाषाणांसही पाझर फुटतील. संतांनी महाराष्ट्रात एकतरी जागा अशी निर्माण केली, जेथे सारे समान म्हणून वागतील. परंतु शेवटी पंढरपूर आपण जेथे असू तेथे हवे. एकनाथांनी म्हटले-

काया हे पंढरी आत्मा हा विठ्ठल

माझे शरीर म्हणजे पंढरपूर. आत्मा हाच विठ्ठल. माझ्या जीवनातून भेदभाव जावोत. धर्मभावना सर्वत्र हवी. ''जेथे तेथे तू माझी सांगाती'' परमेश्वर नेहमीच जवळ आहे. धर्मभावना अमक्या वेळेस नको असे का आहे? कोणी म्हणतात, ''राजकारणात धर्म कशाला?'' त्यांना तुकारामचे उत्तर आहे की, जेथे जाशील

तेथे देव जवळ हवा. त्याला आवडेल की नाही, हे मनात आणून वागा. गीता सांगते,

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज

सारे धर्म सोडून प्रभुशरण वृत्तीने वागावे, म्हणजेच प्रत्येक कर्म ईश्वराला आवडेल की नाही, हा विचार करून करावे. ही कसोटी आहे.

तुकारामांचे अभंग म्हणजे तुमचे-आमचे वेद, ते स्वत:च गर्जना करून सांगतात,

वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा
येरांनी वहावा भार माथां

इतरांनी शब्द ओकावे. परंतु शब्दातील अर्थ, वेदांचा अर्थ आम्हालाच माहीत आहे. सर्वत्र अद्वैत अनुभवणे हा वेदांचा खरा अर्थ. देवाची पूजा म्हणजे नुसती फुले वाहणे नव्हे.

कोणाही जीवाचा न घडो मत्सर
वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।

या चरणातील सर्वेश्वर शब्द मला फार महत्त्वाचा वाटतो. अमक्या जातीचा, अमक्या धर्माचा देव नव्हे. त्या वेळेस शैववैष्णवांची भांडणे असत. त्या त्या उपास्य देवतांवरून भांडणे होत. तुकाराम तुम्हाला म्हणतात- ''जर विश्वंभराची पूजा करायची असेल तर कोणाचा द्वेष-मत्सर करता येणार नाही.'' कारण कोणाचा द्वेषमत्सर करणे तो देवाचाच करणे होय. कारण तो सर्वत्र आहे ना? संत सर्वेश्वराची पूजा करणारे होते. म्हणूनच ते चराचरावर प्रेम करणारे झाले. परंतु असे हे जीवन क्षणात अनुभवता येणार नाही. त्यासाठी मागे ओढणारे शतबंध तोडले पाहिजेत. सूर्याजीने मावळे पळत आहेत, असे पाहाताच दोर तोडून टाकला. आसक्तीचा दोर तोडल्याशिवाय विजय कसा मिळणार? ध्येयासाठी देहावर निखारा ठेवायची तयारी हवी.

संसाराची आग लावूनिया हाते
मागूतें परौते पाहूं नये

असे तुकाराम सांगत आहे. ते पुन्हा म्हणतात-

तुका म्हणे व्हावी प्राणांसवे ताटी
नाहीं तरी गोष्टी बोलू नये

परम पुरुषार्थ प्राप्त करून घ्यायचा असेल तर प्राणावर पाणी सोडण्याची तयारी हवी. संत हे खरे झुंजार. ते कामक्रोधाची डोकी फोडतात.

रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग

अंतर्बाह्य जग आणि मन

बाहेरच्या जगात आणि स्वतःच्या मनात संत रात्रंदिवस झगडत असतात.

विष्णुवीर गाढे

कळिकाळ पाया पडे

आम्ही विष्णूंचे वीर, कळिकाळही आमच्या पाया पडेल. कारण ज्याने आसक्ती जिंकली, वासना-विकार जिंकले, त्याला मरणाची डर कुठली? मृत्यूला पाहून तो हसतो, मृत्यूचे तो स्वागत करतो.

आपुले मरण पाहिले म्यां डोळां

तो सुखसोहळा अनुपम

असे धन्योद्‌गार ते काढतात. मृत्यूने मारण्यापूर्वीचे ते दहाला मारून ठेवतात. मृत्यूवर ते स्वार होतात. देहावर विजय मिळवून निर्मळ मनाने ते संत मग जगाची सेवा करीत राहतात.

तुका म्हणे आतां

उरलो उपकारापुरता

देह गळेपर्यंत आत लोकांची सेवा होईल ती करायची. जीवनात कसे वागावे?

आणिकांचे कानी, गुणदोष मना नाणी

बोले ते वचन, जेणे राहें समाधान

तुका म्हणे फार, थोडा करी उपकार।।

दुसऱ्यांचे गुणदोष मनात न आणता आपले कार्य करीत राहावे. दुसऱ्यांना जेणेकरून समाधान होईल, असे बोलावे. थोडाफार उपकार करावा. असे सूत्रमय सार.

परंतु हजारो अभंगांतून निवडानिवड काय करायची? तुकारामांच्या अभंगांवर आणि ज्ञानेश्वरांच्या ओवीवर सारा महाराष्ट्र पोसला गेला आहे. ज्याला तुकारामाचे चार अभंग येत नाहीत, असा मनुष्य महाराष्ट्रात आढळणार नाही. महाराष्ट्रात हजारो ठिकाणी भजने होतात. ''रूप पाहता लोचनी'' वगैरे शेकडो अभंग येथे गायिले

जातात. संतांनी महाराष्ट्राला संस्कृतीच्या समान पातळीवर आणले. उच्च विचार भाषेत घरोघर नेले. ग्यानबा-तुकाराम हे महाराष्ट्राचे हृदयसम्राट आहेत. त्यांचे वाङ्मय हे खरे राष्ट्रीय वाङ्मय. कारण ते सर्व घरघरांत गेले. मोरोपंतांची आर्या व वामनी श्लोक पांढरपेशी लोकांत व हरदासात, परंतु आम जनतेत तुकोबांची वाणी गेली. न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर, यांच्यासारखे नव विद्वान प्रार्थना समाजात तुकारामांचे अभंग घेऊनच कीर्तन करीत व खेड्यातील कीर्तनकार तेच अभंग घेऊन विवरण करतात.

तुकारामांच्या अभंगात प्रसाद आहे, कळकळ आहे. स्वानुभव आहे. ते रोकडे बोल आहेत. ते चावट बोल नाहीत. त्यांच्या अभंगात परिचयाचे दाखले, रोजच्या व्यवहारातील उपमा नि दृष्टान्त. कधीकधी त्यांची वाणी कठोर वाटते. ती वाणी क्वचित शिवराळ होते. विनोबा म्हणाले, ''तुकारामांचा आईचा गुण् अशा वेळेस प्रगट होतो.'' आईच मुलावर रागावते. त्यांच्या त्या कठोर, कधी शिवराळ वाटणाऱ्या वाणीत त्यांची अपार करुणा आहे, त्यांचे वात्सल्य आहे.

ज्या समाजात ज्ञानेश्वर, तुकाराम झाले, तो समाज शतखंड का? समाजात द्वेषमत्सराचा बुजबुजाट का? ज्याला त्याला आपली जात, आपला प्रांत, आपला धर्म श्रेष्ठ वाटून तो दुसऱ्याचे निसंतान करायला निघतो. तुकाराम म्हणतात,

देह आणि देहसंबंधि निंदावीं
आणिक वंदावीं श्वानसूकरें

तू तुझ्या जवळच्यांचे दोष बघ, आणि तुला जे वाईट वाटतात, त्यांचे गुण बघ. समाजात ही शिकवण द्यायला हवी. तुकारामांच्या पुण्यतिथीचा त्रिशतसांवत्सरिक उत्सव होईल. व्याख्याने, कीर्तने, मिरवणुका, सर्व काही होईल, परंतु या सर्वांचा जीवनावर काही परिणाम झाला तर उपयोग!

संतांची ध्येये ही क्षणिक राजकीय ध्येयाहून महान असतात. ख्रिस्ताने शेजाऱ्यावर प्रेम करा सांगितले. परंतु अजून तो धडा शिकायचा आहे. संतांची ध्येये मानवजातीला कवटाळणारी असतात. त्यांच्यासमोर जात धर्मनिरपेक्ष मानवजात उभी असते. सर्व भूतल म्हणजे त्यांना स्वदेश वाटतो.

आमुचा स्वदेश । भुवनमयी वास ।।

सारे त्रिभुवन त्यांना स्वतःचे वाटते.

वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरें

झाडे-माडे, पशुपक्षी यांच्यावरही त्यांचे प्रेम असते. आपल्या सभोवतालच्या जीवनात प्रेमस्नेह आणूया. सहानभूती, उदारता आणूया. गरिबांचे दुःख दूर करूया. त्याग शिकूया. आज खरा धर्म उरलाच नाही. म्हणून ही मारक विषमता आहे, युद्धाच्या भीषण छाया आहेत.

+++

कल्की अर्थात संस्कृतीचे भवितव्य

प्रास्ताविक

मानवी संस्कृती आज संकटात आहे. मधूनमधून असे प्रसंग तिच्यावर नेहमीच येत असतात. जग आज जुनी वस्त्रे फेकून देत आहे. एका पिढीपूर्वी जे आदर्श, जी ध्येये, ज्या संस्था वगैरे प्रमाण म्हणून मानली जात, त्या सर्वांना आज आव्हान आहे. त्या सर्वांत बदल होत आहे. जुन्या प्रेरणा दुबळ्या झाल्या आहेत. नवीन शक्ती निर्माण होत आहे. जो जो कोणी आजच्या युगाच्या अंतरंगात डोकावून पाहील, त्याला असे दिसून येईल की आज सर्वत्र एक प्रकारची अस्वस्थता आहे; निश्चितता कशालाच नाही. आजच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीविषयी कोणालाच समाधान नाही. आणि एखादी नवी व्यवस्था जन्माला यावी म्हणून सारे उत्सुक झाले आहेत. विचारांचा आज गोंधळ उडाला आहे. ध्येयांची सुस्पष्ट कल्पना नसल्यामुळे त्यांच्याबद्दलचा वाटणारा जिव्हाळा व उत्साह ही तात्पुरती असतात. या सर्व परिस्थितीवरून मानवजात लवकरच एखादे नवीन पाऊल टाकील असे वाटते.

आज जी एक प्रकारची सारीच अनिश्चितता आटत आहे. तिला मुख्य कारण म्हणजे आजचे शास्त्र होय. शास्त्र आजच जन्माला आले असे जरी नसले, तरी त्याची प्रगती अर्वाचीन काळात कल्पनातीत झपाट्याने होत आहे. शास्त्राचे क्षेत्र वाढत आहे, ते सर्वत्र घुसत आहे. शास्त्राच्या गतीबरोबर संसार टिकत नाही. शास्त्राच्या प्रगतीबरोबर भराभरा परिस्थितीही नीट रीतीने बदलणे होत नाही. आपण एखाद्या प्राण्याला त्याच्या नेहमीच्या वातावरणातून एकदम उचलून जर अगदी अपरिचित अशा वातावरणात नेऊन सोडले, तर त्या प्राण्याला कसे तरी वाटते. तो

प्राणी बेचैन होतो. त्या नवीन परिस्थितीशी जमवून घेईपर्यंत त्याला अस्वस्थ वाटत असते. ''काही काळ शास्त्राने आता सुटी घ्यावी'' असे एक थोर बिशप म्हणाले. त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ काय? भावार्थ इतकाच, की शास्त्र फार झपाट्याने पुढे जात आहे. नवीन शोध रोज मिळत आहेत. परंतु या शास्त्रीय शोधांचा उपयोग करून घेणारा मावनप्राणी तितक्याच झपाट्याने सुधारत आहे असे नाही.

बाह्यत: तरी सारे जग आज एका ठशाचे होत आहे. युरोप आणि अमेरिका, आफ्रिका व आशिया सारी एकाच दिशेने जात आहेत. फरक इतकाच की आशिया व आफ्रिका जरा मंद गतीने जात आहेत, तर युरोप व अमेरीका घोडदौडीने जात आहेत. अर्वाचीन युगाची चिन्हे म्हणजेच मोटारी, विमाने, बोलपट. ही चिन्हे अत्यंत मागासलेल्या देशातही दृष्टीत्पत्तीस पडतात. मनुष्याची प्रगती आता सारखी होत जाणार आहे; कारण निसर्गावर त्याला सत्ता मिळत आहे, निसर्गातील साधनांचा तो स्वामी होत आहे; आणि ही श्रद्धा दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे.

हिंदुस्थान नि चीन ही वातचक्रात खेचली जात आहेत. आज पौर्वात्य देशांत अशांती का आहे, अस्वस्थता का आहे? त्यांना स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव झाली आहे, जगातील इतर राष्ट्रे साहसाने, उद्योगाने, संघटाशक्तीने साऱ्या पृथ्वीचा ताबा घेत आहेत, अशा वेळेस आपला विनाश व्हावयास नको असेल, तर ओढवणारे मरण टाळायचे असेल, तर आपणही त्यांच्या बरोबरीने उभे राहिले पाहिजे ही जाणीव आज पौर्वात्य देशांना तीव्रतेने झाली आहे. 'पूर्व ती पूर्व व पश्चिम ती पश्चिम' असे जे कोणी म्हणतात त्यात फारसे तथ्य नाही. पूर्व नि पश्चिम यांच्यात इतके तीव्र भेद आहेत असे नाही. पूर्व पश्चिम कधीच एकत्र येणार नाहीत असे नाही. उलट, आज ती एकत्र आणली जात आहेत. भौतिक शास्त्रे, आध्यात्मिक शास्त्रे नवीन नवीन विचार व कल्पना, नवीन नवीन स्थापत्यतंत्रे, नाना राज्यशासनाचे प्रकार, कायद्यांची बंधने, आर्थिक संस्था, राज्यकारभारातील अनेक व्यवस्था या सर्वांमुळे नाना संस्कृतीचे लोक एकत्र जोडले जात आहेत. एकमेकांचा एकमेकांवर परिणाम होत आहेत. सारे जग जणू एक विराट पुरुष बनून काम करू पाहात आहे.

जग बाह्यत: एकरंगी होत चालले असले तरी त्यामुळे आंतरिक एकता झाली आहे असे नाही. जरी आपण एकमेकांच्या जवळ ओढले गेलो तरी तेवढ्यावरून सुखसमाधान वाढले आहे, स्पर्धा कमी झाली आहे, असे नका समजू. आपण

एकमेकांना प्रेमाने भेटावे, एकमेकांना गुण्यागोविंदाने राहावे असे आपणास अद्याप कोठे वाटू लागले आहे? बाह्यत: जवळ आलो, परंतु मनाने दूरच आहोत. मॅक्झिम गॉर्कीने एक अनुभव नमूद करून ठेवला आहे. एकदा शेतकऱ्यांच्या परिषदेत तो बोलत होता. शास्त्रांचा महिमा तो सांगत होता. नवीन नवीन शोध सांगत होता. उद्योगधंद्यातील चमत्कार सांगत होता. परंतु त्याचे व्याख्यान संपल्यावर एक शेतकरी म्हणाला, ''पक्ष्यांच्याप्रमाणे आपण उडायला शिकलो; माशांप्रमाणे पाण्यात तरंगायला शिकलो; परंतु पृथ्वीवर कसे नीट नांदायचे ते मात्र आपण अद्याप शिकलो नाही!''

ही पृथ्वी फार मोठी आहे असे नाही. या लहानशा पृथ्वीवर नान जाती, जमाती, नाना धर्म, नाना राष्ट्रे जवळजवळ नांदत आहेत. परंतु जीवन सुंदर होण्यासाठी लागणारा बंधुभाव त्यांच्याजवळ नाही. आपण एकमेकांचे शत्रू आहोत, प्रतिस्पर्धी आहोत असेच उलट त्यांना वाटते. मानवजातीने बाह्यत: एक शरीर धारण केले असेल तरी आतील आत्मा एक आहे असे नाही; आतील प्रेरक विचार एक आहे असे नाही. मानवजातीचे मन आज समान नाही.

स्पेंग्लर या सुप्रसिद्ध लेखकाने ''पश्चिमेचा ऱ्हास'' म्हणून एक ग्रंथ लिहिला आहे. त्यात तो म्हणतो, '' निरनिराळ्या राष्ट्रांची निरनिराळी संस्कृती असते. त्या संस्कृतीही निरनिराळ्या ध्येयांना जन्म देत असतात.'' स्पेंग्लरने मांडलेली ही विचारसरणी मोठी धोक्याची आहे. एक सर्वसामान्य अशी मानवी संस्कृती निर्माण करण्याची आशा विचारप्रसारात नष्ट होते. ''प्रत्येक जात, प्रत्येक संस्कृती जन्मास येते, वाढते व नष्ट होते. हे रहाटगाडगे सारखे सुरू आहे.'' असे स्पेंग्लरने गृहीत धरले आहे. परंतु स्पेंग्लरचे हे म्हणणे ऐतिहासिक सत्याला धरून आहे असे नाही. भूतकाळात कदाचित त्या त्या भागात स्थानिक व प्रादेशिक संस्कृती एका पाठोपाठ एक जन्माला आल्या असतील, वाढल्या असतील, नष्ट झाल्या असतील. आपल्या मरणानंतर त्यांनी आपली सांस्कृतिक पुंजी नवीन तरुण पिढीच्या स्वाधीन केली असेल. परंतु आजच्या काळात अशा प्रादेशिक संस्कृतींना वाव नाही. प्रादेशिक संस्कृतींचा काळ संपला आणि मानवजातीचा इतिहास प्रथम एका अखंड प्रवाहाने जात होता, परंतु मागून एकमेकांची वैशिष्ट्ये व पृथकत्वे दिसून आल्यामुळे अलग अलग असे त्याचे तुकडे झाले असेही निश्चितपणे मानणे योग्य होणार नाही.

उलट, इतिहासाच्या अध्ययनावरून असे दिसते, की भिन्न भिन्न संस्कृती आपापल्या विकासनियमानुसार बऱ्याच काळापर्यंत निरनिराळ्या रीतीने वाढल्या आणि नंतर हळूहळू एकमेकींच्या जवळ येऊ लागल्या. आणि आज तर एकत्र येऊन त्या सर्वांचा एक महान संयुक्त संस्कृतीप्रवाह बनेल असे स्वच्छ दिसत आहे. स्पेंग्लर म्हणतो की, ''नियतीनियमानुसार युरोप आपल्या वृद्धावस्थेतून जात आहे. आणि युरोपला वाचवणे म्हणजे वेडेपणा आहे.'' त्याच्या म्हणण्यात एक सत्य आहे. परंतु ते सत्य स्पेंग्लरच्या ध्यानात आलेले नाही. युरोप जगापासून अलग राहून आपली विशिष्ट संस्कृती राखू पाहील तर ते आता जमणार नाही. आता जीवनाच्या कलेत आपण प्रादेशिक प्रयोग करीत नाही बसणार. आता जागतिक प्रयोग करू. हे एक महान सत्य स्पेंग्लरच्या विचारसरणीत आहे. कोणत्याही एका विशिष्ट प्रादेशिक संस्कृतीला वा सभ्यतेला संपूर्णपणे विश्वव्यापक होता येणार नाही. प्रत्येक संस्कृती म्हणजे त्या त्या मानववंशातील जिवंत शक्तीचे प्रकट स्वरूप. आपणास या सांस्कृतिक गोष्टींचा विचार करताना इतिहासालाच फक्त प्रमाण मानून चालले पाहिजे. इतिहास हेच आपले तर्कशास्त्र आणि इतिहासाला केवळ वस्तुस्थितिनिरपेक्ष असा विश्वात्मक परिपूर्ण मानव माहीत नाही आणि म्हणूनच कोणतीही संस्कृती केवळ स्वत:पुरते पाहून परिपूर्ण होणार नाही, विश्वव्यापक होणार नाही. मानवी संस्कृतीने मानवी जीवनाची सर्वव्यापक अशी कल्पना घेऊन उभे राहिले पाहिजे. मनुष्याची दृष्टी संकुचिन न ठेवता भावी संस्कृतीने ती विश्वाकार केली पाहिजे. प्रादेशिक संस्कृतींनी मानवजातीचे खरे कल्याण सदैव केलेले आहे असे नाही. भूतकाळात पाहा किंवा आजही पाहा; संकुचित संस्कृतींनी धार्मिक, राजकीय व जातीय अशी विशिष्ट वर्चस्वे स्थापिली. पुरुषांची स्त्रियांवर सत्ता, श्रीमंतांची गरिबांवर सत्ता, असले प्रकार त्या संस्कृतीतून निर्माण झाले. अशा प्रकारांना त्या त्या स्थानिक संस्कृतींनी पाठिंबा दिला. सर्व मानवजातीला शोभेल अशी शाश्वत व स्थिर संस्कृती निर्मिण्यापूर्वी प्रत्येक संस्कृतीने आपल्या उणिवा व आपल्या मर्यादा ओळखणे जरूर आहे. कोणतीही एकच संस्कृती मानवजातीचे ध्येय होऊ शकणार नाही, हे सर्वांनी नम्रपणे ध्यानात घेणे अगत्याचे आहे.

यांत्रिक शोधातील विजयांमुळे भावी संस्कृतीला एक सर्वसामान्य असा पाया मिळत आहे. या पायावर अध्यात्मिक ऐक्याची इमारत उभारण्यासाठी परंपरागत

आलेल्या दुष्ट विचारसरणींची, नाना भ्रामक कल्पनांचा व दुष्ट आचारांचा नायनाट झाला पाहिजे. सर्व राष्ट्रांतून या गोष्टीला आरंभ झालेला आहे. विशेषत: दुसऱ्याच्या हातातील बाहुली होण्याचे नाकारणाऱ्या तरुणात ही नवीन दृष्टी येत आहे. आज विचाराला जोराची चालना मिळाली आहे. ज्या कल्पना, जे विचार, जी ध्येये आजपर्यंत उराशी बाळगली, त्यांत काहीतरी असमाधानकारक आहे, असे सर्वांना वाटू लागले आहे. नवीन मूल्यांचा शोध करण्यासाठी धडपड होऊ लागली आहे. वातावरणात 'इन्किलाब'ची गर्जना घुमत आहे. मोडतोड करू पाहण्याची वृत्ती बळावत आहे. धर्माची पुरातन रूपे कोलमडून जात आहेत. रूढींचे डोलारे ढासळू बघत आहेत. प्रत्येक देशातील व प्रत्येक धर्मपंथातील विचारवतांच्या मनात काही तरी जन्माला येणार अशी उत्सुकता वाढत आहे. ते आशेने, अपेक्षेने बघत आहेत.

माथेफिरूंची गोष्ट सोडून देऊ. आपलेच म्हणणे खरे असे हटवादाने म्हणणाऱ्या धर्मवेड्यांची गोष्ट सोडून देऊ. अशांजवळ चर्चा करण्यात अर्थही नसतो. परंतु प्रत्येक संस्कृतीच्या विचारवंत पुरस्कर्त्यांना आज एक गोष्ट स्पष्टपणे पटू लागली आहे, की मानवजात अलग नसून अखंड आहे. तिच्या सर्व इतिहासात, तिच्या सर्व घडामोडीत केवळ पृथकत्व नाही. ही अखंड मानवजात सारखी पुढे जाईल. तिच्या प्रगतीला कोण रोधील, कोण मर्यादा घालील? दिवसेंदिवस मानवजातीचे हे वैभव वाढत आहे व त्या वाढत्या वैभवाकडे आदराने व भक्तीने ती जात आहे. थोर इटॅलियन कवि डान्टे म्हणाला होता, "या संस्कृतीसाठी एक ध्येय व त्या संस्कृतीसाठी दुसरे, असे असू शकणार नाही. परंतु सर्व मानवजातीची म्हणून जी संस्कृती आहे तिला एकच ध्येय असू शकते." सर्वांची म्हणून जी संस्कृती तिचे जरी एकच गन्तव्य व प्राप्तव्य असेल तरी त्याचा अर्थ असा नाही, की सारे एकच भाषा बोलतील, सारे एकाच धर्माचे असतील; सारे एकाच राज्यतंत्राखाली असतील किंवा सर्वांच्या चालीरीती एकाच ठरीव साच्यांच्या असतील. सांस्कृतिक ऐक्य बाह्य सारखेपणात पाहण्याचे नसून विविधतेतील अविरोधात पाहावयाचे आहे. भिन्नभिन्न ध्येयांचे व प्रकृतीचे लोक एकत्र आले, एकमेकांत मिसळले व त्या मिश्रणातूनच कोणतीही महान संस्कृती निर्मिली गेली असा इतिहास आहे. मिसर देश घ्या; किंवा बाबिलोन घ्या; चीन घ्या किंवा हिंदुस्थान घ्या; ग्रीस घ्या की रोम घ्या; सर्वांच्या संस्कृतीच्या इतिहासातून हेच एक सत्य प्रतीत होत आहे. सांस्कृतिक ऐक्य घडवू पाहाणाऱ्यांचे क्षेत्र आज अधिक

झाले आहे. आज सारे जग समोर उभे करावे लागते. आपणाला एकमेकांत विलीन व्हायचे नसून एकमेकांशी सहकार करावयाचा आहे; आपल्या बंधूंचे अनुकरण करायचे नसून त्यांना वाव द्यायचा आहे; आपलेच म्हणणे खरे असे मानायचे नसून दुसऱ्यांना सहानुभूती दाखवायची आहे; अशा तऱ्हेची वृत्ती असणे, अशी वृत्ती उत्पन्न होणे, हीच भविष्यकाळाची आशा; हीच भविष्यकाळाची श्रद्धा.

✦✦✦

२. सर्वत्र नकार

धर्म

पश्चिमेकडे काय किंवा पूर्वेकडे काय, धर्मक्षेत्रात फारच गुतागुंत झाली आहे. सर्व धर्मांची धर्मशास्त्रे ढासळत आहेत. शास्त्रे वाढत आहेत. मानसशास्त्र, समाजशास्त्र, प्राणिशास्त्र, मानववंशशास्त्र वगैरे शास्त्रे परंपरागत चालत आलेल्या सनातनी धार्मिक कल्पनांना खो देत आहेत. धार्मिक असे जे विविध अनुभव नमूद केले जातात, त्या अनुभवांवरून, त्या वृत्तांतावरून ईश्वर म्हणजे एक भ्रांत कल्पना आहे, तो एक मनाचा खेळ आहे, मानवी हृदयाचे ते एक गोड स्वप्न आहे, असे म्हणण्याची पद्धत रूढ होऊ पाहात आहे. परलोक आहे वगैरे सांगणाऱ्या धार्मिक विभूतींना वेड्यांच्या इस्पितळात पाठवावे, त्यांची मने विकृत असावीत, त्यांच्या मनोरचनेचा अभ्यास केला पाहिजे, असे लोक म्हणू लागले आहेत. ते जुनाट मुद्दे आजच्या मनाचे काडीइतकेही समाधान करू शकत नाहीत. प्रत्येक कार्याला जर कारण असेल, तर ईश्वरालाही कोणी तरी कारण असले पाहिजे. जर ईश्वराला कारणाची आवश्यकता नसेल, तर सृष्टीला तरी का असावी? हे विश्व किती सदोष, किती अपूर्ण! सर्वज्ञ व सर्वशक्तिमान प्रभूने का हे विश्व निर्माण केले? शक्यच नाही. ईश्वर म्हणून काही आहे हे इतिहासावरून सिद्ध होत नाही. लॉइझी म्हणतो, "इतिहासकाराने देवाला इतिहासातून घालविले असे नाही; तर त्याला देव मुळी कोठे तेथे दिसलाच नाही." कोठे तरी परलोक असेल, तेथे न्याय्य असेल, समता असेल, तेथे अश्रू पुसले जातील, जखमा बऱ्या होतील, असे आपणास वाटते. याचा अर्थ फक्त इतकाच की हे जग

वाईट आहे. या जगात अन्याय आहे. ''तो पाहा तेथे देव आहे, हा पाहा इकडे आहे.'' असे नि:शंकापणे सांगण्याइतका कोणताही पुरावा आपणास मिळत नाही. कोठे आहे ईश्वर तो दाखवा, दाखवा त्याच्या खाणाखुणा, असे मानवजात पुकारीत असता त्या देवाने मौन धरून बसावे, यावरूनच देव नाही असे सिद्ध होते. असे असूनही ईश्वरावरील श्रद्धेला जे धडपडत जोराजोराने चिकटून राहातात, त्यांच्याविषयी आश्चर्य न वाटता उलट वाईट मात्र वाटते. त्यांची कीव करावीशी वाटते. बुडणाऱ्या माणसाने एखाद्या काडीला धरण्यासाठी धडपडावे तसेच हे. स्वार्थी धर्मवेत्ते काहीही म्हणोत, ही श्रद्धा कुचकामाची व भंगुर आहे यात शंका नाही.

सार्‍या धार्मिक विचारप्रक्रिया मानवाच्या भोळेपणावर जगतात. नाना प्रकारच्या दंतकथा व भारुडे निर्मिली जातात. त्यांचा देव रागावतो, तो सूड घेऊ बघतो. हा देव कधीकधी स्वत:च्या शत्रूशीही देवाणघेवाण करतो, तडजोड करतो. हा क्रोधी देव मानवजातीला कधी खोल दरीत फेकतो, कधी अनंत नरकात लोटतो. परंतु त्याची लहर लागली तर कधीकधी दया करतो, एखादा कृत्रिम उपाय योजतो आणि हा देव हे सारे का करतो? तर जग निर्मिण्यापूर्वी त्याने तसे आधीच ठरवून ठेवले होते म्हणून! जगाच्या बाल्यावस्थेतील या कल्पित कथा आहेत. आजचे प्रश्न सोडवताना पूर्वीच्या पोथ्या फारशा उपयोगी पडणार नाहीत. प्राचीन धार्मिक ग्रंथातून आजच्या काळाला अनुरूप अर्थ शोधून काढण्याचे कोणी कोणी प्रयत्न करतात. आपण भूतकाळाबद्दल अशा प्रयत्नांना आदर व्यक्त करतो. परंतु अशा गोष्टीत बौद्धिक प्रामाणिकपणा नसतो. लहान मुलांप्रमाणे ज्यांची मते आहेत त्यांनी धर्माच्या पाठीमागे लागावे. परंतु निर्भय असे जे विचारस्रष्टे आहेत, त्यांना धर्माशी काहीएक कर्तव्य नाही. देवबीव सब झूट आहे. निर्दय, कठोर, भावनाशून्य अशा नियतीच्या हातातील आपण बाहुली आहोत. त्या नियतीला सद्गुणांशी काही करावयाचे नाही, दुर्गुणांशी काही करावयाचे नाही. या नियतीच्या हातून सुटणे म्हणजे शेवटी सारे शून्य होणे.

काहीचे वर सांगितल्याप्रमाणे मत आहे, तर दुसरे काही असे म्हणतात की, देवाच्या अस्तित्वाविषयी पुरावा जरी न मिळाला तरी देव नाहीच असेही निश्चितपणे म्हणता येणार नाही. आपण कशाचाच आग्रह धरू नये. असेल असेही म्हणू नये, नसेल असेही म्हणू नये. काही होकारू नये, काही नाकारू नये. धर्माविषयी ज्यांना थोडीशी आस्था वाटते ते म्हणतात की संशय जर आहे तर संशयाचा फायदा

आरोपीला देणे रास्त आहे. हे लोक देवाला सोडू इच्छित नाहीत. आलेल्या अडचणीत साहाय्य करतात. परंतु कट्टर असा संशयात्मा जो असतो, तो म्हणतो की देव कोण व कसा आहे हे जर माहीत नाही, तर देव नाही असे क्षुद्र मर्त्य माणसाने म्हणणे म्हणजे उपमर्द आहे. नास्तिक व नियतिवादी यांच्यामध्ये हा संशयात्मा उभा राहतो. या संशयात्म्याजवळ त्या उभ्या वादींचा तो थोर आत्मविश्वास नसतो. हा प्रश्न आपल्या आवाक्याबाहेरचा आहे असे त्याला वाटते.

देव आहे असे मानल्याने काही संरक्षण आहे असे उपयुक्ततावादी म्हणतात. धर्म म्हणजे ईश्वरावर विश्वास, त्या अमूर्ताजवळ एकरूप होणे, असे काही ते मानीत नसतात. जीवाच्या मोक्षासंबंधी आम्हाला काहीएक कर्तव्य नसून जगात सुधारणा व्हावी असे आम्हाला वाटते. जगाच्या सुधारणेसाठी धर्माचा उपयोग करून घेता येईल. कारण सामाजिक शांती व सामाजिक सदुन्नती यांना त्याची मदत होईल.

कोणत्याही धर्मातील बहुजनसमाज जो असतो, त्याला धर्मापासून आधार हवा असतो. ते अंधपणे श्रद्धा ठेवतात. ते जर विचार करू लागतील तर धर्मामुळे त्यांना जो ओलावा मिळतो तो नाहीसा होईल. यासाठी ते विचार करण्याच्या भानगडीत पडत नाहीत. ते नेहमी भूतकाळाकडे बघत असतात. मानवजातीला जे जे अनुभव आले व त्या अनुभवांतून जे जे शहाणपण मिळाले, ते सारे भूतकाळात समाविष्ट आहे असे त्यांना वाटते. आज जिवंत आहेत, त्यांच्यावर अशा प्रकारे मृतांची खरी सत्ता आहे. ते मृतच खरोखर जिवंत आहेत. कोणी कोणी अध्यात्मिक मोक्षाची तहान असलेले केवळ व्यक्तिवादी बनतात. कोणी मुमुक्षू निसर्गवादी बनतात. कोणाला साशंकवादातच समाधान वाटते, तर कोणी काहीच नाही असे म्हणतात. असा साराच गोंधळ धर्मक्षेत्रात माजला आहे.

कौटुंबिक जीवन

जी एक सामाजिक नीती म्हणून मानली जाते असे, तिच्याविषयी आज अनास्था उत्पन्न झाली आहे. मागचे महायुद्ध झाले व एक प्रकारचा सर्वत्र विस्कळीतपणा आला. आर्थिक अडचणीमुळे लग्ने उशिरा करण्याची पद्धत पडू लागली. स्वतःच्या व्यक्तित्वाचा कोंडमारा होता कामा नये असे उत्कटपणे वाटू लागले. आईबापांचे मुलाबाळांवरील नियंत्रण ढिले पडले. अर्धवट लैंगिक ज्ञानामुळे

घोटाळे झाले. फ्राइड वगैरे मानसशास्त्रज्ञांनी लैंगिक वासनाच सर्व व्यवहारांच्या मुळाशी असतात असे प्रतिपादिले. संततिनियमनाची साधने उपलब्ध झाल्यामुळे विषयभोग भोगूनही त्याचे परिणाम भोगावयास न लागण्याची सोय झाली. अशा या अनेक कारणामुळे पूर्वीची ध्येये व दृष्टी यांना तितकेसे महत्त्व राहिले नाही. पुरुषांना एक कायदा व बायकांना मात्र निराळा ही गोष्ट अत:पर स्त्रिया सहन करावयास तयार नाहीत; आणि ते रास्तही आहे. पुरुष तो पुरुष व स्त्री ती स्त्री, असे मूलभूत भेद पाडून उभारलेली ध्येये आज कोणी मानायला तयार नाही. अक्षतयोनित्वाचे, निर्मळ कौमार्याचे ध्येय स्त्रियांच्या गळी उतरविण्याची पूर्वी पुरुष खटपट करीत, ते ध्येय आज धुळीत गेले आहे. त्या ध्येयाचा मनावर फारसा पगडा हल्ली राहिला नाही, पुरुष काय स्त्रिया काय, त्यांना रोजच्या चाकोरीतील जीवनापेक्षा स्वैर सुंदर जीवनच आवडते असे सांगण्यात येत आहे. चंचल वासनाविकारांनी नटलेले प्राणी म्हणजे हे मानव. पुरुष व स्त्रिया यांच्यात श्रेष्ठ–कनिष्ठपणा दाखविण्याची जरूर नाही. दोघेही वासनांचे गोळे. पुरुष चंचल असतात नि स्त्रिया नसतात असे थोडेच आहे? आणि स्त्रिया तेवढ्या पतिनिष्ठ असतात आणि पुरुष पत्नीनिष्ठ नसतात असे थोडेच आहे? गुणदोष दोघांत आहेत. मानवजात जन्माला आली त्या वेळेपासूनच लैंगिक स्वैरता रूढ आहे. परंतु त्या स्वैरतेला आज गोड गोंडस नाव दिले गेले आहे. ही स्वैरता नाही. त्या त्या व्यक्तीचे आंतरिक स्वरूप प्रकट करण्याचा हा मार्ग आहे. हे व्यक्तीचे अंतराविष्करण आहे. चांगल्या कादंबऱ्यातूनही ही जी नैतिक शिथिलता ती गौरविली जात आहे. ती आदर्श म्हणून पुढे मांडली जात आहे. वरिष्ठ वर्गातून ही लैंगिक स्वैरता स्वीकारली जात आहे. जी स्त्री आर्थिक अडचणीमुळे पाप करते, तिला तिच्या या धंद्यातून लैंगिक सुखाचा आस्वाद घेऊ पाहणाऱ्या नवयुवती घालवून देत आहेत. स्वत:ची वासना तृप्त करून घेत असताही ती आपली सद्सद्विवेकबुद्धी शाबूत ठेवू पाहते. पुष्कळ स्त्रिया केवळ वासनांना बळी पडून व्यभिचार करतात असे नाही; तर विवाहित स्त्रीचे प्रियकर असलेच पाहिजेत असे त्यांना वाटते! लैंगिक स्वैरतेची आवश्यकता आहे, ते एक कर्तव्यच आहे. असेही म्हणण्यापर्यंत काहींची मजल गेली आहे! सामजिक निर्बंध स्त्रियांपुरते तेवढे असतात व पुरुषांना मात्र मोकळीक असते, ही गोष्ट मान्य करायला स्त्रिया तयार नाहीत. स्त्रियांनाही मोकळीक का नको? ही

स्त्रियांवरची बंधने कितीही पक्षपातीची असली, अन्यायाची असली, तरी ती बंधने झुगारून देणे कठीण आहे व धोक्याचेही आहे. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य पाहिजे आहे. वैवाहिक बंधनापासूनही मोकळीक पाहिजे आहे. मातृत्वाची जबाबदारी त्यांना नको आहे. पुष्कळशा चुणचुणीत तरतरीत अशा तरुणींची ही अशी महत्वाकांक्षा आहे. काडीमोड वाढत आहेत. मुलांची आईबापांमध्ये ढकलाढकली चालली आहे. आणि हे आईबाप आपल्याला वकिलांमार्फत एकमेकांशी बोलणे, चालणे करीत असतात.

स्त्रीपुरुषांच्या या संबंधात चार भिन्न अशी मते प्रदर्शिली जातात. नियतिवादी म्हणतात, की आपण पूर्वापार पद्धतीनेच पुढे जाणे बरे. प्रेमहीन विवाह जर वाईट असेल, तर विवाहहीन प्रेम केवळ पृथ्वीवरील नरकच होय. प्रेमाचा प्रकाश असला, तरी जेथे धार्मिक विधी नाही तो विवाह गर्ह्यच होय. आणि प्रेमाचा गंध नसलेलाही विवाह जर तो धार्मिक असेल तर तो स्तुत्य होत.

आदर्शवादी म्हणतात, की ज्या अर्थी जग हे बदलत असते, त्या अर्थी कोणतीही स्मृती सार्वकालीन असणे शक्य नाही. बदलत्या काळाबरोबर नियम व विधीही बदलले पाहिजेत; केवळ उच्च ध्येयाच्या शिखरावर दृष्टी खिळण्यात अर्थ नाही. व्यवहाराच्या भूमीवर उतरून आपण पाहिले पाहिजे आणि व्यावहारिक जगात एकदा आलेच म्हणजे मोठी मोठी तत्त्वे प्रत्यक्ष आचार यांच्यात किती विसंगती असते

• न्यायाधीश लिंड्स याने ''आजच्या तरुणांचे बंड'' म्हणून एक पुस्तक लिहिले आहे. त्यात तो लिहितो, ''चौदा ते सतरा वर्षांच्या मुली जर आपण घेतल्या तर असे दिसेल की, दर दहा मुलींपैकी एकीने लैंगिक बाबतीत गुन्हा केला आहे. सतरा ते एकवीस वर्षांपर्यंतच्या मुली घेतल्या तर हे प्रमाण अधिकच आढळते. तरुण व तरुणी वनभोजनास जातात, नाचांना जातात, मोटारीत बसून फिरायला जातात; परंतु यांच्यातील शेकडा नेव्वद तरी एकमेकांस मिठ्या मारतात, एकमेकांची चुंबने घेतात आणि शेकडा पन्नास तर चुंबन-आलिंगनाचीही मर्यादा ओलांडून पलीकडे जातात.'' न्यायाधीश लिंड्से अमेरिकेतील डेव्हर शहरी न्यायाधीश होता. तो म्हणतो, ''जी गोष्ट मी डेव्हर शहरासंबंधी म्हणून सांगत आहे, ती गोष्ट अमेरिकेतील प्रत्येक शहर व प्रत्येक नगर यांना अधिकच यथार्थतेने लागू आहे.'' कदाचित न्यायाधीश लिंड्से याचे लिहिणे थोडे अतिशयोक्तिपूर्ण असेल व परिस्थिती इतकी बिघडली असेल असे मानलेच पाहिजे, असे नाही.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय सातारा

दाखल नं ______ अनुक्रमांक
किंमत ______ पाने ______

ते दिसून येईल. आपली जी सनातन मते आहेत, जी पूर्वापार चालत आलेली विचारसरणी आहे, त्यामुळे पुष्कळशा स्त्रियांना खरा विषयानंद भोगणे दुरापास्त झाले आहे. त्यांना लैंगिक भूक नीट शमविता येत नाही. त्यांना समाधान लाभत नाही. उदाहणार्थ, ग्रेट ब्रिटन घेऊ. ग्रेट ब्रिटनमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या वीस लक्षांनी अधिक आहे. धर्मावरची श्रद्धा कमी होत असल्यामुळे स्त्रियांची ही ज्यादा संख्या निरनिराळ्या धार्मिक संस्था, मठ वगैरे आपल्यात मिळवून घेऊ शकत नाहीत. मग या स्त्रियांचे काय करावयाचे? अशा परिस्थितीत एका पुरुषाला एकच बायको असावी असे जर आपण म्हणू, तर बाकीच्या स्त्रियांनी का ब्रह्मचर्य पाळावयाचे? परंतु सक्तीचे ब्रह्मचर्य याला काहीच अर्थ नाही. जुन्या रूढींना बळी पडतात, त्यांना वैवाहिक सुखांना आपण आंचवावे असे मनातून वाटत असते का? नाही. आपल्या वासनांची भूक शमवण्याची त्यांनाही इच्छा असते. परंतु तसा वाव न मिळाल्यामुळे काही स्त्रिया वेड्या होतात. कारण अतृप्त भावना म्हणजे परम कठीण वेदना होत. त्यामुळे जिवाची तगमग होते. माणसाला काही सुचेनासे होते. ज्यांना लग्न करणे अशक्य असते, त्या दुसऱ्या साधनांचा अवलंब करतात व आपली भूक शांतवू बघतात; आणि त्यांच्या या अनिर्बंध वर्तनाकडे आपणास कानाडोळा करणे भाग असते. एका पुरुषाला अनेक बायका असणे हे जरी बेकायदेशीर असले, तरी व्यवहार तर सर्रास तसा चालू आहे आणि अशा ह्या व्यवहारामुळे रोग फैलावत आहेत, वंचना होत आहेत, अश्लीलता वाढत आहे. शिवाय तरुण-तरुणी आमरण एकमेकांस प्रेमाने बिलगून बसतील असे सांगणेही फोल आहे. असल्या आशा दाखवण्यात काय अर्थ? कायमचा परस्परांना जखडून टाकण्याचा करार न केला तरच प्रेम सुरक्षित राहण्याचा संभव आहे. आज जी सामाजिक अशांतता आहे तिच्यावर एकच उपाय आमच्या मते आहे. तो उपाय म्हणजे ''प्रायोगिक विवाह.''

संशयवादी म्हणतात, ''भूतकाळाकडे पुन्हा वळणे योग्य नाही.'' परंतु आजची परिस्थिती पाहून त्यांचे मन खचते. घटस्फोट वाढत आहेत. कौटुंबिक घटक न्यायमंदिरातील निकालाने अलग अलग होत आहेत. नवीन पती जोडले जातात, नवीन पत्न्या मिळविल्या जातात. मुलांची ओढाताण होते. बाप पहिला तर आई नवीन. आई पहिली तर बाप नवीन, अशी सृष्टी मुलांसमोर असते. त्यांची कोणी काळजी घेत नाही आणि यांच्यावर आईबापाचे नियंत्रण नीट राहात नाही. कुटुंबातील

ते हितकर व कल्याणकर असे वातावरण नष्ट झालेले असते. मुलांवर सत्संस्कार होत नाहीत. हे सारे पाहून हे साशंकवादीही निराश होतात व हात चोळीत बसतात. तरणोपाय काय ते त्यांना समजत नाही. जसे व्हायचे असेल तसे होईल, असे म्हणून ते स्वस्थ बसतात. ते प्रवाहाबरोबर जातात. प्रवाहाबरोबर कसे तरी वाहत जाणे म्हणजे निश्चित प्रगती नव्हे. काही तरी यातून निष्पन्न होईल अशी वाट ते पाहात असतात.

दुसरे निर्भय विचारकर्ते असे उद्घोषितात की, जगणे हेच जीवनाचे ध्येय. ज्यांना मस्तपणे नीट जगावे असे वाटत नाही अशा भितुरड्यांची कीव करावी. जीवनातील आनंद भोगावे, एक प्रकारची गोड प्रक्षुब्धता अनुभवावी. जीवनातून ते डोळे मिटून जातात. जीवनाकडे डोळे उघडे ठेवून ते बघत नाहीत. हे पुरुषार्थी पापे करतात व दुर्मीळ आनंद अनुभवतात. वासना-विकार जीवनात असणारच. कुरकुरण्यात काय अर्थ? शारीरिक सुखे म्हणजे काही अपराध नव्हे. त्यांनी आत्मा बाटत नाही, विटाळत नाही. ज्यांच्याशी आपली बौद्धिक समधर्मिता आहे, ज्यांच्याकडे आपले मन ओढते, त्यांच्या देहांशीही आपण परिचय करून घेतला तर त्यात काय बिघडते? आपण माणसे अमुक चांगले व अमुक वाईट असे म्हणतो. परंतु निसर्गाला सारे सुंदरच वाटते. यांचा नास्तिकवाद निसर्गमूल आहे. सारे सृष्टीच्या नियमानुसार चालले आहे. सृष्टीतील काही शक्ती एकत्र आल्या व हा मानवी आकार जगातून नाहीसा होईल. म्हणून जोपर्यंत हा मानवी देह आहे, तोपर्यंत सुख भोगावे. जास्तीतजास्त सुख भोगण्याची खटपट करावी. जर जीवनात परिपूर्णपणे अनुभव घ्यावयाचा असेल, जीवनात साहस अनुभवायचे असेल, सौंदर्य चाखावयाचे असेल, सर्वांशाने जगायचे असेल, तर मरण येण्यापूर्वीच या पेल्याचा मनमुराद आस्वाद घेतला पाहिजे. आपल्या वासना-विकारांना लपविणे, आपल्या क्षुद्र सुखांच्या क्षुधांवर पांघरूण घालणे वरील विचारसरणीच्या लोकांना आवडत नाही. ही लपवालपवी व छपवाछपवी शिष्टतेचे किंवा सद्भिरूचीचे लक्षण आहे असेही ते समजत नाहीत. कोणत्याही वृत्तींना उगीच दाबू नका, कोंडू नका. होऊ दे सारे खरे स्वरूप प्रकट. लपंडावाची काय गरज? जीवन म्हणजे साहस, बेफिकीर वागणे. या जगात आपल्या उत्साहाला स्वैर वाव द्या. मस्तपणे राहणे यातच मौज. कशाची दिक्कत नाही. कशाची पर्वा नाही. जोरदारपणे, बेगुमानपणे जगा. जुनाट नीतिशास्त्राचे तुणतुणे वाजवणारे बुळे असतात. त्याचे रक्त सळसळत नसते, म्हणून त्यांना मिळमिळीत व गुळगुळीत जीवन आवडते.

बहुजनसमाजाच्या भावना कशा पटकन प्रक्षुब्ध होता. वृत्ती कशा उत्तेजित होतात, ते या बावळटांना व मेषपात्रांना काय कळे? आपला दुबळेपणा व भित्रेपणा नीतीच्या नावाखाली ते छपवू पाहतात, दुसरे काय? असे हे स्वैर व स्वच्छंद व्यक्तित्वाचे धीट पुरस्कर्ते आहेत. स्वत:च्या वासनांवर कोणताही अंकुश चालविण्यास ते तयार नाहीत. आपल्या मोकाट व भरमसाट जीवनाला कोणी अडथळा केला तर तो त्यांना खपत नाही. नैतिक सयंम म्हणजे एक जुनाट बावळटपणाची कल्पना आहे असे ते मानतात. पावित्र्याच्या व धर्मश्रद्धेच्या गोष्टी म्हणजे भोळसटपणा आहे. ज्याला व्यभिचार म्हणतात तो व्यभिचार नसून आंतरिक स्वातंत्र्याचे ते बाह्य प्रतीक आहे. दृढमूल झालेल्या नाना धार्मिक संस्था म्हणजे जीवनाचे शत्रू आहेत. या सर्व धार्मिक संस्था तुडवल्या पाहिजेत. एरवी नवीन सामाजिक रचना उभारता येणार नाही.

आर्थिक संबंध

आर्थिक बाबतीत सरकारने ढवळाढवळ करायची नाही हे तत्त्व आता मागे पडले. ''कारखानदार व कामगार परस्परांशी करारमदार करावयास स्वतंत्र आहेत; स्पर्धेचे स्वातंत्र्यही सर्वांस हवे; ज्या काही भानगडी उत्पन्न होतील त्या आपोआप शमतील.'' असले विचार अत:पर राहिले नाहीत. आपली घडी आपोअप नीट बसवून घेईल अशा प्रकारचे यंत्र समाज नव्हे हे आता कळू लागले आहे. आर्थिक बाबतीत व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य दिल्याने दोन वर्ग निर्माण झाले. मूठभर अशा चंदूलालांचा एक वर्ग व दारिद्र्य आणि दु:ख यात खिचपत पडलेल्या श्रमजीवींचा, कोट्यावधी कष्टाळूंचा दुसरा वर्ग. ही अशी स्थिती निर्माण होणे अपरिहार्य आहे असे नाही. ज्यांच्यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही, ज्या आपल्या हाती नाहीत, अशी काही बाह्य शक्तींनी व्यक्ती व समाज बनत असतात असे आज सहसा कोणी मानीत नाही.

यंत्रामुळे कंटाळवाणे तेच ते बैलासारखे काम करणे कमी होईल व मनुष्याला कलात्मक व सांस्कृतिक असे जीवन अनुभवायला अधिक अवसर मिळेल अशी अपेक्षा होती. आज मानवी श्रम यंत्रामुळे कमी झाले आहेत यात शंका नाही. परंतु त्यांनी कामात कंटाळावाणेपणा मात्र अभिक उत्पन्न केला आहे. आजच्या यांत्रिक उत्पादनाचा पाया श्रमाच्या आंत्यतिक विभक्तीकरणात आहे. एखादी मोटार तयार

करायची असली तर तिचे हजारो भाग निरनिराळ्या खात्यांत तयार होत असतात. तीच एक वस्तू, तोच एक भाग त्या त्या कामगाराने मरेपर्यंत करायचा. यामुळे कामगाराच्या जीवनातील कारागिरी नष्ट झाली आहे. कामगार म्हणजे एक यंत्रच बनला आहे! यंत्रासमोर तोही यंत्राप्रमाणे उभा असतो. व ते ते ठरावीक भाग, त्या त्या ठरावीक वस्तू यंत्रातून बाहेर काढीत असतो! आज औद्योगिक कारखान्यात सौंदर्य, पावित्र्य, आनंद यांना स्थान नाही. कारागीर, जास्त मोठ्या प्रमाणावर उत्पादन व्हावे म्हणून एक यंत्र चालवणारा कामगार बनला आहे. कामगाराला कामात आनंद वाटत नाही, तेथे मनाला करमणूक नाही. शरीर मात्र थकून जाते. पूर्वी कारागीर आपल्या वस्तूच्या निर्मितीत आनंद मानीत असे. त्याच्या बुद्धीचा व चारित्र्याचा त्याच्या कर्मात विकास होत असे. परंतु आज बौद्धिक विकासासाठी, चारित्र्याच्या संवर्धनासाठी दुसऱ्या गोष्टींची जरूर पडते. कामगारांना कामाबाहेर आनंद बघावा लागतो. उद्योगमंदिरच आनंदमंदिर होत नाही. कारखानाच कलात्मक जीवनाचा अनुभव देऊ शकत नाही. आणि म्हणून कामगार अधिक मजुरी मागतो, कामाचे कमी तास असावेत, अशी मागणी करतो. कारण त्याला दुसरे काही शिकावेसे वाटते; मनाची करमणूक त्याला करून घ्यावयाची असते; त्याला स्वत:चा विकास करून घ्यावयाचा असतो; थोडा मोकळा वेळ त्याला पाहिजे असतो. परंतु चळवळी करून कामगारवर्गाने जी थोडीफार फुरसत मिळविली तिचा विनियोग कसा केला जातो? काही उत्तेजिक करमणुकीत ती फुरसत खर्चिली जाते. कामगारांचा फुरसतीचा वेळ जावा म्हणून नानाप्रकारच्या मोहक करमणुकी उभ्या असतात. खिसा रिकामा होतो आणि रोजचे कारखान्यातील ते जड जीवन, ते शून्यमय जीवन, त्यापासून थोडा वेळ तरी अलग झाल्यासारखे वाटते. थोडा वेळ तरी त्या नीरस, प्राणहीन व यांत्रिक जीवनाचा विसर पडतो. * काम करीत असताना आपल्या ज्या उदार व उच्च वृत्ती दबल्या गेलेल्या असतात, कोंडल्या गेलेल्या असतात, त्यांना समाधान देण्यात फुरसतीचा वेळ कोणी

---

*वुइल्यम आर्चर ''ज्ञान आणि चारित्र्य'' या पुस्तकात लिहितो, ''जीवनातील कंटाळवाणेपणा दूर करावयास दुर्गुण हे एक साधन होते. निराशा मनुष्य व्यसनी होतो. कंटाळवाणे काम करून कंटाळलेल्या व थकलेल्या मेंदूला दुर्गुण व व्यसने जरा तरतरी देतात. रिकाम्या मेंदूतील शून्यतेची जड भावना व्यसनामुळे थोडा वेळ नष्ट होते.''

दवडीत नाही. म्हणून कामाचे तास कमी होऊन फुरसत मिळाली. परंतु फायदा काय झाला शंकाच आहे. ही फुरसत आशीर्वाद समजावी की शाप? कारखान्यातून कामे करणारे ओंगळ व गलिच्छ वस्तीत राहतात. त्यांचा वेळ दारूच्या गुत्त्यात व चहाच्या दुकानात जातो. आत्म्याचे पोषण अशा ठिकाणी होत असते. एक म्हण आहे की, ''जेथे तुझा ठेवा तेथे तुझे मन'' ही म्हण समुदायांना व व्यक्तीनाही लागू आहे. व्यक्ती किंवा समुदाय कोणत्या वस्तूंना महत्त्व देतात हे समजून घ्यायचे असेल, तर आपला फुरसतीचा वेळ ती कसा दवडतात ते त्यांना विचारावे. हा जो मानवी जीवनाचा ऱ्हास होत आहे. भयंकर विनाश होत आहे, तो पाहून मन उद्विग्न होते. श्रम, विश्रांती व पूजा या मानवाच्या तीन आवश्यक गरजा आहेत असे प्रत्येक धर्म सांगतो. श्रमामुळे आपण इतरांशी संबद्ध होतो. आपण सारे एकमेकांसाठी काम करीत आहोत ही बंधुभावाची भावना वाढते. आपण एकमेकांस अधिक यथार्थतेने जाणतो आणि सर्वांच्या सुखस्वास्थ्यात भर घालण्याची आपली वृत्ती जागृत राहते. विश्रांतीमुळे आपण आपणास जाणतो. त्या वेळेस आपण आपले असतो. आपले वैचारिक स्वातंत्र्य त्या वेळेस आपण अनुभवतो. त्या वेळेस आपण आपले नियन्ते असतो. आपण आपले राजे असतो आणि पूजेमुळे या विश्वाचा आत्मा आपण जाणू पाहतो; या सर्व विश्वाचा हेतू समजावून घेतो. परंतु आज काय झाले आहे पाहा. श्रमाने मनुष्य एकमेकांच्या जवळ येण्याऐवजी एकमेकांपासून दुरावत आहे, त्याची सामुदायिक, सामाजिक वृत्ती मारली जात आहे. विश्रांतीच्या वेळी मनाचे डोळे आंधळे केले जातात, आत्मारामाचे मंदिर बंद असते, आणि क्षुद्र मूल्यांचा स्वीकार करून आपल्या दैवी वृत्ती निस्तेज व निर्जीव करण्यातच पूजेची इतिकर्तव्यता दिसून येते. जरा एकटे राहणे आज केवळ अशक्य झाले आहे. श्रमाचे वेळी, विश्रांतीचे वेळी, किंवा पूजेचे वेळी एकटे असणे म्हणजे लोकांना जणू दुर्भाग्य वाटते! कारखान्यात काम करू, गर्दीत घुसून मजा मारू, बाहेर जायचे झाले तरी जमावाने जाऊ, पाप करायचे असले तरी सर्व मिळून करू, आणि प्रार्थनाही सामुदायिकरित्या करू!

संध्याकाळच्या वेळी घरी निवांत बसणे, एकटेच जरा सृष्टीच्या सान्निध्यात फिरायला जाणे, आत्म्याचा विकास व आत्मचिंतन, या सर्व गोष्टी आज नीरस व कंटाळवाण्या वाटत आहेत. आजची आपली पिढी म्हणजे धावपळीची पिढी. ना विश्रांती, ना निद्रा. वास्तविक खरे म्हटले तर ज्याप्रमाणे जरूर पडली म्हणजे शोध लागतात, गरजेतून शास्त्र जन्मते, त्याप्रमाणे विश्रांतीच्या वेळीच कला व साहित्य, तत्त्वज्ञान व धर्म यांचा जन्म होतो. विश्रांती, फुरसतीचा वेळ म्हणजेच सर्व संस्कृतीची

जननी. परंतु आजची संस्कृती म्हणजे आपल्याच हातात सर्व सत्ता घेण्याची संस्कृती. या राक्षसी व सुलतानी संस्कृतीत मनाच्या उच्च विकासाला अवसरच नाही. खरोखरच सात्त्विक चिंतन करायचे असेल तर एक प्रकारची शांती, एक प्रकारची स्तब्धता व एकाग्रता, एक प्रकारचा अलिप्तपणा यांची जरुरी असते. परंतु आजच्या संस्कृतीत या गोष्टी आहेत कोठे? आजची संस्कृती या अशा गोष्टींची शत्रू आहे. आज ज्ञान वाढले असले, तरी शहाणपण वाढले असे नाही.

आणि आजच्या या औद्योगिक युगाने, या यांत्रिक युगाने, आपणास पैशाचे पुजारी बनविले आहे. द्रव्य म्हणजेच देव! श्रीमंत होऊ तरच सुईच्या भोकातून पार जाऊ असेच आज निश्चित वाटते आहे. पैसा म्हणजे स्वर्गातील राज्याचा सदर परवाना. कोणत्याही मार्गाने व वाटेल ती किंमत देऊन व्यवहारात यशस्वी होणे हेच आजचे ध्येय आहे. पैशामुळे मान, पैशामुळे स्थान. पैसा मिळविण्याची कला ज्याला साधली किंवा सुदैवाने ज्याला पैसा लाभला त्याला समाजात सर्वोच्च स्थान आज दिले जाते. श्रेष्ठ-तनिष्ठपणा मोजण्याचे पैसा हे साधन झाले आहे. हे यांत्रिक युग येण्यापूर्वी समाजातील मानपान मोजण्याची निराळी साधने होती. संत, विद्वान् लोक, कवी, कत्त्वज्ञानी यांना समाज अग्रपूजेचा मान देई. जे ज्ञानाने व चारित्र्याने श्रीमंत असत तेच लोकनायक बनत. त्यांच्याजवळ मालमत्ता किती आहे या गोष्टीकडे कोणी बघत नसे. परंतु ते दिवस गेले. गरिबीतही निर्मळ, निरागस व स्वाभिमानी राहण्याचे ते दिवस गेले. पैसे मिळविणे हा आजच्या जगातील एक अत्यंत आवडता व लोकप्रिय धंदा झाला आहे!

या यांत्रिक उद्योगधंद्याच्या काळात आणखी एक महत्त्वाचा परिणाम झाला आहे व तो म्हणजे घर नाहीसे होणे. अमेरिकेत व रशियात ही गोष्ट दिसून येत आहे. ज्या कुटुंबातील प्रत्येकास आर्थिक स्वातंत्र्याची स्पृहा असते, तेथे कौटुंबिक संबंध व कौटुंबिक बंधने शिथिल होतात. स्त्रिया व पुरुष घराबाहेर कामे करतात आणि मुले जर घरी झोपलेली नसतील तर शाळेत किंवा कॉलेजात किंवा क्रीडांगणावर, किंवा बोलपटगृहात कोठे तरी आपला वेळ दवडतात. "जीवनाचा प्रश्न" या आपल्या पुस्तकात ट्रॉटस्की रशियाविषयी लिहितो, "पुरातन पद्धतीची जी कुटुंबपद्धती तिच्यावर फार महत्त्वाच्या व प्रचंड अशा आपत्ती आज आल्या आहेत. महायुद्ध व क्रांती यांनी ही जुनाट कुटुंबपद्धती कोलमडू पाहात आहे... आपण अधिक समाजवादी आर्थिक सुधारणा घडवून आणल्या पाहिजे. नाना प्रकारची कामे कुटुंबातील मंडळींना करावी लागतात. त्यांना सतत काळजी व चिंता वाटत असते. यापासून आपण त्यांना मुक्त केले पाहिजे. जर नवीन

आर्थिक सुधारणा करू तरच हे शक्य होईल. धुणे वगैरे सार्वजनिक धोबीखान्यात केले पाहिजे. जेवणखाण सार्वजनिक भोजनालयात झाले पाहिजे. शिवणकाम सार्वजनिक कारखान्यात केले पाहिजे. मुलांचे शिक्षण बालसंगोपनगृहात सार्वजनिक शिक्षकांकडून झाले पाहिजे व हे शिक्षकही असे हवेत की ज्यांना ह्या कामाची खरोखर आवड आहे. असे आपण करू तरच पती व पत्नी यांना जखडून टाकणारे बंध ढिले होतील. बाह्य परिस्थितीमुळे व प्रासंगिक आणि आकस्मिक कारणांमुळे जी बंधने निर्माण होतात ती नष्ट होतील. पतिपत्नी परस्परांचे जीवनशोषण करणार नाहीत.'' याचा अर्थ थोडक्यात हा की, पुरुषालाही घरात स्थान नाही, स्त्रीलाही नाही; घर ही वस्तू नाहीशीच झाली!

हे यंत्रमय औद्योगिक युग नवीन नवीन गरजा उत्पन्न कराव्या असे मानते. जे जे भोगावे त्याने भूक वाढतच जाते. गिऱ्हाइकांच्या भुकेला जे मिळते त्यानेच ती भूक वाढते. भौतिक प्रगतीचा मार्ग म्हणजे अधिक मागणे, अधिक मिळविणे हाच होय. अशा उत्तेजक व प्रक्षोभक स्पर्धेमुळे जीवनातील शून्यता व निष्फळता आपण लपवू बघत असतो. हे यंत्रयुग मनुष्याच्या सर्वसाधारण गरजा भागवते, परंतु व्यक्तीच्या विशिष्ट इच्छेला येथे स्थान नाही. कला हद्दपार झाली, ती कोपऱ्यात बसली.

राजकारण

लोकशाहीची तर आज सत्त्वपरीक्षा चालली आहे. राजकीय व्यवस्थेच्या दृष्टीने लोकशाही तितकीशी प्रिय आज नाही. इटलीत ती कोलमडली. स्पेनमध्ये तेच झाले. रशिया व चीनमध्येही तिच्याविषयी फारसे चांगले मत नाही. पूर्व युरोपच्या काही भागात व दक्षिण अमेरिकेत प्रतिनिधक लोकशाहीचे स्वरूप थोडेसे दिसते. परंतु तेथेही श्रद्धा डळमळू लागली आहे, संशय निर्माण झाला आहे. स्वित्झर्लंड, स्वीडन, नॉर्वे अशा लहान राष्ट्रांतच खरी लोकशाही जगू शकेल, अन्यत्र नाही, असे लॉर्ड ब्राइस म्हणाले होते.

अनियंत्रित सत्तेपासून बचाव म्हणून लोकशाहीची आपण कास धरिली. परंतु आज लोकशाहीचा जो व्यवहार दिसत आहे तो समाधानकारक नाही. राज्यशासन म्हणजे तंत्रमय अशी एक कला आहे व तिच्यात तज्ज्ञ असणारेच सत्ताधारी होतात ही गोष्ट आज आपल्या अनुभवास येत आहे. लोकशाहीचा प्रत्यक्ष कारभार पाहू तर असे दिसेल, की खरोखर अत्यंत योग्य व कार्यक्षम अशी जी माणसे ती क्वचितच राज्यकारभार चालवतात. ती माणसे पुढे येऊ शकत नाही. उत्कृष्ट माणसे लोकशाहीला जणू नको असतात.

उद्योगधंद्यातच आज यंत्रयुग आहे असे नाही, तर राजकारणातही तेच आहे. लोकशाहीच्या नावाखाली कोणी तरी पुंजीपती उभा राहतो, तोच मागे उभा राहून सर्व राज्ययंत्र चालवतो. सारी कळ त्याच्या हातात असते. निवडून आलेल्या प्रतिनिधींना स्वातंत्र्य नसते. ते पुढारीपण घेऊ शकत नाहीत. आपल्या स्फूर्तीने काही करू शकत नाहीत. प्रतिनिधी म्हणजे बाहुलीच असतात. एका प्रचंड यंत्रातील ती लहानमोठी चाके असतात. आपल्या मतदारसंघातील मतदारांचे मत काय असेल याचा विचार हे प्रतिनिधी फारसा करीत नाहीत. सभागृहातील चर्चांकडे त्यांचे लक्ष नसते. स्वत:ची प्रामाणिक मतेही ते दूर ठेवतात. मत कोठे द्यावयाचे ते त्यांना आगाऊच सांगितलेले असते. यामुळे या साऱ्या चर्चा व हे वादविवाद केवळ भ्रमरूप व मायावी असतात. पक्षोपक्ष करण्याची जरूरच नसते. लोकशाही केवळ एक नाव आहे झाले.

लोकशाही युगात व्यक्तीचे स्वातंत्र्य तरी नीट राहिले का? तसेही नाही. युरोप व अमेरिका म्हणजे लोकशाहीची पूजक असे मानतात. व्यक्तित्वाला तेथे मान आहे असे समजतात; परंतु वास्तविक व्यक्तीच्या जीवनाला आज तेथे काडीचीही किंमत नाही. वैयक्तिक जीवनाची कोणी कदर करीत नाही. स्वातंत्र्याच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या या भूमीतून 'हम करे सो कायदा' हेच तंत्र आहे. अन्य संस्कृती व अन्य मानववंश यांच्यावर सूड घेणे व हल्ले चढविणे सुरू आहे. विरुद्ध मताच्या राजकीय पक्षांना दहशत बसावी म्हणून तेथे संघटना आहेत. व्यक्तीचे जीवन सुरक्षित नाही. वैयक्तिक सूडही घेतला जातो. कशाने तरी प्रतिस्पर्धी दूर करायचा. आज साम्यवादी रशियातही आपण काय कराव हे ठरविण्याचा व्यक्तीला अधिकार नाही. यांत्रिक व तांत्रिक परिणती हे ध्येय असल्यामुळे जशी जरूर असेल त्याप्रमाणे ती ती माणसे तेथे पाठवली जातात. त्या त्या कामात त्यांना तरबेज करण्यात येते. आचरस्वातंत्र्य, कर्मस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य यांना तेथे स्थान नाही.

या लोकसत्तात्मक म्हणून मिरवणाऱ्या देशात अज्ञान बोकाळले आहे, शिथिलता शिरजोर झाली आहे. सदभिरुचीला स्थान नाही, संयम व शिस्त नष्ट झाली. तेथील वृत्तपत्रे पाहा म्हणजे वरील गोष्टींचा पुरावा मिळेल. लोकसत्तात्मक राष्ट्रांतील बहुजनसमाज मुख्यत्वेकरून काय वाचतो? वर्तमानपत्रात कोणता मजकूर असतो. कोणत्या गोष्टींना स्थान असते? घटस्फोटांच्या हकिकती, खून, नाचरंग,

गुप्त पोलिसांच्या गोष्टी, कोर्टाच्या आवारातील हकिकती, हे सारे तेथे आढळते. या खांद्यावर पुष्ट होणारी लोकशाही कशी असेल बरे? कितीशी सुसंस्कृत ती असेल बरे? कसे असेल तिचे अंतरंग? शिक्षणाच्या सोई जरी पुष्कळांना अनुकूल असल्या, तरी संस्कृतीचा दर्जा वाढला असे झाले नाही. कॉलेजात जाणे सोपे झाले आहे, परंतु सुसंस्कृत होऊन, खऱ्या अर्थाने सुशिक्षित होऊन बाहेर पडणे मात्र दुष्कर झाले आहे. वाचायला आपण शिकतो, परंतु विचार करायला शिकत नाही. आणि वृत्तपत्रे, नियतकालिके, बोलपट, नभोवाणी ही जी लोकशिक्षणाची साधने, त्यांनी कोणते शिक्षण देण्याचे ठरविले आहे? अर्धवट लैंगिक ज्ञान, संततिनियमनाची माहिती, फ्रॉइड व जंग यांच्या मानसशास्त्रांची मोडकीतोडकी हकिकत, मनोविश्लेषणाच्या नावाने पाणचट व चटोर गोष्टी हे सारे पुरवले जात आहे. जे समंजस आहेत, शिकवण्याची ज्यांना पात्रता आहे, ज्यांना अधिकार आहे ते भीतीने बाजूला उभे राहतात आणि बहुजनसमाजाच्या विचाराशी व मनाशीच एकरूप होतात. आज साराच गोंधळ माजला आहे. अधिकारवाणीने कोण सांगणार? पवित्र परंपरा तीही मेली. बहुजनसमाजाच्या वृत्तींना वळण कोण देणार, त्यांच्या शक्तीला व उत्साहाला मार्ग कोण दाखवणार? त्यांच्या भावनांना विचारांची वेसण कोण घालणार? आज वृत्ती स्वैर झाल्या आहेत. भावना उच्छृंखल होत आहेत. वर्गद्वेष पसरत आहे. प्रक्षोभ वाढत आहे. आपणासमोर जे महान प्रश्न आहेत त्यांना तोंड देण्याची कोणातही हिंमत नाही; त्या प्रश्नांचे स्वरूप समजावून घेण्याची पात्रता नाही; आणि वेळही नाही. किंवा समतोल विचार करणारे असे जे द्रष्टे आपणात काही आहेत त्यांच्यावर श्रद्धा व विश्वास ठेवण्यास आपण तयार नाही. बहुजनसमाजाचे मत तेच प्रमाण. संख्येला महत्त्व. आरडाओरडीला मान. विचारवंतांच्या मताला किंमत नाही. विचाराच्या पेढीवर आज प्रमाणबद्ध, मन:पूर्वक बनवलेल्या मताला किंमत नाही; तर घाईघाईने बनवलेली मते, ना ज्यांना ताळ ना तंत्र, तीच आज तेथे स्वीकारली जात आहेत.

कारखान्यातून जसा एका साच्याचा माल बाहेर पडतो, त्याप्रमाणे सर्वांच्या मनातून ठरावीक विचार व ठरावीक कल्पनाच बाहेर पडाव्यात, अशी वृत्ती लोकशाही देशांतून दिसून येते. आपली मने स्वतंत्र विचार करीत नाही, यांत्रिक रीतीने विचार करतात. मनाचे यंत्र झाले की सारी सृजनशक्ती नष्ट झाली असे समजावे. स्वतंत्र निर्माणशक्तीला वावच नाही. परमोच्च अशी जी निर्मिती होत

असते ती ठराविक साच्याप्रमाणे विचार करणाऱ्या मनातून कधीही होत नाही. ज्याच्याजवळ वस्तूच्या अंतरंगात शिरणारी प्रज्ञा असते, जो कठोरपणे व अनासक्तपणे विचार करू शकतो, जो आजूबाजूच्या लोकांपेक्षा जरा उंच जाऊन बघतो व शांतपणे मनन व चिंतन करतो, तोच जगाला नवीन असे काही देऊ शकतो. तोच जगाला नवीन सृष्टी दाखवील. नवीन दृष्टी देईल. आणि खरोखर खोल जर आपण पाहू, तर नाव लोकशाहीचे जरी असले तरी तिच्या प्रत्यक्ष व्यवहारात एकशाहीच दिसून येईल. हे म्हणणे विरोधात्मक भासले तरी खरे आहे. लोकशाहीचा आत्मा कशात आहे? व्यक्तीला स्वातंत्र्य असणे, व्यक्तीला मान असणे, हाच तो आत्मा. इब्सेन म्हणतो, ‘‘मनुष्या, तू तू अस.’’ परंतु आजच्या लोकशाहीत व्यक्तित्वाला वाव कोठे आहे? एका ठरावीक नमुन्याचे आपण सारे बनत आहोत. आपले आंतरिक स्वातंत्र्य जीवन आज मेले आहे. आपले सर्वांचे विचार जर एकरुप झाले, एका ठशाचे झाले तर प्रगती खुंटलीच म्हणायची.

जेथे इतकी आर्थिक विषमता आहे, तेथे राजकीय समता कोठून असणार? नवीन, अधिक चांगली अशी समाजरचना निर्मिण्यासाठी आपल्या हातात सर्व सत्ता घेण्याची खटपट श्रमजीवी लोक करीत आहेत. समाजसत्तावादी व साम्यवादी संघटना राज्ययंत्र आपल्या हाती घेऊ पाहात आहेत. राष्ट्रीयत्वाच्या कल्पनांचे बांध ढासळत आहेत व वर्गविग्रहावर भर दिला जात आहे. देशभक्तीचे खूळ भांडवलवाल्यांनी निर्मिले आहे. राष्ट्रभक्ती व देशभक्ती असल्या भ्रामक कल्पनांच्या भुतांपासून श्रमजीवी वर्ग मुक्त केला पाहिजे. ‘‘माझा वर्ग म्हणजे माझा दे.’’ असे साम्यवादी म्हणतो आणि वर्ग नष्ट केल्याशिवाय, अस्तित्वात असणारे वर्गविग्रह दूर केल्याशिवाय, खरी लोकसत्ता अस्तित्वात येणार नाही असे तो म्हणतो.

ज्या मानाने स्वतंत्र विचारसरणीचे व स्वतंत्र इच्छेचे लोक समाजात असतील, त्या मानाने त्या समाजात राजकीय जीवन आहे असे समजावे. समाजाचे स्वास्थ्य नीट राहावयास हवे असेल तर विचार व आचार यांचा मोकळा खेळ सुरू असला पाहिजे. परंतु आजच्या लोकशाहीत कोठे आहे हे? आजच्या समाजरचनेत आहे का हे शक्य? मतदानाच्या पेटीत मते टाकण्याच्या जुगारापेक्षा दुसरी कोणती तरी अधिक चांगली पद्धती शोधून काढली पाहिजे. मानवी व्यवहार जिने अधिक सुरळीत व सुंदर रीतीने चालतील अशी पद्धती शोधून काढण्यासाठी पराकाष्ठा केली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय संबंध

मानवजातीवर प्रेम करणारा आजची परिस्थिती पाहून सुखावणार नाही. राष्ट्रे शांतिसूक्ते गातात व युद्धाची सिद्धता करीत असतात! युद्धाला जन्म देणारी मनोरचना सोडावयास ते तयार नाहीत. दुसरे आहेत तसे आपण अजून नाही म्हणून ईश्वराचे ते आभार मानीत असतात. आपली जात सर्वोत्कृष्ट व अति पवित्र, आपला धर्म म्हणजे जगाची आशा आणि आपले राष्ट्रच जगाचे नेतृत्व करण्यास पात्र, असे सर्वांस वाटत असते. लहानपणापासूनच दुसऱ्यास तुच्छ व स्वत:स उच्च समजणाऱ्या या संकुचित राष्ट्रधर्माची शिकवण मिळत असते. निशाणे फडकविली जातात, शिंगे फुंकिली जातात, देशभक्तीची व द्वेषाची गीते गायिली जातात. मागील युद्धात गुंतलेल्या प्रत्येक राष्ट्रास वाटत असे की, आपण लढाईत पडलो ते केवळ संस्कृतीच्या संरक्षणासाठी! संस्कृतीच्या नावाखाली प्रत्येक राष्ट्राने वाटेल ते केले व त्याचे समर्थन केले. कत्तली केल्या, जाळपोळी केल्या, सारे उद्ध्वस्त केले, परंतु संस्कृतीसाठी म्हणून ते केले! शिकारी कुत्रे सशावर किंवा कोल्ह्यावर ज्या क्रूरतेने तुटून पडतात, त्या क्रूरतेने माणसे माणसांवर तुटून पडावीत, क्रूरता माणसात येऊन माणसाने पशू बनावे, यासाठी आधी द्वेषाचे मंत्र कानीकपाळी ओरडले जात असतात. आपण विजयी झाले पाहिजे व इतरांना धुळीत मिळविले पाहिजे, ही उत्कट तीव्रता माणसाच्या मनात आधी उत्पन्न करावी लागते. माणसाचे मन द्वेषाग्नीने प्रज्वलित करून ठेवावे लागते. यासाठी अर्धवट सत्ये प्रसृत केली जातात. असत्य गोष्टी प्रसिद्धिल्या जातात. दुसऱ्या राष्ट्रांविषयी व दुसऱ्यांच्या संस्कृतीविषयी हेतुपुरस्सर विपर्यास सदैव केला जात असतो आणि अशा रीतीने माणसाला जंगली जनावर केले जाते. एखादा वक्ता रस्त्यात उभा राहतो, मोठ्या कुशलतेने हेतुपुरस्सपणे नाना गोष्टी व घडामोडी तो आपल्या व्याख्यानात गुंफतो आणि सीझरचा रक्तरंजित अंगरखा जनतेला दाखवून अँटनी ज्याप्रमाणे बोलला त्याप्रमाणे हे वक्ते ''केवढे भयाण व करुण दृश्य! भीषण देखावा! सूड! खून! जाळा, मारा!'' असे बोलू लागतात. कत्तली करणारे सैनिक एकेकाळी माणसे होती. परंतु एकदा लष्करात भरती झाली की त्यांना स्वतंत्र इच्छा नाही, त्यांना मन नाही, आत्मा नाही, आशा नाही, काही नाही! एका मोठ्या यंत्रातील ते छोटे भाग बनतात व यंत्र फिरवील तसे त्यांना फिरावे लागते. त्या यंत्रासमोर नमावयास त्यांना शिकविलेले असते व इच्छेने वा अनिच्छेने त्या यंत्राला ते प्रणाम

करतात. बुद्धिप्रधान माणसांस अशा रीतीने स्वेच्छाहीन गुलाम बनविण्यात येते. युद्धाचे एकदा रणशिंग वाजले की संस्कृतीच्या गप्पा दूर राहतात आणि मनुष्य जणू अगतिक होऊन पशू होतो. युद्ध म्हणजे मानवजातीला मिळालेला भीषण शाप होय. युद्ध म्हणजे मानवजातीवरचा अत्यंत क्रूर असा अत्याचार! शेतेभात उद्ध्वस्त होतात. शहरे बेचिराख होतात. लाखो लोक ठार होतात. लाखो अपंग होतात. कोणाचे हात तुटतात, कोणाचे पाय. लाखो स्त्रिया निराधार होतात. त्यांची विटंबनाही होते. मुलांना कोण सांभाळणार, कोण खायला देणार? सर्वत्र दुष्काळ व मरण. जिकडे तिकडे द्वेशाचे मारक वातावरण. कारस्थाने सदैव चाललेली. कुटिल डावपेच चाललेले असे हे युद्ध असते. जोपर्यंत असा या सैतानी नाचाचा, या भीषण भुतेरी नृत्याचा आपणास वीट येत नाही, तोपर्यंत आपण सुधारलेले आहोत व सुसंस्कृत आहोत असे कोणत्या तोंडाने म्हणायचे? हा दंभ किती वेळ आपण दाखविणार? जोपर्यंत तोफा डागून लक्षावधी माणसांची कत्तल आपण करीत आहोत, म्हातारे असोत की मुले असोत, स्त्रिया असोत की आजारी असोत, सरसकट आगीचा वर्षाव करून करीत आहोत, तोपर्यंत प्राण्यांना क्रूरता दाखवू नये म्हणून कायदे केलेत किंवा प्रचार केलेत, आजाऱ्यांसाठी दवाखाने घातलेत, किंवा निराश्रितांसाठी अनाथालये उघडलीत तरी काय उपयोग? तेवढ्याने तुम्ही खरोखर सुधारलेले असे सिद्ध होणार नाही आणि ही युद्धे, या कत्तली कशासाठी? देशाच्या वैभवासाठी! राष्ट्राच्या गौरवासाठी!

युद्धे अजिबात बंद करता येत नाहीत म्हणून निदान त्यांना नियमित तरी करू या, तरी खटपट करू या, असे काही म्हणतात. काहींचे तसे प्रयत्न चालले असतात, ही गोष्ट खरी आहे. परंतु तो प्रयत्न यशस्वी होणे शक्य नाही. दोन परस्परविरुद्ध अशा राष्ट्रांतील स्पर्धेचे व संघर्षाचे मूर्त रूप म्हणजे युद्ध. युद्ध म्हणजे मनातील वैराचे बाह्य प्रतीक. या स्पर्धेचा शेवट, वैराचा निकाल शक्तीने लावायचा असतो. एकदा बळाला कवटाळले, प्रतिस्पर्ध्याला चीत करण्यासाठी शक्ती हाच उपाय असे एकदा ठरवले, म्हणजे मग त्यात वाईट चांगले काय ठरवणार? दोन्ही पाशवी शक्तीच. ही पाशवी शक्ती अधिक सुसंस्कृत, ती कमी सुसंस्कृत अशी निवडानिवड कशी करता येईल? एकदा शक्तीच्या जोरावर सारे करायचे ठरले, म्हणजे असेल नसेल ती सारी शक्ती आपण संघटित करतो व प्रतिपक्ष्याला धुळीस मिळवू बघतो. दंड व खड्ग यात तसे फारसे अंतर नाही. तोफा-बंदुकांची दारू व विषारी धूर यात काही विशेष फरक नाही. जोपर्यंत शस्त्र हे प्रतिस्पर्ध्याला दडपून टाकण्याचे साधन म्हणून मानले जात आहे,

तोपर्यंत प्रत्येक राष्ट्र आपापली हिंसामय शस्त्रास्त्रे अधिकाधिक वाढविणार, ती शस्त्रे अधिक प्रभावी करण्याची खटपट करणार. युद्ध दुसरा कायदा ओळखीत नाही. युद्धमान राष्ट्रे फक्त युद्धाचा कायदा ओळखतात; युद्धात विजयी होणे म्हणजेच परमोच्च सद्गुण मानतात. प्रत्येक राष्ट्राला अशा प्रकारे या भीषण व मरणाच्या रस्त्यावरून जाणे भाग पडते. युद्ध ही वस्तू गर्ह्य नाही, फक्त तिची पद्धत सुधारली पाहिजे असे म्हणणे म्हणजे लांडगा कोंकराला खातो हे वाईट नाही, फक्त त्यानो नीट, पद्धतशीर रीतीने खावे असे म्हणण्याप्रमाणे आहे. युद्ध म्हणजे युद्ध; तो काही खेळ नाही. खेळात आपण नियमाप्रमाणे खेळतो. परंतु युद्धात सारेच क्षम्य ठरते!

आंतरराष्ट्रीय वृत्ती वाढत आहे ही गोष्ट खरी. अर्थशास्त्रज्ञ सांगत आहेत की युद्धाने फायदा नाही. युद्ध म्हणजे शेवटी आतबट्ट्याचा व्यवहार. युद्धाने दिवाळे निघण्याचीच पाळी येते. काही लोक धोरण म्हणून तरी शांततावादाचा पुरस्कार करू लागले आहेत. तशी त्यांची प्रामाणिक निष्ठा असते असे नाही. आंतरराष्ट्रीय वृत्ती अद्याप खरी आंतरिक झाली नाही. ती ओठांवर आहे, पोटात नाही. मागच्या महायुद्धात प्रत्येक राष्ट्रातील काही मूठभर लोक आंतरराष्ट्रीय धर्माला चिकटून राहिले, त्यांनी त्या तत्त्वाला धैर्याने जवळ धरले; परंतु बाकीच्या बहुतेकांनी राष्ट्राच्या स्थंडिलावर आंतरराष्ट्रीय धर्माचा बळीच दिला! शांतिधर्मावर प्रवचने देणारे मोठमोठे धर्मोपदेशकही शेवटी दांभिकच ठरले! त्यांनी ईश्वरासाठी चर्चे व मंदिरे उभारली; परंतु ईश्वराच्या आदेशाचा तुच्छतेने तिरस्कार केला. चर्चे रिक्रूटभरतीची स्थळे झाली. जो तो आपणास जय मिळावा म्हणून ईश्वाची प्रार्थना करू लागला. आपल्या बाजूला देव आहे असे सारे म्हणत. धर्मोपदेशक आपापल्या राष्ट्राच्या शिपायांना आशीर्वाद देत होते, विजयी व्हा म्हणत होते. ईश्वर गोंधळून गेला असेल बिचारा! जे. सी. स्कायर या कवीने त्या वेळची स्थिती मोठ्या मार्मिकपणे वर्णिली आहे:

युद्धास गुंतले देश । चढला त्यांना रणावेश
त्यांच्या प्रार्थना जगदीश । ऐकता झाला ।।
देवा, इंग्लंड हे सांभाळी । देवा, राजा आमुचा प्रतिपाळी
देवाच्या कानीकपाळी । नाना प्रार्थना आदळती! ।।
देवा, तू आमचा । देवा, तू नाही त्यांचा
देवा हे करी, ते करी, ऐशी वाचा । सारी राष्ट्रे गर्जती ।।

देवा म्हणाला मनात, । 'देवाची नाही धडगत!
देवाचे कार्य मिळविती धुळीत । किमर्थ ओरडती कळेना ।।'

राष्ट्रसंघ वगैरे स्थापन झाले. सारे खरे; परंतु प्राणाशिवाय कुडी काय कामाची? राष्ट्रसंघ म्हणजे सांगाडा आहे. त्यात आत्मा नाही. खरी सद्भावना कोणाच्याच ठायी नाही. राष्ट्रसंघातील घटक सदैव परस्परांविषयी साशंकच असतात. अविश्वास व असदिच्छा यांचेच प्राबल्य आहे. खरी आंतरराष्ट्रीय वृत्ती फारच थोड्या लोकांजवळ आहे. ती अद्याप सर्वसामान्य मानवी मनाची अभिजात वृत्ती झाली नाही. १९१४ च्या ऑगस्ट महिन्यात आकाश काळेकुट्ट होत. महायुद्ध संपून तह झाले. तह होऊन दहा वर्षे होऊन गेली. परंतु आकाश निर्मळ झाले आहे का? पूर्वीहून स्वच्छ झाले आहे का? नाही; आकाशात अद्याप अंधारच आहे. गेल्या महायुद्धाच्या आरंभ जितके सैन्य युरोपात होते, त्याच्यापेक्षा आज युरोपात कितीतरी पटीने अधिक सैन्य आहे. आपण इतरांपेक्ष श्रेष्ठ, आपण जगाची पुनर्रचना व पुनर्घटना करणारे, आपण देवाचे प्रेषित, या भावना आजही कोणी सोडल्या आहेत असे नाही. अशा अहंकारातूनच युद्धे जन्मतात. असले अहंकार आपल्या राष्ट्रात नसावे अशी नम्रता दाखवण्यास कोणीही तयार नाही. प्रत्येक राष्ट्र म्हणत आहे की, आम्ही काय ते खरे. तो खरा देशभक्त, जो फक्त स्वत:च्या देशापुरतेच पाहील. थिऑडॉर रुझवेल्ट एकदा म्हणाला की, ''पत्नीलाच द्यावयाच्या प्रेमात पतीने जर दुसऱ्या एखाद्या स्त्रीस भागीदार केले तर ते जसे अश्लील व असभ्य, त्याप्रमाणे नागरिकाने जे प्रेम संपूर्णपणे आपल्या देशालाच द्यावयाचे त्यात जर इतर राष्ट्रेही भागीदार केली तर ते अयोग्य व अधर्म्य होय.'' अशा प्रकारे स्वत:च्या राष्ट्रांवर प्रेम म्हणजे दुसऱ्या राष्ट्रांचा द्वेष असे झाले आहे. राष्ट्राराष्ट्रांमधील हे द्वेष, राष्ट्रांराष्ट्रांच्या परस्परांस मारक अशा या महत्त्वाकांक्षा, यामुळे शांती दुरावली आहे. शांततेचा काळ म्हणजे लढाई तात्पुरती थांबल्याचा काळ. खरी शांती नाहीच. चाणक्यनीतीच सर्वत्र मानली जात आहे. कपटी कारस्थाने व डावपेच म्हणजेच राजकारण असे झाले आहे. राष्ट्रे नि:स्वार्थ बुद्धीने सहकार्य करण्यास तहानेली नसून स्वार्थांध होऊन दुसऱ्यांवर सत्ता गाजविण्यासाठी अधीर झाली आहेत.

✦✦✦

३. प्रश्न

तत्त्वज्ञान म्हणजे काय? व्यापक अर्थाने पाहिले तर ज्या अमूर्त व अदृश्य पायावर संस्कृतीची इमारत उभी असते तो पाया म्हणजे तत्त्वज्ञान. तत्त्वज्ञान असा पाया देत असते. तत्त्वज्ञान म्हणजे जणू संस्कृतीचा आत्मा. हा आत्मा आपल्याभोवती हळूहळू संस्कृतीचे शरीर उभारतो. त्या त्या समाजातील लोकांना त्या त्या समाजात परंपरागत चालत आलेल्या रूढींवरून, निरनिराळ्या संस्थांवरून; कोणत्या वस्तू महत्त्वाच्या मानावयाच्या, नैतिक मूल्ये म्हणजे काय, ते सारे कळत असते. जीवनाचा अर्थ काय, हेतू काय, हे आपण आपल्या समाजातील रूढ व सर्वमान्य अशा आचारविचारांवरून ठरवीत असतो, त्यावरून समजून घेत असतो. ज्या वेळेस एखाद्या संस्कृतीची आपण स्तुती करतो किंवा निंदा करतो, त्या वेळेस त्या त्या संस्कृतीत कोणत्या गोष्टीस किती किंमत दिली जाते हीच आपल्या डोळ्यांसमोर असते. मूल्यश्रेणीवरून त्या त्या संस्कृतीची परीक्षा घेता येते.

''पिंडी ते ब्रह्मांडी' असे भारतीय ऋषी म्हणत. ग्रीक तत्त्वज्ञानीही ही गोष्ट मानीत. मनुष्य म्हणजे एक लहानसे विश्वच होय. खनिज वस्तूंप्रमाणे, जड धातू वगैरेंप्रमाणे माणसाच्या देहाला मोजमाप आहे; वनस्पतीप्रमाणे या देहातील रचना आहे; पशूंप्रमाणे या देहाला हालचाल आहे व इंद्रियज्ञान आहे, आणि याशिवाय बुद्धी व आध्यात्मिक आकांक्षा आहेच. मनुष्य म्हणजे शरीर, मन व आत्मा यांचा त्रिवेणी संगम होय. आपले हे बाह्य शरीर माकडाच्या शरीरापेक्षा फारसे निराळे नाही. वनस्पती व प्राणी यातूनच हे शरीर उत्क्रांत होत आले असावे. वनस्पती व पशू हे आपले पूर्वज होत. आचार्य इलियट स्मिथ सांगतो की, चिंपांझी जातीच्या

मनुष्यसदृश वानरजातीच्या मेंदूची रचना व माणसाच्या मेंदूची रचना सारख्या आहेत. आपल्या काही वृत्तींवरून प्राण्यांशी असलेले आपले नाते स्पष्ट होते. उपजत आलस्यवृत्ती, एके ठिकाणी राहण्याची इच्छा, त्या त्या स्थानाबद्दल, भूमीबद्दल वाटणारे प्रेम, क्रोध, भीती वगैरे दुर्दम्य विकार यावरून ही गोष्ट सहज ध्यानात येईल. त्याबरोबरच दुसऱ्याही काही गोष्टी आपणात आहेत. अमूर्त व अदृश्य गोष्टींसाठी उत्कट इच्छा, आध्यात्मिक वृत्ती, पशुत्वातून वर जाऊन उच्चतर जीवन मिळविण्याची धडपड, या गोष्टीही आपल्या जीवनात आहेत. आपली वाङ्मये, आपल्या कथा, आपली तत्त्वज्ञाने, आपले धर्म, या दुसऱ्या प्रकारच्या वृत्तीतून जन्मली आहेत. मानवी संस्कृती सारखी उत्क्रांत होत चालली आहे. मानवजात सारखी पुढे जात आहे. मानवजातीचा सारा प्रवाह जर आपण पाहू तर आपणास असे दिसून येईल, की मनुष्याची आध्यात्मिक भूक ही सदैव जागी आहे. उच्च जीवनाची त्याची तळमळ सारखी सुरू आहे. आदर्श जीवनाकडे तो डोळे लावून बघत आहे. ही त्याची आध्यात्मिक वृत्ती प्रथम ओबडधोबड स्वरूपात प्रकट झालेली दिसेल; परंतु ओबडधोबड व भोळ्याभाबड्या गोष्टी व कथा यातून ही वृत्ती विकसित होत होत शेवटी उच्च तत्त्वज्ञानात परिणत झाली. या स्थूल वृत्तीतूनच सूक्ष्म विचार करणारी दर्शने निर्माण झाली, नीतिप्रधान अशा संस्कृती उत्पन्न झाल्या.

आपण जरी बरेचसे पशूंचे वारसदार असलो, पशुत्वाचा अंश जरी परंपरेने आपणात आला असला, तरी मनुष्यप्राणी हा इतर प्राण्यांपेक्षा मनुष्यप्राणी या दृष्टीसुद्धा निराळा आहे. मनुष्यप्राण्याचे गुण व दुर्गुण हे मनुष्यातच आढळतील. आपण विषयसुख हे जीवनाचे ध्येय केले, तर आपण पशुत्वाकडे गेलो असे मानले जाते. परंतु असा कोणता मानवेतर पशू आहे, की जो विषयसुख हे ध्येय ठरवून सारखा त्याच्या पाठोपाठ जातो? असे करणे हे या विशिष्ट मनुष्यप्राण्यालाच शक्य आहे. पुन्हा अशा काही गोष्टी आहेत की ज्यात पशू माणसांपेक्षा अधिक नेटकेपणे वागतात. काही गोष्टी पशूत स्वाभाविक आहेत. माणसाला त्या हेतुपुरस्सर प्रयत्नाने व संयमाने अंगी आणाव्या लागतील. पशू केवळ प्रजोत्पत्तीसाठीच रमतील. या बाबतीत मागासलेले व रानटी म्हणून ज्यांना आपण समजतो ती माणसेही पशूंप्रमाणेच वागतात. परंतु मनुष्य जसजसा सुधारतो तसतशी त्याची विचारशक्ती वाढते. तो

तुलना करू लागतो. कुरूप-सुरूप पाहू लागतो. आवड-नावड उत्पन्न होते. पसंती-नापसंती येते. यामुळे माणसात अशी क्षमता येते की, तो जर मनात आणील तर महात्मा होईल किंवा अध:पाताच्या खोल दरीतही पडेल. जेव्हा आपण म्हणतो की अमका अमका पशुत्वाच्या पायरीला गेला, त्या वेळेस आपण अलंकारिक बोलत असतो. त्या म्हणण्याचा अर्थ इतकाच असतो की, मनुष्याने आपल्या स्वातंत्र्याचा नीट उपयोग केला नाही; मनुष्य व पशू या दोघांना समान असणाऱ्या ज्या गरजा, त्यांच्या बाबतीत कितपत आसक्ती धरायची ते त्याला नीट समजले नाही; त्या गरज़ा तृप्त करून घेताना मनाला कितपत मोकळे सोडायचे त्याचे तारतम्य त्याला साधले नाही.

मनुष्यातील पशुता स्वत:च्या तृप्तीसाठी सदैव तडफडत असते. आपल्यातील सर्वच वासना-विकारांची जर नीट तृप्ती झाली, तर आपल्यातील पशुतेचा पूर्ण विकास झाला असे समजता येईल. हे शरीर म्हणजे आत्मा व या देहाचे कोडकौतुक म्हणजेच जीवितकार्य, असे जर आपण मानले तर आपण रानटी आहोत असे मानण्यात येते. पाशवी शक्ती पूजिणे, इंद्रियांच्या तृप्तीलाच ध्येय मानणे, हे मनुष्याला शोभत नाही असे म्हणतात. आपण जर केवळ शरीराकडेच लक्ष देऊ, शरीरच पुष्ट व तुष्ट करीत बसू, तर आपल्या आत्म्याची शक्ती क्षीण होईल. आपल्या उच्च व उदार स्वभावाचा नाश होईल. त्याला ज्या आध्यात्मिक भुका आहेत त्यांचे हक्क आपण हिरावून घेतले असे होईल. केवळ शारीरिक बळाची पूजा करणे, त्या बळाचीच प्रतिष्ठा मानणे हे रानटीपणाचे चिन्ह आहे. मागासलेल्या रानटी समाजात पुरुष स्त्रियांची पै किंमत करतो व त्यांचा भोक्ता बनतो. कारण स्त्रिया दुबळ्या असतात. आणि जे पराक्रम करतात, शौर्य गाजवतात, शक्तिमान असतात त्यांच्यावरच स्त्रियाही अनुरक्त होतात; त्यांच्याच गळ्यात पडतात.

जो समाज केवळ शरीराकडे न बघता, केवळ जगण्याकडे न बघतो मनाला महत्त्व देतो, तो समाज अधिक सुसंस्कृत होय. परंतु मन शब्द फार व्यापक अर्थाने मात्र घेतलेला असला पाहिजे. नैतिक परिपूर्णता, कलात्मक विकास वा सर्व गोष्टी मन या शब्दात अंतर्भूत असल्या पाहिजेत, मन म्हणजे आत्माच म्हणा ना? म्हणजे जोपर्यंत आत्म्याला महत्त्व नाही, तोपर्यंत संस्कृतीच्या खऱ्या ध्येयाप्रत आपण पोचलो असे म्हणता यावयाचे नाही. आपले ज्ञान वाढले असेल; परंतु जोपर्यंत त्या ज्ञानाचा उपयोग केवळ शारीरिक सुखासाठी होत आहे, जगण्यापलीकडे काही आहे असे जोपर्यंत

वाटत नाही, जगणे हेच त्या ज्ञानाचे इतिकर्तव्या, तोपर्यंत संस्कृतीचा गाभा सापडला आहे असे म्हणता येणार नाही.

आपल्या गरजा नेहमी वाढत असतात. त्या गरजा तृप्त करणे, त्या गरजा तृप्त करून घेण्याची साधने जमविणे, मालमत्तेचा धनी होणे हेच शेवटी आपले जीवितकर्तव्य होत असते. आपले आंतरिक वैचारिक जीवन फारच कमी दर्जाचे असते. महान सारस्वतात आपण डुंबणार नाही, परमोच्च कलेत रमणार नाही. भावनांना क्षणभर उन्माद आणणाऱ्या गोष्टी आपणास गुदगुल्या करतात, बुद्धीला क्षणभर उत्तेजित करणाऱ्या गोष्टी आपणास गुंगवतात. थोडा वेळ मन नाचते, थोडा वेळ आपण सौंदर्यसाधक गोष्टीत दंग होतो. असा हा सारा क्षणिक व तात्पुरता रस चाखण्यात आपण धन्यता मानतो. हे उच्च जीवन नसून क्षुद्र जीवन आहे. कृत्रिम संविधानके असलेल्या कथा, गुप्त पोलिसांची गूढे, शब्दांची कोडी या आपल्या बौद्धिक करमणुकी होऊन बसतात. या क्षुद्र वस्तू आपणास मोह पाडतात. याहून अधिक थोर आनंद चाखण्याची पात्रताच जणू आपणास नसते, क्षमताच जणू नसते. उंच उड्डाण करण्याची शक्ती जणू नष्ट झालेली असते. मग चिखलातच बुड्या मारायच्या व बेडकाप्रमाणे क्षणभर जरा वर उडी मारायची! या अवस्थेतील मनुष्य कधी स्वत: विचार करीत नाही. जसे इतर वागतात तसा तो वागतो. जी एक चाकोरी पडलेली असते, त्यातून तोही जातो. स्वत:च्या बुद्धीचा उपयोग तो करीत नाही. त्याचे जीवन डोळस नसते. ते आंधळे, मेंगरूळणपणाचे असते.

त्याची नैतिक दृष्टी स्थूल, वरवरची असते; त्याच्याजवळ विवेक व विचार नसतो. शास्त्रपूत अशी दृष्टी नसते. काही आवडीनावडी, काही पूर्वग्रह, काही वास्तव कल्पना, हीच त्याची वैचारिक व नैतिक पुंजी. रूढीप्रमाणे तो आपल्या जीवनाला आकार देतो. बरे दिसते, बरे वाटते, हेच एक वर्तनाचे प्रमाण शिक्षणाची किंमत जर ते आजकालच्या स्पर्धेत यशस्वी होण्यास मदत करणार असेल तरच असते. शास्त्राला किंमत का? तर ते उपयोगी पडते म्हणून, नाना सुखसोई देते म्हणून, संघटितपणा वाढून यंत्रे उभारून उत्पादन झपाट्याने करता येते म्हणून. परंतु बाह्य संचयाने आंतरिक सुसंस्कृतता वाढली आहे असे मात्र होत नाही. यंत्रे आली; परंतु युद्धे आहेतच. फरक इतकाच की पूर्वी हातघाईची युद्धे होत, आता यांत्रिक युद्धे होतात. मनुष्याची विनाशक शक्ती आज सहस्रपटीने वाढली आहे. आणि जोपर्यंत आपण आपल्या लोभास

मर्यादा घालीत नाही तोपर्यंत संहार होणार; या वाढत्या विध्वंसक शक्तीने पूर्वीपेक्षा अनंतपटीने होणार. आपण सारे रुढीचे दास बनल्यामुळे आपली मते गुलामी वृत्तीची झाली आहेत. व्यक्ती स्वतंत्र विचार करीतच नाही. आपली संस्कृती सर्वांत श्रेष्ठ, आपली राज्यशासनपद्धतीच काय ती चांगली असे काही म्हणू लागताच, प्रत्येक व्यक्ती तेच बोलते व तदर्थ युद्धासही सिद्ध होते. जीवनशास्त्रातील आजचे महत सूत्र म्हणजे 'शक्तिदेवो भव' पाशवी शक्तीवर श्रद्धा, तिच्यावर सारा भर! एका धर्माने अन्य धर्माचा छळ करावा, यात दुसरे काय दिसते? अशा या समाजातूनही क्वचित कोणी उदारात्मे निघतात. अरे, सारी वसुधाच कुटुंब माना, मानवजात एक माना, असे ते प्रतिपादितात; सर्वांचे हित, कल्याण पाहावे असे ते सांगू लागतात. लोकांची मने वळवावी, पण सोटट्याने नव्हे तर त्यांना पटवून, असे ते सांगू लागतात. एकाच प्रेममय परमेश्वराची आपण लेकरे, मग आपण सर्वांनी प्रेमाने एकत्र का नांदू नये, असे ते विचारतात. परंतु अशा उदार विचारांच्या लोकांना नास्तिक व देशद्रोही ठरविण्यात येते. त्यांच्यातील भित्रे असतात त्यांना गप्प बसविण्यात येते; जे निर्भय असतात त्यांना गोळ्याच घालण्यात येतात! समाजाच्या या स्थितीला आर्थिक किंवा बौद्धिक रानटीपणा हे नाव शोभेल. कारण अशा या समाजात सुखविलास म्हणजेच संस्कृती असे समजले जाते, रूढी म्हणजेच नीती असे मानले जाते. धर्म म्हणजे जुन्या चाकोरीतून जाणे व राजकारण म्हणजे जगाच्या बाजारपेठा काबीज करणे आणि दुसऱ्यास गुलाम करून त्यांची पिळवणूक करणे अशा त्यांच्या व्याख्या असतात.

जो समाज केवळ शरीराचा उपासक आहे, जगणे हेच ज्याचे ध्येय, आर्थिक व शारीरिक सुस्थितीपलीकडे ज्याला काही दिसत नाही, शास्त्रांच्या संशोधनाने यांत्रिक क्षमता मिळविणे व पैदास वाढविणे हाच ज्याचा धर्म, तो समाज खऱ्या अर्थाने सुधारला व सुसंस्कृत झाला असे कसे म्हणावे? जेथे उदार ध्येयांना वाव नाही, उच्चतर अशा अखिल मानवजातीला कवटाळणाऱ्या विचारांना अवसर नाही, आत्म्याचे पंख जेथे छाटलेले आहेत, उच्च मतांचा जेथे कोंडमारा आहे, तो समाज का सुसंस्कृत? शरीर, मन व आत्मा या तीन वस्तू पृथक असल्या तरी या अलग करता येणार नाहीत. या तीनही मिळून एक अविभाज्य अशी वस्तू बनलेली आहे. या तिहींचा नीट विकास म्हणजेच खरी संस्कृती. मानवी स्वभाव सर्वत्र सारखाच आहे. शरीर, मन व बुद्धी यांच्यात विरोध आला तर तो मिटविणे हेच महत्त्वाचे काम होय. या तिहातील विरोध पाहून वाईट वाटून घेण्याची जरुरी नाही. त्या तिहीतील कुरबुरी मोडून टाका.

निर्दोष मनुष्यत्वासाठी सुंदर शरीर आधी हवे. शरीर निरोगी हवे, धडधाकट हवे. तसेच सुखा-समाधानाचा संसार चालवण्यासाठी काही सामाजिक व आर्थिक संघटनाही हवी. परंतु एवढ्यानेच सारे संपले असे नाही. केवळ आपल्यातील पशुत्वाचा पूर्ण विकास केल्याने मानवता परिपूर्ण झाले असे नव्हे. सत्य, शिव व सुंदर यांची पूजा करू पाहणाऱ्या मानवी प्राण्यांना निर्मिण्यासाठी सृष्टीने कितीतरी दु:ख सहन केले आहे; असा मनुष्यप्राणी जन्मावा म्हणून विश्वात किती तरी प्रयत्न झाले, धडपडी झाल्या. अर्धवट सुधारलेले व संपूर्णपणे सुधारलेले यांच्यात कोणता बरे फरक असतो? जो फक्त स्वत:चेच पाहतो, स्वत:च्याच वैयक्तिक, क्षुद्र व संकुचित वर्तुळात रमतो, मीच काय तो खरा, मी कसा जगू, माझे समाधान, या 'मी मी' पलीकडे ज्याच्या विचारांची मजल जात नाही तो अर्धवट सुधारलेला. आणि तो स्वत:ला शून्य करून करून सर्वभूतहितात रमतो तो संपूर्णपणे सुधारलेला. व्यक्तीने विश्वात्मक दृष्टीचे होणे, आपले दैनंदिन जगणेही चिरशाश्वत सत्याशी जोडणे आणि अशा प्रकारे खरोखर मानव होणे म्हणजे संस्कृती. असे वाढत जाणे सोपे नाही. त्यासाठी महान त्याग लागतो, खूप किंमत द्यावी लागते. परंतु एकदा का ही दृष्टी आली, एकदा का आपली सारी वृत्ती सर्वांचा विचार करणारी झाली, एकदा का हे आपले व्यक्तित्व विश्वाच्या ध्येयाशी समरस करण्याचे जमले, तर मग पुढे सारे सोपे जाते. एक विशिष्ट दिशा लावण्याचेच अवघड असते. एकदा ती दिशा लागली म्हणजे मग जोखड जड वाटत नाही, भार कठीण होत नाही. आपण सारे ओझे सहज ओढीत नेतो. अशी दृष्टी आली म्हणजे मानवी जीवन निराळे होईल. आज आहे त्यापेक्षा निराळी विचारसरणी, निराळी वृत्ती दिसू लागेल. पशूचे जीवन व पाशवी वृत्ती जाऊन मानवी जीवन व मानवी मन यांचा साक्षात्कार होऊ लागेल. *

मानवी समाजाचा इतिहास पाहिला तर अमुक एका काळी संपूर्णपणे रानवटपणा होता किंवा अमुक एका काळी केवळ रामराज्य होते असे दिसून येत नाही. कोणताही

---

* हिंदूंची परिभाषा वापरायची झाली तर असे म्हणता येईल की, केवळ पाशवी शक्तीची पूजा करणारा समाज हा तमोगुणी समाज, स्वत:ची इंद्रियसुखे तृप्त करू पाहणारा व तदर्थ धडपडणारा तो राजस समाज आणि आत्मिक स्वातंत्र्य व आत्मविकास यांचे ध्येय ठेवून चालणारा तो सात्त्विक समाज.

समाज केवळ जंगली किंवा केवळ निर्दोष असा आढळून येणार नाही. कोणत्याही काळातील व कोठलाही मानवसमाज घ्या. त्याने आपल्या विशिष्ट स्वभावाचा विकास केला, धार्मिक आचारविचार निर्माण केले, सामाजिक नियमने निर्मिली. सत् व असत् यांच्यातील फरक ज्यांना कळला नाही, नीती व कला यांची तोंडओळखही ज्यांना कधी झाली नाही, असे लोक तुम्हाला कोठेही सापडणार नाहीत. रानटीपणा जितका प्राचीन आहे तितकाच सुसंस्कृतपणाही प्राचीन आहे. एस्किमो, रेड इंडियन, बसूटो, किंवा फिजी बेटातील लोक यांना आपण रानटी समजतो. कारण एवढेच की, सुधारलेल्या समाजाची आपली जी कल्पना ती अद्याप त्यांच्यात आढळत नाही. शाळा, दवाखाने, न्यायमंदिरे, पोलीसचौक्या वगैरे सुधारणेच्या खुणा त्यांच्यात दिसून येत नाहीत. परंतु या संस्था नसल्या तरी त्यांच्याही जीवनात स्वतंत्र विशिष्टत्व दिसून येते. पुढारलेल्या ग्रीक व रोमन लोकांत किंवा आजच्या इंग्रज व जर्मन लोकांत ज्याप्रमाणे त्यांचे वैशिष्ट्य प्रकट होते, त्यांच्या विशिष्ट चालीरीती, विशिष्ट कल्पना दिसून येतात, त्याचप्रमाणे ज्यांना आपण रानटी म्हणतो त्यांच्यातही दिसून येतात. सामाजिक व्यवस्था निराळ्या स्वरूपाची असली, सृष्टीचे ज्ञान जरा कमी असले, हत्यारे व अवजारे प्राथमिक अवस्थेतील असली, तरी एवढ्यावरूनच एखाद्या समाजाला रानटी म्हणणे बरोबर नव्हे. आजकाल राजकीयदृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रांनाही अर्धवट सुधारलेली, अर्धवट रानटी असे म्हणण्याची प्रथा पडली आहे. जणू काय राजकीय वर्चस्व हीच सुधारणेची कसोटी! आर्थिक प्रगती, दुसऱ्याची पिळवणूक व मानवांचा संहार करण्यातील अभिज्ञता म्हणजेच संस्कृतीचा आत्मा! जपानने रशियाचा पराजय करताच त्याला एकदम सुसंस्कृत पदवी मिळाली! परंतु हीच कसोटी लावावयाची असे ठरले, तर ज्या तार्तरांनी चीनचा पराजय केला व शुंग घराणे उधळून लावले ते तार्तर चिनी, लोकांपेक्षा अधिक सुधारलेले होते असे मानावे लागेल! आणि ज्या रानटी टोळ्यांनी रोमनसाम्राज्य खिळखिळे केले त्यांना सुसंस्कृत मानवजातीचे आदर्श म्हणून वंदाव लागेल!

अत्यंत प्राचीन जाति-जमातीतही संस्कृतीचे स्थूल का होईनात आरंभ दिसून येतात, तर आजच्या सुधारलेल्या समाजात पुष्कळसा जंगलीपणा दिसून येतो. पूर्वीच्या हूण, गॉथ, व्हॅन्डाल, तुर्क वगैरे लोकांना आपण रानटी मानतो. परंतु अधिक सुसंस्कृत अशी भावी काळातील एखादी पिढी आजच्या विसाव्या शतकातील

आपल्या संस्कृतीलाही रानटी मानणार नाही असे नाही. ही आपली संस्कृती त्यांना राक्षसी, भ्रामक कल्पना उराशी घेऊन बसणारी, अशी वाटेल. त्यांना या आपल्या संस्कृतीचा वीट येईल व अशी कशी ही संस्कृती असे आश्चर्याने व तिरस्काराने ते म्हणतील. आपण प्राचीन रोमन लोकांतील परस्परांस ठार मारू पाहणारे खेळ रानटी समजतो, तद्वत्‌च आपल्या आजच्या साठमाऱ्या, मस्तावलेल्या प्राण्यांच्या झुंजी, मुष्टियुद्धाच्या शर्यती वगैरे ज्या आपल्या आनंदाच्या व करमणुकीच्या गोष्टी, त्या पुढील काळातील पिढ्यास रानटीपणाच्या वाटतील; आणि आपण ज्याला युद्ध म्हणतो त्यातील सुसंस्कृत खाटीकपणासंबंधी तर बोलायलाच नको!

संस्कृती व सुधारणा ही बाहेर नसून आपल्या अंतरंगात आहेत. तुमच्या नैतिक कल्पनात, तुमच्या धार्मिक विचारात, समाजाकडे पाहण्याच्या तुमच्या दृष्टिकोनात संस्कृती भरलेली असते. आगबोटी आहेत व आगगाड्या आहेत, टंकलेखक आहेत व टेलिफोन आहेत, एवढ्याववरून आपण सुधारलो असे म्हणता येणार नाही. माकड दुचाकीवर बसायला शिकले, दारूचा पेला तोंडाला लावू लागले, चिरुट ऐटीने ओढण्यात तरबेज झाले, तरी शेवटी माकड ते माकडच! यांत्रिक सुधारणा म्हणजे काही नैतिक सुधारणा नव्हे. बडा कारखाना चालवता आला एवढ्यावरून मनही मोठे झाले, असे म्हणता येणार नाही. आजच्या काळापेक्षा प्राचीन भारतवर्षातील व ग्रीस देशातील किंवा मध्ययुगीन इटलीतील भौतिक शास्त्रांचे ज्ञान जरी कमी असले, किंवा यांत्रिक उद्योगधंदे त्या वेळी त्या देशात आजच्याएवढे अवाढव्य नसले, तरी त्या लोकांना आध्यात्मिक मूल्यांची अधिक यथार्थ कल्पना होती, जीवनाची कला आपल्यापेक्षा त्यांना अधिक सत्यतेने कळली होती, यात शंका नाही. नवीन नवीन वस्तूंसाठी पिसाटाप्रमाणे धडपड करणे, पैशासाठी प्राणघेणी स्पर्धा करीत राहणे म्हणजे जर संस्कृती नसेल तर आपणास प्राचीन ग्रीक लोकांपासून किंवा हिंदी नि चिनी लोकांपासून जीवनाच्या कलेत किती तरी कल्याणकारक गोष्टी शिकता येतील. चीन, हिंदुस्थान किंवा ग्रीस यांच्यामध्ये दोष नव्हते असे नाही. ग्रीस देशातील नागरिक सुसंस्कृत होते, कलावान व ज्ञानवान होते. परंतु त्यांना स्वत:चा हा विकास करून घण्यास फुरसत कोणी दिली? त्यांच्या देशातील गुलामांनी! जीवनाला आवश्यक असणाऱ्या शेकडो गोष्टी निर्मिण्यासाठी जे अहोरात्र राबत व कष्टत त्यांना नागरिकत्वाचे हक्क या ज्ञानकलासंपन्न होणाऱ्या ग्रीकांनी दिले नाहीत. श्रमणाऱ्या

लोकांच्या गुलामगिरीवर ग्रीकांची संस्कृती उभी होती. भारतीय संस्कृती जरी सर्वांचा संग्रह करीत होती, नाना जाती-जमातींना एकत्र आणून तिने जरी एकत्व निर्मिले, तरी तिच्यात एक महान दोष दिसून येतो. ज्ञानाचा दिवा तिने सर्वत्र नेला नाही, शूद्रांना ज्ञानाचा अधिकार दिला नाही. मागासलेल्या लोकांना तसेच अज्ञानात ठेवण्यात आले. भारतीय संस्कृतीतील मोठमोठी ध्येये कितीही सुंदर व उदात्त असली तरी ती समाजाच्या खालच्या थरापर्यंत गेली नाहीत. आणि पुढे पुढे तर अनियंत्रित राजसत्ता तेथे स्थापन झाल्यापासून ती मोठमोठी ध्येयेही दूरच राहिली. हुकूमशहांच्या कारकिर्दीतून मानव्याचा मोकळेपणाने विकास होणे बंदच झाले.

आजंची संस्कृती म्हणजे आर्थिक क्षेत्रातील जंगलीपणा. आजची संस्कृती सत्ता व संपत्ती यांना मानते, आत्मा व आध्यात्मिक पूर्णता यांना झुगारते. जगाचा आदि काय व अंत काय हे आपणास कळणे शक्य नाही. ''कस्त्वम्?'', ''कुत आयात?'' हे प्रश्न कधीही सुटावयाचे नाहीत. म्हणून आपल्या सभोवती काय आहे तेवढेच पाहावे, हाती घेतलेले काम नीट करावे, आपला उद्योगधंदा पाहावा, व्यवहार सांभाळावा, अशी धडपड जीवनाचे बाह्य स्वरूप नीटनेटके करण्यासाठी अहोरात्र चालली आहे. बाहेरून रंगरंगोटी चालली आहे. सृष्टिसत्तेवर ताबा मिळवावा, जगाची औद्योगिक पाहणी करावी, संसार सुधारावा, मनुष्याचे जीवन अधिक सुखी करण्यासाठी नैसर्गिक शक्तीवर विजय मिळवावा या भौतिक जगावर, या बाह्य जीवनावर आपल्या मनाने आज सत्ता मिळविली आहे. मानवी बुद्धी सृष्टीची राणी होत आहे. परंतु शरीर, संसार व मनोबुद्धी यांच्यावर आत्म्याचे प्रभुत्व अद्याप स्थापन झालेले नाही. जीवनावर व शरीरावर ताबा ठेवता येईल; कारण त्यांची तंत्रे आपणास कळली आहेत, त्यांच्या शक्या-शक्यता समजल्या आहेत. शास्त्रांच्या प्रगतीचे विजयध्वज नाचू लागताच तत्त्वज्ञान कोपऱ्यात सारले गेले, विचाराचा उपहास होऊ लागला व धर्माला फाशी देण्यात आले! आपण आपल्या पूर्वजांपेक्षा अधिक शास्त्रसंपन्न असू; त्यांच्यापेक्षा थोड्याफार अधिक गोष्टी आपणास माहीत असतील; परंतु तेवढ्यानेच आपण पूर्वजांपेक्षा अधिक माणुसकी असलेले, कमी पशुत्व असलेले आहोत असे म्हणता येणार नाही. शिक्षणाने आज बुद्धीची बंधने गळली असे नाही. शिक्षण आज चेतविते, परंतु शांतवीत नाही. आपण काव्य वाचतो; कादंबऱ्यांवर आपल्या उड्या पडतात; बोलपटांना आपण सदैव उपस्थित असतो.

आणि हे सारे केल्यामुळे आपणास वाटते की, आपण सुधारलेले आहोत! आपण सारे स्वत:ला आज बुद्धिप्रामाण्यवादी समजत असतो. परंतु हा दंभ आहे. आपल्या वासना-विकारांना पाठिंबा देण्यापुरती आपली बुद्धी उभी राहत असते. आपणास जे करावेसे वाटते त्याच्यासाठी आपली बुद्धी पळवाटा शोधते. आपणास जे मत मानवते त्याच्या समर्थनार्थ आपली बुद्धी कारणे शोधून काढते. आपण ''भले करीत कोठे तरी जात आहोत.'' असे आपणास वाटत असते. परंतु वास्तविक ''भले करणे'' दूर राहून, आपण ''कोठे तरी जात असतो'' एवढेच काय ते खरे! आपण केवळ बहिर्दृष्टी झालो आहोत, वरवर पाहणारे झालो आहो, मानवजातीच्या ध्येयाविषयी तोंड भरून बोलतो, ठरावीक वचने व म्हणी ओठांवर खेळवितो. परंतु त्या ध्येयाविषयी ना प्रेम, ना जिव्हाळा! ती ध्येये जीवनात आणण्यासाठी ना त्याग, ना तप! संयमाचे नावही आपणास माहीत नसते. अर्वाचीनात व प्राचीनात फारसा फरक नाही. अर्धवट, लहरी, कशावर तरी भरवसा व विश्वास ठेवणारे, असेच आपणही आहो. कधीकधी आपण परमोच्च वीरता प्रकटवितो, तर पुष्कळ वेळा क्रूरतेची कमालही करतो. हा अर्वाचीन मनुष्य इतकी अमानुषता, इतकी निर्दयता दाखवितो तरी कशी, असे मनात येते. मनुष्य अद्याप रानटी पशूच आहे. तो एकदम अंगावर येतो, गुरगुरतो. मनुष्य अद्याप फारसा माणसाळलेला नाही. आर्थिक यशस्विता हे आपले परमोच्च ध्येय! आपल्या बहुतेक युद्धाची कारणे आर्थिक असतात. अर्थशास्त्र म्हणजे धर्म, साम्राज्य म्हणजे बडा धंदा. व्यापार वाढविण्यासाठी, प्रदेश जिंकण्यासाठी, वसाहती मिळविण्यासाठी आपण लढतो. व्यापारधंदे वाढावे, प्रदेश जिंकण्यासाठी, वसाहती मिळविण्यासाठी आपण लढतो. व्यापारधंदे वाढावे, जगाच्या बाजारपेठा हाती याव्या, यासाठीच बौद्धिक स्वातंत्र्यही हिरावण्यात येते. जर लोक स्वतंत्रपणे विचार करतील तर या युद्धाविषयी त्यांना संशय येईल. मागासलेल्या देशांविषयी व कामगारांविषयी त्यांची सहानुभूती वाढेल. अशी सहानुभूती वाढू लागली तर पिळवणुकीचे यत्र निष्ठुरपणे व नि:शंकपणे कसे चालवता येणार? रक्तशोषणाच्या कामात हात कदाचित थोडा ढिला पडायचा! आपली संस्कृती विजिगीषू आहे. व्यक्ती व वंश यांच्या स्पर्धांवर, युद्धाच्या गौरवावर, विजयप्राप्तीच्या आनंदावर ती उभारलेली आहे. आजच्या संस्कृतीत साहस आहे, वेग आहे; प्रक्षोभ आहे, उन्माद आहे; धावपळ आहे, गोंधळ आहे. त्यात ना शांती, ना विश्रांती! सारखी धडपड व धडपड! कधीही तृप्त न होणारी अशी वासना आजच्या

संस्कृतीने उराशी बाळगली आहे आणि अतृप्त राहणे हेच त्या वासनेच्या नशिबी आहे.

यंत्राचे गुणधर्मच आजच्या संस्कृतीचेही झाले आहेत. आपले सद्गुणही यांत्रिक झाले आहेत. वेग, संख्या, सारखेपणा, बाह्य वस्तूत रंगणे हेच आजचे गुण. याचा परिणाम असा झाला की, आंतरिक जिव्हाळा नाहीसा झाला. आध्यात्मिक ओलावा सुकून गेला. ती जी आंतरिक एकता व एकसूत्रता ती आज नष्ट झाली आहे. एक प्रकारचे मानसिक अराजक निर्माण झाले आहे. मनोराज्यात कोणी स्वामीच नाही. तेथे ना ताळ, ना तंत्र! स्वातंत्र्य व सौंदर्य, प्रेम व सद्गुण अशांनी नटलेले जे सुंदर मानवी जीवन, तेच आम्हीही मानतो, असे अज्ञपणे केवळ शारीरिक जीवनात रंगलेले, शरीराच्या गरजा व वासनाविकार यांच्यां तृप्तीत गुंतलेले, क्षुद्र मनोवृत्तीचे व विषयभोगाचे जीवन जगण्यातच पुरुषार्थ मानणारे. केवळ उपयुक्ततावादाचा व्यवहारधर्म मानणारे असे लोक म्हणत असतात. आजच्या सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या जीवनात अति स्थूल, अत्यंत असंस्कृत, सदभिरुचीस न शोभणारा असा रानटीपणा आढळून येतो. शरीरापलीकडे जणू काही नाहीच, पंचविषय म्हणजेच परब्रह्म! शारीरिक सुखोपभोगांविषयी आज निराळीच एक भावना उत्पन्न झाली आहे. ''निष्पाप विषयभोग'', ''दैवी आग'', ''ते खोल आंतरिक मंदिर'' ''उदात्त रानटीपणा'', ''मूळ प्रकृतीचा आवाज'' असे शब्दप्रयोग रूढ होत आहेत. जी जी वृत्ती उठेल ती ती पवित्र मानली जात आहे. अविवेकाला पावित्र्याचे स्वरूप दिले जात आहे.

जगाच्या इतिहासात केवळ आंधळेपणा नाही. ऐतिहासिक तर्कशास्त्र म्हणून काही वस्तू आहे. लॉर्ड ॲक्टन बजावतात, ''केवळ अर्वाचीन चारशे वर्षांच्या पायावर तुम्हाला तत्त्वज्ञान उभारता येणार नाही. पूर्वीची तीन हजार वर्षे वगळून चालणार नाही.'' गत संस्कृतीचे उदयास्त जर आपण परीक्षू तर आपणास असे दिसून येईल की, ज्या ज्या संस्कृतींनी राजकारण, देशाभिमान, परस्परांचे उच्चाटन, यावर सारा भर दिला, त्या त्या संस्कृती अंतर्गत वा बाह्य कारणांनी नष्ट झाल्या. पाषाणयुगातून युरोपने वर डोकेही काढले नव्हते तेव्हा मिसर, बाबिलोन, असीरिया, क्रीट, खाल्डिआ वगैरे राष्ट्रे कितीतरी पुढे गेलेली होती. शंभर वर्षे म्हणजे एक मिनिट असे ठरवून गेल्या सहा हजार वर्षांचा इतिहास घड्याळावर जर आपण मांडला तर कसे

बरे चित्र दिसेल? डॉ. अलेक्झांडर आयर्व्हिन यांनी मोठ्या गमतीने परंतु परिणामकारक रीतीने ते दाखविले आहे. दोन्ही काटे बारावर आहेत असे समजू या व सहा हजार वर्षांपासूनचा इतिहास सुरू झाला असे मानू या. आता पाहा हं? ईजिप्त व बाबिलोन काटे बारावर असता उभी असतात. बारा वाजून पाच मिनिटे होताच क्रीट पुढे येते. बारा वाजून दहा मिनिटे झाली व असीरिया चमकला. सव्वाबारा वाजता खाल्डिआ खडा राहतो. बारा वाजून वीस मिनिटे झाली असता हिंदुस्थान, चीन व मीडिया येऊन उभी राहतात. (डॉक्टर अलेक्झांडर आयर्व्हिनने अर्थातच हिंदुस्थान व चीन यांच्या संस्कृतीच्या प्राचीनत्वाविषयी जे पाश्चिमात्य मत आहे ते येथे घेतले आहे.) बारा वाजून पंचवीस मिनिटे झाली, पर्शिया पुढे येतो. साडेबारा वाजता ग्रीसचा गौरव. बारा-पस्तीस झाले; तो पाहा अलेक्झांडर नकाशावरील काही साम्राज्ये पुसून टाकीत आहे. आणि बारा वाजून चाळीस मिनिटे होताच रोम राज्य करू लागले. पाऊण वाजता अर्वाचीन युरोपियन राष्ट्रांचा उदयकाळ दिसू लागतो. पुढे दहा मिनिटे तर सारी घाईच आहे. एक राज्य जाते, दुसरे येते. एक साम्राज्य संपते, दुसरे जन्मते, अशा गोष्टी प्रत्येक मिनिटाला होताना दिसतात. आणि एकाला थोडेसे सेकंद असताना १९१४ मधील महायुद्धाची तोफ वाजते! हे असे सहा हजार वर्षांचे चित्र आहे.

आशियातील संस्कृती टिकल्या यावरूनच मानवी व आध्यात्मिक मूल्ये जीवनदायी आहेत ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. आशियातही युद्धे होती, युद्धप्रिय राजे-महाराजे होते. परंतु युरोपियन राष्ट्रांत युद्धातील साहसांबद्दल व पराक्रमांबद्दल जी एक गौरवाची भावना आजही दिसून येते, तशी इकडच्या लोकांत फारशी नव्हती. युरोपने युद्धाभोवती तेजोवलय निर्मिले आहे, तसे आशियाने कधी केले नाही. असीरियाने लष्करी सत्तेच्या जोरावर सारे जग जिंकण्याचे ठरविले. आणखी पुढे, आणखी पुढे, अशा महत्त्वाकांक्षेने असीरिया बेहोष झाला आणि शेवटी त्याचा चुराडा उडाला. अतिमुळे माती झाली. प्राचीन ग्रीक लोकांना तर युद्धाचा कायमचाच जीर्णज्वर जडला होता. आणि त्यानेच ग्रीस मेला. रोमने सर्व ज्ञात जग जिंकले. पूर्वेकडून व पश्चिमकडून रोमला अप्रतिहत खंडणी मिळत होती. रोमने सारे जग मिळविले, परंतु आत्मा मात्र नेमका गमावला! ऐषआरामात रोम लोळू लागले,

वैवाहिक नीती भ्रष्ट झाली. रोमचा अध:पात म्हणजे वैषयिक पराकाष्ठा. एका पुरुषाने तेविसावी बायको मिळविली, तर एका स्त्रीने एकविसावा पती मिळविला असे नमूद आहे. विवाह म्हणजे करार. हे करार वाटेल तेव्हा रद्द केले जात, वाटेल तेव्हा पुन्हा मुक्रर केले जात. जणू बाजारातील देवघेवच ती! उच्चतर जीवनाचे रोममध्ये दिवाळे उडत आहे, आध्यात्मिक जीवन संपुष्टात येत चालले आहे, अशी धोक्याची सूचना काही विचारवंत देत होते. इतिहासकार लिव्ही म्हणाला, ''आमचे दुर्गुण आम्हाला झेपणार नाहीत. त्या दुर्गुणांवर उपाय करणेही आता शक्य नाही. दुर्गुणांचा रोग आता बरा होण्याच्या पलीकडे गेला आहे.'' टॅसिटसने तर त्या वेळच्या हत-पतित संसाराचे फारच भेसूर चित्र रेखाटले आहे. जुव्हेनालने अत्यंत बोचक व खोचक उपहास केला आहे. परंतु लोकांनी ही वाणी ऐकली नाही. आणि रोमचे ते वैभव अस्तंगत झाले. जगावर सत्ता गाजविण्याच्या अमर्याद महत्त्वाकांक्षेने पछाडलेली अशी साम्राज्ये एकामागून एक धुळीत गेली. आध्यात्मिक दिवाळखोरीमुळे संस्कृतीपाठीमागून संस्कृती नष्ट झाल्या. हिंदूच्या विष्णुपाराणाचा कर्ता एके ठिकाणी म्हणतो, ''विचार करा. लवकरच नवा अवतार येईल. कल्कीचा अवतार होईल. आणि मग काय होईल? ज्याच्याजवळ संपत्ती तोच मोठा मानला जाईल तोच अभिजनवान, तोच खरा सद्गुणी. स्त्री-पुरुषात कामविकार हेच एक बंधन राहील, अमृत हाच व्यवहारहेतू होईल. विषयसुखाहून अन्य आनंद राहणार नाही. विषयसेवन हाच एक आनंद. गळ्यात जानवे म्हणजेच ब्राह्मणत्व. रतिसुख म्हणजेच जणू गृहस्थाश्रम. बाह्य टिळेमोळी हेच धर्माचे स्वरूप होईल, धर्माचा आत्मा नष्ट होईल.''* असे हे वर्णन आहे. जर रानटीपणाचे क्षुद्र ध्येय अद्यापही आपण सोडणार नाही, त्यालाच चिकटून बसू, तर आपल्या जीवनाचा विकास थांबेल. ते सडेल, झडेल. आपली संस्कृती स्वत:च्या पापाच्या वजनानेच ढासळून पडेल; ती नाहीशी होईल. सर्व गोष्टी उघड आहेत. इतिहासाचा कायदा निर्दय आहे. जे पेराल ते उगवेल. तेथे पसंती-नापसंती मग नाही. जे हाती तरवार घेतील ते तरवारीनेच मरतील. एखादी संस्कृती विजयी होते तेव्हा

---

*अर्थ एव अभिजनहेतु:, धनमेवाशेषधर्महेतु:, अभिरुचिरेव दाम्पत्यसम्बन्धहेतु:, अनृतमेव व्यवहारहेतु:, स्त्रीत्वमेवोपभोगहेतु:, ब्रह्मसूत्रमेव विप्रत्वम्, लिंगधरणमेव आश्रमहेतु:। (विष्णुपुराण, ४-२४-२१)

ती वास्तविक तरवारीने होत नसून तिच्यात जी काही आध्यात्मिक शक्ती असते तिचा तो प्रभाव असतो आणि जेव्हा तिच्यातील ही शक्ती संपते, ही जीवनदायी-प्राणदायी वस्तू नाहीशी होते, तत्क्षणी त्या संस्कृतीचे प्रेत होऊन पडते. जोपर्यंत तरवारीवर हात आहे व तरवार हीच आशा आहे, तोपर्यंत भविष्य भयाण आहे, अंधारमय आहे. जोपर्यंत आत्म्याच्या आधाराने कारभार चालवावयास आपण तयार होत नाही. तोपर्यंत भविष्याची आशा नाही. ज्या संस्कृतीचा स्पर्धा हा पाया आहे, जी संस्कृती काही विरोध उत्पन्न झाला असता शक्तीनेच त्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावू पाहते, शक्तीलाच जी न्यायाधीश करते, शक्ती हेच जिचे उपास्य दैवत असते, ज्या संस्कृतीचा अभिमानी समाज फक्त एक अर्थशास्त्र जाणतो, ज्या संस्कृतीत उथळ विचारालाच महत्त्व मिळते, कला केवळ वासना-विकारात्मक असते, ज्या संस्कृतीत नीती शिथिल होते, संयमाला स्थान नसते, ती संस्कृती रजोगुणात्मक होय. ती सत्त्वगुणात्मक नव्हे. आणि म्हणून ती टिकू शकणार नाही. विनाशाच्या दरीकडे दुनिया झपाट्याने जात आहे. अशा वेळेस आपण आध्यात्मिक पायावर पुनर्रचना, पुनर्घटना करू तरच तरणोपाय आहे. पैगंबरांचे शब्द अशा वेळेस आठवतात :

''अरे, नका रे मरू. मागे वळा, मागे वळा. का उगीच मरता?''

हेगेल या थोर तत्त्वज्ञान्याने एके ठिकाणी म्हटले आहे, ''मानवजात इतिहासापासून काहीएक शिकत नाही, ही एक गोष्ट मात्र आपण इतिहासापासून शिकतो.'' हेगेलचे हे म्हणणे आपण खोटे पाडणार का त्यांच्या म्हणण्याला आपण आपल्या कृतीने आणखी पुरावा पुरविणार? संस्कृतीचे भवितव्य अखिल मानवजातीचेच भवितव्य संकटात आहे. ह्या भवितव्याला अजूनही आपण मनात आणू, तर वाचवू. अजून तुकडे पडण्याइतके कठीण ते नाही झाले. अजून ते आकार देता येईल असे आहे. अजून ओले आहेत, जरा मऊ आहे. मानवजात वाचेल अशा प्रकारचे जग करणे आपल्या हातात आहे.

निराश होण्याची जरुरी नाही. पृथ्वीवर आपण जन्मून काही फार काळ झाला नाही. आपण अर्धवट सुधारलेले आहोत यात आश्चर्य नाही. अनंत भविष्यकाळ समोर उभा आहे. सूर्य अजून एक कोट वर्षे तरी थंड होणार नाही. या पृथ्वीवर तोपर्यंत आपण राहू शकू अशी ग्वाही शास्त्रज्ञ देत आहेत. आपण जर प्रगती करीत जाऊ. केवळ भौतिकदृष्ट्या नव्हे, केवळ यांत्रिकदृष्ट्या नव्हे, तर मानसिक व आध्यात्मिक

दृष्ट्याही जर प्रगत होत जाऊ, तर मानवजातीला उज्ज्वल भविष्य आहे. आजच्या वेदनांतून व उलथापालथीतून काही तरी मंगलच निर्माण होईल असे मानण्याइतका आशावादी मी आहे. परंतु कोणतीही सुधारणा करण्यापूर्वी निष्पक्षपातीपणे निरीक्षण-परीक्षण करणे अगत्याचे असते. पृथक्करणाची जरुरी असते. मोकळेपणाची रास्त टीका होणे हिताचे असते. जे न हलणारे असे आळशी गोटे असतात, अहंप्रज्ञ व अहंपूर्ण असे जड-जरठ वृत्तीचे हटवादी असतात, अशांना जर कोणी जोराजोराने धक्केचपेटे दिले, तर त्या गोष्टीचे अभिनंदनच केले पाहिजे. रूढींना जे आव्हान देतात, वाढत्या मताच्या मानगुटीस भूतकाळचे भूत बसविणाऱ्यांवर जे जोरदार हल्ला चढवितात, त्यांचे कौतुक केले पाहिजे. प्रामाणिकपणे चूक कबूल करणे म्हणजेच सुधारणेचा आरंभ. जरी भविष्यकाळच्या पोटात काय आहे हे आपण फारसे पाहू शकणार नाही, तरी जेथपर्यंत विचाराची दृष्टी जाऊ शकते तेथपर्यंतचा तरी मार्ग आखता येणे शक्य आहे.

+++

४. पुनर्रचना

धर्म

धर्माची पुनरचना करण्याचा मोठा प्रयत्न होण्यापूर्वी आधी संशयवादाची प्रचंड लाट येत असते. धर्माची पुनर्घटना करण्याचे सारे प्रसंग पाहा त्या त्या वेळेस तुम्हाला या गोष्टीचे प्रत्यंतर मिळेल. श्रद्धेचे नवीन बी पुन्हा पेरण्यासाठी परंपरेची जमीन उखळून, नांगरून ठेवावी लागते. एक महान आंदोलन सुरू होते आणि पडापड सुरू होते. अशा या पडापडीत, अशा या सर्व संसार धांडुळला जाण्याच्या वेणीच जे अचल असते, जे शाश्वत व सत्य असते, जे कशानेही नष्ट होत नाही, उद्ध्वस्त होत नाही, ते डोळ्यांसमोर उभे राहते. सर्व अस्थिराच्या पसाऱ्यात ती स्थिर वस्तू समोर दिसते. धर्मावर टीका होऊ नये असे म्हणण्यात अर्थ नाही. मनाचा कोंडमारा केल्यामुळे मन सुधारेल अशी आशा करू नये. मनाला मोकळेपणा द्यावा. यांत्रिक सनातनी धर्म किंवा केवळ धर्मशून्यता यांना भविश्यकाळात स्थान नाही. धर्माची भविष्यकाळात गरज भासणार नाही असे कोणी म्हणतात; परंतु धर्म सदैव राहील. धर्माला दूर करता येणार नाही. ती जी अज्ञात सत्यता, ते जे अननुभून ब्रह्म, त्यांच्याशी संबंध जोडावा असे मानवी हृदयास सदैव वाटत असते. त्या अमूर्तापाशी बसावे, त्या निराकाराजवळ हसावे, अशी भूक मानवी मनास नेहमी राहणार. जोपर्यंत मनुष्य मनुष्य आहे, तो मनन करणारा मानव आहे, जोपर्यंत त्याला जीवनासंबंधी जिज्ञासा आहे, अशा आहे, जोपर्यंत उच्चतर जीवनाची त्याला आकांक्षा आहे व जीवनाच्या कर्तव्यांची जाणीव आहे, तोपर्यंत धर्माच्या नाशाची भीती नाही. तोपर्यंत धर्म आहे. धर्माचे स्वरूप फार तर बदलेल, तो नवीन स्वरूपात मांडावा लागेल. अर्वाचीन ज्ञानाशी व विचारांशी,

आजच्या शोधक व डोळस बुद्धीशी ज्या विश्वव्यापक सत्यांचा विरोध नाही, तो सत्ये नवीन स्वरूपात नवीन पद्धतीने मांडावी लागतील. आपले कार्य दुहेरी आहे. आपणास रूढीची बंधनेही तोडावयाची आहेतच परंतु त्याचबरोबर कशात काही नाही असे बेछूटपणे म्हणणारी जी स्वच्छंदी अराजक वृत्ती तिच्याशी झगडावयाचे आहे.

प्रत्येक वस्तूला काही तरी कारण असते, म्हणून कार्यकारणभावात्मक अशा या सृष्टीलाही काही आदिकारण असेलच, या साखळीच्या सुरुवातीला कोणता तरी आरंभीचा दुवा असलाच पाहिजे, असे जर कोणी म्हटले तर त्याच्या सत्यतेसंबंधी आपण शंका घेऊ शकू; परंतु या विश्वाच्या मुळाशी काही तरी आधारभूत सत् असले पाहिजे, काही तरी मूळ प्रकृती असली पाहिजे, असे जर आपण म्हटले, तर संशय बराचसा कमी होतो. "या विश्वाला आदिकारण आहे की नाही, या सर्व पसाऱ्याच्या पाठीमागे काही शक्ती आहे की नाही?" काहीकाही तत्त्वज्ञानी अशा प्रश्नांची टिंगलच करतात. व्हाल्टेअर उपहासाने म्हणे, "नाक कशासाठी? चष्मा ठेवण्यासाठी!" अशाच प्रकारची ही कारणमीमांसा आहे. परंतु खरोखरच का सारे उपहासास्पद आहे? जर कोणी म्हटले की या विश्वाची व्यवस्था, रचना, गती हे सर्व पाहून असे वाटते की याच्या पाठीमागे काही तरी योजना असावी, कोणता तरी हेतू असावा, हे उगीच, आपातत:, सुदैवाने सारे चालले आहे असे नाही, तर त्याच्या म्हणण्याचा विचार नको का करायला? ते म्हणणे विचार करण्याच्या लायकीचे नाही का? या विश्वाकडे शास्त्रीय दृष्टीने पाहूनही आस्तिकता राहते. शास्त्रीय दृष्टी नास्तिकच करते असे नाही. सत्यार्थीने पाहिले तर जगाचे शेवटी काय होणार आहे ह्या मूलभूत प्रश्नाशी शास्त्राला काहीएक कर्तव्य नाही. शास्त्र जीवनातील काही स्वरूपांचा विचार करते आणि इतर प्रश्न धर्म व तत्त्वज्ञान यांच्यावर सोपविते. या विश्वाच्या विकासासंबंधी दोन तुल्यबळ अशा विचारप्रक्रिया जर समोर मांडण्यात येत असतील, त्या दोन्हीही दृष्टी जर सत्य वाटत असतील, तर ज्या विचारप्रक्रियेमुळे, जी दृष्टी घेतल्यामळे मनुष्यांचा परमोच्च विकास होण्याची शक्यता दिसेल ती प्रक्रिया, ती दृष्टी आपण का मान्य करू नये? शास्त्रीय दृष्टीशी जर निष्ठावंत राहावयाचे असेल, तर आपणास असे कबूल करावे लागते की या विश्वाच्या भौतिक पसाऱ्याच्या पाठीमागे काही तरी आध्यात्मिक सत्यता आहे. त्या सत्यतेचे यथार्थ आकलन होणे कठीण आहे. त्या सत्यतेची व्याख्या नाही करता येणार. परंतु ती सत्यता आहे हे मात्र

खास. वस्तूला चैतन्याची जोड मिळाली व मन, बुद्धी, आत्मा अशा प्रकारे त्यातून वाढते गुणधर्म प्रकट होऊ लागले. मधूनमधून प्रगती खुंटते, अध:पात होतो, निर्दयता व मूर्खता उत्कटत्वाने प्रतीत होतात, तरीही पुढे पाऊल पडत आहे. चैतन्ययुक्त प्रकृतीच्या प्रगतीची दिशा सदैव वाढत्या परिपूर्णतेकडे आहे. मनोधर्मांची सुधारणा, सामुदायिक वृत्तीची वाढ, सहन करण्याची शक्ती, निरनिराळ्या भागांचा मेळ घालणे वगैरे जे मौल्यवान सद्गुण, ते उत्तरोत्तर वाढत आहेत. प्रकृतीत मूळचीच नैतिक गती आहे असे वाटते. विश्वाच्या विकासाकडे अशा नैतिक व आध्यात्मिक दृष्टीने बघणे म्हणजे कल्पना नव्हे. ही एखाद्या व्यक्तीची आवड किंवा लहर नाही. व्हाईटहेड, थॉम्सन, ऑलिव्हर लॉज, लॉईड मॉर्गन, अशा शास्त्रीय तत्त्वज्ञान्यांच्याही लेखातून ही दृष्टी मांडली गेली आहे.

त्या अज्ञात चिरंतन सत्याकडे आपण इतके दिवस अंधळेपणाने धडपडत जात होतो. परंतु शास्त्रीय ज्ञानाने आज नवीन दृष्टी दिली आहे. प्राचीन धर्मातील सत्यतेवर जरी शास्त्र हल्ला करीत नसले, तरी त्या जुन्या जरठ हटवादीपणाला ते धक्के दिल्याशिवाय राहत नाही. विश्वरचनेच्या पाठीमागे काही तरी शक्ती, ज्ञानमय शक्ती असली पाहिजे असे शास्त्र म्हणते. परंतु त्याचबरोबर मनुष्याने आजपर्यंत ईश्वरासंबंधी ज्या इतर नाना कल्पना उभारल्या आहेत, जे भारूड निर्माण केले आहे, त्या सर्वांचा शास्त्र उच्छेद करते. ईश्वर म्हणजे मातीची मडकी घडविणारा कुंभार, स्वर्गात बसणारा देवाधिदेव, आपल्या लेकरांचे कौतुक करणारा बाप, वगैरे ईश्वरासंबंधी ज्या कल्पना आहेत, त्या कल्पनांशी विश्वाच्या पाठीमागे असणाऱ्या त्या अनंत शक्तीला काहीएक करावयाचे नाही. ते सारे काव्य आहे. प्रत्येकाच्या त्या त्या कुलदेवताशी, त्या नाना मूर्तींशी व आकारांशी त्या चिच्छक्तीचा संबंध नाही. मग ईश्वर म्हणजे काय? ईश्वर म्हणजे विश्वव्यापक चैतन्य, विश्वव्यापक जीवन-तत्त्व. ते आपल्यात आहे, या सर्व चराचरात आहे. ते तत्त्व या सर्व विश्वाला आधार देते, या विश्वात ओतप्रोत भरून राहते, विश्वाच्या पलीकडेही ते सत्ता चालविते. समुद्रात मीठ मिसळलेले आहे, फुलात सुगंध भरलेला आहे, तसे ते तत्त्व या चराचरात भरून राहिले आहे. या विश्वाचा कारभार शाश्वत व निश्चित अशा योजनेनुसार चालला आहे. विश्वविकासाचे नियम आहेत. या किंवा त्या व्यक्तीसाठी ते नियम थांबणार नाहीत. आपण चूक केली व खड्ड्यात पडलो तर कोणीही हात धरून काढायला येणार नाही.

मोडलेल्या कायद्याबद्दल तेथे दयामाया नाही. जे बोलला ते बोलला, जे पाऊल टाकले ते टाकले जे पेरले ते पेरले. भूतकाळ निश्चित झाला, भविष्याचे काय ते पाहा.

असे जे परम तत्त्व, त्याचा मानवी मनाला नाना रूपांनी साक्षात्कार होतो. हिंदुधर्मातील देवतांची विविधता पाहा. त्याचप्रमाणे ''या सर्वांपाठीमागे एक तत्त्वआहे किंवा ते तत्त्व स्थिरचरात भरूनही दशांगुळे उरले'' हा विचार पाहा. बुद्ध धर्मामध्ये अभंग असा निष्ठुर कायदा आहे, तरी त्या धर्मातही हे कोणी अवतार येतो व वाचवितो हा विचार आहेच. मिसर, बाबिलोन, ग्रीस वगैरे दशांतील त्या नाना देवदेवतांचे खेळ पाहा. आणि हिब्रूंचा तो कठोर न्यायप्रिय प्रभू. कॅथॉलिकांचा प्रत्यक्ष देव जरी दूर असला, तरी इतर देवदूत हात देण्यासाठी उभे आहेतच. देवाचे आवडते भक्तही तेथे आहेत. प्रॉटेस्टंट आपला देव आपल्या मनात आणतात. मुस्लीम बंधूचा तो एकेश्वरी पंथ. अशा या नानाविध मार्गांनी त्या अदृश्य शक्तीशी आपला संबंध जोडण्याचा मानवी मनाने आजपर्यंत प्रयत्न केला आहे. ती शक्ती व्यक्तीपेक्षा महान आहे, अधिक सत्य, शिव व सुंदर आहे, असे सर्वांनी मानले आहे. मानवी स्वभाव विविधतेने नटलेला आहे आणि म्हणून ईश्वराचे स्वरूप विविध असे दिसणे साहजिकच आहे. आपलाच अनुभव खरा किंवा आपलेच म्हणणे खरे, असे जर हे सारे म्हणतील तर त्यांची एकवाक्यता कशी घडवायची? या सर्व विविध कल्पनांच्या मुळाशी एक अंतिम सत्यता आहे एवढे बरीक खरे. ती अंतिम सत्यतात काय आहे. किंरूप आहे, ते आजपर्यंत कोणी सांगितले नाही, पुढेही कोणी सांगेल असे वाटत नाही.

धर्मातील वैविध्य हे पुष्कळ वेळा विरोधाचे निमित्त केले जाते. ही विविधता नष्ट करून सर्व मानवांचा एक धर्म व्हावा एतदर्थ प्रयत्न केले गेले व केले जातात. परंतु अशा प्रयत्नांनी भले तर झाले नाहीच, उलट जगातील अशांती व दुःख ही मात्र वाढली. स्वतःचे मत दुसऱ्यावर लादू पाहण्याचा धर्मवेडेपणा काही स्वार्थी लोकांचा स्वभावच असतो. सत्य काय ते फक्त आपणाला मिळाले, विश्वाचा आपण जो अर्थ करू तोच काय तो खरा, असे मानणे अहंकार आहे. अहंकारामुळे अशी भूल मानवाच्या हातून होते. त्या त्या धर्मातून त्या त्या लोकांचा आत्मा प्रकट होतो. त्या त्या लोकांच्या आंतरिक जीवनाचे स्वरूप त्या त्या धर्मात प्रतिबिंबित होते. प्रत्येक जाती किंवा वंश आपापल्या आंतरिक धर्माप्रमाणे विकास करून घेतो. दिव्यत्व सर्वत्रच आहे. त्या त्या ठिकाणी त्या त्या विशिष्ट रूपात ते प्रकट होते. ज्या वेळेस दिव्यत्वाचे असे दोन भिन्न

आविष्कार समोरासमोर येतात, त्या वेणेस ते एकमेकांवर परिणाम करतात. दोघांतही नवता व भव्यता येते. दुसऱ्यांजवळून जसेच्या तसे घेऊ नये, त्याचे कलम करावे. ते आपणात मिळवून घ्यावे, त्याचे स्वरूप बदलावे. जगाचा धर्म एक करू पाहण्यात अर्थ नाही. जगाची विविध अशी आध्यात्मिक श्रीमंती, त्याचे हे बहुविध वैभव त्यामुळे कमी होईल. मन जर वांझोटे व्हावयास नको असेल, मनाचा विकास जर स्थगित व्हावयास नको असेल, मानवजातीचा आत्मा डबक्यात पडून राहू नये असे जर वाटत असेल तर कोणत्याही धर्माला नाकारू नका, कोणत्याही धर्माला खोडून काढण्याचा खटाटोप करू नका. राहू देत हे सारे महान धर्म. ‘‘ईश्वराने ज्यांना ज्यांना रस्ता दाखविला, ते ते सारे त्याचेच आहेत.’’

आध्यात्मिक क्षेत्रात ज्याने त्याने स्वत:च्या सदसद्विवेकबुद्धीला प्राधान्य दिले पाहिजे. प्रत्येकाने असे स्वातंत्र्य घेणे म्हणजे चुकाही होणारच. परंतु या चुका मुद्दाम केलेल्या नव्हेत. या चुका दु:खकारक असल्या तरी सत्यशोधनाचेच ते प्रामाणिक प्रयत्न होत. अधिक खोल असलेल्या गहन–गंभीर प्रश्नांचा सतत अभ्यास करीत राहिल्याने या चुका कमी होत जातील, दुरुस्त करता येतील.

भविष्यकाळातील धर्म अत्यंत उदार व व्यापक हवा. जे जे धार्मिक प्रवृत्तीचे आहेत त्या सर्वांचा उद्याच्या धर्मात समावेश झाला पाहिजे. पथस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य सर्वांस दिले गेले पाहिजे. प्रत्येकाला आपापल्या मनात काढू दे विचार–चित्रे, खेळवू दे स्वप्ने. धर्म म्हणजे अतीन्द्रिय वस्तुविषयीची एखादी सांगोपांग मांडलेली विचारप्रणाली नव्हे. व्यापक अर्थाने पाहिले तर धर्म म्हणजे मनाची विशिष्ट वृत्ती, प्रत्येकाच्या आत्म्याचा कल.

तुमची मते काय, तुमचे मंत्र कोणते, तुमचे तंत्र कोणते यावरून तुमची परीक्षा नाही करावयाची. तुमची परीक्षा शेवटी तुमच्या जीवनावरून केली जाईल. तुम्ही कसे वागता, तुमचे चारित्र्य काय, याला महत्त्व आहे. कोणत्याही धर्माचे लोक असोत, जे खरे धार्मिक असतात त्यांची दृष्टी वा वृत्ती सर्वत्र तीच दिसून येते. संत कोणत्याही धर्माचा असो. साऱ्या संतांचे जीवन एकरूपच आढळेल. अशा धर्मात्म्यांची मन:शांती कालत्रयीही भंगत नाही. आपत्तीचे डोंगर कोसळोत, दुर्दैव पाठीस लागो, ते स्थितप्रज्ञच असतात. आणीबाणीच्या वेळीही जे शांत राहतात, कितीही संकटे आली तरी ज्यांचा आत्मा अजिंक्य राहतो, त्यांच्याजवळच स्वत:चा मोठेपणा आहे. सर्व

आध्यात्मिकतेचे सार ते हेच. अविचल श्रद्धेचे लोक ज्या जगाला जिंकून घेतात, त्या जगाहून ते मोठे असतात, श्रेष्ठ असतात. गोळ्यांचा वर्षाव होत असला तरी ते सत्यच सांगतील. त्यांना क्रॉसवर चढवा, जाळा, फाशी द्या, ते सत्यापासून परावृत्त होणार नाहीत. व्यापक अशी त्यांची दृष्टी असते. त्यांच्या दृष्टीला स्वार्थ ओंगळ दिसतो, आसक्ती त्यांना शिवत नाही. सर्वांच्या हितात स्वतःचे हित आलेच, निराळे स्वतःचे हित ते काय पाहायचे, असे ते म्हणतात. त्यांच्या त्यागाला मोजमाप नसते, तेथे हिशेबीपणा नसतो. त्यांचा त्याग निरपेक्ष असतो. मोबदला मिळावा अशी इच्छा चुकूनही त्यांच्या मनात नसते. त्यांचे जीवन असे यज्ञमय झालेले असते तो त्यांचा स्वभावच बनतो. स्वतःला शून्य करणारा हा त्याग, ही धीरवीरता, ही शांती, सर्वसाधारण मनुष्यास शक्य नाही, असे म्हणून आपण मोकळे होत असतो. पराभूत झालेल्या गॅलिलीच्या कोळ्यांना अशा त्यागाने समाधान लाभत असेल, दुबळ्या हिंदी मनाला अशा आत्मसमर्पणाचे कौतुक वाटत असेल, परंतु आम्हाला नको हे निर्वाण, असे कोणी म्हणतात. संयमी जीवनावर धर्माने भर दिला आहे. प्रत्येक धर्माने त्यागाची शिकवण दिली आहे. स्वतःला विसरायला सांगितले आहे. धर्म म्हणजे काही एखादी गोरीगोमटी वस्तू नव्हे, फुकाफुकी लाभणारी समाधाने धार्मिक नव्हेत. सदैव सुखोपभोगासाठी धडपडणे म्हणजेच जीवन असे मानणे अधर्म होय. दुःख ही आकस्मिक गोष्ट नसून जीवनात ती ओतप्रोत भरलेली आहे. कष्टाने व त्यागानेच महत्त्वाच्या वस्तू संपादाव्या लागतात. वेदनांशिवाय वैभव नाही. जीवनाचे प्राप्तव्य प्रेयस नसून श्रेयस आहे. ''आनंदी जीवन'' नि ''जीवनातील आनंद'' ह्या दोन निराळ्या गोष्टी आहेत. त्यागाने, दुःखमय जीवनाने जर ध्येयप्राप्ती होत असेल, तर तो त्याग, ते कष्ट आनंददायकच असतात. एखाद्याला सुखाचे जीवन जसे वाटत असेल, तसेच ध्येयार्थीला हे कंटकमय जीवन आनंदाचे वाटते. स्वतःच्या ध्येयाचा साक्षात्कार करून देणारे असह्य असे दुःखही मनुष्य हसत हसत सहन करतो. महाकवी गटे म्हणतो, ''शिखरे मनाला आकर्षितात, तेथे नेणारा रस्ता नव्हे.'' त्या उच्चतेकडे आपले लक्ष असते. मग मार्ग कठीण व सुळक्याचा का असेना. रोजच्या बारीकसारीक गोष्टीतही हा न्याय दिसून येतो. शरीराला त्रास झाला तरी तो पत्करून बायका नटतील थटतील. पायांना सहन होत नसले तरी बूट घालतील. सौंदर्यप्रसाधनासाठी नाना सोस करतील. मनुष्य मनात आणील ते करतो. स्वतःची इच्छा त्याला प्रमाण असते. स्वतःची इच्छा

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

चालविणे हेच जीवनातील पहिले महत्त्वाचे अंग असते. जीवनातील महत्त्वाची जरुरी ती हीच. परंतु ही स्वेच्छा विश्वतंत्राशी जुळवून घ्यावी. स्वत:ची इच्छा व विश्वेश्वराची इच्छा यात अविरोध निर्माण करावा. परंतु यामुळेच झगडे उत्पन्न होतात, मनाची धडपड सुरू होते. ''रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग.'' असे म्हणावे लागते. आपल्या रोजच्या जीवनात असे हे कुरुक्षेत्र हरघडी दिसून येते.

प्रत्येक व्यक्ती म्हणजे अविकसित गोळा आहे. सर्वांची वाढ व्हावयाची आहे. पशुवृत्ती आपणातून सर्वस्वी गेली आहे असे नाही. या पशुवृत्तीला आपण वळण देऊ शकू. तिचे दुसऱ्या कोणत्या तरी उच्च वृत्तीत पर्यवसान करू. आत्म्याची मागणी आधी मान्य करावयास आपण शिकले पाहिजे. आत्मारामाचा हक्क आधी. यासाठी इतर वृत्तींवर नियंत्रण ठेवावे लागेल. अशा तपश्चर्येतून व संयमातूनच विकास होत असतो. आपण देहवृत्ती असतो. आपणास विदेही व्हावयाचे असेल, आत्मसंस्थ व्हावयाचे असेल, तर आपण आपल्या आवडीनावडींना निराळे वळण दिले पाहिजे. आपल्या अंतर्मनाचे नीट विनयन केले पाहिजे. यालाच निग्रह म्हणतात, वैराग्य म्हणतात. प्रत्येक पायरी चढताना मोह आडवे येतात. उच्च जीवनाकडे जाणे म्हणजे युद्ध आहे, खरोखरचा झगडा आहे. परंतु उच्च जीवनाकडे गेले तर पाहिजेच. एरव्ही आपल्या व्यक्तित्वाची परिपूर्णता नाही. अपरंपार त्याग करावा लागेल; परंतु फळही मोठे मिळेल. जसे मोल द्याल तसे फळ मिळेल. सर्व प्रकारच्या प्रगतीत खालचे सोडून वरचे घेणे हाच मार्ग आहे. क्षुद्राचा त्याग व उच्चाचा स्वीकार. अत्यंत क्षुद्र जंतूपासून तो आत्मार्थी पुरुषापर्यंत आपण पाहिले तरी हे दिसून येईल. हेतुपुरस्सर क्रमवार अखंड प्रयत्न किडीपासून तो महात्म्यापर्यंतच्या सर्व जीवांचे चालले आहेत. सर्वांच्या समोर ध्येय असते. प्रत्येकाचे काही तरी गंतव्य-प्राप्तव्य असते. त्या त्या ध्येयानुरूप आपण साधने योजितो, प्रयत्न करतो. इतर सर्व प्राण्यांपेक्षा मनुष्याच्या प्रयत्नात ही हेतुपुरस्सरता, जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची वृत्ती अधिक स्पष्टपणे प्रतीत होते.

मनुष्य परिस्थितीचा गुलाम नाही, ईश्वराच्या हातातील बाहुले नाही. परिपूर्णतेकडे जाणारी विश्ववृत्ती मनुष्यात जागृत अशी असते. विश्वाचा स्वभावच परिपूर्णतेकडे जाण्याचा आहे. परंतु हा स्वभाव मानवात आंधळा न राहता डोळस होतो. तिर्यग्योनीत प्रगती घडते; परंतु मानव ती घडवितो. मनुष्य पुरुषार्थपूर्वक, प्रयत्नपूर्वक प्रगतीकडे पावले रोवीत जातो. मनुष्येतर सृष्टीत अजाणता फेरफार

होतात, मानवी व्यवहारात जाणीवपूर्वक हेतू असतो. मी आज असा आहे, परंतु मी तसा होऊ शकेन, अशा प्रकारची धडपड आणि या धडपडीमुळे वाटणारी अस्वस्थता ही मानवातच दिसून येते. इतर प्राण्यात व मनुष्यात जर कोणता फरक असेल तर तो हा, की मनुष्य जीवनाचा कायदा शोधू पाहत असतो, प्रगतीचे तत्त्व शोधू पाहत असतो.

आपण स्वत:ला बदलू तर आपण जग बदलू, स्वत:ला सुधारूनच आपण जग सुधारू शकू. स्वत:ला सुधारणे हा सुधारणेचा पाया आहे असे जे म्हटले जाते ते अक्षरश: खरे आहे. नवीन संस्कृतीची उभारणी दैवावर सोपविण्याची जरुरी नाही. आपणही काही काम करू शकू. पुष्कळ करावयाचे आहे. किती तरी बाबतीत हे जग अपूर्ण आहे. किती तरी ठिकाणी बांधकाम करायचे आहे. प्रगती झपाट्याने करायची की मुंगीच्या पावलाने करायची हे आपणावर आहे. उत्क्रांतीची शिकवण स्पष्ट आहे. काही ठरावीक कार्यक्रमानुसार जीवन जात नसते. प्रगतीची ती ती इच्छित शिखरे जीवन कधी गाठू शकत नाही. जीवनाची नदी कधी सरळ जाते, कधी वाकडी जाते. कधी उथळ असते, कधी गंभीर असते. कधी ती नदी वाळवंटात लुप्त झाल्याप्रमाणे दिसते. जीवन कधी इकडे जाते, कधी तिकडे. कधी प्रगती खुंटते व पुन्हा पूर्वपदावर गाडी येते. निसर्गाच्या कामात हिशेबीपणा नाही. पुन:पुन्हा तेच तेच प्रयोग करावे लागतात. भूतकालीन इतिहास सांगतो की जरा जर चुकीचा मार्ग घेतला गेला, तर एकदम अदृश्यच व्हावे लागेल, जगातून नष्ट व्हावे लागेल. आपणापैकी प्रत्येकाला अधिक चांगले जग निर्मिण्याच्या प्रयत्नात भाग घेता येईल. प्रत्येकाला काही तरी करता येईल. विश्वाचा हेतू जर आपण लक्षात घेऊ व त्याच्याशी एकरूप होऊ तर हे करता येईल. प्रत्येक व्यक्तीत काही तरी अपूर्वता असते. प्रत्येकाचे विशिष्ट गुणधर्म असतात. प्रत्येकाला जगाच्या कल्याणात काही विशेष भर घालता येईल. ती शक्यता सर्वांच्या ठायी आहे. स्वत:चा स्वधर्म ओळखणे हे सर्व परिपूर्णतेचे सार आहे. मी काय करू शकेन, मला काय होता येईल, माझे ईश्वरी देणे कोणते हे कळणे म्हणजेच स्वत:च्या विकासाचे सूत्र हाती येणे. जीवनाचा शांतपणे व स्थिरपणे विचार करून जीवनातील आपले स्थान आपण शोधू शकतो. जीवनाचा अर्थात सर्वांगीण विचार केला पाहिजे. प्रत्येक मनुष्य म्हणजे काही विवक्षित गुणांचा व घटनांचा गोळा असतो. प्रत्येकाच्या जीवनातील मध्यबिंदू निरनिराळा असेल. कोणाचा खाली, कोणाचा वर. त्या मध्यबिंदूवर आपले चरित्र अवलंबून असते. मनुष्य उथळ स्वभावाचा आहे की

गंभीर वृत्तीचा आहे, हे त्याच्या जीवनातील मध्यबिंदूवरून दिसून येते. कितीही चुका झाल्या, तरी पण मध्यबिंदू जर काळजीपूर्वक घेतलेला असेल, तर आधार आहे; आपल्या सर्व जीवनात एकसूत्रीपणा आहे. त्या मध्यबिंदूशी साऱ्या अंतर्बाह्य क्रिया संबद्ध हव्या. जीवनातील एकसूत्रीपणा देणारा हा जो मध्यबिंदू तो आपण शोधून काढला पाहिजे, म्हणजे विश्वातील आपले विशिष्ट स्थान आपणास कळेल. मग आपली भूमिका नीट पार पाडण्यास लागणारा उत्साह आपणास मिळेल. ती भूमिका मग लहान असो वा अति कष्टाची, दगदगीची असो. यासाठी शांतपणे चिंतन व मनन करण्याची, एकाग्र करणाऱ्या एकांताची आवश्यकता असते. त्यामुळे जीवनात मेळ येतो.

दैनिक जीवनाला विशिष्ट अर्थ असतो व त्याला सार्वजनिक, सामाजिक महत्त्व असते. त्या क्रियेत हेतुपुरस्सरता नाही, जी क्रिया सहजधर्म म्हणून झाली, ती नैतिक म्हणता येणार नाही. स्वाभाविक क्रिया, प्रतिक्रिया यांना नैतिक मूल्य नाही. ज्यांना आपण नैतिक क्रिया म्हणतो, त्यातून कोणता तरी विचार प्रकट होत असतो. त्या क्रिया कोणत्या तरी उद्देशाला मूर्त करीत असतात. त्या क्रिया विशेष अर्थाने होत असतात म्हणूनच महत्त्वाच्या असतात. मानवी प्रकृती ओबडधोबड असते. तिला आकार द्यायचा असतो. आपल्या आडमुठ्या स्वभावाला वळण देऊन आध्यात्मिक ध्येये मिळवावयाची असतात. आत्मोन्नतीची, आत्मप्राप्तीची साधने आपल्याला या मातीतून घडवावयाची असतात. आपण वळण कोणते देतो, आकार कसा देतो ही गोष्ट महत्त्वाची आहे. मानवी जीवनाचे सारे आविष्कार अर्थपूर्ण आहेत. प्रत्येकाची किंमत त्यातील हेतुवरून, त्यातील तत्त्वावरून होत असते. आपणास एकच ठरावीक ठसा किंवा साचा मिळणे अशक्य आहे. प्रत्येक व्यक्ती अपूर्व आहे. प्रत्येकाचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन इतरांपेक्षा निराळा असतो. ध्येय कोणतेही असो; त्या ध्येयाचे स्वरूप काय, ते शक्य आहे की नाही हे आधी नीट लक्षात घेणे जरूर आहे. नंतर त्या ध्येयप्राप्तीचा मार्ग नीट आखून, कष्ट करीत हालअपेष्टा सोशीत, संकटांशी झुंजत त्या ध्येयाला भेटण्यासाठी निघाले पाहिजे. दुसरे असे की, आपली वर्तणूक नैतिक ठरण्यासाठी ती सामाजिक हिताची असली पाहिजे. आपल्या वर्तनाने समाजाची सुस्थिती राहिली पाहिजे. समाजाची विघटना नाही होता कामा. समाजाचे रक्षण झाले पाहिजे. आपल्या कर्माने समाजात मेळ राहील, अविरोध राहील असे

झाले पाहिजे. समाजात संगीत निर्माण करणे, समाजाचा विध्वंस होऊ न देणे हे उत्क्रांतितत्त्वाचे रहस्य आहे. मानवजातीचे उच्चाटन करील असे कोणतेही कर्म नैतिक असू शकणार नाही. समाजात उगीच आपला आणखी एक तिसरा सूर काढू नये. विघटना नको, संग्राहक संघटना हवी. प्रत्येक व्यक्तीचे विशिष्टत्व आदरिणे म्हणजेच नैतिक जीवन. दुसऱ्यांच्या भावना, वृत्ती या तुच्छ नाही लेखता कामा. दुसऱ्यांच्या मोठेपणाची जाणीव असणे, तो मोठेपणा कबूल करणे, त्यांच्याशी संबंध जोडणे म्हणजेच सदाचार. अशानेच खरोखर मानवी जीवन वैभवशाली होते, विविध व श्रीमंत होतं. फोनिशियन माता स्वत:चीच मुले खाऊ लागल्या. त्यांना मोलॉकने प्रतिबंध केला. मोलॉकने ती गोष्ट थांबविली नसती तर दुसऱ्या कोणत्या तरी देवाने थांबविली असती. सारी माणसे अपूर्व आहेत. एकजण दुसऱ्यासारखा नाही. ही अपूर्वाई, ही नवलाई हा आपला सर्वांचा विशेष धर्म आहे. या जागतिक उत्क्रांतीचे ध्येय काय? ध्येय हे की, सर्व विविधतेतून एक सुंदर एकता निर्माण व्हावी. लहानमोठी अनेक शिखरे मिळून एक हिमालय शोभावा. प्रत्येकाच्या जीवनाचे विशिष्ट फूल फुलावे व विविध रंगांच्या व गंधांच्या फुलांचा एक भव्य ताटवा जगात फुलावा व खुलावा.

जे आहे त्याचा स्वीकार करून त्यातून सौंदर्य निर्मिण्यासाठी प्रयत्नपूर्वक झटणे म्हणजेच नैतिक प्रगती. एखादी व्यक्ती घ्या. किती भिन्नभिन्न वृत्ती, प्रवृत्ती त्या व्यक्तीच्या ठायी असतात! किती राग-द्वेष, किती वासना-विकार, किती चंचलता, किती लहरीपणा! परंतु अशातूनच सौंदर्य निर्मावयाचे आहे. या मातीतूनच मांगल्याचा साक्षात्कार करून घ्यावयाचा आहे. हीच आपली सामग्री, हेच साहित्य. एखादा नीतिशास्त्रज्ञ जर ही मिळालेली पुंजी भिरकावून देईल किंवा तिचा नाश करील तर ते योग्य नाही होणार. जे मिळालेले आहे ते स्वीकारले पाहिजे आणि त्याच्या आधारावर उच्च इमारत बांधावयास हिंमतीने उभे राहिले पाहिजे. जे आहे त्याचा स्वीकार करणे व त्याचीच नीट व्यवस्था लावणे एवढ्याने मनुष्याला कधीही समाधान नसते. त्याला पुढे नेऊ पाहणारी, उच्चतर जीवनाकडे नेणारी एक अमर, प्रबळ प्रेरणा त्याच्या अंतरंगात असते. ही प्रेरणा, ही आतील ऊर्मी मनुष्याला स्वस्थ बसू देत नाही. जे आहे ते सांभाळणे एवढेच जीवनाचे साध्य नाही. जे आहे ते उदात्त करणे हा जीवनाचा अंतिम हेतू आहे. ही जीवनाची उदात्तता आहे. प्रत्येकातला अधिकाधिक अर्थ समजून

घ्यावयाचा असतो. अधिकाधिक पूर्णपणे जगावे असे त्याला वाटत असते. तो वाढत असतो, स्वत:च्या पलीकडे जातो. बीजाचा विशाल वृक्ष होतो. तो काही तरी होत जातो, बनत जातो, हेच त्याचे व्यक्तित्व; हेच त्याचे विशेष अस्तित्व; हेच विकसन. परिस्थितीशी जमवून घेणे म्हणजे नैतिक जीवन असा जर आपण अर्थ केला, तर जोपर्यंत परिस्थिती बदलत आहे तोपर्यंत हे नैतिक जीवनही थांबणार नाही. तेही बदलत राहील. आणि म्हणूनच जीवनाची जी बाह्य रूपे प्राचीन काळात दिसत ती आज नाही दिसणार. जीवनाच्या त्या स्वरूपाची पुनरावृत्ती नाही होणार. तसेच्या तसे भूतकालीन जीवन आजही आम्ही जगू असे म्हटले, व समजू या की ते शक्य झाले, तरी ते इष्ट होणार नाही. आजच्या काळी पूर्वीचे रजपूत योद्धे किंवा मध्ययुगातील वीर पुरुष शक्य नाहीत. ते नमुने आजच्या परिस्थितीत असंभाव्य आहेत. आणि परिस्थिती बदलतच नसेल तर? सदा सर्वदा तीच परिस्थिती सभोवती सर्वत्र असेल तर? तरीही प्रश्न सुटत नाही. कारण आपली ध्येये नेहमी बदलत असतात. केवळ परिस्थितीशी जुळवून घेण्यात खरे नैतिक जीवन नाही. आपल्या ध्येयांना परिस्थिती अधिकाधिक अनुकूल करणे यातच खरोखर नैतिक जीवनाचा आत्मा आहे. परिस्थितीला असा आकार द्यायचा, की तिच्यातून आपली ध्येये उत्तरोत्तर अधिक प्रकट व्हावी. जे आहे त्याचा नम्रपणे स्वीकार करणे, जी परिस्थिती आहे तिच्याशी जुळवून घेणे यातही एक प्रकारची शांती आहे, हीही एक प्रकारची पूर्णता आहे; परंतु ही मानवी जीवनाची परिपूर्णता नव्हे, हा मनुष्यत्वाचा विकास नव्हे. ही शांती खरी आध्यात्मिक नव्हे. जे आहे ते घेऊन त्यातून हिंमतीने नवीन निर्मिले पाहिजे. जी परिस्थिती आहे, तिला आपल्या हेतूच्या पूर्ततेसाठी अनुकूल करून घेतले पाहिजे. हा पुरुषार्थ आहे. एखाद्या गोगलगाईप्रमाणे कठीण कवच अंगावर घेत परिस्थितीशरण असे राहणे हे वीराचे काम नाही. जो जगाला वर उचलतो तो खरा वीर. जग ज्या तऱ्हेचे असावे असे आपणास वाटते, त्या तऱ्हेचे ते थोडेफार करण्यासाठी खटपट करणे हे मनुष्याचे खरे काम. जग आहे त्यापेक्षा अधिक चांगले करणे, अधिक उच्च पातळीकडे ते नेणे यात खरे भूषण. परिस्थितीशी सम्यक् मेळ घालणे यात सौंदर्य नाही असे नाही. परंतु बदलत्या व विविधतेने नटलेल्या बहुरूपी जगात अशी सुंदरता फार वेळ टिकू शकणार नाही. ती तडजोडही टिकणार नाही. बालकाचे निष्पाप सौंदर्य तडफदार तारुण्याला जागा देते. हे कर्मोत्सुक उत्साही तारुण्य पोक्त पावन वृद्धत्वाला वाव देते. आणि असे हे सर्वत्र

चालले आहे. जीवनाच्या मार्गावर मुक्काम नाही. येथे विश्रांती नाही. एक संपले की त्यातूनच नवीनाचा आरंभ होतो. मरणातून जीवनाची कळी वर येते.

स्वतःच्या जीवनाची पूर्णता हे जे परंपरागत ध्येय, त्याच्याशी वरील विचारसरणीचा उघड विरोध दिसतो. पूर्वी व्यक्ती आपल्या स्वतःच्या मोक्षाचा विचार करी. सामुदायिक मोक्षाचा विचार समोर नसे. व्यक्तीने स्वतःचा उद्धार करावा. स्वतः मुक्त व्हावे, यावर भर दिला जात असे. धर्मामध्ये जी अधिकारवृत्ती शिरली तिचा हा परिणाम असावा. चालीरीतींना, नाना पद्धतींना व प्रकारांना, नाना संस्थांना पाठिंबा देणारे एक साधन म्हणून, धर्म उपयोगिकला जाऊ लागला. आणि ज्यांना अशा परिस्थितीत आत्मविकासास अवसर मिळेना ते रानावनात गेले, गुहांतून वा गिरिशिखरांवर राहू लागले. त्यामुळे समाजाची प्रगती खुंटली. ''अस्ति तत् समर्थयितव्यम्' हा न्याय रूढ झाला. अमुक धर्माच्या विरुद्ध आहे, तमुक धर्माच्या विरुद्ध आहे, असे सदैव सांगण्यात येऊ लागले. परंपरेला सांभाळणे म्हणजेच धर्म असे झाले. मग प्रगती कोठून होणार? काही व्यक्ती मधूनमधून आपणास दिसतात की ज्यांनी पूर्णतेचे शिखर गाठले. परंतु ह्या सर्वांना खरोखरची मुक्ती मिळाली असे म्हणता येणार नाही. क्रोध व भय, दुःख व संकट यांच्यापासूनच मुक्त व्हावयाचे आहे असे नाही, तर अलग राहणे, एकांतवासात राहणे, या वृत्तीपासूनही मुक्त झाले पाहिजे. सर्व मानवांचा उद्धार झाला पाहिजे, सर्वांमध्ये ती शक्यता आहे, दिव्यता सर्वांच्या ठायी आहे, असे ज्यांना प्रामाणिकपणे वाटत असेल, ते सर्व जगाचा उद्धार झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत. सर्व खऱ्या धर्मांचा आत्मा एकच आहे. तो हा की, मनुष्य पूर्ण होणे शक्य आहे, मनुष्यामध्ये ईश्वरी अंश आहे व त्या दिव्य आध्यात्मिक जीवनात सारी मानवजात सारखी एकत्र उभी आहे. सारे मानवप्राणी दिव्य आध्यात्मिकतेने रंगलेले प्रत्यक्ष येथे दिसत नसले, तरी त्या ध्येयभूत जीवनात तसे दिसतात. जो जीव मुक्त झाला, ज्याने देवाशी सख्य जोडले व म्हणूनच जो शक्तिमान झाला, त्याने स्वतःच्या समाधीतच डोलत राहू नये; कर्महीन दयेत कृतार्थता व समाधान मानू नये. त्याने प्रत्यक्ष सेवा केली पाहिजे. जोपर्यंत जग दुःखीकष्टी आहे, जोपर्यंत जग चिखलात रुतले आहे, तोपर्यंत त्या मुक्त पुरुषाला तरी खरी शांती कशी लाभणार? तो का जगातील ही आग व ही हायहाय स्मितमुखाने स्वस्थपणे पाहत बसेल? बाह्य जगाशी नीट मेळ घातल्याशिवाय स्वतःच्या जीवनातही कोणाला मेळ घालता येणार

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

नाही. जोपर्यंत पृथ्वीवर देवाचे राज्य आले नाही, तोपर्यंत संतांनी आपले सारे जीवन या बाह्य जगासाठी सेवेत ओतले पाहिजे; ते देवाचे राज्य पृथ्वीवर यावे म्हणून हळूहळू झेंडा फडकवीत त्यांनी पुढे जात राहिले पाहिजे, जगाला पुढे नेत राहिले पाहिजे. जगाचा जोपर्यंत बचाव नाही, तोपर्यंत कोणाचाही बचाव नाही. जग मुक्त नाही तोवर कोणीही मुक्त नाही.

सद्‌गुण म्हणजे उत्तरोत्तर अधिकाधिक उच्चत्वाकडे जाण्याचा अव्याहत प्रयत्न. दुर्गुण म्हणजे अहं-तृप्ती. ही अहं-तृप्ततेची वृत्ती क्षुद्र मनाचे चिन्ह आहे. उदात्त ध्येयाची जाणीवही नसणे याहून अधिक आपत्ती ती कोणती? जोपर्यंत वर जावेसे वाटत आहे, तोपर्यंत सुधारणेस वाव आहे-मग तो किती का पापी असेना. सद्सद्विवेकबुद्धीची ज़ोपर्यंत टोचणी आहे, तोपर्यंत आशा आहे. ती टोचणी थांबली म्हणजे सारे संपले. मग जगत असलो तरी ते मरणच समजावे. ते मेल्याप्रमाणे जगणे. जितका अधिक विकास, तितके अधिक असमाधान. ध्येयासाठी गाठ पडेपर्यंत कोठली शांती?

जेथे जेथे तुम्हास अर्थपूर्ण वर्तन दिसेल, सामाजिक मूल्य दिसेल तेथे नीती आहे असे समजा. मग त्या जीवनाचे स्वरूप कोणते का असेना. मानवी जीवनाचा कोणताही अविष्कार आपण नाकारू नये. त्या विशिष्ट दिशेच्या ध्येयाची व्यवस्थित अनुभूती जोवर नाही, तोपर्यंत तरी कोणास नाकारू नये. मानवी स्वभाव वैचित्र्यपूर्ण आहे आणि पूर्णताही विविध रूपांनीच प्रकट होईल. पूर्णता म्हणजे मानव जीवाची ध्येयभूत वस्तूशी ऐट किंवा पूर्णता म्हणजे त्या ध्येयभूत वस्तूशी मानवी जीवनाचा संपूर्णपणे मेळ. ईश्वरी वैभव अनेक रूपांनी व्यक्त होते. पावित्र्य शतरूपांनी प्रकट होते. भगवद्‌गीता दहाव्या अध्यायातील ४१ व्या श्लोकात म्हणते, "जे जे भव्य आहे, वैभवशाली आहे, सुंदर आहे, सामर्थ्यसंपन्न आहे, ते ते मीच आहे असे मान. ते माझेच स्वरूप. माझ्या दिव्यत्वाचेच ते प्रकटीकरण." प्लेटोच्या आदर्श जगात पृथ्वीवरील प्रत्येक वस्तूचे एक आदर्श रूप आहे. पृथ्वीवरील सर्व वस्तूंची विवक्षित व परिपूर्ण रूपे त्या आदर्श सृष्टीत आहेत. त्या स्वर्गाच्या राज्यात या अनंत आदर्शांसाठी अनंत प्रासाद उभारलेले आहेत.

आपल्या वर जाण्याच्या धडपडीने ध्येय नेहमी हाती येतेच असे नाही. परंतु ध्येयाला हात न पोचले म्हणून कष्टी होण्याची जरुरी नाही. खेळ कसा खेळलो याला

महत्त्व आहे. धावा किती काढल्या ही गोष्ट महत्त्वाची नाही. कर्तव्य करणे हे आपले काम. ते कोणाकडून करवून घेणे हे काम नाही.

असत् ही अकरणात्मक वस्तू आहे. असत् म्हणजे कमी सत्. अमुक एक मनुष्य वाईट आहे याचा अर्थ काय? याचा अर्थ इतकाच की त्याच्या ठिकाणी चांगुलपणा तितकासा नाही. चांगुलपणाने त्याच्या जीवनात फारशी प्रगती केली नाही. सत् व असत् यांच्यातील विरोध हा अंतिम नाही. जे असत् आहे तेच सत् व्हावयाचे आहे. जो झगडा आहे तो सत् व असत् यांच्यात नसून अधिक सत् व कमी सत् यांच्यामध्ये आहे किंवा कमी वाईट व अधिक वाईट यांच्यात आहे. सत् व असत् असे भेद न करता वरचे व खालचे, श्रेष्ठ व कनिष्ठ असे भेद करणे अधिक यथार्थ होईल. सारेच मोक्षाच्या शिडीवर चढणारे. कोणी वरच्या पायरीवर, कोणी तळच्या पायरीवर. आपलेच घोडे नेहमी पुढे दामटू नये; दुसऱ्यांचाही विचार करावा. प्रतिपक्ष्याला केवळ कचरा मानू नये. त्याचेही म्हणणे सहानुभूतिपूर्वक समजून घ्यावे. आपल्या प्रियतम ध्येयांना विरोध सहन करणे कठीण असते, खरे व तो विरोध पुन्हा खेळीमेळीने शांतपणे सहन करणे हे तर त्याहूनही कठीण. परंतु अशाच वेळी तर आध्यात्मिक वृत्तीचा विजय असतो. येथेच महात्मा इतरांपेक्षा उमटून पडतो व मात करतो. जग कसे असले पाहिजे व कसे आहे, यातील महदंतर पाहून आध्यात्मिक वृत्तीचा मनुष्य खवळून उठत नाही. कधी सुधारणार हे जग, असे मनात येऊन तो अधीर होत नाही, आदळपाट करीत नाही. तो जीवनाचा शांतपणे स्वीकार करतो, इतकेच नाही, तर या जीवनाचा जे त्याग करतात, त्यांचाही तो स्वीकार करतो. ''जीवनाचे हे असेच स्वरूप असले पाहिजे, दुसरे नाही असता कामा'', असे हटातटाने म्हणणारे जे उतावळे लोक, त्यांची निराशा व गडबड आध्यात्मिक वृत्तीच्या मनुष्याच्या ठायी आढळणार नाही. सहानुभूतीचा अभाव म्हणजे अधर्म. मी जसा प्रामाणिक आहे तसेच दुसरेही असतील, मला जितकी कळकळ व तळमळ आहे तितकीच दुसऱ्यांनाही आहे, असे आध्यात्मिक पुरुष मानतो. ज्यांचा देव राष्ट्रप्रिय किंवा युद्धप्रिय नाही, ज्यांचा देव प्रेमरूप आहे, विश्वरूप आहे, त्यांचा तर हाच धर्म ठरतो की, विरोधासमोर शांतपणे उभे राहावे. प्रेमस्वरूप परमेश्वराची उपासना करणारे विरोधकांशीही शांतीने व सौजन्यानेच वागतील. आपल्याला विरोध करणाऱ्यांवरही न रागावता क्षमावृत्ती दाखवणे, त्यांच्याशी सहनशीलपणाने वागणे, हा त्यांचा धर्म आहे. जो जो आपल्या धर्माचा नाही तो नास्तिक व पाखंडी आहे असे मानण्याची एक सहजप्रवृत्ती आपणात असते. जो

आपल्याप्रमाणे ग्रह-पूर्वग्रह करून घेणार नाही तो मूर्ख, दुष्ट व अडाणी! एखादी व्यक्ती अमुक एक मत का पत्करते याचा उलगडा तेव्हा होईल, जेव्हा त्या व्यक्तीचा स्वभाव, तिच्या भोवतालची परिस्थिती, त्या व्यक्तीचे शिक्षण, त्या व्यक्तीच्या जीवनाची पार्श्वभूमी वगैरे आपण समजून घेऊ. दुसऱ्याचा दृष्टिकोन आपण नीट समजून घेतला तर त्याच्यावर आपण रागावणार नाही, त्याला त्याच्या मताविषयी क्षमा करू, एवढेच नव्हे तर, त्याच्याविषयी आपण सद्भाव धरू, त्याची अधिक किंमत करू आणि अशा करण्याने आपण त्याचे मन जिंकून घेऊन अधिक वरच्या दर्जाचा अविरोध निर्माण करू, अधिक उच्च प्रकारचा मेळ घालू शकू, ऐक्य निर्मू शकू. हिंदूंच्या पुराणात रावण व हिरण्यकश्यपू केवळ पापमूर्ती असे मानले आहे. परंतु त्यांनाही शेवटी सद्गती मिळते. त्यांनाही मोक्ष मिळवून घेण्याची पात्रता आहे. रावण व हिरण्यकश्यपू स्वतःच्या पुरुषार्थाच्या व पराक्रमाच्या कल्पनांप्रमाणे वागतात; ते स्वतःशी असत्यरूप होत नाहीत. जे श्रेयस्कर असे त्यांना वाटले, त्याच्या पाठीमागे ते उत्कटपणे लागले. त्यांच्या जीवनात तीव्रता व उत्कटता आहे. तिची दिशा निराळी होती एवढेच. रावण वरून जरी लोखंडासारखा कठोर दिसला, सीतेचे हरण करण्यात त्याची जरी प्रक्षुब्ध वासना दिसली, रामाला जिंकण्यासाठी जरी तो धडपडत असला, तरी त्याच्या या सर्व हालचालींत मधूनमधून होणाऱ्या हळूवार प्रतिक्रिया, मधूनमधून स्फुरणारी क्षणिक उदात्तता दिसून आल्याशिवाय राहत नाही. सीतेच्या व्यक्तित्वाविषयी त्याला फार आदर वाटतो. तो रामाचा भयंकर शत्रू आहे, हाडवैरी आहे, ही गोष्ट खरी; परंतु दुखावलेल्या मनातूनच न शमणारा संताप जन्मत असतो. गाढ्या वैराच्याच पाठीमागे तीव्र वेदना असते. मानवजातीचे काही विशेष नमुने असतात. काही काही मोठ्या विवक्षित वृत्तीची माणसे असतात, त्यांचे स्वरूप समजून घेणे सोपे नसते आणि ज्यांचे जीवन समजून घेण्याची उत्सुकता आपण दर्शवलेली नसते, अशांबरोबर आपण श्रेष्ठ आहोत या गर्वाने फुगून कधी वागू नये. जीवनाची सर्जनशक्ती अनंत रूपांनी प्रकट हेते. त्यातील प्रत्येक रूपात अपूर्वाई असते. क्रियेच्या प्रत्येक प्रकारात सत् व असत् दोन्ही असतात. कोणतीही गोष्ट असो, ती जशी चांगली तशी वाईटही करता येते.

ईश्वराच्या या जगात केवळ दुष्ट असे काही नाही. अमिश्र असत् या संसारात राहीच. म्हणून जेव्हा आपणास वाइटाचा विरोध होतो तेव्हा रागावू नये. असे रागावणे

वाईट आहे. आपली वृत्ती जे जे विरोध होतील ते सर्व शांतपणे सहन करून धैर्याने पुढे जाण्याची असावी. त्या विरोधांचाही स्वीकार करावा. प्रेमाचा आत्मा दुसऱ्याला समजून घेण्यात आहे, दुसऱ्याविषयीही संपूर्ण सहानुभूती दाखविण्यात आहे. अशा निर्मळ व उदार प्रेमाने जगातील दुष्टतेचा आपण धैर्याने स्वीकार केला पाहिजे. असे करण्यात आपण दया दाखवितो किंवा मोठी क्षमावृत्ती दाखवतो असे समजण्याचे बिलकूल कारण नाही. आपण केवळ न्याय दाखविला असे म्हणता येईल. निरपेक्ष न्यायाची वृत्ती ही दया किंवा क्षमा यांच्याहूनही थोर आहे. मनुष्य जसा आहे तसा पत्करून त्याच्यावर प्रेम करणे, त्याचा दुबळेपणा व त्याची शक्ती दोन्ही समजून घेणे, जग ज्याला अपराध किंवा पाप म्हणजे, ते करायला मूळचा सत्प्रवृत्तीचा असा हा मानव का प्रवृत्त झाला ते समजून घेणे, म्हणजेच खरोखर न्याय. नंदनवनात ईव्हने ॲडमला मोहात पाडले, त्याचे परिणाम पुढे अत्यंत दुःखद असे झाले; परंतु त्या ईव्हहून आपण नैतिकदृष्ट्या अधिक श्रेष्ठ आहोत असे म्हणण्याचे धाष्ट्य आपल्यापैकी कोणी तरी करील का? आपण जर त्या काळात व त्या परिस्थितीत असतो, तर आपण निराळ्या तऱ्हेने वागलो असतो असे कोणास तरी वाटते का? जगातील दुष्टातल्या दुष्टासही स्वीकारणे, हाच एक अशक्य वाटणाऱ्या सहकार्याचा पाया होऊ शकेल. शत्रूवर विश्वास टाकणे हाच त्याच्याशी वागण्याचा उत्तम मार्ग. जो खरोखर आध्यात्मिक वृत्तीचा पुरुष आहे त्याला ना भय, ना क्रोध. "शूराने वस्तूचे स्वरूप नीट समजून घ्यावे; तो असे करील तर त्याला रागावण्याचे किंवा भिण्याचे कारणच उरणार नाही. त्याने मग फक्त भले करावे, आनंदात राहावे. परंतु असे जीवन जगणे कष्टाचे आहे; ती तपश्चर्या आहे; आणि म्हणूनच असे जीवन दुर्मीळ आहे." हे शब्द एखाद्या हिंदू संन्याशाने नाहीत लिहिले. युरोपातील एका थोर तत्त्वज्ञान्याचे हे शब्द आहेत. स्पिनोझा त्याचे नाव.

आणि हे पाहा, उंचातील उंच झाडालाही आकाशाला स्पर्शता येत नाही. तो एक श्लोक आहे ना?

वाईटातही चांगले असे
चांगल्यातही दुष्टता दिसे।।
ठेवणे कुणा नाव ना बरे
आज ना उद्या जीव हा तरे।।

अत्यंत चांगल्या माणसातही काही दोष असतात. एखादा दुर्गुण असतो, एखादी उणीव असते, एखादी परंपरागत आलेली दुष्ट वृत्ती असते. एखादी चूक त्यांच्या हातून होते. कधीकधी स्वत:च्या गुणांचे जोरदार समर्थन हाही दोष होतो. आणि जर विश्वाच्या शक्तीची इच्छा असली तर या अशा एखाद्या चुकीचेही घोर परिणाम होतात आणि मग थोरामोठ्यांचीही करुण स्थिती होते. धर्मराजा वनवास येतो. त्याच्यावर महान प्रसंग, घोर आपत्ती ओढवतात. त्या नरवीरांची ती दशा पाहून आपण द्रवतो, हळहळतो. त्या थोरांचे दोष आपणातही असतात म्हणून आपणास त्यांचेबद्दल हळुवारपणा व आपलेपणा वाटतो असे नव्हे, तर त्या महान व्यक्तीच्या दोषांमुळे नव्हे तर केवळ दुर्दैवामुळे त्यांच्यावर दुर्दशेचा फेरा येतो, त्यामुळे अधिक वाईट वाटते. ज्यांना जगाने पापाचे पुतळे म्हणून ठरविले, ज्यांच्या उद्धाराची आशा नाही असे म्हटले, अशांनीही कधीकधी इतकी उच्च साधुता जीवनात प्रकट केली की, साऱ्या जगाने तोंडात बोटे घातली! इतिहासात अशी उदाहरणे थोडीथोडकी नाहीत. मोठे लोकही पडतात व पापीही चढतात आणि हे लक्षात ठेवून दुसऱ्यांना शिव्याशाप देताना जरा सबुरी करावी, जरा सावधगिरी राखावी. पुष्कळ गुन्हेगारांची गुन्हेगारी अभिजात नसून सामाजिक परिस्थितीचा तो परिणाम असतो. समाजातील विषमतेला जरी वैयक्तिकरित्या आपण प्रत्यक्ष जबाबदार नसलो, तरी आपण सारेच ती वाढ़वीत असतो. समाजातील गुंतागुंती, नाना परस्परविरोधी शक्ती यामुळे पाप वाढते, गुन्हे घडतात. महान कलावान आपणास दाखवीत असतात की, पतन अपरिहार्य आहे. आपण सारे ऑथेल्लोसारखे आहोत. आणि पुष्कळशा गोष्टी, ज्या हातून व्हायला नको असतात त्या अविचाराने होतात, हृदयशून्यतेमुळे नव्हे. विचारात चूक होते व आपण काही तरीच करतो. त्याचा अर्थ हृदयात सद्भाव नव्हता असा नव्हे. एखाद्याला बहिष्कृत करणे, एखाद्याला सर्वस्वी टाकाऊ समजणे हे बरे नव्हे. अशाने काही उपयोग होत नसतो. वरच्या स्वभावाखाली आपले नाना वासनाविकार खोल दडलेले असतात, आपल्या विकृती लपलेल्या असतात, आपली विचारशून्यता असते; परंतु या सर्वांवर एकच उपाय आहे तो म्हणजे शिक्षणाचा. हळूहळू आपण आपला सर्व स्वभाव ताब्यात आणू शकू, आपल्या सर्व वृत्तींना वळण लावू शकू. नवीन दृष्टी येते; नवीन मूल्ये, नवीन ध्येय दिसतात, नवीन व्यवस्था निर्मिता येते.

आज परंपरागत नीतिविरुद्ध बंड पुकारण्यात आला आहे. जागृत सदसद्विवेकबुद्धीचे हे चिन्ह आहे. काही थोड्याशा व्यक्ती उभ्या राहतात व त्या नीतीत बदल घडवून आणतात. हे निर्भय पुरुष पूर्वग्रह फेकून देतात व खरे काय आहे ते बघतात. आपल्या परंपरेला जे सत्य दिसत असे, तेवढेच काय ते सत्य, त्याहून दुसरे सत्य नाही, असे भासविण्याचा प्रयत्न परंपरेकडून केला जात असे; अशा त्या परंपरादर्शित सत्याहून अधिक व्यापक असे सत्य या सत्यार्थी वीरांना आढळते. नीतिशास्त्रात क्रांती घडविणारा प्रत्येक सुधारक हा प्रथम पाखंडीच मानला जातो. सनातनी लोक त्याला धर्महीन मानतात. या सनातन्यांना कोणताही बदल नको असतो. डोळस आचाराची त्यांना भीती वाटते. परंपरागत चालत आलेल्या नीतीच्या आरामदायक आलस्यात पडून राहावे असे त्यांना वाटते. चालू रूढीचा शिक्का करणे म्हणजेच नीतिमय असणे आणि त्या रूढीच्या विरुद्ध जो वागेल तो अर्थातच नीतिहीन! परंतु आजचा हा पाखंडी उद्याच्या पिढीचा देव होतो. उद्याच्या परंपरेचा तो आचार्य होतो. कोणताही काळ घ्या. त्या त्या काळी काही लोक अत्यंत प्रगत अशा जीवनाच्या कल्पनेहूनही पुढे गेलेले आढळतील; काही त्या प्रगत कल्पनेच्या आजूबाजूस असलेला आढळेल. पुढे जाणारे ते बंडखोर असतात, मागे पडणारे गुन्हेगार असतात आणि बाकीचे यथातथा असतात. जगातील सारी प्रगती त्या बंडखोरांमुळे होते. गतानुगतिक वृत्तीचे लोक कोणत्याही विचारांचे परीक्षण करणार नाहीत. जसे आले असेल तसेच पुढे चालविणे यातच त्यांचे समाधान असते. दुसऱ्यांच्या कुटाळक्या करीत ते आपला काळ दवडतात. दुसऱ्यांविषयी वाईटसाईट गोष्ट ऐकण्यातच त्यांना मजा वाटते. जेठे मारून बसतील व साऱ्या गावाच्या उठाठेवी करतील! दुसऱ्यांच्या ज्या गोष्टी ते ऐकतात, त्या गोष्टी काही साध्या नसतात. जीवनाची काही तरी गुंतागुंत त्यात असते. सामाजिक रचनेचे दुष्परिणाम त्यातून दिसत असतात. परंतु त्या जड जरठांना त्याचे काय होय? स्वत:ला सद्गुणांचे पुरस्कर्ते समजणारे सनातनी जगातील अन्याय दूर करण्यासाठी मात्र कधी उभे राहत नाहीत. अशा सनातन्यांचा काय उपयोग? केवळ यांत्रिक जीवन जगणे म्हणजे खडकाळ भूमीवर भटकणे होय! तेथे हिरवळ नाही, हळुवारपणा नाही, कोमलता नाही, सौंदर्यही नाही! परंपरागत नीतिशास्त्राला चिकटून बसणे वाईट आहे, असे नव्हे. परंतु त्याच्याविषयी हट्ट धरणे मात्र वाईट. परंपरेपासून आपण काही शिकू, आपणास

मार्गदर्शन होईल, काही प्रकाश मिळेल. परंपरेच्या खांद्यावर उभे राहून आपण अधिक दूरचे बघू शकू. परंतु परंपराच आपल्या डोक्यावर बसली तर मात्र प्रगतीच खुंटली. परंपरेचा परमेश्वर नका करू. तसे कराल तर दृष्टी अंध होईल आणि अंधळेपणाने वागाल तर अनीतीच्या चिखलात रुताल. कोणतेही नीतिनियम अविचल व अभंग मानाल तर अनीतीच्या चिखलात रुताल. कोणतेही नीतिनियम अविचल व अभंग मानाल तर प्रगती अशक्य होईल. जीवन म्हणजे महाप्रस्थान, जीवन म्हणजे एक मोठे साहसाचे काम. जीवन म्हणजे अज्ञानाचा शोध, सत्याचे प्रयोग. जीवन म्हणजे ठरावीक पद्धती नव्हे, चार रूढींची चाकोरी नव्हे. जीवनाचा खेळ असा आहे की, त्याचे सारे नियम संपूर्णपणे नीट समजणे अशक्य आहे. वस्तुस्थितिनिरपेक्ष असे कोणतेही नियम सुंदर जीवन कसे जगावे हे आपणास सांगणार नाहीत त्यांची मदत आपणास होणार नाही. आपण प्रत्यक्ष जगू या; विश्वाचा हेतू ध्यानात धरून, उत्क्रांतीचे नियम व ध्येय लक्षात ठेवून त्यांच्याशी आपल्या जीवनाचा मेळ घालीत पुढे जाऊ या. अशानेच प्रगती होईल, जीवनात राम वाटेल. आज समाजात अशांती का आहे? वाढते ज्ञान, नीतिशास्त्राचे ऐतिहासिकदृष्ट्या सम्यक् पर्यालोचन, आजच्या सामाजिक संस्था, यामुळे ही अशांती आहे. सुशिक्षित लोक म्हणतात, ‘‘सदसद्विवेकबुद्धीची आज्ञा आम्ही मानतो, परंतु तिच्यावर आमचा भरवसा तर नाही. कर्तव्यकर्म आम्ही पार पाडतो, परंतु त्यात काही अर्थ आहे असे तर वाटत नाही.’’ नैतिक जीवनाची रूढ कल्पना ते धाब्यावर बसवितात. नवीन आरोग्यदायी सुंदर प्रघात निर्माण व्हावे असे त्यांना वाटते. एखादा नवीन प्रघात पडताच सर्वसामान्य लोकांच्या मनाला धक्का बसतो. त्यांना कसेसेच वाटते. परंतु कसेसेच वाटणे म्हणजे काही सबळ कारण नव्हे. आपल्या पूर्वजांपेक्षा आपण जरा शिथिल बंधनांचे झालो आहोत असे जर कोणी म्हटले, तर त्यांचे ते म्हणणे सत्यार्थाने घेतलेच पाहिजे असे नाही आणि त्यांच्या म्हणण्याचा बाऊ करण्याचीही जरुरी नाही. त्यांनी असे म्हटले म्हणून आपला मोठा अपमान झाला असे वाटून घेऊ नये. किती तरी गोष्टी अशा आहेत की, ज्यांना हे गतानुगतिक लोक बऱ्या म्हणतात, त्यांना आपण आज रद्दी समजत आहोत. आपली रुची बदलली आहे. आवडीनिवडी बदलल्या आहेत, दृष्टी बदलली आहे. एक काळ असा होता की भार्या विकली जात असे व त्यात काही अब्रह्मण्यम् आहे असे वाटत नसे. तो रोमन मुत्सद्दी सेनेचा सौम्यमूर्ती होता. परंतु गुलामांना क्रॉसवर चढविण्याचे त्याला काही विशेष वाटत नसे. आपले गेले महायुद्ध सीझरच्या युद्धांपेक्षा जरी कमी

भीषण नसले, तरी सीझर जितक्या सहजतेने युद्धाचे समर्थन करी, तितक्या सहजतेने आज युद्धाचे समर्थन कोणी करीत नाही. नीतीच्या क्षेत्रातील तारे स्थिर नसतात. ते भ्रमण करीत असतात. नीतीच्या प्रांतातील प्रकाश अंधुक असतो. परंतु एका दृष्टीने मात्र पूर्वजांपेक्षा आपण नक्की घसरलो आहोत. आपण एखाद्या ठरीव साच्याप्रमाणे वागत नसलो तरी त्याचे दु:ख नाही. दु:ख आहे ते हे की, आपण फारच उथळ झालो आहोत. एक प्रकारचा फालतूपणा सर्वत्र दिसून येत आहे आणि धोका आहे तो येथेच. आपल्या विचारात, आपल्या आचारात एक प्रकारचा थिल्लरपणा आला आहे. जीवनात जणू मूल्यच राहिलेले नाही. जीवन म्हणजे एक गंमत झाली आहे. आजच्या जीवनाचा रोग आहे तो हा क्षुद्रपणाचा. या रोगातून मुक्त व्हायचे असेल तर एकच उपाय आहे. कोणतेही ध्येय निवडा, कोणताही मार्ग घ्या; परंतु उत्कटपणे तदर्थ अहोरात्र झिजा. वीर व्हा. झुंजार व्हा. त्या त्या ध्येयासाठी आटापिटा करणारे कर्मवीर व्हा. वीरता हवी असेल तर तपश्चर्या हवी; निग्रह, संयम, विलासविन्मुखता यांची जोड हवी, एक प्रकारची कणखर वृत्ती हवी. गुळमुळीत व मुळमुळीत असून भागणार नाही. तसेच दुसऱ्यांविषयी सहानुभूती, उदारता, माणुसकी यांचीही जरुरी आहे. म्हणजेच जे आहे त्याचा स्वीकार करून, नवीन उभारण्यासाठी हिंमतीने उभे राहिले पाहिजे.

कौटुंबिक जीवन

मानवी जीवनाची विविध रूपे आहेत : शारीरिक, मानसिक, भावनात्मक, कलात्मक, नैतिक, आध्यात्मिक. किती तरी प्रकार! हे सारे प्रकार पवित्र आहेत. कारण दिव्यतर जीवनाकडे जाण्याची ती साधने आहेत. देहाची वा आंतरमनाची कशाचीही उपेक्षा करू नका. देहाला जपा, प्राणांची काळजी घ्या. आपण विशाल जीवन हे ध्येय करू या, जीवनाच्या पैलूपैलूला पूर्णत्व देऊ या. कोणत्याही अंगाची उपेक्षा नको. सर्वांगीण वाढ, सर्वांगीण विकास. त्या त्या बाबतीतील जी परमोच्च स्थिती ती ती प्राप्त करून घेऊ या. लैंगिक वृत्तीचाही स्वीकार करू या विवाहसंस्थेच्या साह्याने या आपल्या विकारात्मक वृत्तींमधूनच अधिक उच्च असे जीवन उभारू या. कोणत्याही इच्छेला बळी पडणे म्हणजे अव्यवस्थितपणा व गोंधळ माजविणे होय. लहरीला शरण जाण्याचे आपण जीवनाला कोणताच आकार देऊ इच्छित नाही, जीवनाला महत्त्वच देत नाही, असे होईल.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

दोन जीवांचे लग्न लागते. रतिक्रिया म्हणजे एक प्रतीक आहे, चिन्ह आहे. आंतरिक ऐक्याची ती बाहेरची खूण. ते बाह्य शरीरमीलन मनोमीलनाचे निदर्शक आहे. ती मनोमय सुभगता, प्रसन्नता व एकता त्या बाह्य क्रियेने प्रतीत होते असे असेल तरच ते खरे लग्न. प्रेमाची वेल चढण्यासाठी समान ध्येयाची सुंदरशी कमान हवी. त्या ध्येयाच्या कमानीखाली दोघांचे जीवन वाढेल. त्या ध्येयासाठी दोघे आपली जीवने अर्पितील. पति-पत्नी एकमेकांचा स्वीकार करून, परस्परांच्या विविधतेतून एक नवीन सुंदर अशी एकता निर्माण करतात. परस्परांनी खरोखरचे नाते निर्मिण्यासाठी सहकार्याने प्रयत्न केला पाहिजे. ज्या ज्या अडचणी येतील, त्यांच्या परिहारार्थ उभयतांनी झटले पाहिजे. दोघांनी सहनशीलता दाखविली पाहिजे; अधीर होता कामा नये. संयम, क्षमा, उदारता, दया या गुणांनी संपन्न असे उभयतांनी असले पाहिजे. दोघांनी सावध व दक्ष असावे. अशा रीतीने ती वागतील तरच संसार सुंदर होईल. विवेकाने व विचाराने विकारांना जरी सौम्य करण्यात आले, तरी या कर्मात संपूर्ण सिद्धी कधीच मिळत नसते. अगदी चांगले उदाहरण घेतले तरीही आपणास असेच म्हणावे लागेल की, विचाराचे डोळस जीवन जगण्याचा सतत प्रयत्न करणारा प्राणी म्हणजे मानव. ''मनुष्य म्हणजे विचारात्मक प्राणी'' असे म्हणण्याऐवजी ''वैचारिक जीवनाकडे जाण्यासाठी धडपड करणारा प्राणी'' असे म्हणणेच अधिक युक्त होईल. विवाहाचा जो प्रकार आहे तो आनंदमयही आहे व दु:खमयही आहे. विवाह म्हणजे सदैव मधुचंद्र अशी भ्रामक कल्पना करून घेणारी जोडपी, सुखाला जरा अडथळा येताच हे वैवाहिक बंधन नको असे म्हणू लागतात व काडीमोड करून घेतात पुष्कळशा काडीमोडी पतिपत्नी परस्परांशी एकनिष्ठ नव्हती, किंवा संभोगसुखात काही चुका झाल्या, म्हणून होतात असे नाही. परस्परांचे स्वभाव जुळत नाहीत, परस्परांच्या आवडीनिवडी निरनिराळ्या असतात, यामुळेच बरेचसे घटस्फोट होत असतात. लग्नसंस्था दोन जीवांच्या विकासार्थ आहे ही गोष्ट जर आपण मान्य केली, तर मग कितीही अडचणी येवोत वा विघ्ने येवोत, त्यातून पलीकडे जाण्यासाठी दोन्ही जीवांनी झटणे हेच कर्तव्य ठरते. येणारी प्रत्येक अडचण म्हणजे पुढे जाऊ पाहणाऱ्या त्या दोन जीवांना आव्हान असते. त्या अडचणींना शरण जाऊन काडीमोड करून घ्यावयाची, की त्या अडचणी जिंकून दोघांनी अधिक उत्साहाने पुढे जावयाचे? परस्पर गैरसमज होताच एकमेकांचा त्याग न करता, एकमेकांस चिकटून राहणे यातच

कृतार्थता आहे. एकमेकांच्या लहरी एकमेकांनी सांभाळल्या पाहिजेत. कोणाला कधी काय वाटेल, कोणाला कोणती हुक्की येईल, त्याचा काय नेम सांगावा? कोणाची कोणती मन:स्थिती असेल, कशी असेल, ते नीट पाहून वागले पाहिजे. परस्परांच्या आवडीनिवडी भिन्न असल्या, एकमेकांचे काही विशिष्ट स्वभाव असले, तरी त्यामुळे कंटाळून जाता कामा नये. अशा परिस्थितीतच आपल्या चिकाटीची, सहनशीलतेची कसोटी. अशातूनच सुंदर सहकार्य निर्मावयाचे. एकमेकांच्या आधाराने परस्परांनी विकास करून घ्यायचा. एकमेकांनी काही पापे केली तरीही एकमेकांनी एकमेकांस सोडू नये असे मी म्हणेन. कितीही म्हटले तरी घटस्फोट खाली नेणारे दुबळे व अविकसित जीवच घटस्फोटाचा आश्रय करतात. आरोग्य व सुख हेच काय ते मानवी जीवनाचे साध्य असे त्यास वाटते. स्वत:ची आंतरिक वाढ त्यांच्या डोळ्यांसमोर कधीही नसते. ज्यांची थोडीफार आंतरिक वाढ झालेली आहे, ज्यांच्या जीवनाचा थोडाफार विकास झाला आहे, असे लोक तीव्र वेदना झाल्या, जखमा झाल्या, तरी त्या दु:खाचा स्वीकार करतात. त्या दु:खाने त्यांचा आत्मा दुबळा न होता उलट अधिक बलवान; होतो. परंतु स्वार्थी वृत्तीने आत्मा कधीही उन्नत होत नाही, शक्तिशाली होत नाही. पुरुषांपेक्षा स्त्रियांनीच अधिक सोशिकता व क्षमावृत्ती दाखविल्या आहेत. पुरुषांचे अपराध व चुका त्या पोटात घालतात. कारण त्यांच्यावर त्या प्रेम करतात. स्त्रियांमध्ये एक प्रकारची विशेष विकसित अशी सुंदर आध्यात्मिकता असते. पुरुषांनीही ती संपादण्याचा निश्चय केला तर बरे.

उच्चतर जीवनाकडे जाण्यासाठी लहान मुले मुदत करतात. आईबापांना मुलांबद्दल उपजत प्रेम असते; आणि मुलांबरोबर वागताना साहजिकच आईबाप समान भावनांचा अनुभव घेतात. नकळत उभयतांचे सहकार्य होते; सखीभाव वाढतो. परंतु अलीकडे आईबाप मुलांकडे काडीमात्र लक्ष देत नाहीत. ती आपल्याच सुखात दंग असतात. मुलांबद्दलचे कर्तव्य कायम, याचा विचारही त्यांना शिवत नाही. आता सरकारनेच बालसंगोपनगृहे स्थापिली आहेत. परंतु ही गृहे कधीही लोकप्रिय होणार नाहीत. मुलांच्या नानाविध विकासांसाठी आईबापांच्या प्रेमाची व समजूतदारपणाचीच जरुरी आहे. आईबापांची जागा कोणीही भरून काढू शकणार नाही. आईबापांचे आध्यात्मिक जीवन जितके खोल असेल, तितके मुलांपासून दूर व्हावे असे त्यांना कमी वाटेल. घटस्फोटांचा नीट अभ्यास केला तर असे दिसेल, की

बहुतेक घटस्फोट मुलांबाळांविरहित दांपत्यांनी केले. बहुतेक स्त्रियांना मूलबाळ व्हावे अशी उत्कट इच्छा असते. त्यांना तसे आतून वाटत असते. पुरुषांनाही तशीच इच्छा असते. आणि जोपर्यंत ही आंतर इच्छा मेली नाही, जिवाची ही भूक नष्ट झाली नाही, तोपर्यंत लग्न म्हणजे आजन्म सख्य, मरेपर्यंत भागीदारी, असाच अर्थ राहील.

अर्वाचीन अशांतता आपणास बजावते की, सद्गुण हे पडद्यात वाढत नाहीत. जे सद्गुण सक्तीने, बाह्य दडपणाने आणले जातात, जे सद्गुण विचारांची निर्मिती नसून अज्ञानाने व गतानुगतिकत्वाने म्हणून येतात, ते सद्गुणच नव्हेत. निराधार व अगतिक वाटल्यामुळे स्त्रिया पतिनिष्ठ राहत असतील, कुटुंबात कशा तरी मारून मुटकून असमाधानाने नांदत असतील, तर त्याला का आपण सद्गुण म्हणू? ज्ञानपूर्वक येणारा संयम हा थोर आहे. अज्ञानाने सहजासहजी आपण निष्पाप राहिलो तर त्यात पुरुषार्थ नाही. नीती म्हणजे वैचारिक प्रक्रिया. लक्षावधी स्त्रियांना जर रतिहीन राहावे लागत असेल तर, किंवा वेश्यांचा धंदा स्वीकारावा लागत असेल तर, अर्वाचीनांनी एकपत्नीत्वाच्या नियमाचा फिरून विचार केला पाहिजे. विवाहसंस्था अनिर्बंध होणे जसे अहितकारक आहे, तसेच ती संस्था अपरिवर्तनशील व संकुचित होणेही हानिकारकच्चर. अति सैल नको, अति ताणही नको. स्त्रिया काय किंवा पुरुष काय, उभयतांना एकच नीती असावी. त्यासाठी खाली येण्याची जरुरी नाही; उलट वरच जावे लागेल. स्त्रियांनी पुरुषांच्या दर्जाला खाली येण्यापेक्षा, पुरुषांनी स्त्रियांच्या दर्जाला वर चढवावे. युगानुयुगे ज्या शिक्षा स्त्रियांवर लादल्या जात होत्या, त्यापासून आज नवीन ज्ञानामुळे स्त्रिया मुक्त झाल्या आहेत. परंतु हे नवीन ज्ञान व स्त्रियांना मिळालेले हे नवीन स्वातंत्र्य यांची भीती वाटायला नको. जोपर्यंत श्रद्धेने व धैर्याने आपण परिस्थितीला तोंड देत आहोत, तोपर्यंत नाव आपटण्याची भीती नाही. संक्रमणावस्थेत काही काही व्हायला नको अशाही गोष्टी घडतात; त्याला उपाय नसतो. पूर्वीच्या पिढीतल्यापेक्षा आजच्या शिकणाऱ्या मुली लैंगिक जीवनाचे बाबतीत अधिक जागृत व विकसित असतात. त्या मुलीही म्हणतात की, ''आम्ही काही त्रेतायुगातील नाही. आम्ही आजच्या आहोत. आम्ही अशा वागणारच.'' त्यामुळे सनातन्यांना धक्का बसतो. शाळा-कॉलेजातून सहशिक्षण असते, त्यामुळे असभ्य वर्तनाला थोडी चेतना मिळते.

स्त्रियांमध्ये जी अशांतता आहे, तिचे मुख कारण म्हणजे आज त्यांचे जीवितकार्यच त्यांना मिळत नाही. त्यांना चुकल्याचुकल्यासारखे वाटत आहे. कवी बायरन म्हणत असे, ''प्रेम ही पुरुषांच्या जीवनातील एक वस्तू आहे; तो एक कप्पा

आहे, तो एक भाग आहे. परंतु प्रेम म्हणजे स्त्रियांचे सारे जीवन, सारे अस्तित्वच.'' सर्वसाधारणपणे आपण असे समजतो की, स्त्रियांची जागा म्हणजे घरात, गृहिणी घरातच शोभते. परंतु गृहिणीचे गृह आहे कोठे? आज घरेच नाहीशी होत आहेत! यंत्रामुळे घरातील कामधाम कमी झाले आहे. उपाहारगृहांनी घराला उद्ध्वस्त केले आहे. यामुळे स्त्रियांजवळ भरपूर उत्साह व शक्ती शिल्लक उरतात. हा उत्साह कशात ओतावयाचा? शक्ती कशात खर्चायची? पती तर पूर्वीपेक्षा अधिकच कार्यव्याप्त झाला आहे. त्याला क्षणाची फुरसत नसते. मग पत्नीने वेळ कसा दवडायचा? ज्यात मन लागेल, लक्ष लागेल, असे काम नसल्यामुळे स्त्री दु:खीकष्टी होते. ती असमाधानी होते, अस्वस्थ होते. तिच्या जीवनात अर्थ राहत नाही, हेतू राहत नाही. तिचे जीवन म्हणजे का कचरा? स्त्रियांना मग मानसिक रोग जडतात. त्यांना फेफरे वगैरे येऊ लागते, कधी कधी वेडही लागते. अशा परिस्थितीत स्त्रियांनी काय करावे? जवळ पैसा असेल व वेळ असेल, तर एखादी स्त्री आपला हा रिकामा वेळ भरून काढण्याची खटपट करते. मग ती करते गंमत, करते मजा! वेडेवाकडेही जरा वागते. स्वत:च्या काही अतृप्त भुका ती शमवू पाहते, काही सुख भोगते. तिचे पूर्वीचे घरकाम नाहीसे झाले आणि नवीन तर आले नाही. लग्न काही सर्व दिवसभर काम देत नाही, पुरेसे काम देत नाही. विवाहित स्त्रियांची जर ही कहाणी, ही दुर्दशा, तर मग अविवाहित स्त्रियांची किंवा मूलबाळ नसलेल्या विधवांची, किंवा ज्या विधवांची मुले वयात येताच किंवा विवाहित होताच त्यांना सोडून जातात त्यांची काय बरे मन:स्थिती होत असेल? सर्व दु:खाचे कारण एकच आहे, की करायला पुरेसे काम नाही, वेळ जायला साधन नाही. जीवनातील हा रिकामेपणा स्त्रियांना अनैसर्गिक व अस्वाभाविक मार्गाकडे न्यायला कारणीभूत होतो. कुटुंबांतच त्यांना काम मिळेल अशी योजना करणे, त्यांच्या स्वभावास अनुरूप व अनुकूल असा उद्योग त्यांना देणे हे कर्तव्य आहे, ही न्याय्य अशी गोष्ट आहे.

शारीरिक आनंदाचे स्तोम माजविणे चुकीचे आहे. विचाराच्या व बुद्धीच्या नियंत्रणाशिवाय केवळ भावनेच्या उद्रेकाने कर्मे करणे म्हणजे पुन्हा तिर्यक्‌योनीकडे जाणे होय, पुन्हा पशुत्वाकडे जाणे होय. वासनांनी बुद्धीच्या नियंत्रणाची जागा घेऊ नये. आत्म्याचे प्रकटीकरण म्हणजे वासना-विकारांचे प्रदर्शन नव्हे. सुखासक्ती म्हणजे आत्म्याचा अविष्कार नव्हे. जीवनात मोकळेपणा हवा व जी बंधने स्वत:च्या

जीवनातून, स्वत:च्या इच्छेतून निर्माण झालेली नाहीत, ती स्वीकारणे योग्य नव्हे असे म्हणण्यात येते. विचारदृष्ट्या हे म्हणणे कितीही रास्त असले, तरी अप्रगल्भ अशा तरुणांनी अशा रीतीने वागणे धोक्याचे आहे. तसे त्यांना वागू देणे हितावह होणार नाही. बाह्य बंधनातूनच आंतरिक बंधने उत्पन्न होतात. बाह्य शिस्त पाळून मग स्वत:ची आंतरिक शिस्त येते. बाह्य बंधनांची ज्यांना अत:पर जरुरी नाही, अशांनाच ती बंधने झुगारण्याचा अधिकार आहे; त्यांनाच आज्ञा मोडण्याचे स्वातंत्र्य आहे, परंतु असे हे स्वातंत्र्य मिळविण्यापूर्वी व्यक्तीने स्वत:ला शिस्त लावून घेतली पाहिजे. संयमी राहण्यास शिकले पाहिजे. व्यक्तीला एक दिवस पूर्ण स्वातंत्र्य मिळावे यासाठी आज संयमी जीवन जगायला आपण तिला मदत केली पाहिजे. जे तरुण आहेत, अद्याप पोरवयाचे आहेत, त्यांनी स्वत:ची इच्छा प्रमाण असे म्हणून चालणार नाही. आपण म्हणू तो कायदा असे त्यांनी करणे योग्य नाही. कसे तरी लहरीप्रमाणे वागणे, मनात येईल त्याप्रमाणे संगती जोडणे, संबंध जोडणे हे बरे नव्हे. लग्न म्हणजे गंमत होऊ नये, खेळ होऊ नये. लग्नासंबंधी भ्रामक कल्पना व भ्रामक ध्येये असणे बरोबर नाही. लग्न म्हणजे गंभीर पवित्र वस्तू आहे. अत्यंत अर्वाचीनलेले कोणी कोणी घटकाभर राहणाऱ्या लग्नालाही ''कायदेशीर'' म्हणून संबोधतात. लग्न म्हणजे का इतकी हास्यास्पद वस्तू? कोणी कोणी प्रायोगिक, तात्पुरत्या लग्नाची प्रथा सुचविली आहे; पुढे जमले तर खरे लग्न लावावे. परंतु ही प्रायोगिक लग्ने म्हणजे सदर परवाना असलेला व्यभिचारच म्हणायचा! अशा गोष्टींचे पुरस्कर्ते भूतकाळाकडेच लक्ष देत नाहीत असे नव्हे, तर मानवजातीच्या भवितव्याकडेही दुर्लक्ष करतात. लग्न म्हणजे लैंगिक वासना तृप्त करण्याचे एक साधन यापलीकडे अधिक अर्थ हे लोक लग्नाला देऊ इच्छित नाहीत. लग्नातून शेवटी स्वत:चा विकास व्हावा, आध्यात्मिक साक्षात्कार व्हावा, उच्चतर जीवनाकडे जाण्याचे ते एक साधन व्हावे, नाना गुण अंगी यावे, लहर थोडी कमी व्हावी. उच्छृंखलता नष्ट व्हावी, अशी दृष्टीच या अर्वाचीनांजवळ नाही. तारुण्याच्या उन्मादात, त्या पहिल्या नव्या नवतीच्या भरात सारी बंधने झुगारून युवकयुवती परस्परांस मिठ्या मारतील, मनसोक्त वागतील; परंतु ज्या वेळेस जीवनात परिपक्वता येईल, प्रौढपणा येईल, त्या वेळेस त्यांना आढळून येईल, की स्वैराचाराने आध्यात्मिक व सामाजिक हानी तर होतेच, परंतु जे सुख त्यांना पाहिजे असते ते सुखही अशाने नीट मिळत नाही.

आर्थिक संबंध

एखाद्या वस्तूचा दुरुपयोग केला जातो एवढ्यावरून तिचा नीट उपयोग करून घेऊ नये असे नव्हे. अग्नीने कोणी आगही लावील; म्हणून का आपण स्वयंपाक करण्याचेही बंद करायचे? सृष्टी कधीकधी उग्र स्वरूप धारण करते. सृष्टीच्या अशा उग्र रूपापासून मानवजातीला वाचवायचे असेल, तर शास्त्र मदत करू शकेल. शास्त्रांची वाढ होत आहे. उत्तरोत्तर अधिकाधिक शक्ती मानवाच्या हाती येत आहे, नाना साधने मिळत आहेत, उपलब्ध होत आहेत; त्या सर्वांचा नीट बुद्धिपूर्वक उपयोग करू तर कल्याण होईल. प्राचीन काळी ग्रीक लोक काहींना गुलाम ठेवीत व मग स्वतःची सुधारणा करीत! दुसऱ्यांना राबत ठेवून स्वत: मोकळे राहत व सुख-संस्कृती भोगीत. तशी जरुरी आज राहणार नाही शास्त्रांच्या सदुपयोगाने मानवी शक्ती वाचेल; सुखाची व संस्कृतीची सर्वांना संधी मिळेल. गिरणीतील कापडापेक्षा हातसुताची खादी अधिक पवित्र, मोटारीपेक्षा बैलगाडी अधिक श्रेष्ठ, असे धर्म सांगत नाही. जपायचे ते इतकेच, की यंत्रांची गुलामगिरी वाढू नये. मनुष्यांना धुरकटलेल्या शहरात व घाणेरड्या अंधारमय तुरुंगात यंत्रांनी डांबू नये. हिरवी शेते दृष्टीस पडणार नाहीत, निळे आकाश दिसणार नाही. असे यंत्रांनी करू नये.

श्रम व फुरसत असे शब्द आपण का वापरतो? आपल्या कामात आपणास आनंद वाटत नाही म्हणून निराळ्या फुरसतीची जरुरी वाटते. आपल्या कामात आपले मन नसते, म्हणून ते काम आनंददायक वाटत नाही. ते काम जणू बोजा वाटते. समाजाला आवश्यक वस्तू पुरवण्यासाठी असे कंटाळवाणे काम आपण करतो. कामगारांना कामातच आनंद वाटेल असे केले पाहिजे. कारखान्याच्या सर्वसाधारण व्यवस्थेत कामगारांनाही आपलेपणा वाटेल असे केले पाहिजे. हा कारखाना आपला असे त्यांना वाटेल, तरच त्या कामात आनंद येईल. अशी आपुलकीची भावना त्यांच्यात उत्पन्न केली पाहिजे.

मनुष्याच्या गरजा दोन प्रकारच्या असतात : काही आर्थिक व भौतिक असतात; पैसा, मुख, सत्ता, प्रतिष्ठा वगैरे या प्रकारात येतात. दुसरा प्रकार म्हणजे सामाजिक व आध्यात्मिक गरजांचा. उदाहरणार्थ, सचोटी, ज्ञान, न्याय, खेळीमेळीने वागणे, सहानुभूती, दुसऱ्याचे नीट समजून घेणे, निष्पक्षपातीपणा, सेवा वगैरे. कामाकडे केवळ धंदा या दृष्टीने बघता कामा नये. धंदा म्हटला म्हणजे तो बाजारभावानुसार नियमित

करावा लागतो. आपण आपल्या कामाकडे अशा दृष्टीने बघावे की, ''यामुळे मी समाजाच्या गरजा पुरवीत आहे, समाजसेवेचे साधन म्हणून हे माझे काम आहे.'' कामगारांनीही इकडेतिकडे वारेमाप न जाता आपण एकाच जिवंत संघटनेचे घटक आहोत अशा रीतीने बंधुभाव वाढवावा. त्यांची संघटनॉ एकजीवी झाली पाहिजे. आज कोणी कोणाचे म्हणणे नीट समजूनच घेत नाही. परस्पर-समजूतदारपणा वाढला पाहिजे. सामुदायिक जीवनात व वैयक्तिक जीवनात आपण एक व्यापक व जिवंत अशी माणुसकीची व आध्यात्मिकतेची भावना निर्माण केली पाहिजे. काम करणाऱ्या निरनिराळ्या घटकात एक प्रकारची सामुदायिक भावना उत्पन्न झाली पाहिजे. आपण परस्परावलंबी आहोत ही वृत्तीही अशा सामुदायिक भावनेत अवश्य हवी.

पैसा म्हणजेच सर्व काही नव्हे. उत्कृष्ट वस्तू पैशाने विकत घेता येत नाहीत. मनाचे व हृदयाचे समाधान, सुख व शांती, सद्भाव व सदिच्छा या वस्तू बाजारात मिळत नाहीत. धनाच्या राशी ओतल्या तरी त्या लाभत नाहीत. आणि याच वस्तू सर्वांना हव्या असतात. सर्वांना यांची इच्छा असते. जीवनात केवळ उपयुक्ततावाद नसतो. माणसे म्हणजे का संपत्ती निर्मिणारे? माणसे म्हणजे का केवळ हमाल व मजूर? आपण आधी मनुष्य आहोत, मानव आहोत. आणि म्हणूनच सौंदर्याचे प्रेम, मनाचा विकास वगैरे गोष्टी आपणास ओढतात. जोपर्यंत मनाचे समाधान नाही, मनाचे स्वातंत्र्य नाही, तोपर्यंत बाह्य सोंगेढोंगे काय कामाची? बाहेरचे रागरंग काय किमतीचे? मनुष्याचे भौतिक जीवन सुधारण्यासाठी आपण हपापलो आहोत आणि म्हणून आज बदलत्या संस्थांवर आपले सारे लक्ष केंद्रित झाले आहे. अर्वाचीन जीवन यंत्रमय व गुंतागुंतीचे झाले आहे आणि त्यातच आपण गुरफटलो आहोत. त्यात सुधारणा कशी करायची? या बदलत्या काळात सुखसमाधान कसे निर्मावयाचे? काय फेरफार हवे? जोपर्यंत मनुष्याच्या गरजा वाढत नाहीत, त्या गरजांचे स्वरूप बदलत नाही, तोपर्यंत सामाजिक संस्थात व यांत्रिक संघटनात कितीही सुधारणा केल्या तरी उपयोग नाही. भौतिक व आर्थिक गरजा, सामाजिक व आध्यात्मिक गरजा जोपर्यंत नीट भागविल्या जात नाहीत तोपर्यंत काय? जीवनातील रामरगाड्यापासून शास्त्र मुक्त करील; जीवनातील ओसापडणा, भकासपणा शास्त्रामुळे दूर होईल; शास्त्रामुळे रिकामा वेळही मिळेल. परंतु आपल्या रिकाम्या वेळाचा सदुपयोग करण्यासही आपण शिकू या. नीट शिक्षण दिले तर हे होईल.

राजकारण

लोकशाहीचा अर्थ काय? समाजाने आपला कारभार स्वत: हाकणे म्हणजे लोकशाही. समाजाचे स्वराज्य म्हणजे लोकशाही. सर्वांत चांगली राज्यपद्धती कोणती? जी कमीतकमी राज्य करते ती. मनुष्यस्वभाव मूळचा चांगला आहे अशी ध्येयवादी दृष्टी जे पत्करीत नाहीत, ते शासनपद्धतीची अधिक सत्ता असावी असे प्रतिपादितात. 'सक्तीने मनुष्यस्वभाव दबला जाईल' असे मनुष्यस्वभावाची ज्याला काही प्रतिष्ठा वाटते असा मनुष्य तरी म्हणणार नाही. मनुष्य म्हणजे रानटी पशू असे ज्याला वाटत असेल तो मात्र म्हणेल की, जरब दाखविली की सारे ठिक होईल. कोणत्याही राज्यशासनाचा हेतू असा असावा, की शेवटी मनुष्य एक दिवस स्वयंशासित होईल.

लोकशाही म्हणजे 'बहुजनसमाजाची इच्छा. सार्वभौम' असे समजायचे. परंतु विशिष्ट तांत्रिक गोष्टी बहुजनसमाजाच्या इच्छेला झेपणार नाहीत. हिंदुस्थानची राज्यघटना कशी असावी, आयात निर्यात-करातील सुधारणा, अशासारखे प्रश्न तज्ज्ञांसमोरच ठेवावे लागतात. बऱ्याचशा देशात लोकशाही यशस्वी झाल्यासारखी दिसते, कारण ती खरी लोकशाही नाही म्हणून! लोकशाही अद्याप कोठेच नाही. ती अद्याप दूर असलेले, अप्राप्त असे ध्येयच आहे. परंतु एक चालचलाऊ तत्त्व म्हणून लोकशाहीचा आपण आधार घेतो, 'लोकशाही' तत्त्वाचा स्वीकार करतो. याचा अर्थ इतकाच की मनुष्याच्या व्यक्तित्वाचे काही जन्मजात हक्क असतात, या हक्कांचे दुसऱ्यांशी वागताना कधीही अपहरण होता कामा नये, हे हक्क सदैव आदरिले गेले पाहिजेत- मग ते हक्क स्त्रीचे असोत वा पुरुषांचे असोत. 'स्त्री-पुरुष' हा भेद येथे नाही. व्यक्ती कोणता धंदा करते, या गोष्टीलाही येथे महत्त्व नाही. व्यक्तित्व पवित्र आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या विशिष्टत्वाचा विकास करायला वाव असला पाहिजे. जे जे उत्कृष्टत्व मिळविण्याची प्रत्येकात पात्रता असेल, त्या त्या उत्कृष्टत्वाच्या जवळ जाणे मनुष्यास शक्य असले पाहिजे, ते ते पूर्णत्व, त्याला मिळवता येईल असे करता आले पाहिजे. लोकशाहीचा असा अर्थ नव्हे, की तत्त्वज्ञान, साहित्य, कला, शास्त्र, कायदा, राजकारण, यातील मूल्यांचा निर्णय करण्याची पात्रता सर्वांजवळ सारखी असते. ती कमीअधिक असते. कोणाचा एखाद्या बाबतीत अधिक विकास झालेला असतो, कोणाचा कमी झालेला असतो. प्रत्येकाचे प्रयत्न निराळे, गुणधर्म निराळे.

आइन्स्टिनचा शोध बरोबर की चूक हे आपण सर्वांची मते घेऊन ठरवू शकणार नाही. मनुष्य म्हणजे विचार करणारा प्राणी अशी जरी व्याख्या असली, तरी सारे बुद्धीचा उपयोग करतातच, विचारपूर्वक वागतातच असे नाही आणि त्यांची बुद्धी सर्व क्षेत्रात अंकुठितपणे चालेल असेही नाही. लोकशाहीचा असा अर्थ नाही, की आपण सर्व बाबतीत समान आहोत. मनुष्यात असमानता सदैव राहणारच. कोणी लठ्ठ असतील, कोणी काटकुळे असतील; कोणी उंच असतील, कोणी बुटबैंगण असतील; कोणी मोठे असतील, कोणी छोटे असतील. भेद कधीही नष्ट करता येणार नाहीत. त्याचप्रमाणे कोणत्याही सामाजिक संस्थेला वस्तुनिरपेक्ष अशी सर्वांना अगदी काटेकोर व तंतोतंत समान अशी संधी देता येणे शक्य नाही. मनुष्य कोणत्या सामाजिक स्थितीत आहे, त्या स्थितीची त्याच्यावर क्रिया-प्रतिक्रिया काय झाली आहे, होत आहे, या सर्वांवर दिलेल्या संधीचा तो कितपत उपयोग करून घेईल हे अवलंबून राहील. संधी मिळणेही या अशा अनेक गोष्टींवर अवलंबून असते. 'परंतु सर्वांना समान संधी' हे सामाजिक ध्येय निर्दोष आहे. अज्ञानाचे व दारिद्र्याचे अडथळे आपण दूर केले पाहिजेत. थोर कला व वाङ्मय यांना मनुष्यांच्या हृदयात खोल जाण्यास अवसर दिला पाहिजे. त्यांची पाळेमुळे खोलवर जातील असे केले पाहिजे. देशाचा सांस्कृतिक दर्जा आपण वाढविला पाहिजे प्रत्येकाला स्वत:चे स्वस्वरूप पाहता येईल, स्वत:चा विकास करून घेता येईल असे केले पाहिजे. प्रत्येकाच्या जीवनात भावना, विचार व कृती यांची एकता राहील असे वातावरण निर्मिले पाहिजे. लोकशाही म्हणजे काही सहजस्थिती नव्हे. हे ध्येय आहे; आणि हे ध्येय प्रयत्नाने व शिक्षणाने साध्य करायचे आहे. राजकीयदृष्ट्या लोकशाही आज तितकीशी यशस्वी नाही, याचे मुख्य कारण मतदार आपले मत विचारपूर्वक व प्रामाणिकपणे देत नाहीत हे आहे, मतदारांची बुद्धी वाढली पाहिजे व पुढाऱ्यांचा प्रामाणिकपणा वाढला पाहिजे. असे होईल तर लोकशाही अधिक यशस्वी होईल. ध्येयभूत पूर्णतेच्या दृष्टीने आजची लोकशाही जरी हिणकस ठरली, तरी भूतकालीन राज्यपद्धतीपेक्षा ती शतपटीने बरी. अर्थातच काही अनियंत्रित राजे असेही झाले की, ते अति उदार होते; त्यांच्या कारकिर्दीत लोकांना सुख व शांती यांचा लाभ झाला. परंतु ते अपवाद आपण सोडून देणेच बरे. लोकशाहीत सार्वजनिक शांती व सुस्थिती अधिक राहते. कारण, मतदारांना राज्यकारभाराला दिशा दाखविण्याची जी सत्ता असते, त्यामुळे ते आपले

असमाधान प्रकट करतात. मनातील कुरबुरी, असंतोष चर्चेच्या वेळी प्रकट होतात. मनातील सारे ओकले जाते. मतानील जमलेल्या वृत्तींना व विचारांना प्रकट होण्यास हा जो वाव मिळतो, त्याने सार्वजनिक आरोग्य राहायला मदत होते. समाज नीटनेटका व जरा सुखासमाधानाने राहतो.

आंतरराष्ट्रीय संबंध

सर्व राष्ट्रांचा एक जागतिक संघ व्हावा व गुण्यागोविंदाने सर्वांनी राहावे, असे तोंडाने केवळ म्हणून काहीएक निष्पन्न होणार नाही. ओठावर सुंदर व उदात्त शब्द खेळविल्याने धेयाचा साक्षात्कार होत नसतो. अशी मोठमोठी ब्रीदवाक्ये उच्चारणे ही आजकालची पद्धतच झाली आहे परंतु त्या शब्दात आत्मा नसतो. सर्व जगाचे एक कुटुंब व्हावे यासाठी जगातील मालमत्ता सर्वांची, असे होण्यासाठी आधी बंधुभाव वाढविला पाहिजे. राष्ट्राराष्ट्रात सहकार्य वाढले पाहिजे. आज तर सर्वत्र गैरसमज माजले आहेत. देशभक्तीच्या नावाने सर्वत्र विनाश होत आहे. ज्या राष्ट्रचे आपणास ज्ञान नसते त्या राष्ट्राचा आपण द्वेष करतो. एकमेकास नीट समजून घेऊ या. न्यूमनने एक अनुभव सांगितला आहे; त्या वेळेस इंग्लडचे नेपोलीयनशी सारखे युद्ध सुरू होते. लंडन शहरातून इकदा फ्रेंच कैदी जात होते. इंग्रज लोकांची गर्दी झाली होती. ती गर्दी त्या अभागी फ्रेंचांना पाहण्यासाठी झाली होती. फ्रेंच लोक कसे असतात, कसे दिसतात, ते सर्वसाधारण इंग्रजांना कोठे माहीत होते? आणि त्या गर्दीतील काही इंग्रज अगदी गंभीरपणे हळूच फ्रेंच कैद्यांचे कोट पाठीमागून उचलीत व त्यांना शेपूट वगैरे आहे की काय हे पाहत! फ्रेंच म्हणजे माकडे असे इंग्रजांना खरोखरच वाटत होते. आज आपण आपल्या शत्रूत शेपटे नाही पाहणार, परंतु दुसरे काही विषेश गुणधर्म पाहू. आपले शत्रू म्हणजे मूर्तिमंत सैतान असे आपण म्हणू. हिंदुस्थानसंबंधी असेच एक पुस्तक काही दिवसांपूर्वी लिहिले गेले. त्यात साऱ्या राष्ट्राची नालस्ती केलेली होती. हिंदुस्थान परसत्तेखाली आहे हे योग्यच आहे असे त्यात म्हटले होते. पृथ्वीवरून तो अजिबात नष्टच व्हावा असे म्हटले नाही हे भाग्य! कार्लाईत संतापाने म्हणत असे की, राष्ट्रे कुत्र्याप्रमाणे एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठीच बहुधा जवळजवळ येत असतात. कुत्री जवळ येताच व

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

एकमेकांच्या अवयवांचा वास घेतात. दुसऱ्याला मालक व्हावे, स्वामी व्हावे यासाठीच त्याच्या जवळ जायचे! कार्लाईलचे म्हणणे तिखट असले तरी ते आजही खरे आहे. लेखी करारावर, कागदी समजुतींवर, जगात शांती उभारता येणार नाही. आर्थिक तह व राजकीय गट करून ही शांती निर्मिती येणार नाही. विचाराची व ज्ञानाची देवाण-घेवाण अधिक झाली पाहिजे. एकमेकांची ध्येये एकमेकास अधिक कळली पाहिजेत. कल्पना, विचार, ध्येये यांचा व्यापार वाढू दे या वस्तू जगभर जाऊ देत एकेमकांची ओळख एकमेकांस होऊ दे. जगातील सुसंस्कृत लोकाची मने जवळ आली पाहिजेत. त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीही जवळ आल्या पाहिजेत. जोपर्यंत फक्त भौतिक भरभराटच डोळ्यासमोर असते, व्यापारी वैभवावरच डोळे खिळलेले असतात, तोपर्यंत शेजाऱ्याशी आपले भेद आहेत असेच दिसते. परंतु आत्म्याच्या वैभवाकडे जर वळू व बघू. भागीदारीने जे आनंद कमी न होता उलट वाढतात असे जे मानसिक आनंद त्यांच्याकडे जर आपण दृष्टी देऊ, तर सर्वत्र एकच मानवी स्वभाव नाचत आहे, एकच नाडी, एकच हृदय आहे असा साक्षात्कार होईल. हे आत्म्याचे वैभवच एक दिवस तारील. आर्थिक झगड्यातील कटुता या आत्मदर्शनानेच कमी होईल. जगाच्या शांतीसाठी व सांभाळासाठी लागणारी जी व्यापक सहानुभूती वा समजूत, ती अशा वृत्तीनेच येईल.

आपण एक आहोत, मानवी हृदय व मन एक एक आहेत, ही भावना ज्याप्रमाणे वाढली पाहिजे, त्याप्रमाणेच युद्धसंबंधी जी एक राष्ट्रीय अशी मनोवृत्ती निर्माण करण्यात येते, तिच्यातही बदल झाला पाहिजे. हे राष्ट्रीय मानसशास्त्र फिरून लिहिले पाहिजे. मानवजात आजपर्यंत लढत आली व पुढेही लढतच राहील असे संशयात्म्याप्रमाणे आपण मानलेच पाहिजे असे नाही. राक्षसी वृत्तीचे पुरस्कर्ते, मनुष्यरक्षक लोकही एक काळी असेच म्हणत आसत. मनुष्याने आजपर्यंत मनुष्याला खाल्ले आहे व पुढेही तो खाईल. गुलामांच्या व्यापाराचे पुरस्कर्ते, द्वंद्वयुद्धांचे पुरस्कर्ते सारे आपापली तुणतुणी अशीच वाजवीत. पूर्वी असे होते म्हणून पुढेही असेच असणार, हाच एक त्यांचा सनातन मुद्दा असे. परंतु मनुष्याचे मन हळूहळू बदलता येते. युद्धविन्मुखता, शांतिवाद, आंतरराष्ट्रीय भावना या गोष्टी

म्हणजे काही बिनतारी तारायंत्र नव्हे. या गोष्टी म्हणजे काही टेलिफोन नव्हे, रेडिओ नव्हे जगात आपले एकदम सारे गेले, असे 'झटपट रंगाऱ्या' चे काम नाही. येथे धीर धरायला हवा. हे फार नाजूक रोपटे आहे हे वाढायला बराच वेळ लागतो. क्षमा व सहनशीलता, परस्पर–समजूतदारपणा, परस्परांद्दल आदराची भावना, याचे खत घालू तर हे रोपटे झपाट्याने वाढेल. 'मानव जात सारी एक' हा मंत्र बालपणापासूनच कानावर जायला हवा. शांतता स्थापण्याची वृत्ती त्यांच्यात रोविली पाहिजे. आम्ही जगात खरी शांती आणू असा संकल्प त्यांच्यासमोर ठेवला पाहिजे. युद्धाने मानवजातीचे तुकडे तुकडे केले आहेत, युद्ध हे स्वतःच स्वतःशी भांडण्याप्रमाणे आहे, ही गोष्ट त्यांच्या मनावर बिंबविली पाहिजे. निसर्गाने तुम्हास एक होण्यासाठी निर्मिले. परंतु ही युद्धे खोटे भेद निर्माण करून माणसांमाणसास अलग करतात. तुम्ही जर भाऊभाऊ आहात, तर एकमेकांचा का नाश करता? युद्धाची ही वृत्ती मानवजातीच्या बाल्यावस्थेत शोभली. आज ती शोभत नाही. परंतु काही या युद्धवृत्तीभोवती भ्रामक भव्यता निर्माण करतात, तिच्या भोवती भावनांचे तेजोवलय निर्मितात. परंतु या युद्धाने काय साधते? थोड्यांची चंगळ होते, परंतु लक्षावधींना हायहाय करीत बसावे लागते प्राण ही पवित्र वस्तू आहे. कोणाचीही हत्या होणे म्हणजे देवाचा अपराध आहे. जीवनाची पवित्रता सर्वांच्या मनावर सारखी बिंबविली पाहिजे. युद्धामुळे आपणास हिंसेची सवय होते. ज्या द्वेषमत्सरांना संस्कृती गाडू पाहते, तेच युद्धे पसरवितात. मनुष्यांच्या हृदयात यांच्याकडून द्वेषाची बीजे पेरली जातात, कोट्यावधी लोकांच्या मनात परस्परद्वेषांचे गराळे पुन्हा निर्मिले जातात. अत्याचार मग तो शारीरिक असो किंवा अन्य प्रकारचा असो–क्षुद्र वृत्तीतूनच जन्मत असतो. आपला जो स्वार्थमूलक स्वभाव आहे त्यातून हिंसा जन्मते. कामातून क्रोधाचा संभव, स्वार्थातून संहार अशा या हिंसेत ना तथ्य, ना महत्व! सर्व सामाजिक मूल्यांचा विनाश अशा स्वार्थमूलक हिंसेने होत असतो.

ज्या देशभक्तीला प्रथम, शेवटी नेहमी, स्वतःच्या देशाशिवाय दुसरे काही दिसतच नाही, ती देशभक्ती मानवजातीच्या उच्च ध्येयाची दृष्टी आपणास देऊच शकत नाही. देशभक्तीने आपण एक प्रकारे आंधळे होतो. जणू डोळ्यावर एक प्रकारची झापड येते, निशा चढते, ''शिकागो ट्रिब्यून'' या नावाचे एक अमेरिकन पत्र आहे. त्याच्यावर कोणते ब्रीदवाक्य आहे, माहीत आहे?

“माझा देश! दुसऱ्या राष्ट्रांशी व्यवहार करताना माझा देश
नेहमी बरोबर असू दे. त्याच्या हातून चूक न होवो! परंतु
शेवटी चूक होवो की न होवो, माझा देश तो माझा देश!”

स्वत:च्या राष्ट्राबद्दल योग्य तो अभिमान नसावा असे नव्हे. परंतु दुसऱ्यांबद्दल तुच्छता दाखविणे यात मात्र धोका असतो. अभिमान असू दे, घमेंड नको. स्वत:ची प्रतिष्ठा ठेवा; परंतु दुसऱ्यांची अप्रतिष्ठा करू नका. आपले ते सारेच चांगले, आपले सारे बरोबर, आपल्या कृत्यांचे नेहमी समर्थन करणे, ही भ्रामक देशभक्ती होय. नैतिक कायद्याचे डोक्यावर राष्ट्राला बसवू नये. राष्ट्रीय सरकार हे सर्वतंत्र-स्वतंत्र असते. अशी एक विचारसरणी निघाली आहे. राष्ट्रीय सरकार कधी चूक करू शकतच नाही, त्याच्यावर टीका करता येत नाही, त्याने केलेली युद्धे ही नेहमी न्यायच असतात, अशी ही विचारसरणी म्हणजे शुद्ध अधर्म आहे. परंतु हा अधर्मच अर्वाचीन जगाचा धर्म झाला आहे. आणि हा धर्म आपल्या अनुयायापासून काय काय तरी अपेक्षितो! कोणत्याही धर्माने मानवजातीचा असा एकजात अकारण संहार करायला लावले नाही; परंतु हा आजच राष्ट्रधर्म मात्र निष्कारण कत्तली आपल्या अनुयायापासून अपेक्षितो. बोल्शेव्हिक लोक सर्व मानवजातीचा उद्धार करू बघत आहेत. ते वंश किंवा राष्ट्र बघत नाहीत. रशियाकडेही राष्ट्र या दृष्टीने ते बघत नाहीत. रशिया म्हणजे नव श्रद्धेच्या प्रसाराचे एक साधन. अंध देशभक्तीला बोल्शेव्हिक चाट देतात हे ठीक आहे. त्या बाबतीपुरते त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. लेसिंग हा जर्मन तत्त्वज्ञ म्हणाला होता ‘देशभक्ती म्हणजे दुबळेपणा होय. या दुबळेपणात दिव्यता असली तरी शेवटी तो दुबळेपणाच. हा दुबळेपणा दूर केला तरच बरे.’

दंडुक्यापेक्षा श्रेष्ठतर असा दुसरा कायदा आहे; देशभक्तीच्या अहंकाराहून श्रेष्ठ असे दुसरे प्रेम आहे. देशप्रीती सर्व मानवजातीच्या प्रीतीशी अविरोधाने राहू शकेल. दोघीत विरोध येण्याची जरुरी नाही. मानवजातीवर प्रेम करूनही देशावर प्रेम करता येईल. देशावरप्रेम करूनही मानवजातीवर प्रेम करता येईल. राष्ट्रे म्हणजे तरी मानवजातीचेच घटक ना? प्रत्येक राष्ट्राला त्याच्या त्याच्या विशिष्ट ऐतिहासिक परंपरेतून एक प्रकारची प्रेरणा मिळत असते. प्रत्येकाचा विकास त्या त्या परीने होईल. परंतु म्हणून प्रत्येकाने इतरांपासून अहंकाराने अलग राहण्याची

जरुरी नाही. माझीच प्रेरणा काय ती खरी, माझीच दिशा बरोबर, असे म्हणण्यानेच सारे बिघडते. आत्मश्लाघा ज्याप्रमाणे आपण गर्ह्य मानतो, त्यप्रिमाणे स्वत:च्या राष्ट्राची स्तुती करीत बसणेही गर्ह्यच मानले पाहिजे. फिरस्ते आपल्या मालाची स्तुती करीत हिंडतात, त्याप्रमाणे आपल्या संस्था, आपली मते त्यांची स्तुती करीत बसणे बरे नव्हे. ते हीनतेचे, दुरभिरुचीचे लक्षण समजावे. वृथा गौरव, आत्मश्लाघा, दुसऱ्यास तुच्छ लेखणे म्हणजे राष्ट्रधर्म नव्हे.

जागतिक ऐक्याचे दोन मार्ग आहेत : जागतिक सत्ता किंवा जागतिक राष्ट्रसंघ. एकाचीच सत्ता सर्व जगावर होणे अशक्य आहे. कारण राष्ट्रवाद हा नेहमी आडवा येणार. तसे करू पाहणे म्हणजे रक्तमांसाच्या चिखलातून सदैव जाणे होय अशा मारणमरणाच्या लढायांत मानवजातच कदाचित् नष्ट व्हायची, जगाचाच अंत व्हायचा. एखाद्या मानववंशाची सर्वश्रेष्ठता सिद्ध व्हावी म्हणून बाकी या जगाचा का बरे नाश व्हावा? आजकाल युद्धेही महाग होत आहेत, भीषण होत आहेत. कोणत्याही एका साम्राज्यात इतर सर्व जग पादाक्रांत करण्याची शक्ती नाही आणि ईश्वराने का मानवजात एकाच ठशाची निर्मिली आहेत? नाना जातिजमातीची व नाना वंशांची, नाना राष्ट्रे त्याने निर्मिली आहेत. जागतिक ऐक्याचा दुसरा एक सुकर मार्ग आहे : आपण आपल्या राष्ट्रवादास थोडी मुरड घालून उच्चतर अशा एकीकरणाचा, आंतरराष्ट्रीय सहकार्याचा प्रयत्न करू शकू. आशिया युरोपचे यशस्वी अनुकरण करू लागला, आपली आर्थिक पिळवणूक बंद करू लागला, दुसऱ्यांची सत्ता रोखू लागला तर युरोपच्या सुस्थितीला धोका आहे असे म्हणणे म्हणजे मोठे चमत्कारिक व विचित्र तर्कशास्त्र होय. आमचा देशाभिमान दैवी, इतरांचा मात्र आसुरी! आजच्या चालू असलेल्या आर्थिक शोषणाला जर कोणत्या देशाने विरोध केला तर संकट आले, असे आम्ही ओरडू लागतो!काही राष्ट्रांना गुलाम ठेवून जगात शांती नांदवू पाहाल तर ते शक्य नाही. सर्वांच्या स्वातंत्र्यातच जगाचे रक्षण आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य होण्यासाठी प्रत्येक राष्ट्र आधी स्वतंत्र होणे आवश्यक आहे; त्याशिवाय सारे फोल आहे. प्रत्येक राष्ट्राच्या विशिष्टत्वाला मान दिला पाहिजे. प्रत्येकाची अपूर्वता मान्य केली पाहिजे. सर्व राष्ट्रांना आम्ही स्वातंत्र्य देऊ अशा प्रकारचे ध्येय व अशा प्रकारचा प्रयत्न सर्व जगाचा असला पाहिजे. जगातील काही भाग इतरांपेक्षा

मागासलेले असतील; परंतु 'त्यांचा दुबळेपणा म्हणजे आमची संधी' असे नाही होता कामा. एखाद्या मनुष्याने दुबळेपणा म्हणजे आमची संधी' असे नाही होता कामा. एखाद्या मनुष्याने दुबळ्या शेजाऱ्याला दरडावणे किंवा त्याच्या दुबळेपणाचा फायदा घेणे हे जितके, वाईट तितकेच एखाद्या प्रबळ राष्ट्राने दुसऱ्या प्रबळ राष्ट्राला घशात घालू पाहणेही वाईट असेच सर्व प्रामाणिक माणसे म्हणतील. व्यक्तींप्रमाणे राष्ट्रांनाही सहानुभूतीची जरुरी असते. परंपरागत चालन आलेल्या पूर्वग्रहांपासून, रूढींपासून बौद्धिक गुलामगिरीपासून मुक्त होण्यासाठी जी राष्टे धडपडत आहेत, त्यांना सहानुभूती दाखवणे, त्यांना त्यांच्या त्या कामात मदत करणे, हे सुधारलेल्या राष्ट्रांचे कर्तव्य आहे. त्या धडधडणाऱ्या राष्ट्रांवर उडी घालून त्याचे धनी होऊ नका. किंवा त्यांना आपल्या पंखाखाली घेऊ नका. पोर्वात्यांची जागृती म्हणजे युरोपवर संकट नव्हे. चीन धडपडत आहे; तेथे उलथापालथ होत आहे. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हा थोड्या कालावधीचा प्रश्न आहे. तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थान झपाट्याने अर्वाचीन व अद्ययावत् होत आहेत. हे सारे तर जगाच्या बऱ्यासाठीच आहे. दुसऱ्यांचा विचार न करता कोणही राष्ट्रास जगता येणार नाही. राष्ट्रांचे परस्परांवलंबन प्रत्यही वाढत आहे. आणि जेथे जेथे अन्याय व जुलूम असतील तेथे तेथे त्यांच्याशी झगडावयास 'मानवजातीच्या भवितव्या'वरील अढळ श्रद्धच्या जोरावर आपण उभे राहिले पाहिजे. पेटू दे ती 'मानवजातीच्या भवितव्या'वरील अढळ श्रद्धेची मंगल ज्यात सर्वांच्या हृदयात व होऊ दे सारे दास्य-दारिद्र्य खाक!

केवळ ध्येय थोर ठेवून भागत नाही. त्या ध्येयांच्या प्रत्यक्ष सृष्टीत आणण्यासाठी साधनाही हवी. काही तरी एखादे नवीन कामचलाऊ तंत्रही निर्मायलला हवे. बहुजनसमाजाला शिक्षण देण्यासाठी म्हणून राष्ट्र-संघ किंवा केलॉग-करार अशा गोष्टी उपयोगाच्या असतात. परंतु राष्ट्रसंघाविषयी खोल गेलेला असा संशय सर्वांच्या मनात आहे. जगात आज जी स्थिती आहे तीच कायम ठेवण्यासाठी निर्माण केलेले एक साधन म्हणजे हा राष्ट्रसंघ. राष्ट्रसंघ म्हणजे दोस्त राष्ट्रांच्या हातातील एक बाहुले! सर्व राष्ट्रांना सरंक्षण व स्वातंत्र्य देण्यासाठी हा संघ अवतरला आहे, असे कोणाला फारसे वाटतच नाही आणि केलॉग-कराराचे महत्वही नष्ट झाल्यासारखेच आहे. कारण ज्याने या कराराला जन्म दिला, तो म्हणाला, ''स्वसंरक्षणार्थ शेवटी युद्धाशिवाय गत्यंतर आहे की नाही हे ठरविण्यास

ते ते राष्ट्रच अंती अधिक समर्थ असणार.'' जगात केवळ न्याय असे युद्ध कधी असूच शकत नाही. राष्ट्राराष्ट्रांतील प्रश्न सोडविण्याचे साधन म्हणून अत:पर युद्ध स्वीकारू नये. युद्धाचा मार्ग सोडूनच द्यावा. युद्ध हा खरा उपाय नव्हे. स्वसंरक्षणार्थ म्हणूनही अंगीकारिलेल्या युद्धाचे समर्थन आपण करू नये. स्वसंरक्षण म्हटले म्हणजे कोठून तरी धोका येणे शक्य आहे हेही आले, तो धोका टाळण्यासाठी अमुक एक प्रदेश जिंकून घेणे अवश्य आहे हेही आले मग स्वसंरक्षणाच्या नावाखाली होणारी दुसऱ्यावरची स्वारीही समर्थनीयच ठरायची! जेथे सारेच अंधुक आहे, तेथे प्रकाश व अंधार यात फरक कोठे काढणार? आणि हिंसेवर प्रतिहिंसा ठेवलेलीच असल्यामुळे सत्याला विजयी होण्यास वेळच नसतो. जोपर्यंत राष्ट्रे स्वत:च्या भोवतीच फिरत राहणार तोपर्यंत सदैव विग्रह राहणार, युद्धे राहणार! प्रत्येकाला नवीन बाजारपेठा हव्या. त्या धुंडताना एकमेकांच्या गाठी पडायच्याच व शेवटी युद्धाची ठिणगीही पडायची! परंतु कलागती विवेकाने शांतवू या. शक्तीने प्रश्न सोडवू पाहणे माणसास शोभत नाही. सर्वांना बंधनकारक असे जागतिक कायदेशास्त्र निर्मू या. सर्व जगाचे असे एक सर्वश्रेष्ठ न्यायमंदिर स्थापू या. तेथील निकाल सर्वजण मानंतील असे करू या. त्या निकालांची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस नेमू या. परंतु जोपर्यंत मोठी राष्ट्रे थोडेही सोडावयास तयार नाहीत, आपल्या साम्राज्यासत्तेला जराही धक्का लावू द्यावयास तयार नाहीत, तोपर्यंत आशा नाही. जोपर्यंत साम्राज्य-सरकारे आपापली साम्राज्ये तरवारीने सांभाळण्यासाठी सदैव उभी आहेत, तोपर्यंत हे राष्ट्रसंघ, हे केलॉग-करार म्हणजे केवळ थट्टा आहे, केवळ वंचना आहे.

जगात शांतता स्थापण्यासाठी एकच साधन आहे. ते म्हणजे धर्मयुक्त ध्येयवाद हेच खरे राजकीय साधन. या साधनातच आशा आहे. 'हे आमचे कर्तव्य, हे आमचे हक्क,' ही भाषा जोपर्यंत आहे, तोपर्यंत परस्परविरोधी हितसंबंधाचा मेळ घालता येणार नाही. तह व मुत्सद्द्यांची परस्पर समझौता करणारी कारस्थाने, यांनी प्रक्षोभ क्षणभर शांत होईल, परंतु पुन्हा भडका उडेल. उसळलेल्या व पेटलेल्या भावना तहांनी तात्पुरत्या शमतात, परंतु कायमच्या विझत नसतात. मानवजातीविषयी प्रेम सर्वांच्या हृदयात भरेल तरच आशेस आधार आहे. ते प्रेम जगात भरू दे. असे धर्मात्मे, महात्मे आज हवे आहेत, की जे सर्व जगाच्या

सुधारणेची वाट न पाहता ‘‘पृथ्वीवर एक कुटुंब’’ – वसुधैवकुटुम्बकम् हे तत्त्व जरुरी पडली तर स्वत:च्या आत्मसमर्पणानेही सिद्ध करतील; असे महात्मे व वीर पाहिजे आहेत, की जे म्हणतील; ‘‘आम्हाला फळांची आशा नाही, प्रयत्न करणे एवढेच आमचे काम. कोणी सुधारतील या आशेने आम्ही कर्मप्रवृत्त होत नसतो; आम्हाला राहवत नाही म्हणूनच आम्ही उद्योग आरंभितो.’’

✦✦✦

गीताहृदय

दोन शब्द...

पू. विनोबाजी भावे यांनी १९३२ मध्ये धुळे तुरुंगात दर रविवारी एका अध्यायावर एक अशी श्रीमद्भगवद्गीतेच्या अठरा अध्यायांवर अठरा प्रवचने दिली होती. मी तेथे ती सारी प्रवचने विस्तृतरूपाने लिहून घेतली होती. १९३८–३९ मध्ये मी माझ्या 'कॉंग्रेस' नावाच्या साप्ताहिकातून ही सारी प्रवचने छापून काढली होती. ती तपासून पू. विनोबाजी ग्रंथरूपाने प्रसिद्ध करणार होते. दोन अध्याय तपासून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. पुढचे तसेच राहिले. वैयक्तिक सत्याग्रहापासून त्यांना वेळच मिळाला नाही. मीही तुरुंगात होतो. विनोबाजींच्या या प्रवचनांचा सारांश महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मी रोज दीड–दोन तास या प्रमाणे तीन दिवसांत सांगितला आहे. मित्र म्हणत, बंधुभगिनी म्हणत, 'हा सारांशच द्या ना लिहून. संपूर्ण प्रवचनांची पवित्र गंगा मिळेपर्यंत हा लहानसा सारांशरूप झरा आम्हाला द्या.' पू. विनोबाजींना मनात भक्तिप्रेमाने स्मरून तो लिहून काढला व मित्रांच्या हवाली केला व म्हटले, 'हा घ्या. यातील सत्यता व सुंदरता पू. विनोबाजींची आहे. यात जे काही चुकीचे असेल ते माझे आहे. तुम्ही याचे काहीही करा. मी निमित्तमात्र आहे.'

– साने गुरुजी

अध्याय पहिला

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. ही दोन महाकाव्येच आहेत असे नव्हे, तर ही काव्ये आपल्या जीवनाशी एकरूप झाली आहेत. राम, लक्ष्मण, सीता, कृष्ण, अर्जुन, द्रोपदी वगैरे आपल्या जीवनात मिळून गेली आहेत. जगातील इतर देशांतही महाकाव्ये आहेत; परंतु त्या त्या देशातील जीवनाशी अशी एकरूप झालेली दिसत नाहीत. रामायण व महाभारत या दोन ग्रंथांनी भारतीय जीवन बनविले आहे. वाल्मिकींची प्रतिभा, व्यासांची प्रज्ञा व शुकाचार्यांचे वैराग्य याला जगात तुलना नाही. रामायणात प्रतिभेचा अपूर्व विलास आहे. काव्यशक्तीची पराकाष्ठा आहे; परंतु महाभारतात जणू विश्वदर्शन आहे. व्यासांची प्रज्ञा आहे. सर्व संसाराचे अंतर्बाह्य दर्शन घडवित आहे. महाभारतात थोरामोठ्यांचेही दोष दाखविले आहेत. येथे दुष्टांचे गुण दाखविले आहेत, सज्जनांच्या उणिवा दाखविल्या आहेत. येथे धर्मराजही 'नरो वा कुंजरो वा' करतो. कृष्णाचा, हातात शस्त्र न धरण्याचा गर्व गळतो. कर्णाची उदार शूरता दिसते. मांडी मोडून पडलेल्या दुर्योधनाचा बाणेदारपणा दिसतो, असे हे एक प्रकारचे भव्य दर्शन आहे. जगात केवळ निर्दोष एक परमेश्वर आहे.

व्यासांनी अठरा पुराणे लिहिली. सागराप्रमाणे अगाध व अनंत असे त्यांचे हा वाङ्मय आहे. सामान्य मानव हे सारे केव्हा वाचणार, केव्हा पाहणार? व्यासांनी आपला संदेश थोडक्यात सुटसुटीतपणे कोठे नाही का सांगून ठेवला? शेकडो कथा, आख्याने, उपाख्याने, शेकडो उपदेश यातून त्यांनी जे सांगितले त्याचा सारांश,

त्याचे नवनीत त्यांनी कोठे काढून दिले आहे का? होय, त्यांचा संदेश श्रीमद्भगवद्गीतेत आहे. व्यासांच्या सर्व शिकवणीचे सार म्हणजे श्रीगीता होय.

हिंदू धर्माचा सुटसुटीत असा एक ग्रंथ सांगा, असे कोणी म्हटले तर गीता आपण पुढे करू. हिंदू धर्मातील सर्व उदात्त भावनांचा व विचारांचा हा साररूप ज्ञानकोश आहे. अमुक एक विचार येथे आला नाही असे नाही. गीता किती लहान. फक्त सातशे श्लोक; परंतु वामनाच्या एका पावलात सर्व त्रिभुवन यावे त्याप्रमाणे सारे तत्त्वज्ञान या सातशे श्लोकांत आले आहे. चंद्रबिंब बचकेएवढे दिसले तरी साऱ्या पृथ्वीला धवळिते, त्याप्रमाणे ही लहानशी गीता सर्व मानवी संसाराला प्रकाश देत आहे.

महाभारताच्या मध्यभागी गीतेचा हा नंदादीप, हा दीपस्तंभ उभा आहे. महाभारताची अठरा पर्वे, गीतेचेही अठरा अध्याय. अठरा अक्षौहिणी सैन्याच्यामध्ये गीता जन्मली. श्रीकृष्णांनी गीता सांगितली, अर्जुनाने ती ऐकिली, व्यासांनी ग्रंथिली, या तिघांची जणू एकरूपता झाली आहे. व्यासांना कृष्णद्वैपायन म्हणतात. अर्जुनालाही कृष्ण नाव आहे. सारेच जणू कृष्णमय झाले.

अर्जुनाने आपल्या रथाचे दोर कृष्णाच्या हातात दिले होते; परंतु त्याच्याही आधी त्याने आपल्या मनाचे दोर त्याच्या हातात दिले होते. अर्जुन या शब्दाचा अर्थ काय? जो ऋजू आहे तो अर्जुन. ऋजू म्हणजे सरळ. अर्जुनाचा सरळ भाव, शुद्ध भक्ती. जो सरळ व निर्मळ मनाचा असतो तो हृदयातील श्रीकृष्णाला शरण जातो. कृष्ण म्हणजे कर्षून घेणारा, ओढून घेणारा, इंद्रियांना सन्मार्गावर ठेवू पाहणारा. ज्ञानस्वरूप. या शुद्ध विचाराची वाणी कोण ऐकतो? एक ऋजू आहे, शुद्ध वृत्तीचा आहे तो ऐकतो.

अर्जुन युद्धासाठी प्रवृत्त झाला. तो महावीर होता. त्याला 'नर' अशी श्रेष्ठ पदवी होती. असा हा अर्जुन श्रीकृष्णाला माझा रथ हाक, बघू दे कोण कोण युद्धार्थ उभे आहेत, असे म्हणतो. भगवान रथ हाकतात. अर्जुन उभा राहून सर्वत्र पाहतो. त्याला सारे स्वजन दिसतात. आप्त, सखे-सोयरे, गुरू दिसतात. मारणमरणाच्या निश्चयाने ते सारे जमलेले असतात. ती मामुली लढाई नव्हती. अखेरची सोक्षमोक्षाची लढाई होती. अटीतटीची लढाई होती. हे दृश्य पाहून अर्जुन दुःखी होतो. युद्ध ही अतिभयंकर वस्तू आहे असे त्याला वाटते. त्याच्या डोळ्यांतून पाणी येते. त्या धनुर्धराचे धनुष्य

गळते. तो देवाला म्हणतो, "देवा, या सर्वांना मारून मिळणारे राज्य काय कामाचे? रक्ताने माखलेले सुखभोग भोगणे पाप आहे. हे सारे आप्तेष्ट कसे मारू? गुरुजन कसे वधू? हे लाखो वीरपुरुष मरतील. लाखो मायबहिणी विधवा होतील. व्यभिचार माजतील. कुलधर्म लोपतील. छे:! नको हे युद्ध. संन्यासधर्मच बरा. तोच श्रेष्ठ आहे. खरोखर मी काय करावे ते मला समजत नाही. तूच मार्ग दाखव.'

युद्ध ही अतिभयंकर वस्तू आहे यात शंका नाही. अर्जुनाने युद्धामुळे जे अनर्थ होतात म्हणून सांगितले त्याचा अनुभव मागील महायुद्धांत आला, या महायुद्धात आणखी शतपटीने येईल; परंतु अर्जुनाला आलेले हे वैराग्य खरे होते का? त्याच्या जीवनात मुरलेला तो विचार होता का? कालपर्यंत तो युद्धे करीत होता. शत्रूंची मुंडकी चेंडूप्रमाणे उडवीत होता. आताच अकस्मात कोठून आले वैराग्य? ते वैराग्य त्याच्या अनुभवांतून परिणत होऊन आलेले नव्हते. अर्जुन क्षत्रियधर्म सोडून कोठे हिमालयात जाता तर तेथे मृगया करू लागला असता. तेथल्या जातिजमातींना जिंकून नवे राज्य मिळविता. हिमालयात इमले उभरता. संन्यासधर्माची ती विटंबना झाली असती. अर्जुनाचीही ती फजिता झाली असती. भगवान श्रीकृष्ण हे सारे ओळखीत होते. म्हणून अर्जुनाच्या सर्व म्हणण्याला त्यांनी 'प्रज्ञा-वात' असे म्हटले आहे. आपल्या मनात जे येते त्याच्या समर्थनार्थ आपण बुद्धी लढवीत असतो, सत्यासाठी म्हणून नव्हे. तो प्रज्ञा-वाद असतो. आपण नाना मुद्दे मांडीत बसतो. त्यात सत्यता नसते. आपले मनही आपणास खात असते.

एखादा न्यायाधीश असावा. त्याने आजपर्यंत अनेकांना सहज फाशीची शिक्षा दिली असावी; परंतु एके दिवशी स्वतःच्या खुनी मुलालाच फाशीची शिक्षा देण्याचे त्याच्या नशिबी यावे. मग लगेच तो म्हणतो, 'ही फाशीची शिक्षा फार वाईट. अपराध्याने भावनेच्या भरात काही केले म्हणून आता आपण त्याला शांतपणे का फाशी द्यावयाचे? छे:! हे अयोग्य आहे.' त्या न्यायाधीशासमोर मुलगा असतो. स्वतःचा मुलगा. त्या मोहातून, त्या आसक्तीतून त्याचे ते वैराग्य जन्मलेले असते. तो तात्पुरता जन्मलेला विचार असतो. मोहाला सावरून धरण्यासाठी, आसक्तीचे स्वरूप लपविण्यासाठी तो विचार जन्मलेला असतो.

अर्जुनाचे अगदी तसेच आहे. स्वजन व परजन असा तो भेद करतो. आजपर्यंत परजन त्याने कितीतरी मारले. परंतु स्वजन दिसताच युद्ध वाईट म्हणून तो म्हणतो. ही

आसक्ती आहे. हा मोह आहे. कर्तव्य करीत असता स्वजन, परजन हा भेद करावयाचा नसतो.

अर्जुनाला संन्यासधर्म श्रेष्ठ वाटतो. परंतु तो झेपला पाहिजे ना? आपापल्या वृत्तीप्रमाणेच अनासक्त राहून समाजसेवा आपण केली पाहिजे. दूध पाण्यापेक्षा किमतीचे आहे. आपण जर माशाला म्हणून 'माशा, तुला दुधात ठेवतो. पाण्यापेक्षा दूध अधिक मोलवान आहे' तर तो काय म्हणेल? मासा पाण्यातच जगेल. दुधात मरेल. मोरोपंतांनी म्हटले आहे :

''यज्जीवन जीवन तो दुग्धी वाचेल काय हो मीन?''

म्हणून दुसऱ्याचा धर्म जरी श्रेष्ठ वाटला तरी तो आपणास झेपला पाहिजे ना? सूर्याचा प्रकाश चांगला खरा; परंतु आपण त्याच्याजवळ जाऊ तर जळून जाऊ. पृथ्वीवर राहूनच त्याचा प्रकाश घेऊ व वाढू. पृथ्वीवर राहणे आकाशात राहण्यापेक्षा कमी प्रतीचे वाटले, तरी तसे करण्यातच आपले कल्याण आहे, आपला विकास आहे.

अर्जुन संन्यासधर्मी होऊ पाहतो. त्याची फजिती होईल हे श्रीकृष्ण जाणतात. म्हणून त्याच्या सर्व बुद्धिवादाला ते 'प्रज्ञावाद' म्हणतात. अर्जुनाला मारून मुटकून संन्यासी करण्यात काय अर्थ? केवळ त्याच्या डोक्यावर हात ठेवून त्याला संन्यासी करणे बरे नव्हे. जो तो स्वतःच्या आंतरिक धडपडीने ध्येयाकडे जाऊ दे.

सारांश, अर्जुन मोहामुळे, आसक्तीमुळे स्वधर्म टाळू पाहतो. मोह व आसक्ती जिंकणे ही खरी गोष्ट आहे. अनासक्त होऊन स्वधर्मकर्माचे आचरण करणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. मोह जिंका व अनासक्त व्हा. असे होऊन स्वधर्मकर्म आचरा. गीता हे शिकविण्यासाठी जन्मली आहे. अठराव्या अध्यायाच्या शेवटी 'कच्चिदज्ज्ञानसंमोहः प्रणष्टस्ते धनंजय' अर्जुना, गेला का मोह? असे श्रीकृष्ण विचारतात. अर्जुन उत्तर देतो, नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा।' मोह गेला, भान आले, स्वधर्माचरणाची जागृती आली, असे म्हणतो.

कर्तव्यकर्मे करीत असताना जे मोह आड येतात, आसक्ती आड येतात, त्या कशा दूर कराव्यात व कसे झगडावे हे सांगण्यासाठी गीताशास्त्र आहे. पहिल्या अध्यायात उपदेशाचा आरंभ नाही. परंतु अर्जुन कोणत्या भूमिकेवर उभा आहे हे

समजण्यासाठी पहिल्या अध्यायाची जरुरी आहे. गीताशास्त्राची उत्पत्ती कशासाठी झाली हे कळण्यासाठी पहिला अध्याय हवा.

गीता ही केवळ अर्जुनासाठी नाही, केवळ क्षत्रियांसाठी नाही. ती तुम्हा–आम्हा सर्वांसाठी आहे. सर्व सांसारिकांसाठी आहे. आपण सारे एक प्रकारे क्षत्रियच आहोत. तुकारामांनी म्हटले आहे :

''रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग
अंतबार्ह्य जग आणि मन''

रात्रंदिवस आपणा सर्वांचा जनात व मनात झगडा चाललेलाच असतो. प्रत्येकजण आपल्या कर्तव्यकर्माच्या 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' उभा असतो. तेथे मोह आडवे येतात. आसक्ती आड येते. तेथे झुंजावे लागते. ते मोह कसे जिंकावेत, आसक्ती कशी दूर करावी हे गीता आपणा सर्वांना सांगत आहे. म्हणून सर्वांना या शास्त्राची जरुरी आहे. उंच डोंगरावर पाऊस पडतो. अर्जुनासारख्या महापुरुषाच्या मस्तकावर श्रीकृष्णांनी सदुपदेशाची अमृतवृष्टी केली. व्यासांनी तो प्रवाह बांधून तुम्हा आम्हा सर्वांसाठी आणला आहे. त्यांचे थोर उपकार. अर्जुनाला निमित्त करून सर्वांनाच येथे उपदेश केलेला आहे. आपण सारेच ऋजू होऊन, सरळ व निर्मळ होऊन, ज्ञानमय कृष्णाजवळ बसू या व मोह जिंकून, अनासक्त होऊन स्वधर्मकर्म आचरून समाजसेवा कशी करावी व जीवन कृतार्थ कसे करावे ते शिकू या.

✦✦✦

अध्याय दुसरा

दुसऱ्या अध्यायाच्या आरंभी जीवनाचे महासिद्धांत सांगितले आहेत. कोणते हे महासिद्धांत?

१) आत्मा सर्वत्र भरलेल्या आहे.

२) देह नाशिवंत आहे.

३) स्वधर्म अबाध्य आहे.

या तीन सिद्धांतांत जीवनाचे सारे शास्त्र जणू येऊन गेले. आत्मा अनंत आहे. एकच तत्त्व जणू सर्वत्र भरलेले आहे. आपणास याचा पदोपदी थोडा तरी अनुभव येत असतो. आपणास सुखदुःख होते तसे दुसऱ्यास होते. आपण सारे समान, सारखे आहोत. एकच चैतन्य सर्वांत खेळत आहे. सर्वत्र भरलेले आहे. आत्मतत्त्व पाहणे म्हणजेच मोक्ष; परंतु आपण या आत्मतत्त्वाचे खंड खंड करतो. एखादी मौल्यवान पैठणीचे तुकडे तुकडे करावेत, असे आपण करीत असतो. सर्वत्र भरलेल्या आत्मतत्त्वाचे आपण तुकडे करतो. एक सुंदर विणलेले सणंग त्याच्या चिंध्या करतो आणि मग अंगावर घ्यायला काही नाही म्हणून रडत बसतो! जगभर जी दुःखे आहेत, जे अन्याय आहेत, ज्या स्पर्धा आहेत, ज्या मारामाऱ्या आहेत, जी युद्धे आहेत, त्या सर्वांचे कारण काय? एकच कारण, आणि ते म्हणजे आपण नाना कृत्रिम भेद निर्माण करीत असतो. सर्वत्र भरलेले एक आत्मतत्त्व आपण पाहात नाही. नदी वाहती असावी, परंतु नदीत ठायी ठायी बांध घालून जर आपण डबकी निर्माण करू तर त्यामुळे हिवताप मात्र येईल. डास सर्वत्र होतील.

मरून जाऊ. आज जगात आपण सारे मरत आहोत. कारण आपण डबकी निर्माण केली आहे. हे म्हणे गोरे, हे काळे, हे हिंदू, हे मुसलमान, हे ब्राह्मण, हे ब्राह्मणेतर हे स्पश्य हे अस्पृश्य, हे देशस्थ, हे कोकणस्थ, हे महाराष्ट्री हे गुजराती–सारी डबकी! आपापल्या डबक्यात बसून सारे बेडकाप्रमाणे अहंकारो टरो टरो करीत आहेत. सर्वांत मरणकळा येत आहे.

ज्या हिंदुस्थानाने गीता दिली, उपनिषदे दिली, त्या हिंदुस्थानात भेदांचा जसा बुजबुजाट झाला आहे. ठायी ठायी आपापल्या क्षुद्र जातींची डबकी उभी करून आपण करंट्यासारखे भांडत आहोत.

ही अशी डबकी आपण का निर्माण करतो? सर्वत्र भरून राहिलेले आत्मतत्त्व आपण का पाहात नाही? कारण नाशिवंत देहालाच आपण महत्त्व देतो. गीता सांगते, अरे, हा देह जाणार आहे. हे मडके फुटायचे आहे, हे वस्त्र फाटायचे आहे. या देहाला काय महत्त्व देतोस? यातील आत्मा पाहा. परंतु आपण आत्म्याकडे लक्ष देत नाही. अमक्या आडनावाचे, अमक्या रंगाचे ते माझे असे आपण म्हणून लागतो. बाह्य रुपरंगांना महत्त्व देऊन डबकी निर्माण करतो. अरे, उद्या मेल्यावर एकाच मातीत सारे मिळून जाणार आहात. ज्या शरीराची एवढी मातब्बरी तुम्हास वाटते आहे हे नाशिवंत आहे.

''आधी पलंगी झोपती
शेवटी गोवऱ्यांची संगती''

परंतु विचार करतो कोण? तुकारामांनी म्हटले आहे :

''एकमेकांची दहने
पाहती न होती शहाणे''

सारे शेवटी मातीत जातात हे पाहून आपण शहाणे होत नाही. दुःखाची गोष्ट आहे.

रवींद्रनाथांनी गीतांजलीत एके ठिकाणी म्हटले आहे, या तुरुंगात एक कैदी आहे. या कैद्याकडे कोणाचेच लक्ष नाही. तुरुंगाच्या भिंतींचीच फक्त काळजी घेतली जाते.' आपण या देहात असलेले आत्मतत्त्व पाहात नाही. आपला आत्मा पंख फडफडून सारी कृत्रिम बंधने, खोटे भेदभाव तोडून सर्व विश्वाला मिठी मारू इच्छितो. परंतु त्याच्या भुकेकडे आपले लक्ष नाही. आपण देहाचीच पूजा करीत बसलो आहोत. स्वतःच्या देहाची, स्वतःच्या जातीच्या लोकांच्या देहाची. जपानला वाटते फक्त, जपान्यांनी सुखात लोळावे. जर्मनांना वाटते जर्मनांची सत्ता असावी. इंग्रजांना वाटते, आपले साम्राज्य

असावे; परंतु सारे मानव सुखी व स्वतंत्र असू देत असे कोण म्हणतो? जो तो आपले रंग, आपला देश आपली जात पाहात आहे. बाहेरच्या आकारांना आपण महत्त्व देत आहोत. शिंपले हृदयाशी धरीत आहोत. मोती फेकून देत आहोत! गीता सांगते, ''अरे, सर्वत्र भरलेला परमात्मा पाहा. देहाला भुलून अखंड आत्म्याचे खंड पाडू नका.''

हिंदुस्थानात ज्याप्रमाणे भेदांचा बुजबुजाट, त्याप्रमाणे मरणाचाही अपरंपार डर. इतर देशांनी मरणाचा जसा खेळ केला आहे. स्वदेशार्थ लाखो मरत आहेत. परंतु आपल्याकडे सारीच भीती! 'लाठी बसेल, गोळी लागेल, तुरुंगात जावे लागेल' अशी भीती एकमेकांस घालीत असतात. ज्ञानेश्वरांनी दुःखाने म्हटले आहे :

''अगा मर हा बोल न साहती
आणि मेलिया तर रडती''

मरणे हा शब्दही उच्चारू देत नाही. कोणी मेले तर जगात कोठे नसेल अशी आपली रडारड! असें कातडीला कुरवाळणारे, सदैव भांडणारे जे करंटे त्यांच्या नशिबी शतकानुशतके गुलामगिरी नाही येणार तर काय?

आपण भेदांची डबकी बुजविली पाहिजेत. देहाची क्षुद्रता ओळखली पाहिजे. देह हे साध्य नसून एक साधन आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. सर्वसाधारण करण्यासाठी हा देह स्वधर्म म्हणजे स्वतःचे कर्तव्य कर्म, आपणास जन्मतःच स्वधर्म प्राप्त होत असतो. आईबाप जसे शोधावे लागत नाहीत, तसा स्वधर्म शोधावा लागत नाही. आपण कोणत्या तरी एक प्रवाहात जन्मत असतो. आपल्या सभोवती विशिष्ट परिस्थिती असते. त्या परिस्थितीनुरूप आपणास स्वधर्म मिळतच असतो. उदाहरणार्थ, आपण परतंत्र हिंदुस्थानात जन्मलो, म्हणून येथे जन्मणाऱ्या प्रत्येकाचा स्वातंत्र्यासाठी धडपडण्याचा स्वधर्म आहे.

परंतु स्वातंत्र्यासाठी धडपडण्याचा स्वधर्म तोही सर्वांचा सारखाच असेल असे नाही. प्रत्येकाची वृत्ती निराळी. कोणी म्हणेल मी हरिजनसेवा करून स्वातंत्र्याच्या कार्यात मदत करतो. कोणी म्हणेल मी खादीचे काम उचलतो. कोणी म्हणेल मी राष्ट्रभाषेचा प्रचारक होतो. कोणी म्हणेल मी चर्मालय काढतो. कोणी म्हणेल मी शास्त्रीय गोरक्षण हाती घेतो. कोणी म्हणेल मी साक्षरतेला वाहून घेतो. कोणी म्हणेल मी मधुसंवर्धनविद्येचा भक्त होतो. कोणी म्हणेल मी शेतकऱ्यांची संघटना करतो. कोणी म्हणेल मी कामगारांत घुसतो. कोणी म्हणेल मी उघड बंड करतो, कोणी म्हणेल फाशी

जातो. कोणी म्हणेल मी तुरुंगात बसतो. जो तो आपापल्या शक्तीप्रमाणे वृत्तीप्रमाणे स्वातंत्र्याच्या कामात मदत करील.

याला स्वधर्म म्हणतात. स्वधर्म म्हणजे हिंदूधर्म, ख्रिस्तीधर्म असा अर्थ नव्हे. स्वधर्म म्हणजे स्वतःचा वर्णधर्म. वर्ण म्हणजे रंग घेऊन आपण जगात आलो? आपल्या मनोबुद्धीचा कोणता रंग आहे? माझा कल कोठे आहे? ते पाहून तदनुरूप सेवाकर्म हाती घ्यावयाचे. त्या कर्तव्यकर्मासाठी मग जगावयाचे, त्यासाठी मरावयाचे.

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः

या चरणाचा हा असा अर्थ आहे. प्राचीन काळी पित्याचा जो वर्ण तोच मुलाचा असे ठरविले होते कारण लहानपणापासून जे घरात पाहील, आजूबाजूस असेल तेच मुलगा उचलील. परंतु आपण पुढच्या काळात आहोत. निरनिराळ्या शिक्षणपद्धीत निघाल्या आहेत. एकाच आईबापांची निरनिराळ्या गुणधर्मची मुले असतात. त्या सर्वांचा एकच वर्ण नसतो. कोणी चित्रकार होतो. कोणाला फुलाफळांची, शेतीची आवड असते. तेव्हा ज्याने त्याने आपल्या आपल्या वृत्तीनुरूप स्वधर्म उचलावा. तो स्वधर्म आचरता आचरता हा देह झिजवावा सर्वत्र भरलेल्या आत्मस्वरूपाची जाणीव ठेवून, स्वधर्माचरण करण्यासाठी देहाचे हे साधन लाभलेले. या देहाच्या साधनाने स्वधर्म आचरीत सर्वत्र भरलेल्या परमात्म्याची कर्ममय पूजा आपणास करावयाची आहे.

आत्मा अखंड आहे, देह नाशिवंत आहे हा स्वधर्म अबाध्य आहे ते तीन सिद्धांत गीतेने सांगितले. परंतु केवळ शास्त्र सांगून भागत नसते. शास्त्र जीवनात आणण्यासाठी कला हवी. स्वधर्म आचरा असे सारेच धर्म सांगतात. परंतु गीता सांगते, ''स्वधर्म तर आचरच. परंतु फलेच्छा सोडून निष्काम वृत्तीने तो स्वधर्म आचर.'' कृष्ण म्हणतात :

'एषा तेऽ मिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु' तुला सांख्यशास्त्र सांगितले. आता योग सांगतो ऐक. आणि योग म्हणजे काय?

''योगः कर्मसु कौशलम्''

कर्म करण्याची कला म्हणजे योग. कर्म उत्कृष्ट असे हातून कधी होईल? जेव्हा सारखे त्या कर्मातच रमू फळाचे चिंतन न करीत बसता साधनेतच तन्मय होऊ तेव्हा. असे कर्म करण्यात एक प्रकारचा आनंद असतो, कृतार्थता असते. तेथे निराशा शिवत नाही.

असे निष्काम कर्माचरण करणारा पुरुष कसा असेल? या देहाने आपल्या स्वधर्माचरणाच्या निष्काम सेवेने समाजरूपी परमेश्वराची पूजा करणारा तो अनासक्त कर्मयोगी, तो कसा बरे असेल?

जीवनाचे शास्त्र सांगून, निष्काम बुद्धीने कर्म करण्याची कला सांगून, हे शास्त्र व ही कला ज्याच्या जीवनात प्रकट होत असते अशा स्थितप्रज्ञाची मूर्ती भगवंतांनी दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी उभी केली आहे. गीताशास्त्र दुसऱ्या अध्यायात जणू संपले. पुढचे अध्याय म्हणजे विस्तार आहे. दुसऱ्या अध्यायाला कोणी म्हणून एकाध्यायी गीता म्हणतात. दुसऱ्या अध्यायातीलच हे विचार पुढे अधिक विस्ताराने मांडले आहेत. ते हळूहळू पाहू चला.

+++

अध्याय तिसरा

गीता स्वधर्माचरण निष्काम बुद्धीने कर, असे सांगते, तुमची वृत्ती पाहा. स्वत:चे गुणधर्म पाहा. तदनुरूप सेवा हाती घ्या. समाजसेवेचे कोणतेही कर्म हीन नाही. सारी कर्मे पवित्रच. समाजसेवेचे सारे प्रकार सारखेच मोक्षदायी आहेत. वेद देणारा ऋषी असो वा रस्ता झाडणारा झाडूवाला असो, शाळेत शिकविणारा शिक्षक असो व दुकान घालणारा वाणी असो, सारे मोक्षाचे अधिकारी आहेत. कोणी कोणाला हिणवू नये. माझे कर्म श्रेष्ठ असे म्हणू नये. उपनिषदात एक गोष्ट आहे. एकदा देवांचे भांडण लागले. वारा म्हणे मी श्रेष्ठ. अग्नी म्हणे मी श्रेष्ठ. पर्जन्यदेव म्हणे मी श्रेष्ठ. इंद्र म्हणजे मी श्रेष्ठ. असा त्यांचा वाद चालला असता तेथे एकदम एक देवता येऊन उभी राहिली. ती ज्ञानदेवता उमा होती. दिव्यरूपाने ती झळकत होती. इंद्र वायूला म्हणाला, जा, त्या देवतेची विचारपूस करून ये.'' वायू त्या देवतेजवळ आला व म्हणाला, आपण कोण?'' देवतेने विचारले, तुम्ही कोण?'' वायू गर्वाने म्हणाला, मी तुम्हाला माहीत नाही?'' अहो मी वायू. मी पर्वत उडवतो, झाडे मोडतो, समुद्र नाचवतो. माझी शक्ती अचाट आहे.'' ती देवता म्हणाली, ही येथे एक काडी आहे ती उडवून दाखवा.'' वायू ती काडी उडवू लागला. काडी उडवता येईना. तो खाली मान घालून निघून गेला.

नंतर अग्नी आला. त्याने देवतेस विचारले, तुम्ही कोण?'' देवतेने त्याला विचारले, आपण कोण?'' अग्नी रागाने म्हणाला, मी तुम्हाला माहीत नाही? मी अग्नी. मी मनात आणीन तर सर्व ब्रह्मांड भस्म करून टाकीन. माझा प्रभाव अनंत आहे.'' देवता म्हणाली, ही येथे एक काडी आहे. ती जाळून दाखवा.'' अग्नी आदळआपट करूनही ती काडी जाळू शकला नाही. सारे देव याप्रकारे फजीत झाले. शेवटी ती ज्ञानरूपिणी म्हणाली, अरे देवांनो, मी मोठा, मी मोठा, असे करीत भांडत काय बसता? सूर्याच्या ठिकाणी प्रकाशण्याची शक्ती ठेवलेली आहे. म्हणून तो मोठा. वायूच्या ठिकाणी वाहण्याची शक्ती आहे. अग्नीच्या ठिकाणी जाळण्याची शक्ती आहे, परंतु त्या त्या स्वतःच्या शक्तीचा गर्व नका करू. त्या विश्वेश्वराने ती ती शक्ती तुमच्या ठायी ठेवली आहे. तो ती शक्ती काढून घेईल तर तुम्ही कचरा आहात!''

आपण आपल्या गुणधर्माप्रमाणे सेवाकर्म करीत जावे. तीसारी कर्मे मोक्ष देणारी आहेत. प्रभूला प्रिय आहेत. कर्मे करावी. फलेच्छा सोडून करावी. परंतु फलेच्छा सोडून जरी कर्मे केली तर फळ मिळत नाही, असे नाही. उलट फलेच्छा मनात सतत बाळगून कर्म करणाऱ्यापेक्षा निष्काम कर्मयोगी अनंतपट फळ मिळवतो. फळाचे चिंतन करीत बसण्यातही त्याला वेळ नाही. तो वेळही त्या कर्मातच जात आहे. जो शेतकरी रात्रंदिवस शेतीच्या कामात रंगला, त्याची शेती इतरांपेक्षा अधिक फलदायी झाल्याशिवाय रहाणार नाही, परंतु यापेक्षाही अत्यंत महत्त्वाची अशी अनेक फळे तो मिळवतो.

गंगेच्या प्रवाहात एक विज्ञानाचा अभिमान बाळगणारा स्नानार्थ गेला व एक भक्तिभावाने गेला, तर त्या दोघांची अंगशुद्धी होईलच. परंतु भक्तिभावाने स्नान करणाऱ्यास अंगशुद्धीबरोबर इतर ' फळे मिळतात. विज्ञानवादी म्हणेल, गंगा म्हणजे काय? ऑक्सिजन व हायड्रोजन यांचे मिश्रण. जास्त काय आहे?'' त्याला फक्त अंगशुद्धीचे फळ मिळतात. परंतु ते फळ एखाद्या हेल्यासही मिळेल. पण भक्तीभावाने जो गेला, गंगा म्हणजे विष्णूच्या पदकमलापासून जन्मलेली, शंकराच्या जटाजुटांतून बाहेर आलेली, जिच्या तीरावर राजे राज्य

सोडून मोक्षाची साधना करते झाले, जिच्या तीरावर योगी योगीचरणात रमले, ज्ञानी ज्ञानात रंगले, भक्त भक्तीने वेडे झाले, अशी ही गंगा, असे मनात येऊन भावनांनी उचंबळून जो त्या गंगेच्या प्रवाहात शिरला, त्याला अंगशुद्धीबरोबरच चित्तशुद्धीचेही फळ मिळते. शरीराचे मळ त्याचे धुतले जातात, तसेच मनाचे मळही धुतले जातात.

निष्काम कर्म करणाऱ्याची जीवनयात्रा चांगली चालते. त्याला चित्तशुद्धीचे फळ मिळते. चित्तशुद्धीमुळे त्याला त्याच्या कर्मांतूनच ज्ञानही मिळते. महाभारतात तुलाधार वैश्याची गोष्ट आहे. त्यांच्याकडे जाजली नावाचा एक ब्राह्मण ज्ञानार्थ म्हणून आला. तुलाधार म्हणाला, "माझ्याजवळ कोठले ज्ञान? ज्ञान असलेच तर ते एकच आहे आणि तेही माझ्या तराजूच्या दांडीने मला शिकविले आहे. ती तराजूची दांडी जशी सरळ असते तसे माझे मन सरळ ठेवायला शिकलो आहे. शत्रू असो, मित्र असो, स्वजन असोत, परजन असोत, तराजूची दांडी सरळ तसे माझे मन." तुलाधाराला त्याच्या वाणिज्याच्या स्वधर्मातून चित्तशुद्धी मिळून मोक्षाचे ज्ञानही मिळाले. सेना न्हावी, गोरा कुंभार, कबीर सर्वांना त्यांच्या त्यांच्या स्वधर्माचरणातून चित्तशुद्धी होऊन ज्ञानही मिळाले. सेना न्हावी दुसऱ्यांच्या डोई करी. दुसऱ्यांच्या डोक्यातील मळ काढी. असा मळ काढता काढता त्याच्या मनात विचार आला, मी दुसऱ्याच्या डोक्यातील मळ काढीत आहे, परंतु माझ्या डोक्यातील मळ काढला का?" गोरा कुंभार मडकी भाजी, कच्चे आहेत का पक्की ते पाही. असे करता करता त्याच्या मनात विचार आला, मडके कच्चे की पक्के ते मी पाहतो. परंतु माझ्या जीवनाचे मडके मी पक्के केले आहे का?" सावता माळी मळा करी. विषारी रान, निरुपयोगी तृण उपटून टाकी. असे करता करता त्याच्या मनात विचार आला, माझ्या हृदयातील वासनांचे विषारी गवत मी उपटून टाकले आहे का?" कबीर मोमी होता. वस्त्रे विणी. विणता विणता त्याच्या मनात येई, माझ्या जीवनाचे वस्त्र मी नीट विणले आहे का? माझे निर्मळ जीवनवस्त्र प्रभूला देता येईल का?"

अशा रीतीने त्या त्या कर्मांतूनच चित्तशुद्धी होऊन ज्ञानही मिळते. कर्मयोगी आपल्या कर्मानेही केवढाली फळे मिळवितो! फळाची इच्छा मनात धरून कर्मे करणाऱ्यास ते क्षुद्र 'फळ मिळेल. परंतु निष्काम वृत्तीने कर्मात रंगलेला कर्मयोगी ते फळ मिळवून शिवाय चित्तशुद्धी मिळवितो. ज्ञानाचा अधिकारी होतो. मुक्त जणू होतो.

स्वधर्माचरण सतत करीत राहिल्याने समाजातील दंभही टळतो. एखादा केवळ निर्वासन झालेला ज्ञानी म्हणेल "मला आता कशासाठी कर्म करावयाचे? मिळवायचे असे काय राहिले आहे?" परंतु तो जर स्वस्थ बसेल तर इतरही तसे करू पाहती. याची शांती व समाधान तर त्यांच्याजवळ नाही. परंतु केवळ वरपांगी अनुकरण करतील. समाजात यामुळे दंभ माजेल. म्हणून कर्मयोगी सतत निष्काम सेवा करीतच राहतो.

असा हा कर्मयोग भगवान श्रीकृष्ण सांगत आहेत. कर्माचा महिमा त्यांनीच शिकवावा. कोणतेही सेवाकर्म तुच्छ नाही हे त्यांनी स्वत:च्या जीवनात दाखवले. त्यांनी गायी चारल्या, राजसूय यज्ञात उष्टी काढली, शेण लावले. जेव्हा शिशुपाल म्हणाला, "त्या कृष्णाची काय अग्रपूजा करता, तो गवळट. गायी चारणार!" तेव्हा कृष्ण म्हणाले, "होय, मी गायी चारणारा कृष्ण. गोपाळकृष्ण असे म्हणवून घेण्यातच मला आनंद आहे." भगवंतांनी अर्जुनाचे घोडे हाकले. भारतीय युद्धात सायंकाळ व्हावी, क्षत्रिय स्नानसंध्या करावयास जावेत. परंतु भगवान श्रीकृष्ण त्या वेळेस काय करीत असत? ते रथाच्या घोड्यांना पाण्यावर नेत. त्यांच्या अंगात रुतलेली शल्य काढीत. त्यांना खरारा करीत. आपल्या पीतांबराचा तोबरा करून त्यातून चंदी देत मोरोपंतांनी वर्णन केले आहे :

"औषध सुचणक कल्पी पीतपट पसाही तोबरा माप
श्रितसाहित्य कराया न बरा मांदार बरा मा-प।।"

हा लक्ष्मीपती भक्तांची किती काळजी घेतो. कल्पवृक्षापेक्षा हा किती श्रेष्ठ! हा भगवान पीतांबरातून चंदी देत आहे!

अशा भगवंतांनी कर्माचा महिमा सांगितला आहे. असा हा प्रभू संतांनी उभा केला आहे. कर्माचा महिला सांगून शेवटी भगवान सांगतात, अर्जुना, स्वधर्मचरणाने मोक्ष हाती येईल. परंतु कामक्रोध, नाना वासना, लोभ यामुळे स्वधर्माचरण हातून नीट होणार नाही. तरी पण कामक्रोध ताब्यात घे, संयमी हो आणि निष्काम कर्मयोगाच्या साधनाने जीवन कृतार्थ कर.

✦✦✦

अध्याय चौथा

संसार सर्वत्र ओतप्रोत भरलेला आहे. तो सोडू म्हणता सोडता येत नाही. प्राणिमात्राच्या पाठीमागे कर्म हे सारखे लागलेलेच आहे. झोपणे हे सुद्धा क्रियापद आहे. बसणे हे सुद्धा क्रियापद. बसून बसून पाय दुखू लागले म्हणतात. अशा या परिस्थितीत कर्मे कशी टाळणार?

कर्म टाळाल तर देहयात्रा होणार नाही. चित्तशुद्धी लाभणार नाही. ज्ञानाचा उदय होणार नाही. समाजात दंभ माजेल. म्हणून सदैव कर्म करीत रहावे. त्याचा कंटाळा करू नये. स्वत:च्या आवडीने कर्म हाती घ्या. स्वत:च्या गुणवृत्तीला अनुरूप असे कोणतेही समाजसेवेचे कर्म हाती घ्या. त्यात रमून जा.

नुसते बाह्य कर्म तारक नाही. बाह्य कर्माला किंमत कशाने प्राप्त होते? बाहेरच्या सामान्य कर्मांतून आपण मोक्षाची अमृतधार कशी मिळवायची, ते या चौथ्या अध्यायात सांगितले आहे.

चौथ्या अध्यायात तीन शब्द आलेले आहेत. १. कर्म, २. विकर्म, ३. अकर्म.

कर्मणो ह्यपि बोद्धव्यंच विकर्मण:।

अकर्मणोऽपि बोद्धव्यं गहना कर्मणो गति:।।

कर्म काय, विकर्म काय, अकर्म काय हे सारे समजून घेतले पाहिजे. कर्माचा महिमा अपार आहे. कर्माची गहनगंभीर गती मोक्षाच्या समुद्रास नेऊन मिळवील. परंतु नीट समजून घेऊ तर.

कर्म म्हणजे बाहेरचे स्थूल कर्म, परंतु विकर्म म्हणजे काय? विकर्म म्हणंजे विशेष कर्म. अधिक महत्त्वाचे काम. विकर्म म्हणजे मनोमय कर्म. समजा, रस्त्यात एखादा ओळखीचा मनुष्य भेटला आपण त्याला नमस्कार करतो. परंतु त्या नमस्कारात जर आपले मन नसेल, तो जर देखल्या देवा दंडवत असेल तर त्या नमस्काराचा काय उपयोग? तो नमस्कार आपणास बोजा वाटतो. ते नमस्काराचे कर्म आपणास मुक्त न करता उलट बद्ध करते. डोक्यावर जणू ओझे देते.

आपल्या कर्मात मनाचा सहकार हवा. आपल्या कर्मात आत्मा ओतलेला असला पाहिजे. म्हणजे ते कर्मही नीट होते आणि त्या कर्माचा बोजा वाटत नाही. कबीर वस्त्रे विणी तेव्हा,

झिनी झिनी झिनी
बिनी चदरिया''

असे गाणे म्हणत रंगे. बाजारात कबीर आपली ती सणंगे घेऊन बसला की, लोक त्या सणंगांकडे बघत राहत. ती जणू अमोल वाटत. कारण त्या वस्त्रात कबीराचा आत्मा होता. कारण त्याचे हृदय तेथे ओतलेले असे. हृदयाची किंमत कोण करणार?

रुक्मिणीने एका तुळसिदळाने गिरीधर प्रभु तुळिला''

असे बायकांच्या गाण्यात आहे. सत्यभामेने सारे अलंकार पारड्यात घातले तरी कृष्णाची तुला होईना. परंतु भावभक्तीने भरलेले एक पान रुक्मिणीने ठेवले आणि कृष्णाचे पारडे वर गेले. सुदामदेवाने कृष्णासाठी चार मुठी पोहे आणले. परंतु द्वारकेचा राणा त्या पोह्यावर जणू तुटून पडला. सुदाम्याला सोन्याची नगरी देऊनही त्या पोह्यांची किंमत पुरी करता आली नसती. ते पोहे साधे नव्हते. ते जणू मंतरलेले होते. त्या पोह्यांत सुदाम्याचे प्रेमळ हृदय होते.

वस्तू लहान की मोठी हा प्रश्न नाही. तिच्यात तुमचे हृदय आहे की नाही हा प्रश्न आहे. शेतकऱ्यांची एक म्हण आहे, ''ओली पेर पण खोली पेर.'' शेतात जो दाणा पेरावयाचा तो खोल पेरला पाहिजे आणि तेथे ओलही हवी, तरच अंकुर येईल. त्याप्रमाणे आपले कर्म मारून मुटकून केलेले नसावे. त्यात हृदयाचा ओलावा असावा. आपण दक्षिणा देतो. ती ओली करून देतो. वर तुळशीपत्र ठेवून देतो. त्यातील हेतू काय? ती दक्षिणा पै-पैसा असेल. परंतु हृदयाचा ओलावा जर तेथे

असेल, तर त्या पैचे कुबेराच्या सर्व संपत्तीहून अधिक मोल आहे. आपल्या नावाने दगड बसवण्यासाठी लाखो रुपयांच्या देणग्या देतात, त्या काय चाटायच्या? त्यापेक्षा भक्तिप्रेमाने उचंबळून दिलेली दिडकी अधिक थोर आहे. भीम इतरत्र कितीही जेवला तरी कुंतीच्या हातचा एक घास घेताच त्याला ढेकर येई. आईच्या हातचा घास! त्यात अमृताचे सागर आहेत. आईने चार ओळीचे पत्र पाठविले आणि दुसऱ्या कोणी अर्धा शेर वजनाचा निबंध लिहून पाठवला, तरी आईच्या त्या चार ओळी अधिक वजनदार आहेत. रामायणात वर्णन आहे की, प्रभू रामचंद्रांनी मृत झालेल्या वानरांकडे, जखमी झालेल्या वानरांकडे प्रेमाने पाहिले आणि ते सारे अव्यंग होऊन, सजीव होऊन उठले. रामरायांनी किती भावनोत्कट वृत्तीने पाहिले असेल. त्यांचा सारा आत्मा त्या दृष्टीस असेल. तुम्ही कितीही डोळे ताणलेत. रामाने किती अंशाचा कोन करून पाहिले असेल ते ठरवून पाहिले तरी त्याने काय होणार आहे?

कर्मात विकर्म ओता. बाह्य कर्मात हृदयाचा सहकार मिसळा. म्हणजे ते कर्म प्राणमय होईल. ते जिवंत कर्म होईल आणि पुन्हा त्या कर्माचा तुम्हाला मुळीच बोजा वाटणार नाही. आईला मुलाची सेवा करून कधी कंटाळा येतो का? तुम्ही एखाद्या आईला विचारून पाहा, "हे माते, या आजारी मुलाची तू किती दिवस शुश्रूषा करणार? आता याला दवाखान्यात नेऊन आम्हाला शुश्रूषा करू दे." असे तुम्ही जर म्हणाल तर मी माता म्हणेल, "मी नाही हो थकल्ये. मी काय मोठेसे केले? माझा आनंद नेऊ नका." रात्रंदिवस सेवा करूनही आईला आनंद वाटतो का? कारण तिच्या सेवेत विकर्म आहे. मनाचा सहकार आहे.

कर्मात विकर्म मिसळले म्हणजे त्याचे अ-कर्म होते. ज्या कर्मात हृदय ओतलेले आहे, त्या कर्माचा बोजा वाटत नाही. करून न केल्यासारखेच जणू वाटते. जनाबाई सारखे दळीत होती. तिला थकवाच जणू नाही. पांडूरंग जणू तिला हात लावित होता. भावभक्तीचा पांडुरंग, आंतरिक जिव्हाळ्याचा पांडुरंग तिच्या जोडीला होता. म्हणून तिला कंटाळा नसे. रात्रंदिवस दळून जणू ती मुक्त होती.

वि-कर्माची अशी ही महान शक्ती आहे. बंदुकीची लहानशी गोळी, परंतु तिला काडी लावा. केवढी तिची शक्ती असते ते दिसेल. तसे विकर्माचे आहे.

लहानशा कर्मात विकर्माची शक्ती ओततात मोक्ष फळ हाती येते. एखादा ओबडधोबड भला मोठा ओंडका असावा, तो कोणाच्या डोक्यात घालू तर डोके फुटेल. परंतु त्या ओंडक्याला काडी लावा, त्याचे भस्म होईल. ते घ्यावे व खुशाल अंगाला फासावे. औंडक्याचीच का ती राख, असे मनात येईल. परंतु त्या ओंडक्याचीच ती निरुपद्रवी राख.

ज्या कर्मात मन नाही ते ओझे वाटते. त्याचा जोजार वाटतो. परंतु कर्मात मनाचे विकर्म ओतले की मोकळे वाटते. भगवान विष्णूचे वर्णन आहे ना:

शान्ताकारं भुजगशयनम्''

सर्पावर निजलेले असून ते शांताकार आहेत. महात्माजींना एकदा एकाने विचारले, तुम्ही प्रचंड चळवळी करता. किती तुमचे उद्योग! तुमच्यावर किती टीका! परंतु हे सारे करीत असता तुम्हाला काय वाटते?'' त्यांनी उत्तर दिले, 'आत तंबोरा लागलेलाच असतो.'' महात्माजींच्या जीवनातील हे संगीत कोठून आले? ही शांती कोठून आली? ते जे काही करत त्यात त्यांचे विकर्म असे. त्यामुळे मनाची शांती ढळत नाही. प्रसन्नता राहते.

रवींद्रनाथांनी साधनेत म्हटले आहे, ''आपण विहिरीवरून एक घागरभर पाणी आणू लागलो की ती घागर बसलीच, डोक्यावर ओझे झालेच. परंतु जेव्हा आपण पाण्यात पोहत असतो. पाण्यात बुड्या मारीत असतो, त्या वेळेस हजारो घनफूट पाणी डोक्यावर असते. तरी तो बोजा आपण सुखाने उचलतो.'' त्याप्रमाणे जनतेच्या सेवेत जो बुडाला त्याला टीकांचे, निंदा-अपमानांचे बोजे वाटत नाही. तो ते सारे लीलया सहन करतो.

ही शक्ती कोठून येते, कशाने येते? विकर्माने येते. जे जे सेवाकर्म उचलाल त्यात अंतःकरण आत. आपले हृदय म्हणजे अमृताची कुपी आहे हृदयातील प्रेमाच्या गुलाबदाणीतील पाणी प्रत्येक कर्मावर शिंपडीत जा. ते कर्म सतेज होईल, टवटवीत दिसेल. त्या कर्माचा तुम्हाला बोजा वाटणार नाही. शिवाय अशी सतेज कर्मे समाजासही तेजस्वी केल्याशिवाय राहणार नाहीत.

सुर्याला रविवारची सुट्टी नाही. नदीला कधी सुट्टी नाही. त्यांचे सेवाकर्म रात्रंदिवस चालले आहे. त्याप्रमाणे जो आपल्या सेवेत अंतरात्मा ओततो त्याला थकवा वाटणार

नाही. कंटाळा येणार नाही. कर्मातच त्याचा आनंद, कर्मातच मोक्ष, कर्म करून जणू तो अ-कर्मी असतो.

संत सेवाकर्म कधी सोडीत नाही. कारण मोक्ष म्हणून काही निराळी वस्तू आहे, असे त्यांना वाटत नाही. तुकारामांनी एका ठिकाणी गमतीने म्हटले आहे :

का रे पुंड्या मातलासी
उभे केले विठोबासी''

पुंडलिका, माझ्या विठोबाला तू का रे युगानुयुगे उभे ठेवलेस?'' पुंडलिक आईबापांचे पाय चेपीत होता. त्या सेवेने प्रभू भेटायला आले. पुंडलिकाने एक वीट फेकली व राहा उभा, असे सांगितले. त्याला माहीत होते की, ज्या माझ्या सेवाकर्माने पांडुरंग धावून आला, तो पांडुरंग धावून आला, तो पांडुरंग जोपर्यंत माझ्या हातात ती सेवा आहे तोपर्यंत जाईल कसा? माझ्या सेवेतच त्या प्रभूला बांधून ठेवण्याचे सामर्थ्य आहे.

म्हणून साधनेतच राहा. कर्मातच हृदय ओता. तो मोक्ष समोर येऊन उभा राहील.

आपण आज फार हावरे झालो आहोत. जरा काही केले की मिळाले का फळ बघतो. लहान मूल बी रुजत घालून लगेच उकरून अंकुर आला की नाही पाहते. तसे आपले आहे. जरा तुरुंगात जाताच मिळाले का स्वराज्य असे पाहतो. परंतु रामकृष्ण परमहंस म्हणत, कमळाची कळी चिखलात पाय रोवून उन्हात, वाऱ्यात तपश्चर्या करीत असते. एक दिवस ती कळी फुलते. भुंगे येऊन कमळाला म्हणतात, ''कमळा, फुललास रे तू!'' यावयाचा आहे मुक्तेश्वर.

अशा रीतीने जे काही हाती घ्याल त्यात सर्व जिव्हाळा ओता. त्यामुळे फळ मिळेलच. परंतु तुम्हाला मोकळेपणाही वाटेल. त्या कर्माचा बोजा वाटणार नाही. तुम्ही मुक्तदशा अनुभवाल.

कर्मात विकर्म ओतून एक प्रकारची अकर्मी दशा कशी अनुभवावी ते संतांजवळ जाऊन शिकावे. चौथ्या अध्यायाच्या शेवटी शेवटी म्हटले आहे.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया.''

जा, संतांकडे जा. ते कसे वागतात ते पाहा. जा, महात्माजींजवळ जरा बस. त्यांची अखंड सेवावृत्ती, त्यांनी नम्रता, त्यांचा आनंद, त्यांची शांती, त्यांचे हे मुक्त हास्य, हे सारे त्यांच्याजवळ जा व समजून घे.

अशा थोरांजवळ राहिल्याने आपल्या अनेक आशंका फिटतात. गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यऽस्तु छिन्नसंशय:' असे होते. म्हणून थोरामोठ्यांकडे मधूनमधून जावे. सत्संगती जोडावी. भाराभर ग्रंथ वाचून खरे ज्ञान होणार नाही. खरे ज्ञान शेवटी जीवनातून येते. ज्याने आपल्या जीवनाचा पवित्र दीप पेटवून ठेवला आहे, त्याच्याजवळ जाऊनच आपणास आपल्या जीवनात प्रकाश आणता येईल.

✦✦✦

अध्याय पाचवा

कर्मामध्ये विकर्म ओतले की त्या कर्माचे अकर्म होते. कर्म करून जणू संन्यासी. संन्यास म्हणून निराळी वस्तूच जणू नाही. पाचव्या अध्यायात कर्मयोग व संन्यास यांची तुलना आहे. कर्मयोग श्रेष्ठ की संन्यास श्रेष्ठ? कोणता मार्ग घ्यावा? भगवान म्हणतात, अरे, संन्यास व कर्मयोग हे का वेगवेगळे आहेत? संन्यास वा कर्मयोग यात फरक म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू.

तरीही 'कर्मयोगी विशिष्यते' असे म्हटले आहे. हे कोणत्या अर्थाने म्हटले आहे? संन्यासापेक्षा कर्मयोगात विशेष असे काय आहे? विशेष आहे हे की कर्मयोग आपण समजू शकतो. कर्मयोग म्हणजे रात्रंदिवस कर्म करीत असूनही काहीही केले नाही असे वाटणे. ही गोष्ट आपण जीवनात अनुभवू शकतो. या गोष्टीची आपणांस कल्पना येऊ शकते. आई मुलाची सेवा करते, परंतु तिला त्या सेवेचे ओझे वाटत नाही. आपण मित्रांसाठी काही श्रम केले, तर त्या श्रमांचा बोजा वाटत नाही. कर्मयोग समजायला सोपा आहे. कर्म करीत राहून अकर्मी दशेचा अनुभव घेणे हे जरा सोपे आहे. संन्यास म्हणजे काहीही न करता सारे करणे. कर्मयोग म्हणजे सारे करून न केल्यासारखे वाटणे. यातील संन्यास समजणे जरा कठीण. काहीही न करता सारे कसे करावयाचे हे पटकन समजणार नाही. परंतु कर्मयोगाची कल्पना येते म्हणून तो विशेष आहे. सोपेपणाच्या दृष्टीने कर्मयोगाचे विशिष्टत्त्व. एरवी दोन्ही सारखेच.

चौथ्या अध्यायात म्हटले आहे की,

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमयम्

विवस्वान् मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्''

प्रभूने हा योग्य प्रथम सूर्याला शिकविला आणि सूर्यापासून मनू म्हणजे विचार करणारा पहिला मानव शिकला. सूर्य म्हणजे कर्मयोग व संन्यास यांची मूर्ती आहे. सूर्याला कर्मयोगी म्हणावयाचे की संन्यासी म्हणावयाचे? सूर्य उदयाचलावर येऊन नुसता उभा राहतो. परंतु तो पूर्व दिशेला उभा राहताच साऱ्या जगभर व्यवहार सुरू होतात. पक्षी उडू लागतात. गुरे चरायला जातात. माणसे उठून नाना प्रकारचे उद्योग करू लागतात. सारा अंधार नाहीसा होतो. सूर्य येताच सर्व विश्वाला चालना मिळते.

मित्रो जनान् यातयनि ब्रुवाणो''

असे वेदांत म्हटले आहे. तो सूर्य मूकपणाने जणू हाका मारतो. सर्व लोकांना उद्योग करायला लावतो. असा जो हा सूर्य, त्या सूर्याला आपण जर म्हटले, 'हे सूर्यनारायण, तुझे केवढे कतृत्त्व! तू सारा अंधार दूर केलास. सर्व जगात चैतन्य ओतलेस. तुला कोटी कोटी प्रणाम.' तर तो सूर्य म्हणेल, 'तुम्ही काय म्हणता ते मला कळत नाही. कोणता अंधकार मी दूर केला? मला चिमूटभर आणून तरी दाखवा. मी काही करीत नाही. मी येथे नुसता उभा आहे.' सूर्य काही करीत नसून सारे करतो. सारे करून काही करीत नाही.संन्यस व कर्मयोग यांची तो संमिश्र मूर्ती आहे.दोन्ही एकच असे जणू विचारी मानवाला तो सांगत आहे.

आपण असे म्हणत असतो की शुक, याज्ञवल्क्य वगैरे संन्यासमार्गाने गेले. जनकादिक कर्मयोगाच्या मार्गाने गेले, परंतु याज्ञवलक्यचाच शिष्य जनक व जनकाचाच शिष्य शुक. संन्याशाचा कर्मयोगी शिष्य व कर्मयोग्याचा संन्यास शिष्य. गुरू-शिष्य यांच्यात अभेद असतो. म्हणजेच संन्यास व कर्मयोग हे अंतर्यामी एकच आहेत.

तो खरा संन्यास ज्यात अपरंपार कर्मशक्ती असते. भोवरा अत्यंत गतिमान असतो तेव्हा स्थिर वाटतो. शुक्राचार्य संन्यासी होते. परंतु परिक्षितीला भागवत सांगू लागले तर सात दिवस थांबले नाहीत. सारखी कर्मधारा जणू ओतीत राहिले.

समजा, महात्माजी येथे एकदम उभे राहिले. ते नुसते येताच सारे एकदम उठतील, स्वच्छता करतील, उद्योग करून लागतील. महात्माजींचे नुसते ते अस्तित्व प्रचंड चालना देईल. संन्यास म्हणजे कर्माची अपरंपार प्रेरणा देण्याची शक्ती.

आई मुलावर रागावते. ती अबोला धरते. ती एकही शब्द बोलत नाही. मुलगा हिंपुटी होतो. तो आईजवळ जातो व म्हणतो, ''दोन थोबाडीत मार. पण बोल. तुझे हे न बोलणेच मला फार छळीत आहे. मला दु:ख देत आहे. आई, तुझा हा अबोला असह्य आहे.'' आईच्या त्या न बोलण्यात किती बोलणे होते!

चांगदेवांना ज्ञानेश्वरांस पत्र लिहावयाचे होते. परंतु तीर्थस्वरूप लिहावे की चिरंजीव लिहावे, हे त्यांना समजेना. ज्ञानदेव वयाने लहान, परंतु ज्ञानाने मोठे. शेवटी चांगदेवांनी कोरेच पत्र पाठविले आणि ते कोरे पत्र मुक्ताबाईने वाचले! चांग्या, इतके शिकलास तरी कोरा तो कोराच तू!'' असे ती म्हणाली. ज्ञानदेवांनी ते कोरे पत्र वाचून उत्तर पाठविले.

पंढरपुरला कटीवर हात ठेवून पांडुरंग मुकेपणाने उभा आहे. परंतु त्यातील अर्थ शंकराचार्यांनी ओळखला. ते पांडुरंगाष्टकात म्हणतात, 'माझ्या भक्तांना संसारसागर कमरेइतकाच इतका खोल आहे, असे हा मुका पांडुरंग कमरेवर हात ठेवून सांगत आहे.'

संन्यासात असा अपार अर्थ असतो. त्याचा खरा संन्यास की जो उभा राहताच साऱ्या विश्वासा प्रेरणा मिळते. ज्याने अपरंपार सेवा जन्मोजन्मी ओतली असेल त्याच्याच संन्यासात अशी शक्ती असू शकेल. बापाने जन्मभर शेतीत काबाडकष्ट केले. आता तो म्हातारा झाला. त्याचा मुलगा आता काम करतो. मुलगा दमून घरी आला की बाप त्याच्या पाठीवरून हात फिरवतो व म्हणतो, ''बाळ तू दमतोस. माझ्याने काही होत नाही.'' मुलगा म्हणतो, बाबा, तुमच्या या प्रेमळ पाहण्यात व या हात फिरवण्यात सारे आहे. तुमची कृपादृष्टी मला अपरंपार शक्ती देते.'' बापाच्या या सुरकुतलेल्या हातात, त्या संन्यासी हातात मुलाला कर्मप्रेरणा देण्याची अपार शक्ती असते.

कर्मयोग व संन्यास हे एकरूप आहेत. दगड म्हणजे धोंडा म्हणजे फत्तर तसे कर्मयोग म्हणजेच संन्यास. असा हा निष्काम कर्मयोग अंगी बाणवावा. कर्मे करीत राहून मुक्तस्थिती अनुभवावी. ती मुक्तस्थिती एकदम थोडीच येणार आहे? हळूहळू प्रयत्नाने ती स्थिती प्राप्त करून घ्यावयाची आहे. कर्मामुळे चित्तशुद्धी होत जाते. कर्मामुळे आपले स्वरूप प्रतीत होते. समजा, एखादा हिमालयात जाऊन आला. स्वत:ला शांती लाभली असे त्याला वाटते. त्याला कोणीतरी भक्तिभावाने जेवायला बोलावतो. बाबाजी जेवायला येतात. तेथे एखादे लहान मूल दाराच्या कडीशी खेळत असावे, त्या नादब्रम्हात ते बालक रंगून गेले असावे. परंतु हिमालयांत शांती मिळवून आलेल्या बाबाजीला ती कटकट वाटते! त्या आनंदमूर्ती बालकाच्या अंगावर तो ओरडतो. अशी ही शांती काय कामाची? तुमच्याजवळ क्षमा-शांती किती आहे, त्याची जीवनात परीक्षा द्या.

आपण रात्रंदिवस कर्मे करीत असतो. कर्मे करताना अनेकांशी संबंध येतात. आपण कधी रागावतो, कधी भांडतो, कधी द्वेष-मत्सर मनात येतात. अशा रितीने आपल्या मनात काय काय घाण आहे ती आपणास दिसते. आपण ते दोष दूर करण्याची खटपट करू लागतो. उत्तरोत्तर निर्मळ होत जातो. कपडे उन्हात वाळत घातले म्हणजे लपलेले ढेकूण जसे बाहेर पडतात, तसे आपल्या मनात लपलेले, रागद्वेष, कामक्रोध कर्म करीत असता प्रकट होतात. ते धरावे व त्यांचा नि:पात करावा.

तिसऱ्या अध्यायात भगवंतांनी कामक्रोधांच्या बाबतीत सावध राहा, असे सांगितले आहे. पुन्हा पाचव्या अध्यायातही तेच सांगितले आहे. कामक्रोध जिंकून घेतल्याशिवाय कर्मयोग कसा साधायवयाचा? हातून उत्कृष्ट कर्म कसे व्हायचे? विकर्म कसे ओतता येईल? कर्म करून अकर्मी दशा कशी अनुभवता येईल?

मन निर्मळ, प्रसन्न असेल तरच हातून उत्कृष्ट सेवा होईल. म्हणून सदैव प्रयत्न करावेत. धडपडत असावे. धडपड हेच मानवाचे भाग्य. ज्याची धडपड संपली तो मुक्त तरी किंवा पशू तरी. ज्याच्या जीवनात धडपड आहे त्याला आशा आहे. आपल्यासमोर कर्मयोग्याचा दिव्य आदर्श आहे, त्या आदर्शाकडे

पावले टाकीत जावयचे आहे. देवळाचे शिखर लांबून दिसते. परंतु पाऊल हातावरच पडते. त्याप्रमाणे एकदम ध्येयाला मिठी मारता येणार नाही. धडपडत जावे लागेल. कालच्यापेक्षा आज चांगले होऊ, आजच्यापेक्षा उद्या चांगले होऊ असे करीत जाऊ. उत्तरोत्तर अधिक चांगले होता येत नाही म्हणून रडू. मीराबाईने म्हटले आहे :

अंसुवन जल सिंच सिंच
प्रेम-बेल बोई''

डोळ्यातील आसवे ढाळून प्रेमाची वेल मी लावली आहे. हे धन्य अश्रू कोणाजवळ आहेत? जर्मन कवी गटे म्हणतो, जो कधी रडला नाही त्याला देव मिळणार नाही.''

आपल्या अपूर्णतेही पदोपदी जाणीव होऊन रडत, धडपडत पूर्णतेकडे जाणारे आपण यात्रेकरू आहोत. केव्हातरी तो शेवटचा दिवस येईल की, ज्यादिवशी संपूर्ण विकासाची भेट होईल. तुकाराम महाराज म्हणतात :

याजसाठी केला होता अट्टाहास
शेवटचा दीस गोड व्हावा.''

दगड फोडणारा घाव घालीत असतो. शेवटच्या घावाला छकले होतात. परंतु पहिले घाव का निरुपयोगी होते? महात्माजींनी लिहिले होते, 'प्रयत्न म्हणजे यश:सिद्धी' प्रत्येक प्रयत्न, प्रत्येक पाऊल आपणास उत्तरोत्तर पुढे नेते.

आणि एक दिवस संपूर्ण ज्ञान होईल. सारे खळमळ धुऊन जातील. परंतु संपूर्ण ज्ञान या देहात मावू शकणार नाही. देह फाटेल, देह गळून पडेल. जीवमुक्त या देहात मिळणे कठीण. जनकादिकांना आपण जीवनमुक्त म्हणतो. त्याचा अर्थ इतकाच की ध्येयाच्या जास्तीतजास्त ते जवळ गेले होते. जसे भूमितीत आपण म्हणतो की, ही सु-रेषा समजा.' भूमितीत पदोपरी समजा' हा शब्द असतो. कारण रेषा काढावयाची कशी? रेषेची व्याख्या काय? जिला लांबी आहे, परंतु रुंदी नाही ती रेषा. रुंदीशिवाय लांबी कशी काढायची? बर्फीची लांबी खा, रुंदी खाऊ नको असे म्हटले तर बर्फी खाता येईल का? आपण तरीही रेषा काढतो. कमीतकमी रुंदीची लांबी काढतो. परंतु निर्दोष रेषा काढता येणार नाही. तसा संपूर्ण कर्मयोग, संपूर्ण संन्यास या देहात मावू शकणार नाही.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

किती झाले तरी हा मातीचा गोळा आत्म्याला चिकटलेला आहे, थोडी तरी अपूर्णता राहतेच ती देहपातानंतर संपते. तुकाराम म्हणतात–

उद्योगाची धाव बैसली आससी
पडले नारायणी मोटळें हें''

सारे उद्योग जसे गळून पडतात सर्वत्र स्वतःचे परमस्वरूप दिसते आणि देहाचे हे मोटळे प्रभुचरणी पडते. जीवन कृतार्थ होते.

+++

अध्याय सहावा

जीवनात कर्मयोग कसा आणावा, कोणते उपाय करावेत ते या सहाव्या अध्यायात सांगितले आहे. जीवन यशस्वी करावयास संयमाची अत्यंत आवश्यकता आहे. मनुष्य व पशू यांच्यात जर कोणता फरक असेल, तर मनुष्य आपल्या वासना विकारांवर अंकुश चालवू शकतो हा होय. संयमहीन मनुष्य म्हणजे वृकव्याघ्रच जणू. संयमाशिवाय जीवनाला किंमत नाही. कार्लाईल हा प्रसिद्ध पाश्चिमात्य तत्त्वज्ञानी म्हणतो, ''त्या घोड्याला लोक किंमत देतात, जो घोडा स्वतःला लगाम घालून घेतो, पाठीवर जीन कसू देतो. परंतु जो घोडा लगाम घालू देणार नाही, त्याला कोण जवळ करणार? माणसाने स्वतःच विवेकाला लगाम घालून घ्यावा, तरच त्याची किंमत वाढेल.''

जे समाजसेवेचे कर्म आपण हाती घेऊ ते नीट व्हावे असे खरोखर वाटत असेल, तर आपण आपल्या सर्व इंद्रियांवर ताबा ठेवला पाहिजे. भगवान शंकर म्हणजे योग्यांचे मुकुटमणी. परंतु ते योगियांचे राणे कसे झाले? त्यांनी ज्ञानाचा डोळा पेटवून ठेवला आहे. सर्व इंद्रियांवर त्या ज्ञानचक्षूची दृष्टी आहे. वेडीवाकडी जातील त्यांचे भस्म होईल. आपण हा विवेकवैराग्याचा तृतीय नेत्र उघडा ठेवला पाहिजे.

तुमच्या ज्या नैसर्गिक क्षुधा त्या अजिबात मारा, असं धर्माचे सांगणे नाही, परंतु त्यांना मर्यादा घाला, असे धर्म सांगतो. झोपू नका असे धर्म सांगत नाही.

परंतु लवकर झोपा, लवकर उठा असे तो सांगतो. खाऊ नका असे नाही धर्म सांगत. बेताने व शरीराला हितावह तेच खा असे धर्म सांगतो. तुकाराम महाराज म्हणतात :

विधीने सेवन धर्माचे पालन''

विषयांचे संयमपूर्वक सेवन करा. असे केल्याने धर्मपालन केल्यासारखे आहे. सर्वत्र मर्यादा पाळा. प्रभु रामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम असे म्हणतात. ज्याला पुरुषोत्तम व्हावयाचे आहे, नराचे नारायण व्हावयाचे आहे, त्याने मर्यादा घालून घेतली पाहिजे.

ज्ञानेश्वरीत या अध्यायात फार गोड ओव्या आहेत. ज्ञानेश्वर म्हणतात, अरे, योग योग म्हणजे काय? योग म्हणजे मोजके बोलणे, मोजके चालणे, मोजकी झोप, मोजका आहार, इंद्रियांना असे प्रमाणात दे. म्हणजे त्यांना समाधान मिळून जीवनात सुखशांती वाढतील.''

आपण एखादी वस्तू आवडली व तीच खात बसलो तर आजारी पडू. एखादे वेळेस जागतच बसलो तर प्रकृती नीट रहाणार नाही. आपल्या स्वधर्मात अडथळा येऊ नये म्हणून शरीर नीट हवे. शरीर नीट राहिले म्हणजे मनही प्रसन्न राहील. कार्लाईल हा पाश्चिमात्य पंडित म्हणतो, ''आपले निम्मे तत्त्वज्ञान पोटाच्या स्थितीवर अवलंबून असते.'' ज्याला सारखीच बद्धकोष्ठता,ज्याचे डोके सारखे दुखत आहे, त्याच्या हातून स्वधर्म कसा पार पडणार? मॅझिनी हा थोर देशभक्त एकदा म्हणाला, ''माझ्या देशाला माझी जरूर असता मी आजारी कसा पडू शकेन?'' हा देह सेवेसाठी आहे. तो निरोगी राखला पाहिजे. महात्माजी पाच पदार्थांपेक्षा जास्त खात नसत. ज्याने रसनेवर संयम मिळविला त्याला शारीरिक व मानसिक स्वाथ्य मिळाल्याशिवाय रहाणार नाही.

संयमाने जीवनात आनंद येतो, रविंद्रनाथ म्हणतात, ''संयमाने विकास होतो. झाडाला मुळांनी जमिनीशी बांधून ठेवले आहे, म्हणूनच झाड उंच जाते, फुलाफळांनी शोभते. झाड जर म्हणेल की ही मुळांची बंधने कशाला? मला वर उडू दे, तर ते झाड तरारेल का, भरारेल का? ते सुकेल. ते बांधलेले आहे म्हणूनच वाढते. नदीला दोहोबाजूंनी तीरांचे बंधन आहे म्हणूनच तिला गती आहे, खोली आहे. सतारीला तारा बांधलेल्या आहेत म्हणूनच त्या तारा दिव्य संगीत देतात.'' असा हा संयमाचा महिमा आहे. संयमाशिवाय सुसंस्कृतता नाही, विकास नाही.

न्यायमुर्ती रानड्यांना आंबा फार आवडे. एकदा कोणीतरी कलमी आंब्याची भेट पाठविली. रमाबाईंनी सुरेख फाकी करून बशीत भरून त्यांच्यापुढे नेऊन ठेवल्या. न्यायमूर्ती महत्त्वाच्या कामात होते. तरीही त्यांनी एकदोन फाकी घेतल्या. रमाबाईंना वाईट वाटले. आपण एवढा आंबा कापून नेला, परंतु न्यायमूर्तींनी दोनच फोडी खाल्ल्या हे पाहून या खट्टू झाल्या. पुढे न्यायमूर्तींनी काम संपल्यावर हसत विचारले, "चेहरा का उतरला? काय झाले?' रमाबाई म्हणाल्या," मेले माणसाने मनापासून काही आणून द्यावे परंतु ते घेऊही नये का?" न्यायमूर्ती म्हणाले, "अगं, आंबा आवडतो म्हणून का मरेपर्यंत आंबेच खात बसू? तू आणलास कापून म्हणून खाल्ल्या दोन फोडी. खाण्यापिण्याच्या आनंदापेक्षा उच्चतर दुसरे आनंद आहेत. तिकडे मनाला वळवले पाहिजे."

आपण पुष्कळसा वेळ या क्षुद्र गोष्टींच्या चर्चेत दवडतो. आपली शक्ती त्यात दवडतो. आज काय काय खाल्ले, ते कसे होते; याचीच चर्चा करतो. मिटक्या मारतो. खरे पाहिले तर गोडी वस्तूचे नसून स्वत:मध्येच आहे. जे येईल ते गोड करून घेता येईल. आईच्या हातचा कोंड्याचा मांडाही गोड वाटतो. कारण आपल्या अंतरात्म्याची माधुरी आपण त्यात ओततो. उपनिषदे म्हणतात, "हा आत्मा म्हणजेच रसांना रसतम:" आत्मा म्हणजेच माधुर्यसागर. आईला स्वत:चे मूल गोड वाटते कारण ती स्वत:च्या आत्म्याची माधुरी त्या मुलात ओतते. त्या वैदिक मंत्रात म्हटले आहे ना:

अंतर्हृदा मनसा पूयमान:

घृतस्य धारा अभिचाकषीमि"

आपले भरलेले हृदय, भरलेले मन, म्हणजेच घृताची धारा, आईने साधा भात वाढला, तरी त्यात सारी दुधे-तुपे येऊन जातात.

आपले जीवन हेतुमय आहे. ते व्यर्थ दवडण्यासाठी नाही. पुरुषार्थप्राप्ती करून घ्यावयाची आहे.

मानवदेहाचे या साधनें

सच्चिदानंद पदवी घेणे"

या देहाच्या साधनाने परमेश्वर मिळवून घ्यावयाचा आहे. वायफळ गोष्टीत वेळ दवडू नका. शक्ती खर्चू नका. आहाराविहारात सर्वत्र प्रमाण राहू या. सौंदर्य हे प्रमाणात आहे. जीवन सुंदर करावयाचे असेल, तर सर्वत्र प्रमाण राखा.

कर्तव्याचरणात खंड पडू नये म्हणून शरीर सतेज, निरोगी हवे. मन प्रसन्न हवे. मन प्रसन्न राखण्यासाठी मधूनमधून सृष्टीसौंदर्य पाहावे. त्या जगन्माऊलीने तुम्हा-आम्हास रिझविण्यासाठी सृष्टीत अपरंपार सौंदर्य ओतून ठेवले आहे. ती अमृतत्त्वाची जणू ध्वजाच अशी उषा पाहा. सुंदर सूर्योदय पाहा. सायंकाळची आकाशातील रंगशोभा पाहा. रात्रीचा चंद्रमा पाहा. अनंत तारे पाहा.

पश्य देवस्य काव्यं न ममार न जीर्यति''

प्रभूचे हे अमर काव्य खाली, वर सर्वत्र पसरलेले आहे हे पाहा. कधी उत्तुंग पर्वतावर जावे, कधी पवित्र नद्या पाहाव्यात. कधी प्रशांत वनात बसावे, कधी उचंबळणारा अपरंपार सागर पाहावा. सृष्टीच्या दर्शनाने मनाचा शीण जातो. स्वामी रामतीर्थ म्हणत असत, ''कधी उदास वाटले तर मी एकदम बाहेर पडत असे. तो वाहणारा वारा अंगाला लागताच जणू नवजीवन आल्यासारखे वाटे.'' सृष्टीचा स्पर्श जीवनदायी असतो. मनस्ताप हरतो. जगातील निंदा, अपमान, अपयश इत्यादीमुळे मनाला आलेली ग्लानी सृष्टीसौंदर्याने नाहीशी होते. म्हणून भगवान सांगून राहिले आहेत की, जरा नदीकाठी बस. पक्ष्यांची मधुर किलबिल चालली आहे, मोराचा पिसारा दिसतो आहे, हरणे उड्या मारीत आहेत, अशा जागी जरा बस. मनाला आराम मिळेल. पुन्हा उत्साहाने कर्तव्य करावयास सिद्ध होशील.

सृष्टीचे दर्शन घ्यावे, आहारात परिमितता ठेवावी, थोडेफार खेळावे. खेळ ही पवित्र वस्तू आहे. भगवान कृष्ण गोकुळात खेळत असत. त्यांचा तो सवंगडी पेंद्या, तो का कोणी विसरेल? यमुनेच्या तीरी बाळगोपाळाबरोबर कृष्ण परोपरीचे खेळ खेळे. टिपऱ्या खेळे. हमामा, हुतूतू, चेंडू, लगोऱ्या सारे खेळ खेळे. भगिनी निवेदिता यांनी एका ठिकाणी म्हटले आहे, ''श्रीकृष्णांनी खेळांनाही दिव्यता दिली आहे.''

अशाप्रकारे आहार, विहार इत्यादी क्रिया परिमिती प्रमाणात कराव्यात. निसर्गाचे आकाशाचे दर्शन घेत जावे. संयम राखावा. शरीर, मन, बुद्धी, सतेज व निकोपी राहतील असे करावे. म्हणजे आपणास स्वधर्म-कर्म सदैव नीट आचरता येईल.

मना करा रे प्रसन्न सर्व सिद्धी कारण.''

असे तुकारामांनी म्हटंले आहे. शरीर प्रसन्न असले म्हणजे मनही प्रसन्न राहील. तुमच्या अंतर्बाह्य प्रसन्नतेने इतरांसही समाधान लाभेल. त्यांनाही उत्साह वा आशा येईल. अशा रीतीने जीवनात निर्दोष कर्मयोग आणण्यासाठी पराकाष्ठा करावी. कृपाळू भगवंतांनी बारीकसारीक सूचना जणू येथे दिल्या आहेत. त्या सदैव ध्यानी व जीवन सफल होईल असे करावे.

✦✦✦

अध्याय सातवा

सहाव्या अध्यायाच्या अखेरीपर्यंत आपण कर्माचा महिमा पाहिला. कर्म हातून नीट व्हावे, म्हणून सहाव्या अध्यायात भगवंतांनी साधनाही सांगितली. आता सातव्या अध्यायापासून एक निराळेच दालन उघडण्यात आले आहे. सातव्या अध्यायापासून बाराव्या अध्यायापर्यंत भक्तीचा ऊहापोह आहे. भक्ती म्हणजे साधनांचा राजा. इतर साधने म्हणजे साबण, रिठे सोडा याप्रमाणे आहेत. परंतु भक्ती म्हणजे निर्मळ जळ. साबण रिठे, सोडा ही भरपूर असून पाणी नसेल तर कपडे स्वच्छ कसे करावयाचे? परंतु साबण, रिठे वगैरे नसले तरी पाण्याने बरेच धुता येईल. चित्ताचे सूक्ष्म मळ शेवटी भक्तीनेच धुतले जातात.

या सृष्टीत एकाच तत्त्वाचा सारा पसारा आहे. जसा एखादा कुशल चित्रकार एकाच ब्रशाने व एकाच रंगाने नानाविध पशुपक्षी रंगवितो, मानव रंगवितो, निसर्गातील दृश्ये रंगवितो, तसेच तो विश्वंभर करीत असतो. सर्वत्र एकच मसाला. बाह्य रूपरंग निराळे. परंतु आत एकच तत्त्व. सर्व ब्रम्हखंडातील बाह्य विविधतेच्या आत असलेला तो परमात्मा पाहणे, त्याची कळा ओळखणे ही मुख्य गोष्ट आहे. ही दृष्टी ज्याला आली त्याला इतर काही मिळाले. ही दृष्टी ज्याच्याजवळ नाही त्याला इतर काही मिळाले तरी व्यर्थ होय.

त्या परमात्म्याला सर्वत्र पाहणे म्हणजे खरी भक्ती. परमेश्वराकडे आपण निरनिरळ्या मार्गांनी जात असतो. भक्तीचे निरनिराळे प्रकार असतात. या अध्यायात भक्तांचे चार प्रकार सांगितले आहेत.

आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी असे हे चार प्रकार आहेत. या चारी भक्तांना 'उदार' हे विशेषण लावलेले आहे. 'उदारा: सर्व एवैते' अर्जुना, हे सारे भक्त उदार असतात. उदारतेशिवाय भक्ती संभवतच नाही. किंबहुना असेही म्हटले तरी चालेल की उदारता म्हणजेच भक्ती.

आपल्यासारखेच दुसरे आहेत ही जीं एक भावना, तिच्या पोटी भक्तीचा जन्म आहे. आर्त म्हणजे दुसऱ्याच्या दु:खाने दु:खी होणारा. केवळ स्वत:च्या दु:खाने विव्हळ होऊन परमेश्वरास हाका मारणारा तो आर्त भक्त नव्हे. अर्थात स्वत:चे सुखदु:खही देवाजवळ सांगणारा तो काही कमी प्रतीचा, असे नाही. ती गोष्ट सुद्धा या जगात दुर्मीळ आहे.सतरा जणांसमोर तोंड वेंगाडण्यापेक्षा त्या जगच्चालकाचीच करुणा भाकणे ही गोष्टी असामान्य आहे. एकदा एक फकीर अकबर बादशहाकडे काही मागण्यासाठी म्हणून आला. त्यावेळेस बादशहा मशिदीत प्रार्थना करीत होता. देवाजवळ अधिक धनदौलत, अधिक राज्य मागत होता. बादशहाची ती प्रार्थना ऐकून फकीर मुकाट्याने परत चालला. परंतु प्रार्थनेनंतर बादशहास नोकर म्हणाला की फकीर आला होता, परंतु तो तसाच माघारी गेला. अकबराने त्या फकिरास बोलावून आणले, त्याने त्याला विचारले, माझ्याकडे येऊन असा विन्मुख का जातोस? काय हवे ते माग.'' तो फकिर म्हणाला, 'राजा, तुझ्याजवळ मागण्यात काय अर्थ? तूही माझ्यासारखा एक भिकारीच आहेस! ज्या परमेश्वराजवळ तू मागत आहेस, त्याजवळ मलाही मागू दे.''

तुकारामांनी म्हटले आहे :

'जाऊ देवाचिया गांवा
देव देईल विसांवा
देवा सांगू सुख दु:ख
देव निवारील भूक''

अशा रीतीने देवाजवळ आपले सुखदु:ख सांगणारे, त्याची करुणा भाकणारे तेही एक प्रकारे आर्त भक्तच. परंतु गीतेतील आर्तभक्त तो हा नव्हे. गीतेतील आर्तभक्त उदार आहे तो स्वत:च्या दु:खाने दु:खी नसून दुसऱ्यांचे दु:ख पाहून दु:खी झालेला आहे. समर्थ रामदासस्वामी लहानपणी घरात कोठेतरी लपले होते. आठ-दहा वर्षांचे वय, परंतु आजूबाजूचे अपरंपार दु:ख व दैन्य पाहून त्यांचे हृदय जणू

पिळवटून गेले. बाळ कोठे गेला, म्हणून आई धुंडीत होती. शेवटी खोलीत एका कोपऱ्यात बाळ आढळला. आई म्हणाली, 'वेड्या, येथे अंधारात काय करतोस?' तो उदार मनाचा बाळ म्हणाला, ''आई, चिंता करितो विश्वाची.'' समर्थ बालवयातच विश्वाची चिंता करू लागले. सर्वांना सुखी कसे करता येईल, याची विवंचना करू लागले. ती आर्तभक्ती होती. विवेकानंदांची अशीच एक गोष्ट आहे. एके दिवशी रात्री त्यांना झोप येईना. डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वाहत होत्या. उशी ओलिचिंब झाली. त्यांच्या मित्राने विचारले, ''काय झाले? का रडता?'' ते म्हणाले, ''काय सांगू? या माझ्या देशाची स्थिती कशी सुधारू, ही चिंता मला रडवीत आहे. तुम्ही माणसांचे पशू केले आहेत. अस्पृश्यांची किती केविलवाणी दशा! स्त्रियांची किती दुर्दशा! सर्वत्र विषमता, अज्ञान! जिकडे तिकडे गुलामगिरी! स्वकीयांची व परकीयांची. सारे आकाश जणू फाटले आहे असे वाटते. परंतु मला जर एक हजार सेवक मिळतील, सिंहाच्या छातीचे, निश्चयी वृत्तीचे वीर मिळतील, तर या हिंदुस्थानाचे स्वरूप मी बदलून टाकीन.'' अशी विवेकानंदांची आर्तभक्ती होती. दुसऱ्याचे दुःख पाहून सारखी तळमळ वाटणे म्हणजे आर्तभक्ती.

विवेकानंदांनी देशभक्तीची व्याख्या करताना एके ठिकाणी म्हटले आहे, तुम्ही तुमच्या देशबंधूंच्या सुखदुःखाशी एकरूप झाला आहात का? त्यांच्या नाडीच्या ठोक्याबरोबर तुमच्या नाडीचे ठोके पडतात का? त्यांच्या हृदयाबरोबर तुमचे हृदय उडते का? बोला. असे असेल तर देशभक्तीची पहिली पायरी तुम्ही चढलात असे मी म्हणेन.''

अशा आर्तभक्तीतूनच जिज्ञासू भक्ती उत्पन्न होते, असे म्हटले तरी चालेल. जगात दुःख आहे, अन्याय आहे, विषमता आहे, रोग आहेत. हे अपरंपार दुःख कसे दूर करू, असे मनात येऊन मनुष्य विचार करू लागतो. तो प्रश्न करू लागतो. रोग पाहून हे रोग का होतात याची चर्चा करू शकतो. तो संशोधक होतो. जगातील नाना प्रकारचे जे दुःख ते दूर करण्यासाठी प्रयोग करू लागतो.

हे जिज्ञासू भक्त आपल्याकडे फार झाले नाहीत. पाश्चिमात्यांत असे भक्त फार झाले. एक इटालियन शास्त्रज्ञ प्लेगचे संशोधन करू लागला. संशोधन करता करता त्याला प्लेगची गाठ आली.केलेले संशोधन त्या तापात तो लिहून ठेवीत होता. एक जर्मन शास्त्रज्ञ प्रयोगालयात प्रयोग करीत होता. एकदम स्फोट झाला. त्याचा एक

डोळा फुटला, एक हात तुटला. दुसऱ्या हाताने परमेश्वरास प्रणाम करून तो म्हणाला, देवा, अजून एक डोळा शाबूत आहे. एक हात सुरक्षित आहे. तुझे रूप मी शोधून काढीन.'' असे जिज्ञासू भक्त पाश्चिमात्य संस्कृतीच्या पायात आहेत. कोणी ध्रुवावर जातात, तेथे संशोधन करतात. कोणी हिमालयावर पुन्हा पुन्हा चढायला येतात. मानवी सुखात कशी भर घालता येईल याचे कोणी प्रयोग चालवितात. हे सारे जिज्ञासू भक्त होत.

जगातील दु:ख कोणत्या मार्गाने दूर होईल, या विचारातून जिज्ञासा उत्पन्न होते. जिज्ञासा आपणास अनेक मार्ग दाखविते. या मार्गाने दु:ख दूर होईल का, या मार्गाने होईल की? असा आपण विचार करीत जातो. जो अनेक मार्ग दिसतात, त्यातील हितकर मार्ग कोणता? खरा कल्याणप्रद मार्ग कोणता? दिसलेल्या अनेक मार्गांतील खरा मार्ग कोणता, त्याचा विचार करणारा तो अथार्थी भक्त. अथार्थी भक्त म्हणजे पैसा मागणारा भक्त नव्हे. अर्थार्थी म्हणजे कशात अर्थ आहे ते पाहणारा. आज जगात अनेक वाद आहेत. गांधीवाद आहे, समाजवाद आहे, साम्राज्यवाद आहे, भांडवलशाही आहे, फॅसीझम आहे. सर्वांच्या कल्याणाचा मार्ग कोणता? कोणत्या मार्गाने गेले तर सर्वांचे संसार सुखाचे होतील? सर्वांच्या जीवनाचा नीट विकास होईल? सर्वांना विश्रांती मिळेल, ज्ञान मिळेल, कलानंद चाखता येईल? असा विचार मनात येऊन आपण मार्गसंशोधन करतो. कोणता तरी एक मार्ग आपण पत्करतो. या मार्गाने जाऊ तर सर्वांचे कल्याण होईल असे वाटते. मग त्या मार्गाला आपण वरतो. ते जे निश्चित ज्ञान होते, त्या ज्ञानाला आपण वरतो. म्हणजेच ज्ञानीभक्त आपण होतो. ज्ञानी म्हणजे जे ज्ञान झाले ते पदोपदी जीवनात आणू पाहणारा. बुद्धांना जे ज्ञान झाले, जगाच्या कल्याणाचा म्हणून जो रस्ता त्यांना वाटला, त्याचा मरेपर्यंत ते उपदेश करीत राहिले. पुन:पुन्हा जन्म घेईन व हे ज्ञान जगाला देत राहीन असे ते म्हणाले. महात्माजींना गरिबांचे दु:ख कसे परिहरू अशी चिंता होती. त्या चिंतेचे चिंतन करीत असता त्यांना अनेक मार्ग दिसले. परंतु शेवटी चरखा हाच त्यांना तारक परमेश्वर वाटला. त्या चरख्याला त्यांनी हृदयाशी धरले. माझ्या ईश्वराचे नाव चरखा असे ते म्हणाले. रात्रंदिवस चरख्याने ध्यान त्यांना लागले. जे ज्ञान झाले, तो विचार सुचला, सर्वांच्या कल्याणाचा म्हणून जो मार्ग निश्चितपणे वाटला, त्या दिशेने जीवन सारखे नेणे म्हणजे ज्ञानीभक्त होणे होय. रात्रंदिवस मग त्या गोष्टीचा ध्यास, त्या

गोष्टीचा जप, त्या गोष्टीचा प्रचार, त्या गोष्टीचा जयजयकार. हा जन्म त्या ध्येयासाठी, पुढचा जन्म आला तरी तदर्थच. अशा रीतीने ध्येयाशी, मिळालेल्या ज्ञानाशी लग्न लागलेला तो ज्ञानीभक्त होय.

भगवान म्हणतात, 'अर्जुना, हा ज्ञानीभक्त मला फार आवडतो.'' ज्ञानेश्वरीत एके ठिकाणी प्रभू म्हणतो, 'अर्जुना, माझ्या भक्ताला नीट मिठी मारता यावी म्हणून मी चार हात धारण केले. त्या माझ्या भक्ताला बघावे म्हणून निर्गुण, निराकार असूनही मी दोन डोळ्यांचा सगुण साकार बनलो. त्या भक्तांची पूजा करण्यासाठी हातात कमळपुष्प घेतले आहे.''

'दोंवरी दोनी । भुजा आलो घेवोनी ।।
आलिंगावया लागोनी । तयाचा देह ।।
तया पहावयाचे डोहाळे । म्हणून अचक्षूसीं मज डोळे ।।
हातीचेनि लीलाकमळे । तयासी पुजूं ।।'

किती गोड ओव्या! जगाच्या मंगलासाठी अशी डोळस व निर्मळ भक्तीबरोबर घेऊन सदैव झुंजणारा जो महात्मा, तो धन्य होय.

+++

अध्याय आठवा

आपणास जे ध्येय वाटले, जो पवित्र विचार स्फुरला, जे नि:शंक असे ज्ञान वाटले, त्याच्या प्रकाशात सतत पावले टाकीत जाणे हा आपला परमधर्म होय. असे करीत असता हा देह एक दिवस गळू पडेल. ज्या वेळेस मरणाचा क्षण येईल त्या वेळेस जीवनाचा परम विकास झालेला असू दे. कसे मरावे हे या आठव्या अध्यायात सांगितले आहे.

एकदा एकनाथांना एक मनुष्य म्हणाला, नाथ, तुमचे जीवन किती सुंदर, किती प्रशांत! आमच्या जीवनात सदैव ओढाताण! सदैव गोंधळ, कामक्रोध, द्वेषमत्सर यांचा सारखा गदारोळ! आम्ही तुमच्यासारखे जीवन कसे जगू? कोणती युक्ती? कोणता उपाय?'' नाथ म्हणाले, 'ते सारे राहू दे. परंतु तुला एक गोष्ट सांगतो. तुझे मरण जवळ आले आहे. आठा दिशी तू मरणार असे वाटते.' तो मनुष्य घाबरला. तसाच घरी आला. त्याला सारखे मरण दिसू लागले. आठा दिशी मरणार. अरेरे! आता आठच दिवस! असे तो म्हणू लागला. तो शेजाऱ्याकडे गेला व म्हणाला, ''मित्रा, मी तुला उगीच छळले. नाही ते बोललो. तुझे हृदय शतदा दुखविले. मला क्षमा कर. मी आता मरणार.'' त्याने आपल्या मुलांना पोटाशी धरले. तो त्यांना म्हणाला, ''तुम्हाला मी उगीच मारले, झोडपले. बाळांनो, मी आता जाणार. तुम्हाला प्रेमाने जवळ घेऊ दे.'' गावात ज्याच्याजवळ तो भांडला होता, ज्यांच्या ज्यांच्याजवळ द्वेषमत्सराने झगडला होता, त्या सर्वांजवळ जाऊन त्याने क्षमा

मागितली. ''झाले गेले तिसरा. मी मरणार आठा दिशी'' असे म्हणून सर्वांना तो हात जोडी.

आठ दिवस झाले. नाथ त्या मनुष्याच्या घरी आले. तो मनुष्य नाथांच्या पाया पडून म्हणाला, 'आली का वेळ?' नाथ म्हणाले, 'ते देवाला माहीत, परंतु तुझे हे आठ दिवस कसे गेले? कितीकांशी भांडलास, कितीजणांचा अपमान केला?'

तो म्हणाला, ''नाथ, कोठले भांडण नि काय! सारखे मरण डोळ्यासमोर दिसत होते. सर्वांची क्षमा मागत होतो. झाले गेले विसरून जा असे म्हणत होतो. भांडायला वेळच नाही.'' नाथ म्हणाले, 'गड्या, आठ दिवस जी गोष्ट डोळ्यांसमोर ठेवून तू वागलास ती गोष्ट सदैव डोळ्यांसमोर ठेवून आम्ही वागत असतो. एक दिवस हा देह जायचा आहे. तेव्हा देहाचे गुलाम न होता देवाचे गुलाम व्हावे. गोड बोलावे. सर्वांवर प्रेम करावे. जे जवळ असेल ते सर्वांस द्यावे. आपल्या या क्षणभंगुर जीवनाचे दुसऱ्यांच्या जीवनात जर मंगल आनंद निर्माण करता आला, तर केवढी बहारीची ती गोष्ट होईल!''

मरण म्हणजे जीवनाचे उत्तर. जीवन कसे जगलो हे मरणकाळच्या स्थितीवर दिसून येते. मरणकाळच्या एका क्षणात सारे जीवन प्रतिबिंबीत होत असते. अत्तराच्या एका थेंबात ज्याप्रमाणे लाखो फुलांचा अर्क असतो, त्याप्रमाणे मरणकाळच्या एका क्षणात जीवनातील आपल्या अनंत आचारविचारांचे अनंत कायिक, वाचिक व मानसिक कृतींचे सार साठलेले असते.

आपण या जगात सारे दुकान घालून बसलो आहोत. दुकानदार असतो, तो रोज रात्री त्या त्या दिवसाची शिल्लक काढीत असतो. दिवसभर त्याने शेकडो उलाढाली केल्या, परंतु त्या सर्व उलाढालींचे सार इतका फायदा की इतका तोटा अशा सुटसुटीत उत्तरात निघते. तो रोजचा जमाखर्च पाहतो. महिन्याचा पाहतो. वर्षअखेर इतका तोटा किंवा इतका नफा तो म्हणतो. बारा वर्षे समजा दुकान चालले. बारा वर्षात इतके कमावले किंवा इतके गमावले, असे एकाक्षरी उत्तर तो काढतो. बारा वर्षातील त्यांच्या अपरंपार उलाढालीचे एवढे मिळविले किंवा इतके घालविले एवढेच सार निघते.

आपले सर्वांचे असेच चाललेले असते. रात्री आपण अंथरुणावर पडलो म्हणजे दिवसा केलेल्या शेकडो गोष्टी आठवत नाहीत. या दिवसाच्या महत्त्वाच्या चार–

दोन डोळ्यांसमोर असतात. त्या दिवशीच्या उलाढालींचे तेवढेच फलित. एक महिना जातो. महिन्यातील पाच–दहा गोष्टी डोळ्यांसमोर राहतात. बाकीच्या गेल्या. वर्ष होते. या वर्षात काय केले, असा प्रश्न डोळ्यांसमोर येऊन दोनचार गोष्टी स्पष्टपणे डोळ्यांसमोर येतात. असे वर्षानुवर्षे होत जाते आणि मरताना सर्व आयुष्याचे सार म्हणून काही तरी फलित डोळ्यांसमोर उभे राहते. या जीवनातील ती कमाई. अंकगणितातील ती व्यवहारी अपूर्णांकाची उदाहरणे असतात. केवढाले ते अपूर्णांक वाढतात. परंतु शून्य किंवा एक असे सुटसुटीत उत्तर येते. तसे आपल्या जीवनाचे आहे.

जीवनाचे हे शेवटचे उत्तर धन्यतेचे यावे, म्हणून आपण धडपडले पाहिजे. या जगात आपण जन्माला आलो तेव्हा आपण रडत आलो. परंतु सभोवतीने लोक आनंदले. त्यांनी पेढे वाटले. परंतु मरताना आपणास आनंद होऊ दे वा लोकांना रडू दे. जीवन कृतार्थ झाले असे मनात येऊन आपल्या तोंडावर मरताना प्रसन्नता फुलू दे आणि लोकांना म्हणू दे, ''अरेरे! किती सुंदर याचे जीवन ! हा सुंदर मंगलदीप का आता विझणार?''

तुकारामांनी म्हटले आहे :

'सोनियाचा कलश । माजी भरला सुरासर''

सोन्याचा देह मिळाला. त्यात का वासना – वासना विकारांची दारू भरून ठेवायची? का मंगल जीवनाचा सुधारस भरावयाचा? मरताना गत जीवनातील मंगल कार्याची स्मृती येऊन कृतार्थ वाटणे, याहून धन्यतर काय आहे?

परंतु आपण प्रत्येक दिवशी जर जपून न वागू, तर मरणाचे सोने होणार नाही.रोज वाटेल तसे वागाल तर मरताना रडाल. सोन्यासारख्या आयुष्याची माती कराल. म्हणून जपून जाऊ या. रोज ध्येयाचे स्मरण ठेवून वागू या. परमेश्वर जीवनात शिरायला सर्वत्र उभा आहे. ज्याप्रमाणे दार उघडताच वारा आत घुसतो, प्रकाश शिरतो, त्याप्रमाणे तुम्ही हृदय जरा मोठे करताच, बुद्धी जरा विशाल करताच, दृष्टी जरा प्रेमळ व पवित्र करताच परमात्मा आत शिरेल. रवींद्रनाथ गीतांजलीत एके ठिकाणी म्हणतात, ''देवा, आयुष्यातील काही क्षणांवर दिव्यतेचे शिक्के होते. तुझी मुद्रा होती.'' प्रभू तुमच्या क्षणांवर दिव्यतेचा शिक्का मारावयास उभा आहे. तुम्ही प्रत्येक क्षण प्रभूसमोर घेऊन जा. प्रत्येक क्षण ध्येयार्थ जावा म्हणजे मरण मंगल होईल. ध्येयाची

सतत धारा सदैव स्रवू दे. जे आज तेच उद्या, जे या महिन्यात तेच पुढल्या, जे या वर्षी तेच पुढल्या वर्षी, जे या जन्मी तेच पुढल्या, अशा रितीने जे थोर ध्येय मिळाले त्याचा मागोवा घेत सारखे जाऊ या. ग्रह सूर्याभोवती फिरून प्रकाशित होतात, त्याप्रमाणे ध्येयाभोवती सतत कायावाचामने करून प्रदक्षिणा घालीत राहून आपण आपले जीवन प्रकाशित करू या.

आठव्या अध्यायातील मरणाच्या भव्य रूपकाचा हा अर्थ आहे. मरण कसे यावे? त्यावेळी कशी परिस्थिती असावी, कशी नसावी? याचे रूपकात्मक मनोहर वर्णन आठवा अध्याय देत आहे. दक्षिणायन असताना मरू नये. रात्र असू नये. धूर असू नये. कृष्णपक्ष असू नये. या सर्वांचा अर्थ काय? दक्षिणायनात दिवस लहान व रात्री मोठ्या. म्हणजे कर्म करायला थोडा वेळ.तसेच दक्षिणायन आले म्हणजे आकाश मेघाच्छादित असते. प्रकाश नाही याचा अर्थ हृदयाकाश आसक्तीच्या ढगांनी भरून गेलेले असते. रात्र असणे म्हणजे जीवनात कर्मज्वाला धगधगीत पेटलेली नसणे. कर्तव्याचा प्रकाश नसणे. धूर असणे म्हणजे निशंःक ज्ञान नाही. सारेच संशयी वातावरण. कृष्णपक्ष म्हणजे चंद्राचा क्षय होणे. चंद्र ही मनाची देवता. कृष्णपक्ष असणे म्हणजे मनाचा विकास झालेला नसणे. अशा स्थितीत मरण येणे म्हणजे दुर्दैव होय. ज्याच्या मरणप्रसंगी आसक्ती जवळ उभी असेल, कर्महीनता समीप असेल, अज्ञानांधकार असेल,संशय असेल. मन खुरटलेले असेल, त्याचे जीवन व्यर्थ गेले. याच्या उलट, तो दिवसा मरतो, प्रकाश असता मरतो, कर्मज्योती झगझगीत पेटत असता मरतो, उत्तरायणात म्हणजे हृदयाकाश निर्मळ असताना, कर्म करायला मोठे दिवस असताना अनासक्त मनाने जो मरतो, शुक्लपक्षात म्हणजे मनाचा विकास होत असता जो मरतो, तो धन्य होय. ते मरण जीवनच. परम थोर असे ते मरण असते. आपण असे मरण यावे म्हणून सारखी धडपड केली पाहिजे. कृष्णाची मुरली शरदऋतूत वाजली. ज्यावेळेस आकाश निर्मळ आहे, चांदणे पडले आहे, फुलांचा सुगंध सुटला आहे अशा वेळेस मुरली वाजते. आपल्या जीवनात ती गोड मुरली तेव्हा वाजेल, जेव्हा सारे मोह आपण जिंकून घेऊ, सारखे अनासक्त रीतीने, निष्काम बुद्धीने जनताजनार्दनाची आपल्या स्वधर्मानुसार सेवा करीत राहू. महात्माजी एकदा म्हणाले, ' मला इतर आसक्ती उरली नाही. परंतु या चरख्याची काळजी वाटते. मरताना रामराम ओठी येण्याऐवजी या चरख्याची चिंता नाही ना

येणार? चरखा चरखा चरखा असे करीत नाही ना मरणार? चरख्यात आतडे गुंतून राहील की काय?'' स्वर्गीय जमनलालजी महात्माजीस म्हणाले, 'तुम्ही चरख्याची चिंता नका करू. तो मरणार नाही.''

महात्माजींचे हे असे जीवन होते. रात्रंदिवस कर्मज्वाळा पेटून राहिली होती. धूर नाही. आसक्ती नाही. सर्वत्र स्वच्छ प्रकाश १९३१ साली आयर्विन साहेबांजवळ वाटाघाटी करता करता रात्री दोन वाजले. परंतु इतक्या रात्री घरी आल्यावर सूत कातायचे राहिले, म्हणून चरखा हाती घेऊन कातणारे ते महात्माजी होते. प्रत्येक क्षण सेवेत जात आहे. निर्मळ निरपेक्ष अनासक्त सेवा.

आपणही नम्रपणे स्वत:चे जीवन कर्मज्वाले प्रकाशित करण्यासाठी धडपडू या. जीवनाचे सोने करू. या मृण्मय शरीरात अमृतत्त्व मिळवू या. तो शेवटचा दिवस गोड व्हावा म्हणून, धन्यतेचे मरण यावे म्हणून, जाणारा प्रत्येक दिवस नीट जगू या. तरच शेवटी तरणोपाय आहे.

+++

अध्याय नववा

नववा अध्याय अति पवित्र अध्याय. गंगेचा साराच प्रवाह पवित्र असतो. उगमापासून मुखापर्यंत सारा प्रवाह पवित्र असतो. तरीही हरिद्वार, काशी, प्रयाग अशी तीर्थे आपण मानिली आहेत. तेथली गंगा अधिकच पवित्र. तसे अठराही अध्याय पवित्रच. परंतु त्यातही पुन्हा नववा अध्याय, बारावा अध्याय, पंधरावा अध्याय वगैरे अधिक पवित्र. नवव्या अध्यायाचा जप करीत अनेकांनी समाधी घेतल्या. ज्ञानेश्वर महाराज नववा अध्याय म्हणतच समाधिस्थ झाले असे म्हणतात. ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वर म्हणतात, ''नवव्या अध्यायाची वेदांनाही जणू भीती वाटते'' इतका थोर आहे. पवित्र आहे.

या अध्यायाचे इतके महत्त्व का? कारण येथे अनुभवाला येणारा राजमार्ग दाखविण्यात आला आहे. भगवान म्हणतात, ''अर्जुना, तुला प्रत्यक्षावगम असा धर्म देतो.'' जी गोष्ट सांगोवांगीची नाही, तर प्रत्यक्षावगम आहे. तुमच्या-आमच्या अनुभवास येणारी आहे.

अशी कोणती गोष्ट या अध्यायात सांगितलेली आहे? देव म्हणतात, ''अर्जुना, जे काही कर्म करशील ते ईश्वरार्पणबुद्धीने कर.'' याचा अर्थ काय? आपण जी जी कामे करतो, त्या कर्मांचा संबंध जनतेशी असतो. ती कर्मे जनताजनार्दनाला मिळत असतात. ज्यांच्या ज्यांच्याशी आपल्या कर्माशी संबंध येईल त्यांना देव म्हणजे ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करणे.

भक्त आपली स्वधर्मकर्मे या दृष्टीने करतात. गोरा कुंभार मडकी घडवी. ती मडकी चांगली व्हावी म्हणून तो माती किती तुडवी! माती तुडविता तुडविता तो तन्मय होऊन जाई. स्वतःचे मूल मातीत तुडवले गेले तरी त्याला भान नाही. ती माती तुडवीत असता जणू परमेश्वर त्याच्या मनःचक्षूसमोर होता. हा कोठला परमेश्वर? मडकी विकत घेणारे लोक म्हणजेच त्याचा परमेश्वर. गोरा कुंभाराला दुसरा देव जण माहीत नाही. माझा नारायण मडकी विकत घ्यायला येईल, त्याला का फसवू? लवकर फुटणारे मडके का त्याला विकू? असे पक्के मडके त्याला देईन का, त्याच्या मुलालाही ते पुढे पुरेल. अशा भावनेने गोरा कुंभार मडकी तयार करी.

कबीर याच भावनेने शेले विणी, वस्त्रे विणी. माझा परमेश्वर ही वस्त्रे घ्यायला येईल. त्याच्या अंगावर का वेडीवाकडी वस्त्रे घालू? नाही, ही वस्त्रे मला नीट विणू दे. काळजीपूर्वक विणू दे.

सावता माळी याच भावनाने भाजी विकायला आणी. धुऊन, निवडून तो भाजी घेऊन येई. भाजी घ्यायला येणारे गिऱ्हाईक म्हणजे जणू त्याचा भगवंत.

अशा रीतीने आपण सर्वत्र परमेश्वर पाहू या. परमेश्वराला शोधावयासाठी दूर जायला नको. तो आपल्या आसपास सर्वत्र आहे. आपण काशीला, रामेश्वराला जातो. परंतु देव का तेथेच आहे? मध्ये सारे का स्मशान आहे? एकनाथाचा मुलगा काशीची कावड घेऊन रामेश्वरला ती ओतण्यासाठी जात होता. परंतु नाथांनी त्या गंगेने तृषार्त गर्दभाची तृषा शमविली. मुलगा रागावला. परंतु रामेश्वर त्याच्या स्वप्नात आले व म्हणाले, ''अरे, गाढवाला पाजलेली गंगा मला मिळाली हो.''

टॉलस्टॉयने अशीच एक सुंदर गोष्ट लिहिली आहे. दोन मित्र यात्रेसाठी निघतात. परंतु एक मित्र वाटेतील दुष्काळी गावात जातो. तेथल्या दुष्काळपीडितांना जगवितो. पैसे संपल्यामुळे यात्रेच्या स्थानी न जाता तो तसाच परत येतो. परंतु यात्रेच्या ठिकाणी गेलेल्या त्या दुसऱ्या मित्राला स्वतःचा मित्र देवाजवळ दिसतो. दुष्काळग्रस्तांची केलेली ती सेवा देवाला पावली. यात्रेला न जाताही तो मित्र देवाजवळ जाऊन बसला.

आपण जेथे पाहू तेथे परमेश्वरच आहे. परंतु आपण आंधळे आहोत. भगवान मोठ्या खेदाने म्हणतात :

''अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम्''

आपण झाडामाडांत देव पाहतो. दगडाधोंड्यांत देव पाहतो. भुताप्रेतांत पाहतो. परंतु मानवातील देव आपणास दिसत नाही! आपणास चार तोंडाचा, आठ हातांचा असा देव पाहिजे असतो. मनुष्याहून काहीतरी निराळा देव आपणास हवा असतो. मनुष्याच्या रूपाने आपल्या शेजारी उभा असलेला परमेश्वर आपणास दिसत नाही.

या मानवाजवळ आपण भांडतो. त्याला गुलाम करतो, त्याची कत्तल करतो आणि देवाची पूजा करू पाहतो! भगवंतांना याचे आश्चर्य वाटते. अरे, मनुष्यातील देव आधी पाहा. हा बोलता चालता देव आहे. याचे स्वरूप बघ. याला काय हवे नको ते पाहा. दगडाच्या देवाला काय काय आवडते हेही आपण ठरवून टाकले आहे. गणपतीला मोदक आवडतो. विठोबाला लोणी आवडते. खंडोबाला खोबरे हवे. परंतु मानवाला काय हवे, याची कधी विवंचना आपण करतो का? आपल्या सभोवती हा दोन हातांचा मनुष्यरूपी देव उभा आहे. त्याच्या पोटात अन्न नाही. त्याच्या अंगावर वस्त्र नाही. त्याच्या पूजेला येता का धावून?

परमेश्वराला प्रदक्षिणा घालाव्यात असे म्हणतात. एक प्रदक्षिणा घालावयाची व देवाचे रूप न्याहाळून पाहावयाचे. अशाने देवाचे रूप अंतरी ठसते. परंतु हा देव कोठे आहे? लाखो खेड्यापाड्यांतून हा देव उभा आहे. या खेड्यांना प्रदक्षिणा घाला. म्हणजे तेथील दरिद्रीनारायणाचे स्वरूप तुमच्या ध्यानात येईल. त्यांची काय दशा आहे ते तुम्हाला कळेल. त्याच्या सेवेसाठी मग तुम्हा जाल.

असा हा रोकडा भक्तिधर्म आहे. प्रत्यक्षावगम धर्म आहे. तुमच्या बंधूंची सेवा करा. त्यांची सुकलेली तोंडे फुलतील. तुम्हाला परमसुख होईल. आपल्या सभोवती असलेले लोक म्हणजेच भगवंत, असे मनात येऊन जर आपण कर्मे करू तर कर्मे किती सुंदर होतील! त्या कर्मांत एक प्रकारचे तेज येईल. आपला एखादा साधा मित्र यावयाचा असला तरी आपण किती काळजीपूर्वक मनापासून सारे करतो. मग हा प्रत्यक्ष परमेश्वर आहे, असे मानू तर किती दक्षतेने व हृदय ओतून ते कर्म करू? कलकत्त्यात एक महाराष्ट्रीय संन्यासिनी होती. तिने मुलींची एक शाळा चालविली होती. एकदा विवेकानंद तिच्या भेटीसाठी गेले होते. त्यांनी विचारले, ''माईजी, काय चालले आहे?'' ती तपस्विनी म्हणाली, ''या देवतांची सेवा करीत आहे.'' ती सन्यासिनी त्या मुलींकडे किती आदराने व भक्तीने पाहात होती. शिक्षकाने मुलांकडे याच दृष्टीने पाहावे. त्यांना दगड आहेस, नंदीबैल आहेस, असे म्हणू नये. माझ्या

समोरच्या मुलांत दिव्यता आहे, ती प्रकट व्हावी म्हणून मला उद्योग करावयाचा आहे. स्वतःमधील दिव्यता या मुलांनी प्रकट करावी, म्हणून त्यांना साहाय्य देण्यास मी उभा आहे, अशा भावनेने शिक्षक वागेल तर ते अध्यापनकर्म दिव्य होईल!

मी एकदा एका शहरी गेलो होतो. गव्हर्नर यायचे होते. गटारे साफ केली जात होती. झाडलोट होत होती. गव्हर्नर येण्याआधी त्या गावात का माणसे राहात नव्हती? परंतु म्युनिसिपालिटीच्या सभासदांना व अध्यक्षांना गव्हर्नर देव वाटला! तो येणार म्हणून ते स्वच्छता करू लागले. बाकीची पन्नास हजार जनता तिच्या प्राणांची जणू किंमत नाही! आपल्या शहरातील सर्व लोक म्हणजेच परमेश्वराची रूपे, असे मनात वागवून म्युनिसिपालिटीचे सभासद वागतील, तर म्युनिसिपल कारभार, बोर्डाचा कारभार किती निराळा होईल! असा हा थोर मानवधर्म नववा अध्याय सांगत आहे. सर्वत्र परमेश्वर पाहून त्याची तुझ्या कर्ममय पुष्पांनी पूजा कर, मानवातील देव पाहा, त्याला सुखी करण्यासाठी ऊठ, असा संदेश नववा अध्याय देत आहे.

आणि सर्वत्र परमेश्वर जो पाहू लागला तो कोणाला तुच्छ मानणार, हीन मानणार? तो कोणाला अस्पृश्य म्हणून दूर लोटणार? ज्ञानेश्वर म्हणतात, माझ्या भक्ताला मग जातिभेद दिसत नाही,

''तेथ जातीव्यक्ती पडे बिंदुले''

जातिभेद, व्यक्तिभेद, यांच्या नावाने शून्याकार होतो. सर्वत्र मंगल परमात्माच दिसतो.

कर्म कोणतेही असो, ते ईश्वरार्पण भावनाने जर आपण करू, तर सारे मुक्त होऊ. नववा अध्याय मोक्षाची दारे सर्वांना सताड उघडी करीत आहे.

''स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परांगतिम्''

स्त्रिया असोत, वैश्य असोत, शूद्र असोत, कोणीही असो; आपापल्या सेवाकर्माने सर्वांना मोक्ष मिळेल. जी स्त्री पती हाच परमेश्वर मानते. त्याच्या सुखदुःखांत स्वतःचे सुखदुःख पाहते, पतीची इच्छा तीच स्वतःची इच्छा असे जी करते, तिला मोक्ष नाही मिळवायचा तर कोणाला?

प्रश्न इतकाच आहे की, जे कर्म तुम्ही करता ते कोणत्या भावनाने करता? ते जताजनार्दनाला, समाजरूपी भगवंताला अर्पण करावयाचे आहे. या भावनेने करता, की केवळ स्वार्थाने करता, या गोष्टीला महत्त्व आहे. नववा अध्याय फार थोर दृष्टी देत आहे. ती मिळाली तर जीवनात क्रांती येईल. कबीराने म्हटले आहे.

‘‘गुरूकृपांजन पायो
पायो मैने भाई
रामबिना कुछ जानत नाहीं ।।
अंदर राम बाहिर राम
जहाँ देखो वहाँ रामही राम ।।’’

मग सर्वत्र प्रभुदर्शन होईल. त्या प्रभूची सेवा करण्यासाठी तुम्ही धावाल. व्हिट्मन या कवीला हिरवे हिरवे गवत पाहून हा त्या प्रभूचा हातरुमाल आहे असे वाटले. शेक्सपिअर म्हणतो, ‘‘मग त्या मनुष्याला पाषाणातून प्रवचने ऐकू येतील, निर्झरातून वेद मिळतील.’’ एकदा ही दृष्टी यायला हवी. सर्वत्र मांगल्य पाहण्याची दृष्टी. सर्वत्रच प्रभूचा साक्षात्कार.

ही थोर दृष्टी यावी म्हणून आपण धडपडू या. ज्यांची ज्यांची सेवा करावयास आपण जाऊ ते प्रभूची रूपे आहेत, असे मानून सेवा करू या. सेवेत रस वाटेल. एक प्रकारची मुक्तावस्था जीवनात येईल. हृदयात अपार आनंद भरेल. मोक्ष तो आणखी काय?

+++

अध्याय दहावा

नववा अध्याय सर्वत्र प्रभूरूप पाहा असे सांगतो.

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति
तदहं भक्त्युपहृतं अश्नामि प्रयतात्मनः ।।
यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्
यत्तपस्यसि कौन्तेय तत्करूष्व मदर्पणम् ।।

हा जो नवव्या अध्यायाचा संदेश तो एकदम कृतीत कसा आणावयाचा? सर्व कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करावयास कसे शिकवायचे? हजारोंशी आपल्या कर्मद्वारा आपला संबंध येतो. ज्यांच्या ज्यांच्याशी संबंध येतो ती सारी भगवंतांची रूपे आहेत, असे एकदम वाटेल का?

एकदम ही दृष्टी येणार नाही. मूल जसे हळूहळू शिकत जाते तसे आपणास शिकत गेले पाहिजे. भगवान या दहाव्या अध्यायात एखाद्या कुशल शिक्षकाप्रमाणे जणू धडे देत आहेत. लहान मुलाला आपण प्रथम सोपी अक्षरे काढून देतो. सोपी व ठसठशीत अशी अक्षरे त्याच्या पाटीवर आपण काढून देतो. मोठा 'ग' काढतो व त्याला सांगतो की हा गवताचा 'ग'. मोठा 'म' काढून हा मगराचा 'म' असे आपण शिकवतो. प्रथम 'ग', 'म', 'भ', 'न' अशी सोपी अक्षरे शिकवितो. मग 'स', 'ष' वगैरे जरा कठीण अक्षरे. शेवटी जोडाक्षरे. एवढेच नव्हे, तर प्रथम जो मोठा 'ग' होता तोच लहानही असतो हे शिकवावे लागते. 'ग' मोठा ठसठशीत असला काय किंवा बारीक असला

काय, त्यातील अर्थ एकच ही गोष्ट मुलाला समजावून द्यावी लागते. नाहीतर त्या जावईबुवांच्या गोष्टीतला प्रकार व्हायचा. जावईबोवा पत्रातील बारीक श्री पाहून रडू लागले! ते म्हणाले, ''माझ्या पाटीवर केवढी मोठी श्री असे; ही पत्रातील श्री रोड का झाली?'' ती बारीक श्री व ती मोठी यात काही फरक नाही. एकच अर्थ दोहोंत भरला आहे. लहान मूल अशा रीतीने शिकत जाते. प्रथम सोपी व ठसठशीत अक्षरे. मग जरा कठीण अक्षरे. मग तीच बारीक अक्षरे. तसेच ती जोडाक्षरे. एवढे सारे झाल्यावर त्या मुलाची मग वाङ्मयात प्रगती होते. तो वाचू लागतो. काव्याचा आनंद चाखू लागतो.

या सृष्टीचा विशाल ग्रंथ या रीतीनेच वाचायला आपण शिकले पाहिजे. सृष्टीत सर्वत्र प्रभू भरलेला आहे. त्याचे रूप वाचायला शिकायचे आहे. परंतु एकदम बारीक अक्षरे वाचता येणार नाहीत. जोडाक्षरे एकदम उलगडणार नाहीत. म्हणून भगवान सृष्टीतील ठसठशीत अक्षरांचा धडा अर्जुनाला देतात. ते म्हणतात, ''अर्जुना, तुला एकदम सर्वत्र परमेश्वर नाही पाहता येणार. परंतु संतांच्या ठिकाणी तरी पाहता येईल ना? जे संत रात्रंदिवस परार्थ झिजत असतात, जे निंदास्तुतीने विचलित होत नाहीत, प्राणाचे ज्यांना भय नाही, अशा संतांच्या ठिकाणी तुला अनंताची मूर्ती नाही का पाहता येणार?'' मग संत हा सोपा शब्द आहे. ठसठशीत, डोळ्यांत भरेल, असा हा शब्द आहे. हा शब्द घे. वाच, घोक आणि तुझी जन्मदात्री माता? 'मातृदेवो भव' अशी श्रुतीची आज्ञा आहे. परमेश्वराच्या परमकारुण्याची कल्पना आईच्या वात्सल्यावरूनच आपणास करता येईल. त्या मातेला कळत नाही, तिचे आतडे त्या मुलासाठी इतके का तुटते ते! कोणी लावली इतकी माया? मुलावर किती प्रेम! त्याला जरा दुखले-खुपले की ती कावरीबावरी होते. पायाचा पाळणा करते, डोळ्यांचा दिवा करते. अशी ही प्रेममयी स्नेहमयी माता. फ्रेंच भाषेत एक गोष्ट आहे. एक आई होती. तिचा मुलगा व्यभिचारी निघाला. तो एका वेश्येकडे जायचा. सारे घर त्याने तिच्या घरात भरले. तरी त्याच्या प्रेमाची सत्यता तिला पटेना. तो म्हणाले, ''आता मी काय करू म्हणजे माझे प्रेम तुला पटेल?'' ती म्हणाली, ''तुमच्या आईचे काळीज कापून ते मला आणून द्या!'' त्याने आईचे काळीज कापून घेतले. एका ताटात घालून लगबगीने ते घेऊन तो निघाला. परंतु ठेच लागून तो पडला. हातातील ताट पडले. परंतु त्या काळजातून आवाज आला, ''बाळा, तुला नाही ना रे कोठे लागले?'' अशी ही निरपेक्ष प्रेम करणारी माता! तिच्या ठिकाणी देव पाहायला शिक. हे ठसठशीत सोपे अक्षर आहे आणि तुझे पशुत्व नष्ट करून तुला मनुजता देणारी

गुरुमाउली? त्या गुरूच्या ठिकाणीही प्रभूरूप पाहायला शिक आणि लहान मुले? निष्पाप व सरळ. प्रभुसंगीताच्या त्या लकेरी! त्या लहान मुलांच्या ठायी देव पाहा. लहान मुलांना किती लवकर देव मिळाला. ध्रुवं, प्रल्हाद, चिलया, सनक, सनंदन, शुकाचार्य, सारी लहान मुले. परंतु त्यांनी क्षणात परमेश्वर मिळविला.

मुलांच्या ठिकाणी देव पाहायला शिक आणि मानवेतर सृष्टीतीलही ठळक अक्षरे पाहा. तो पाहा भव्य हिमालय कसा उभा आहे. जणू ज्ञानवैराग्याची शुभ्र मूर्ती! इवलीही चंचलता तेथे नाही. मूर्तिमंत स्थिर निष्ठा जणू ती उभी आहे. त्या हिमालयाच्या ठिकाणी परमेश्वर पाहा आणि ती गंगा?

पोषित तीरींचे पादम । फेडीत जगाचे पापताप
जाय जैसे आप । जान्हवीचे ।।

सर्व भूप्रदेश हरितश्यामल करीत जाणारी ती गंगा! रवींद्रनाथांना नद्यांचे प्रवाह पाहताच जणू उचंबळून येत असे. ते म्हणतात, "**जान्हवी-जमुना विगलित करुणा**" गंगा-यमुना म्हणजे ईश्वराची वाहती करुणा आहे! अशा या थोर नद्यांच्या ठायी प्रभूरूप पाहा.

आणि वरचे हे अनंत आकाश? वादळे येतात व जातात. धूळ उडते. धुके येते. मेघमाला येतात. परंतु आकाश निळे निळे पाठीमागे उभे आहे. इवलाही मळ स्वतःला लागू देत नाही. या आकाशाच्या ठायी परमेश्वर पाहा.

आणि हा उचंबळणारा अनंत सागर? भरती असो वा ओहोटी असो, तो सारखा घो घो करीत आहे. "मामनुस्मर युद्ध्य च" अशी जणू घोषणा करीत आहे. भरती असो वा ओहोटी आसे, तू कर्म करीत राहा, असे जणू तो धीरगंभीर वाणीने सांगत आहे. जणू ॐ ॐ ची गर्जना रात्रंदिवस करीत आहे. पाऊस पडो वा न पडो, तो सदैव उंचबळतच असतो. सर्व प्रवाहांना जवळ घेतो. कधी शांत तर कधी अत्यंत भयंकर! असा हा सागर त्याच्या ठायी मला पाहा. तो इंग्रज कवी बायरन समुद्र पाहून उचंबळे, नाचे. तो म्हणतो "सागरा, कर, गर्जना कर. तुझ्या लाटांचा कल्लोळ सुरू ठेव. ये, नाचत नाचत ये. अरे सागरा, तू त्या अदृश्य परमेश्वराचे जणू सिंहासन आहेस." अशा या सागराचे ठायी भव्य दिव्य अदृश्य परमेश्वर नाही पाहायचा तर कोठे पाहायचा?

आणि ती कोकिळा? वसंत ऋतू येताच जी कुहू कुहू करू लागते. कोठे आहे तो प्रभू, उन्हाळ्यात झाडांना नवपल्लव देणारा तो प्रभू कोठे आहे, असे जणू ती विचारते. जणू पहाटेपासून उपनिषद गाते. त्या कोकिळेच्या ठिकाणी देव मान आणि ज्याचा पिसारा पाहून शहाजहान बादशहाचे मयूरासन फिके पडावे, असा तो सुंदर मोर? मेघांचा गडगडाट ऐकून नाचणारा, केकराव काढणारा, सरस्वतीचे दिव्य वाहन होणारा, त्या मोराच्या ठिकाणी परमेश्वर पाहा आणि गोमाता? गाय म्हणजे करुणाकाव्य आहे. किती कोमल, प्रेमळ व स्वच्छ! ती दूध देते. शेतीला बैल देते. तिच्या ठिकाणी देवरूप पाहा.

आणि अर्जुना, ही सोपी अक्षरे तुला सांगितली. परंतु कठीण अक्षरे व जोडाक्षरेही तुला शिकावी लागतील. एरव्ही हा विश्वग्रंथ वाचता येणार नाही. संतांच्या ठिकाणी देव पाहायला तू शिकशील, परंतु रावणाच्या ठिकाणीही देव पाहायला तुला शिकले पाहिजे. रावण हे जोडाक्षर आहे. गायीच्या ठिकाणी देवत्व पाहशील, परंतु व्याघ्राच्या भीषणतेतही प्रभूरूप पाहायला शीक. फुलाच्या ठिकाणी प्रभुरूप पाहू शकशील, परंतु त्या तेजस्वी नागाच्या ठिकाणीही प्रभू पाहा. एकदा पवहारीबाबांना साप चावला. परंतु ते म्हणाले, ''प्रभू आला व चुंबन देऊन गेला!'' सर्पाच्या ठिकाणी त्यांना प्रेमळ परमेश्वर दिसला. अशी ही जोडाक्षरे शिकून, बारीक अक्षरेही शेवटी शिकले पाहिजे. गंगेच्या ठायी प्रभू पाहिला, परंतु दवबिंदूतही तो मला दिसला पाहिजे. आकाशाला कवटाळू पाहणाऱ्या हजारो पक्षांना आश्रय देणाऱ्या शीतल वटवृक्षाच्या ठायी देव मानणे सोपे आहे, परंतु लहान तृणाच्या ठायीही ईश्वरी प्रभा पहावयास आपण शिकले पाहिजे.

अशी रीतीने आपण शिकत गेले पाहिजे. म्हणजे सर्वत्र परमेश्वरच दिसेल. सारेच जसे गोड. त्या वैदिक मंत्रात ऋषी म्हणतो नाः

''मधु वाता ऋतायते मधु क्षरन्ति सिन्धवः
माध्वीर्गावो भवन्तु नः
मधु नक्तमुतोषिसि, मधुमत्पार्थिवं रजः''

सारेच गोड! वारे गोड, तारे गोड, दिवस गोड, रात्रही गोड. नद्या गोड, गायी गोड. मातीचा कणही गोड! ज्या मातीच्या कणातून फुलांना रूप-रस-गंध मिळतो, फळांना रस-रंग मिळतात, तो मातीचा कण का सुंदर नाही?

अशी रीतीने शिकत शिकत आपण जाऊ या. हा विश्वग्रंथ आपण वाचू या. रवींद्रनाथ म्हणतात, ‘‘परमेश्वर फुलांच्या रूपाने, ताऱ्यांच्या रूपाने आपणास पदोपदी क्षणोक्षणी संदेश पाठवितो. पत्रे पाठवितो. परंतु ही वाचणार कोण?’’

ही पत्रे वाचायला शिकला तो खरा ज्ञानी. तो खरोखर शिकला. बाकीची सारी पोपटपंची आहे. ज्ञानाचा मिथ्या भार आहे. ते मंगलमय ज्ञान आपण मिळवू या. विश्वग्रंथात सर्वत्र पाहायला शिकून मुक्त होऊ या. आनंदसिंधूत डुंबू या.

+++

अध्याय अकरावा

दहावा अध्याय आपणास सर्वत्र ईश्वर पाहा असे सांगून राहिला आहे. परंतु अर्जुनाने प्रश्न विचारला, "देवा, सर्वत्र तूच दिसलास तर ते रूप कसे रे दिसेल? मला कल्पनाही करता येत नाही. हे सारे स्थिरचर व्यापून तू भरून राहिला आहेस, असे ते विराट दर्शन मला घडव. माझे मनोरथ पूर्ण कर." आणि प्रभूने ते विश्वरूप दर्शन दिले आहे.तो विश्वंभर सर्वत्र भरून राहिलेला अर्जुनाला दिसला. ते अनंत तेजोमय असे रूप पाहून अर्जुन घाबरला. तो म्हणाला, "आवर आवर. हे तुझे विश्वरूप आवर.मला नाही हे पाहवत. माझे डोळे दिपतात तुझे साजिरे गोजिरे रूपच मला पुरे."

मनुष्याला आजूबाजूला असलेला दोन हातांचा परमेश्वर पटत नाही. परंतु अनंत हातांचा हा विराट परमेश्वर तो पचत नाही. अर्जुन शहाणा होता.शेवटी दोन हातांचा परमेश्वर त्याला पटला.त्याच्या रथावर चार हातांचा श्रीकृष्ण होता.परंतु दोन हातांचाही त्याला आवडला. मानवदेहात असणारा परमेश्वर आपणास पुरेसा आहे. मानवाची सेवा करु या. या मनुष्यरूपी नारायणाची उपासना करू या. त्याला सुखी करू या.

या अकराव्या अध्यायात एकच सूर भरून राहिला आहे. भक्तांना अत्यंत आवडणारा असा हा अध्याय आहे. लोकमान्यांचे गीतारहस्य प्रसिद्ध झाले

तेव्हा महर्षी अण्णासाहेब पटवर्धन म्हणाले ''त्या अकराव्या अध्यायाविषयी बाळाने काय बरे लिहिले आहे?तेवढे वाचावेसे वाटते.'' असा हा अकरावा अध्याय जणू स्तोत्ररूप आहे. अनंताचे ते भव्य स्तोत्र आहे. ज्ञानेश्वरीत फारच मधुर ओव्या आहेत.'' अर्जुन म्हणतो, ''देवा, नमस्कार, नमस्कार. मागे नमस्कार पुढे नमस्कार.'' पुन्हा पुन्हा जणू नमो नमोम्हणत तो राहिला. जेथे पाहावे तेथे प्रभुरूप. अर्जुन केवळ हात जोडून विनम्र भावाने उभा राहिला. अशा या स्तोत्ररूप अध्यायाचे सार एकच आहे आणि ते म्हणजे परमेश्वर सारे करून राहिला आहे. आपणास कशाचाही अहंकार नको. मीच जणू सारे करणारा असा गर्व कोणीही करू नये. ते हास्यास्पद आहे. आपण विश्वशक्तीच्या हातातील बाहुली आहोत.ती विश्वशक्ती आपणास नाचवीत असते. मिल्टन या इंग्रज कवीने एके ठिकाणी म्हटले आहे, ''मी आंधळा झालो म्हणून का देवाचे काम अडणार आहे? असा अहंकार मला नको. त्या परमेश्वराचे काम करावयास हजारो तयार आहेत.'' गोष्ट सत्य आहे. आपण केवळ निमित्त आहोत. जगातील परिस्थिती, जगातील लोक अनेक प्रवाह, अनेक शक्ती, विश्वातील अनंत गती या आपणास भ्रमवीत आहेत. आपल्या मनात असते तसे थोडेच होते? जगातील निरनिराळ्या इच्छांचे प्रयत्नांचे, शक्तींचे परस्परांवर आघात-प्रत्याघात होत काहीतरी एक फलित निष्पन्न होत असते. आपण आपल्यापरी धडपडत राहावे. परंतु मनात कष्टी होऊ नये. कर्ता करविता शेवटी तो विश्वंभर आहे. त्याच्या विश्वात्मक गतीने व शक्तीने जो काही आकार येईल तो खरा. त्याला जसे रूप पाहिजे असेल तसेच शेवटी येईल.

आपण नम्रपणे निमित्तमात्र होऊन कर्तव्य करीत राहावे. प्रभूच्या हातातील आपण साधने बनू या. परंतु ईश्वराच्या हातातील साधन होणे ही सोपी गोष्ट नाही. त्या परम थोर प्रभूने आपणास वापरावे यासाठी आपण आपले जीवन निर्मळ करून ठेवू या. आपले जीवन सतेज करून ठेवू या. जीवनाला नीट धार लावून ठेवू या. ते संयमाग्नीत घालून नीट तावून सुलाखून ठेवू या. एखाद्या मोठ्या माणसाने आपणाजवळ चाकू मागितला तर त्याला नीट धार आहे की नाही ते आपण पाहतो.बोथट चाकू त्याच्या हातात द्यायला आपणास लाज

वाटेल. कोणाचा तरी चांगला चाकू घेऊन तो आपण नेऊन देऊ. त्याप्रमाणे प्रभूने जर आपले जीवन मागितले, तर ते निर्मळ व सतेज असेल तर हापण त्याच्यासमोर ते नेऊ शकू. एका इराणी कवीने म्हटले आहे, ''हे मृत्तिके, तू माझ्या ओठांचे चुंबन घेऊ इच्छितेस का? तर मग पेल्याचा आकार घेऊन भट्टीत भाजून घे. मग तो पेला माझ्या ओठाला स्पर्श करू शकेल. हे लाकडाच्या तुकड्या, माझ्या सुंदर केशकलापास स्पर्श करावा असे का तुला वाटते? तर स्वतःला करवतून घे. कापून घे. कंगोरे पाडून घे. तू फणी बन. मग मी माझ्या केसांत फिरेल केसांशी खेळेल.'' त्यागाने, तपस्येने मोल चढते. आपण आवळ्यांना टोचतो. त्याचा मग मोरावळा होतो. तो मग सुंदर काचेच्या बरणीत बसतो. त्याची किंमत वाढते. रस्त्यावर पडलेला तो भिकारडा आवळा, परंतु तो शिंक्यात जाऊन बसतो. साऱ्या जीवनात हा कायदा दिसून येईल.

ईश्वराच्या हातातील साधन होता यावे, म्हणून आपण तपस्या केली पाहिजे. निरहंकारी झाले पाहिजे. तुमच्या आमच्या जीवनाच्या बासरीतून प्रभूने संगीत निर्मावे असे वाटत असले, तर ही जीवनाची बासरी अंतर्बाह्य पोकळ करून ठेवू या. तरच देवाचा वारा तिच्यातून फुंकला जाईल, संगीत निर्माण होईल. परंतु आपल्या अहंकाराने, आपल्या क्षुद्र वासना विकारांनी जर आपली जीवनाची बासरी भरून गेली असेल, ही बासरी पोकळ न होता भरून गेली असेल, तर प्रभू तिच्यातून वारा कसा फुंकील? संगीत कसे प्रकट होईल?

''तुझ्या करांतील बनून पावा
कृतार्थ हा जन्म मदीय व्हावा''

असे देवाजवळ ज्याला म्हणावयाचे आहे त्याने आपल्या जीवनाची बासरी पोकळ करून ठेवावी. नम्रतेशिवाय काहीएक नाही. नम्रता हा ज्ञानाचा आरंभ नम्रता नसेल तर जीवन वाढणार नाही. समर्थांनी एके ठिकाणी म्हटले आहे:

''नेणतेपण सोडू नये''

आपण नेणते आहात ही भावना कधी सोडू नये.विहिरीत अपरंपार पाणी असते. परंतु विहिरीत सोडलेली घागर जर वाकणार नाही तर ते पाणी तिच्यात

कसे शिरेल? ती अहंकाराने नाचत राहील, तर रितीच राहील. प्रभूचे संगीत सर्व विश्वात भरून राहिले आहे. ते तुमच्या-आमच्या जीवनातूनही प्रकट होईल, परंतु आपण वाकू तर, विनम्र होऊ तर. त्याच्या हातातील आपण निमित्तमात्र साधने आहोत, अशा भावनेने वागू तर. अहंकाराचा वारा लागू न दिला तर. असे करू तर आपलेही हे जीवन कृतार्थ होईल.

✦✦✦

अध्याय बारावा

सातव्या अध्यायापासून आपण बाराव्या अध्यायापर्यंत आलो. भक्तीच्या ऊहापोहाचा हा शेवटचा अध्याय आहे. हा लहानसा वीस श्लोकांचा अध्याय अत्यंत गोड आहे. अति पवित्र असा हा अध्याय आहे. कर्मवीर महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी आपल्या आत्मचरित्रात, मी बाराव्या अध्यायातील श्लोक रोज गुणगुणत असतो, असे लिहिले आहे. हा अध्याय सर्वांनी पाठ करावा, म्हणावा. जीवनावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

या बाराव्या अध्यायात अर्जुनाने एक प्रश्न विचारला आहे. पाचव्या अध्यायात ज्याप्रमाणे संन्यासी श्रेष्ठ की कर्मयोगी श्रेष्ठ असा प्रश्न आहे, त्याप्रमाणे येथे निर्गुणाचा उपासक तुला अधिक आवडतो, की सगुणाचा उपासक तुला अधिक आवडतो, असा प्रश्न आहे. येथे पाचव्या अध्यायात भगवंतांनी उत्तर दिले होते की "अर्जुना, अरे संन्यासी व्रा कर्मयोगी हे दोघे सारखेच आहेत. त्यांच्यांत द्वैत पाहणे, फरक पाहणे, हे मूर्खपणाचे आहे. परंतु त्यातल्या त्यात पाहायचेच झाले तर कर्मयोग समजण्यास जरा सोपा म्हणून तो विशेष, असे म्हणावे पाहिजे तर." हे जसे तेथे उत्तर देण्यात आले आहे, तसेच उत्तर येथेही आहे. सगुण भक्त तुला आवडतो की निर्गुण आवडतो? प्रभू या प्रश्नाचे काय उत्तर देणार? एखाद्या मातेला दोन मुलगे असावेत. एक चांगला मिळवता आहे. आईपासून दूर राहतो आहे आणि दुसरा आईला क्षणभरही सोडू शकत नाही. त्या मातेला जर तुम्ही विचारलेत की, "हे माते, या दोन मुलांपैकी

तुला कोणता आवडतो?'' तर ती माता काय उत्तर देईल? ती म्हणेल, ''दोन्ही मला सारखेच आवडतात. परंतु हा लहानगा आहे ना, त्याला माझ्याशिवाय चैन पडत नाही, सारखा भोवती भोवती असतो. माझ्या पायांजवळ घुटमळतो. परंतु दोन्ही मला प्रियच आहेत.''

जीवनात सगुण व निर्गुण दोहोचा अनुभव हवा, तरच जीवनाला पूर्णता येईल. आपण सारे प्रथम सगुणपूजक असतो. बुद्धधर्मात तीन गोष्टी सांगितल्या आहेत.

१. बुद्धं शरणं गच्छामि ।

२. संघं शरणं गच्छामि ।

३. धम्मं शरणं गच्छामि ।

आपण प्रथम एखाद्या महात्म्याभोवती गोळा होतो. भगवान बुद्धासारखी थोर विभूती उभी राहिली की, त्या मूर्तीभोवती आपण रुंजी घालू लागतो. लोकमान्य टिळक होते, त्यांच्याभोवती लाखो उभे राहिले. महात्माजी आले, लाखो त्यांच्याभोवती जमले. अशा रीतीने सगुण मूर्ती डोळ्यांसमोर ठेवून आपण जात असतो. कोणाची तरी मूर्ती डोळ्यांसमोर हवी. बुद्धांची घ्या, लोकमान्यांची घ्या, महात्माजींची घ्या. त्या मूर्तीसमोर आपण उभे राहतो आणि प्रकाश मिळवितो. परंतु देह हा जाणारा आहे. साऱ्या मूर्ती, सारे आकार मोडायचे आहेत, मातीत जायचे आहेत. मूर्ती मोडली तर का रडत बसणार? समर्थांच्या प्राणोत्क्रमणाची वेळ जवळ आली. सारे शिष्य रडू लागले तेव्हा समर्थ म्हणाले, ''हेच का शिकलात? अरे, माझी पार्थिव मूर्ती लोपली तरी चिन्मय मूर्ती आहे. दासबोधाच्या रूपाने मीच आहे.''

आपण मंगलमूर्तींची प्रतिमा आणतो. तिचा उत्सव करतो. त्या प्रतिमेची पूजा करतो. परंतु शेवटी ती मूर्ती बुडवायची असते. सगुणातून निर्गुणाकडे जायचे असते. 'बुद्धं शरणं गच्छामि' या पायरीवरून आपण 'संघं शरणं गच्छामि' या पायरीवर येतो. बुद्ध निर्वाणाला गेले. पुढे काय? पुढे बुद्धाच्या मताचे जे जे ते एकत्र येतात. स्वतःचा संघ करतात. जणू सामुदायिक मूर्ती बनवितात. या संघाच्या आधाराने राहू पाहतात. परंतु संघ तरी कोठे टिकाऊ आहेत? साऱ्या संस्था व सारे संघ नाशिवंतच आहेत. आज आहेत, उद्या नाहीत, हा प्रकार. म्हणून शेवटी 'धम्मं शरणं गच्छामि' या पायरीवर येणे प्राप्त असते. भगवान बुद्धांची जी शिकवण ती आपल्या हृदयात आपण उभी करतो. वैचारिक मूर्ती आपण निर्माण करतो. ध्येयची मूर्ती बनवतो

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

आणि त्या ध्येयाची उपासना करणारे आपण होतो. मूर्ती जातात परंतु ध्येय अमर आहे. व्यक्ती जातात, तत्त्व टिकते. महात्माजी कराची काँग्रेसच्या वेळेस म्हणाले, ''गांधी जाईल, ही माझी मूठभर हाडे सहज चिरडता येतील, परंतु ज्या तत्त्वाची मी नम्रपणे उपासना करीत आहे ती तत्त्वे मरणार नाहीत.''

''तत्त्वाचा बंदा जीव
व्यक्तीला कोण विचारी''

अशी रीतीने जरी आपण प्रथम व्यक्तिपूजक असलो, तरी शेवटी ध्येयपूजक झाले पाहिजे. त्या ध्येय-भगवानालाच

''जेथे जातो तेथे तू माझा सांगाती''

असे आपण सदैव म्हटले पाहिजे.

सगुणातून निर्गुणाकडे न जाऊ तर जीवन दुबळे होईल. ज्या व्यक्तीभोवती आपण जमलो ती व्यक्ती अंतर्धान पावताच जर त्या व्यक्तीची ध्येयमूर्ती आपण आपल्याजवळ निर्मिली नसेल तर आपण पंगू होऊ. सगुण व निर्गुण दोहोंनी वाढ आहे. लक्ष्मण हा सगुणभक्त होता. रामचंद वनास जाण्यासाठी निघाले तेव्हा लक्ष्मण म्हणाला, ''रामा, तुझ्याशिवाय एक क्षणभरही मी जगू शकणार नाही. पाण्याशिवाय मासा मरेल, तसा तुझ्याविणे मी मरेन.'' परंतु अशा या सगुणोपासक लक्ष्मणाला शेवटी रामाचा वियोग सहन करावा लागला आहे. नारद व रामचंद्र काही गुप्त बोलत असता तो तेथे जातो आणि त्याचे शासन म्हणून रामापासून त्याला दूर जावे लागते. निर्गुणाचा अनुभव घेणे त्याला प्राप्त झाले. भरत हा जणू निर्गुणोपासक. प्रत्यक्ष रामचंद्र जरी जवळ नसले, तरी त्यांचे ध्यान करीत तो नंदीग्रामी बारा वर्षे राहिला. परंतु पंचवटीतून रामांना भेटून परत जाताना त्यांच्या पादुका तरी तो घेऊन गेला. तेवढा आधार त्याला हवा होता. सगुणाचा तेवढा ओलावा त्याला आवश्यक वाटला.

पुष्कळ वेळा असे वाटले की सगुणाची पराकाष्ठा म्हणजेच निर्गुण. सर्वत्रच प्रभूरूप दिसू लागले की शेवटी डोळे मिटून आपण शांत बसू. जणू निर्गुणोपासक बनू. सगुणोपासक असा शांत बसत नाही. तो समाजात सर्वत्र वावरतो. तो कर्मयोगी होतो. सगुणरूपाची सेवा करायला तो धावतो. विश्वरूपचा हव्यास दूर करून या दोन हाती छोट्या परमेश्वराच्या सेवेत तो उभा राहतो आणि अशी सेवा करता करता तो उत्तरोत्तर अधिकाधिक निर्मळ होतो. केवळ ज्ञानरूप होतो. बाराव्या अध्यायातील

भक्तांची लक्षणे वाचा. सगुण ब्रह्माची उपासना करता करता, या आजूबाजच्या परमेश्वराची कर्ममय पूजा करता करता ती लक्षणे त्याच्या अंगी येतात. तो प्रेममय होतो. केवळ निरहंकारी कोणाला उगीच दुखवणार नाही. कोणाला कंटाळणार नाही. सदैव हातांत सेवा. डोळ्यांत प्रेम. असा तो सगुणभक्त म्हणजे सर्वांचा आधार होतो. सर्वांचा प्राण बनतो.

कधी क्षणभर एकांतात बसून निर्गुणात बुडावे. पुन्हा सगुणाची गोडी चाखण्यासाठी संसारात सेवा क्रीत राहावे आणि हा द्विविध आनंद लुटावा. दोहोंनी जीवन परिपूर्ण करावे.

+++

अध्याय तेरावा

तेराव्या अध्यायापासून पुन्हा एक निराळे दालन उघडण्यात आले आहे. सहाव्या अध्यायाच्या अखेरीपर्यंत कर्माचा ऊहापोह होता. बाराव्या अध्यायाच्या समाप्तीपर्यंत भक्तीचा प्रपंच होता. तेराव्यापासून तो पंधराव्याच्या समाप्तीपर्यंत ज्ञानाचा विचार आहे.

ज्ञान म्हणजे काय? ज्ञान म्हणजे सद्गुण.

''अमानित्वमदंभित्वमहिंसा शांतिरार्जवम्''

इत्यादी गुणांची यादी भगवंत देतात व शेवटी म्हणतात.

''एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा''

हे गुण म्हणजे ज्ञान. म्हणजे पांडित्य नव्हे. ज्ञान म्हणजे पुस्तकी विद्या नव्हे. आपणास हे शरीर मिळाले आहे. हे देवाघरचे शेत. बाहेरचे शेतभात मिळेल तेव्हा मिळेल. परंतु हे साडेतीन हातांचे शेत तर प्रत्येकास मिळलेले आहे. बाहेरच्या शेतीत ज्याप्रमाणे आपण धान्य पिकवितो त्याप्रमाणे या जीवनाच्या शेतीत आपण सद्गुणांचे पीक घ्यावयाचे आहे.

भगवान बुद्ध एकदा भिक्षा मागत एका श्रीमंत शेतकऱ्याच्या अंगणात येऊन उभे राहिले. त्यांनी आपले भिक्षापात्र पुढे केले. तो शेतकरी म्हणाला, ''अशी भीक कशाला मागता? माझ्यासारखे शेतकरी व्हा. ही पाहा सोन्यासारख्या धान्याची येथे रास पडली आहे.''

भगवान बुद्ध म्हणाले, ''गड्या मी सुद्धा एक शेतकरी आहे.''

''काय, तुम्ही शेतकरी आहात? कोठे आहे तुमचे शेत? कोठे आहे नांगर? कोठे आहेत बैल? कोणते पीक घेता?''

''माझे हृदय हे माझे शेत. तेथे विवेकाचा नांगर जोडतो. सारे वासनाविकारांचे रानगवत काढतो. प्रेमाचे, सत्य-अहिंसेचे अपरंपार पीक घेतो.''

अशी ही देवाघरची शेती आपणास करावयाची आहे. देहाच्या या साधनाने हे सद्‌गुण अंगी आणावयाचे आहेत. तो प्रसिद्ध तत्त्वज्ञानी कार्लाईल एके ठिकाणी म्हणतो, ''माणसे ही गिधाडासारखी आहेत. जरा काही करताच त्यांना फळ हवे असते. मोबदला हवा असतो. परंतु ईश्वराने हा देह आधीच दिला आहे. बुद्धी दिली आहे. हृदय दिले आहे. या ज्या अमोल देणग्या आधीच मिळाल्या आहेत, त्याबद्दल कृतज्ञ राहून आपण सदैव सेवा केली पाहिजे. काटा दिसला दूर करावा. दगड दिसला बाजूला फेकावा. जेथे ओसाड-उजाड असेल तेथे हिरवे हिरवे करावे. प्रभूने जे आधीच दिले आहे त्याचे उतराई म्हणून आपण सत्कर्म करीत राहणे, हेच आपणास शोभते.''

परंतु हे सद्‌गुण एकाएकी येतील असे नाही. एकेक गुण अंगी यावा म्हणून बुद्धदेवांनी शेकडो जन्म घेतले. आपल्या अंतःकरणात प्रभूचा सूर असतो. ''बाबा रे, हे चांगले आहे. ते वाईट आहे. ते नको करू.'' असे कोणीतरी अंतर्यामी आतून हळूच सांगत असतो. परंतु ती मंजुळ वाणी आपणास जणू ऐकू येत नाही. तो अंतर्यामी लादणारा नसतो. तो मारून मुटकून करायला लावणार नाही. तो हळूच सांगेल, ऐकलेत तर बरे, नाही तर आशेने वाट पाहात राहील.

परमेश्वरासारखा आशावान कोण आहे? हजारो वर्षे मानवाला जन्मून झाली. तरी अद्याप तो माकडासारखा वागत आहे! वृकव्याघ्राप्रमाणे रक्तपिपासू आहे. आईबापांचा एखादा मुलगा बिघडला तरी त्यांना दुःख होते. मग ज्या प्रभूची कोट्यवधी लेकरे आज हजारो वर्षे बिघडत आहेत त्या प्रभूने किती निराश व्हावे? बर्नाड शॉ या विख्यात इंग्रज नाटककाराने एके ठिकाणी लिहिले आहे, ''मानवाला निर्माण करण्याचा आपला प्रयोग फसला असे समजून ही सारी

मानवजात प्रभू एके दिवशी पुसून टाकील!'' आपणास निराशेने असे वाटले तरी प्रभूला तसे वाटत नाही. त्याची अमर आशा आहे. त्याचे प्रेम कमी नाही झाले. त्याचे तारे, त्याचे वारे, त्याचे मेघ, त्याची फुले-फळे सारे आपणासाठी सदैव उभे आहे.

मनुष्याचे प्रेम गुलाम करते. आईबाप मुलाला प्रेमाने वाढवतात. परंतु त्यांच्या मताप्रमाणे मुलगा न वागला तर त्यांना वाईट वाटते. ''तुल एवढ्यासाठी वाढवले का?'' असे ती विचारतात. परमेश्वर कधी विचारीत नाही. तो अनंत हस्ते देत आहे. एक दिवस हा मानवप्राणी माझ्याकडे येईल, अशी त्याला आशा आहे.

तेराव्या अध्यायात पुढील श्लोक आहे :

''उपद्रष्टाऽनुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः''

प्रभू प्रथम उपद्रष्टा असतो. तो जवळ उभा राहून तुमच्याकडे पाहतो. बोलत नाही. तुमचे केव्हा तरी लक्ष मिळेल या आशेने तो असतो. कधी हळूच बोलला तरी ते आपणास ऐकू येत नाही. परंतु जगातील अनुभवाने आपण जरा अंतर्मुख होतो. जीवन चांगले जगावे असे मनात येऊ लागते. जीवनात विवेक येतो. असे करावे, असा निश्चय करावा, आजपासून हे ध्येय, असे बेत आपण करू लागतो. त्या अंतर्यामीला आनंद होतो. तो हळूच होकार देतो. अनुमती देतो. ''बाळ, असाच वाग हो. चांगला आहे तुझा निश्चय. तो टिको.'' असे तो उपद्रष्टा म्हणतो. उपद्रष्टा आता केवळ दुरून बघणारा न राहता जवळ येतो. पाठीवर शाबासकी देतो. तो अनुमती होतो. पुढे आपण धडपडत जातो. संकटात आधार कोठून तरी मिळतो. अंधारात प्रकाश येतो. वाटते की प्रभूच साहाय्य देऊन राहिला आहे. तोच भर्ता, तोच आधार. त्या अंतर्यामीविषयी अपरंपार भक्तिप्रेम वाटते. सारा अहंकार गळतो आणि आपण म्हणतो, ''देवा, तुझाच आधार आहे. तूच प्रकाश दिलास. तू सांभाळलेस. तूच माझे तारण केलेस. माझ्या हातून जे काही झाले असेल, ते तुझ्या कृपेचे फळ. जे काही माझ्या हातून झाले असेल ते तूच घे. तूच त्याचा भोक्ता हो. या चराचराचा चालक तू. तू महेश्वर. तू माझ्या हृदयात बसून मला हळूहळू सन्मार्गावर आणलेस, तुझी ही कृपा.''

असे शब्द आपल्या तोंडून बाहेर पडतात. वृत्ती निरहंकारी होते आणि जीवनाच्या शेतात आपण सद्‌गुणांचे पीक घेऊ लागतो. एक गुण आला की त्याच्या ओढीने दुसरा येतो आणि ही सद्‌गुणसंपत्ती वाढू लागते. जीवनात ज्ञानाची प्रभा फाकते. कर्मे सुंदर व निर्मळ होऊ लागतात. जीवनाचे हेच साफल्य. जन्माला येऊन दुसरे काय मिळवायचे?

+++

अध्याय चौदावा

तेराव्या अध्यायात सद्गुणांची शेती करावी, असे भगवंतांनी सांगितले. हे सद्गुण म्हणजेच ज्ञान, अशी ज्ञानाची व्याख्या केली. परंतु या चौदाव्या अध्यायात आणखी फोड केली आहे. अधिक खुलासा केला आहे.

या जगात सर्वत्र सत्व, रज व तम या तीन गुणांचा पसारा आहे. आपण या तीन गुणांच्या पाशात जखडलेले असतो. ही त्रिगुणात्मक माया आपणास अंतर्बाह्य वेढून आहे. या मायेचे पाश कसे तोडावयाचे या बंधनातून कसे मोकळे व्हायचे?

या तीन गुणंतील तमोगुण जो आहे तो अजिबात नष्ट केला पाहिजे. तमोगुण म्हणजे आलस्य. तमोगुण म्हणजे अनवधानता. आपल्या देशात या तमोगुणाचे साम्राज्य फार. एखादी गोष्ट करण्याचे कबूल करतात आणि खुशाल विसरलो म्हणतात! हा विस्मृतीचा जो रोग आहे ते तमोगुणातून जन्मतो. विसरणे हा मनाचा आळस आहे. महात्माजींनी मॉडर्न रिव्ह्यूसाठी लेख लिहावयाचे कबूल केले होते. १९३० सालची ती अमर दांडीयात्रा सुरू झाली होती. महात्माजींना क्षणाची उसंत नव्हती. रोज त्यांना लेख लिहायची आठवण येई. ते म्हणायचे, ''लेख लिहायचे राहिले'' शेवटी एकदा त्यांनी वेळ काढून तो लेख लिहिला. या लेखाची गंमत अशी झाली की तो चुकून केराच्या टोपलीत गेला! मॉडर्न रिव्ह्यूच्या संपादकांचे पुन्हा पत्र आले, 'लेख पाठवा' महात्माजींचे उत्तर गेले की लेख कधीच पाठवला. मग तिकडे शोधू लागले. शेवटी तो छोटा लेख सापडला.

महात्माजी असे दक्ष असत. बेळगाव काँग्रेसच्या वेळेस तेथेच राष्ट्रीय शिक्षण परिषद भरली होती. महात्माजी तेथे होते. एक ठराव वाचून दाखविण्यात आला. तेथे जमलेल्या प्रतिनिधींपैकी एक तरुण असे प्रतिनीधी म्हणाले, ''माझे जरा लक्ष नव्हते. ठराव फिरून वाचून दाखवावा.'' त्याबरोबर महात्माजी म्हणाले, ''तुम्ही अधिक लक्ष दिले पाहिजे.''

सावधानता, दक्षता, नीट काळजीपूर्वक काम करणे, हे सारे सत्त्वगुणात येते. विनोबाजी एकदा म्हणाले, ''महात्माजींनी हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी दिल्लीस २१ दिवसांचा उपवास केला. त्या वेळेस तेथे सर्वधर्मपरिषद भरली होती. सकाळची ९ वाजताची वेळ होती. परंतु ९ वाजता मंडपात फक्त दोनच माणसे होती! ॲनी बेझंट व मी .'' आपणास कसेतरी गबाळ्यासारखे वागण्याची सवय लागली आहे. बावळटपणा म्हणजे साधुता नव्हे. एका पैची चूक पडत होती, तर एकनाथ रात्रभर बसले. आळस हा भयंकर शत्रू आहे.

''आळस उदास नागवणा''

असे समर्थांनी म्हटले. आळसामुळे साऱ्या जीवनाची माती होते. आळस, निद्रा, अनवधानता, भीती इत्यादी सारे तमोगुणाचेच प्रकार. ज्याला मोक्षार्थी व्हावयाचे आहे, त्याने तमोगुण जिंकून घेतला पाहिजे. तमोगुण सफा केला पाहिजे.

आणि रजोगुण म्हणजे काय? रजोगुण म्हणजे सुखोपभोगासाठी धावपळ. कुंभकर्ण झोपून राहावयाचा, तर रावण सारखा साम्राज्य वाढवीत रहायचा. एक मूर्तिमंत तमोगुण, तर दुसरा मूर्तिमंत रजोगुण! रजोगुण म्हणजेच वायफळ हालचाल. उगीच वटवट करणे, उगीच आदळआपट. ज्या गोष्टींच्या विकासासाठी संबंध नाही, अशा फालतू गोष्टी करत बसणे. आपण आपली कितीतरी शक्ती वाया दवडीत असतो. वास्तविक ही सारी शक्ती ध्येयार्थ खर्च केली पाहिजे. ज्याप्रमाणे आपल्या सूर्याचे किरण भिंगावर एकत्र पाडले तर त्यातून ठिणगी पडते, त्याप्रमाणे आपल्या सर्व शक्तीचा झोत आपल्या ध्येयावर सोडला पाहिजे. परंतु आपली शक्ती फुकट दवडीत असतो. गप्पाच मारू,खाण्याच्याच चर्चा करू, सिनेमा-बोलपटातच केवळ रंगू, नाना प्रकारचे नाना रंगांचे कपडेच करीत बसू. केसच कुरवाळीत बसू. बायका कानांना वा नाकांना भोके पाडतील. नाकांत चमक्या

बसवतील. कानांत मोती घालतील. या देहातच अलंकार ठेवण्यासाठी पेट्या जणू तयार करतात! या सर्वांचा काय उपयोग? याने जीवन समृद्ध होते का? मनाचा, हृदयाचा विकास होतो का?

कोणी विमानातून बसून पक्षी होऊ पाहतो. कोणी पाणबुडीत बसून मासा होऊ पाहतो. माणसाच्या आकारात राहून पशुपक्षी होण्याचे डोहाळे जणू त्याला होऊ लागतात! हे सारे सोस कशासाठी? याचा अर्थ विमानांचा शोध लागू नये असा नाही. दुष्काळी भागात धान्य पाठवण्यासाठी विमाने आणा, त्या त्या गोष्टींनी जीवनात सुंदरता, शिवता आणता येईल तर ती हवी आहे. परंतु उगीच फाफटपसारा काय कामाचा?

समाजोपयोगी कर्मे करता यावी म्हणून देहाची जोपासना केली पाहिजे. अन्नवस्त्रादी आवश्यक गरजा भागल्याच पाहिजेत. परंतु ज्या गोष्टींनी आपण उन्नत न होता कदाचित घसरण्याचाच संभव त्या कशाला करा? खातच बसले, खेळतच बसले, चिरूटच ओढीत राहिले, पानसुपारीचे बारच भरीत राहिले, सारखे गातच बसले, सारखे खो खो हसतच राहिले, सारखे नट्टापट्टाच करीत राहिले, सारखे भांडतच बसले, सारखी काटाकाटी व छटाछटी! असले हे जीवन भेसूर आहे. तमोगुणी जीवनामुळे आपण दगड होऊन पडतो, तर रजोगुणी जीवनामुळे कधी फुलपाखरे तर कधी वृकव्याघ्र असे आपण होतो. केवळ शारीरिक सुखोपभोगांचा हव्यास धराल तर फसाल, मराल, नष्ट व्हाल.

सेवेची उदंड कर्मे पडली आहेत राष्ट्राच्या उभारणीची अनंत कामे आहेत. महात्माजी नाना प्रकारची सेवा करण्यासाठी तुम्हाला बोलावीत आहेत ख्रिस्त एकदा म्हणाला, ''अरे कोळी मासे पकडतो. परंतु मी माणसांना पकडतो. त्यांना वेड लावतो. त्यांना नवीन नादास लावतो.'' तसे महात्माजी माणसे पकडण्यासाठी उभे आहेत. या ना त्या नात्याने ते तुम्हाला राष्टकार्याकडे खेचून घेऊ पाहात आहेत. ''खादी नसेल पसंत तर गोसेवा उचला, नाहीतर राष्ट्रभाषा प्रचार घ्या. ग्रामोद्योग घ्या, स्वच्छता करा, आरोग्य निर्मा, व्यायामशाळा काढा, कोठले तरी कार्य घ्या. असे जणू तो महापुरुष सांगत आहे. सारी कर्मक्षेत्रे दाखवीत आहे. या राष्ट्रोद्योगाच्या जाळ्यात तुम्हास पकडू पाहात आहे. परंतु तुमचा आमचा वेळ वाया जात आहे. जीवन हे कर्तव्यासाठी आहे. आयुष्य ही प्रभूची ठेव. साऱ्या आयुष्याचा झाडा द्यावा लागेल.

आपण आपल्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक शक्तींचा व्यय कसा केला, कशात केला त्याचा हिशेब द्यावा लागेल. येईल का तो देता?

जीवन हे परम पुरुषार्थासाठी आहे. परम पुरुषार्थ प्राप्त करून घेण्यासाठी आपण आपली सारी शक्ती इतरत्र न खर्चिता जरी ओतली तरी अपुरीच पडेल. शेवटी प्रभूला शरण जाऊन त्याची करुणा भाकावी लागते. शेवटी प्रार्थनेचे बळ मदतीस घ्यावे लागते. अशी जेथे परिस्थिती आहे,तेथे आपण आपली शक्ती वारेमाप क्षुद्र गोष्टींत का खर्च करीत बसावे?

विवेकानंद जर वायफळ गोष्टी करीत बसले, श्रीरामकृष्ण परमहंस रागवायचे व म्हणायचे, ''तूही का क्षुद्र काथ्याकूट करीत बसलास?'' विवेकानंदांनी सर्व शक्तीचा संचय केला. ब्रह्मचारी राहिले. त्यांना अगम्य असे काही नसे. एकदा जर्मन पंडित डायमन यांच्याकडे ते गेले होते. तेथे एक पुस्तक होते. विवेकानंदांनी ते भराभर सारे चाळले. पुढे डायसनजवळ बोलताना त्य पुस्तकातील उतारे ते देऊ लागले. डायसन चकित झाला. त्याने विचारले, ''हे पुस्तक केव्हा वाचलेत?''विवेकानंद म्हणाले,'' मघा'',''इतक्यात कसे वाचून झाले?'' ''मी परिच्छेदच्या परिच्छेद वाचतो.'' विवेकानंद पॅरिग्राफच्या पॅरिग्राफ वाचीत. लहान मूल एकेक अक्षर वाचते. आपल्या डोळ्यांत संबंध ओळ एकदम भरते. परंतु विवेकानंदांचे डोळे सारा परिच्छेद एकदम वाचीत. ती शक्ती कोठून आली? मनाच्या एकाग्रतेतून. ब्रह्मचर्यातून. त्यांनी आपल्या शक्तीचा प्रचंड संचय करून ठेवला होता.

लोकमान्यांवर किती संकटे, किती कारागृहवास! डॉ. भांडारकर एकदा म्हणाले, ''लोकमान्यांवर संकटे आली तशी माझ्यावर आली असती, तर मी केव्हाच चिरडून गेलो असतो.'' लोकमान्यांना ही शक्ती कोठून मिळाली? त्यांच्या संयमातून. एक स्त्री अर्ज लिहून घेण्यासाठी त्यांच्याकडे आली. परंतु वर मान करून त्यांनी तिच्या मुखाकडे पाहिले नाही. म्हणून नेविन्सन या पत्रपंडिताने लिहिले आहे : ''लोकमान्यांच्या डोळ्यांत जशी चमक होती तशी मी कोणाच्याही डोळ्यांत पाहिली नाही.'' हे तेज कोठून आले? फालतू पसाऱ्यात, सुखपभोगात त्यांनी आपली शक्ती दडवली नाही.

महात्माजींनी वयाच्या छत्तीसाव्या वर्षापासून ब्रह्मचर्य पाळले आहे. त्याच्या आधीपासूनच त्यांची धडपड सुरू होती. एकदा सिलोनमध्ये महात्माजी गेले होते.

बरोबर कै. कस्तुरबा होत्या. ओळख करून देणारा सभेत म्हणाला, ''आज महात्मा गांधी आले आहेत. बरोबर त्यांच्या 'मातोश्री' कस्तुरबा आहे.'' पुढे भाषण करताना महात्माजी म्हणाले, ''माझी ओळख करून देणारे मात्र थोडे चुकले. कस्तुरबा माझ्या पत्नी आहेत. परंतु एवढे खरे की, आज कित्येक वर्षे मी त्यांच्याकडे माता या दृष्टीने पाहात आलो आहे.'' महात्माजी एवढ्या म्हातारपणी राष्ट्राचा प्रचंड बोजा कोणत्या शक्तीच्या जोरावर उचलतात ते लक्षात आणा.

रजोगुणात बुडाल तर ध्येयासाठी शक्ती उरणार नाही, म्हणून हा रजोगुण जिंकून घ्या. वासना-विकारांचे वेग आवरा. सर्वत्र गुराप्रमाणे धावू पाहणारे उल्लू मन, त्याला आवरा आणि सत्त्वगुणाकडे सारे लक्ष द्या.

परंतु सत्त्वगुणही जिंकून घ्यायला हवा. तमोगुण व रजोगुण गोळी घालून घायाळ करण्याचा अधिकार जसा पोलिसास असतो, त्याप्रमाणे सत्त्वगुणास घायाळ करावयाचे. म्हणजे काय? याचा अर्थ एवढाच की सत्त्वगुणाचा अहंकार होऊ द्यायचा नाही. सात्त्विक क्रियांची तर समाजासाठी, स्वतःसाठी सदैव जरुरी. परंतु त्या सात्त्विक क्रिया हातून सहज होतील असे करावयाचे. आपले नाक रात्रंदिवस श्वासोच्छ्वास करीत असते. त्याचे का आपण कौतुक करतो? त्याचे का आपण आभार मानतो? श्वासोच्छ्वास करणे हा नाकाचा सहजमर्ध. शाळा सुटली की मुले आपोआप घराकडे वळतात. त्यांच्या पायांचा तो सहजधर्म झालेला असतो. अंधार दूर करणे, हा सूर्याचा सहजधर्म. तो म्हणेल मी अंधार दूर नको करू तर का मरू? अशा प्रमाणे सत्कार्य हा सहजधर्म झाला पाहिजे. म्हणजे मग त्याचा अहंकार वाटणार नाही. दुसऱ्याची सेवा करावयास संत सहज धावतात. त्यांना त्यात आपण विशेष काही करतो, असे वाटत नाही.

सत्वगुण जिंकून घेणे म्हणजे त्याचा अहंकार जिंकावयाचा. अशा प्रकारे सत्ता स्थापावयाची. त्रिगुणातीत व्हावयाचे. चौदाव्या अध्यायाच्या शेवटी त्रिगुणातीताची लक्षणे दिली आहेत. दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी स्थितप्रज्ञाची लक्षणे, बाराव्या अध्यायात भक्ताची लक्षणे : येथे चौदाव्यात त्रिगुणातीताची लक्षणे, ही सारी लक्षणे एकच आहेत. याचा अर्थ जो भक्ती, ज्ञान ही जणू निराळी नाहीत.

दत्तात्रेय म्हणजे मूर्तिमंत ज्ञान, परंतु दत्तांचा जन्म कोणापासून? अत्रि व अनसूया यांच्यापासून ज्ञानस्वरूपी सद्गुरू दत्तात्रेयांचा जन्म होतो. अत्रि म्हणजे त्रिगुणातीत भाव व अनसूया म्हणजे निर्मत्सर वृत्ती, यांच्यापासून ज्ञानाचा जन्म होणार.

त्रिगुणातीत होणे म्हणजे देहभाव गळणे. नारळाच्या आत गोटा जसा गुडगुड वाजतो, त्याप्रमाणे या देहाच्या आसक्तीपासून आत्मा संपूर्णपणे अलग करणे. ख्रिस्ताला क्रॉसवर देत होते. ख्रिस्त म्हणाले, ''देवा, का रे हा छळ?'' परंतु पुन्हा म्हणाले, ''तुझी इच्छा प्रमाण.'' अशी रीतीने देहाची आसक्ती जिंकून घ्यावी लागते. त्रिगुणातीत होऊन प्रभूच्या हातातील एक साधन म्हणून राहावायचे. असे हे महान ध्येय आहे. हा परम पुरुषार्थ प्राप्त करून घ्यावयाचा आहे. त्यासाठी अविरत परिश्रम करू या.

✦✦✦

अध्याय पंधरावा

पंधराव्या अध्यायाला 'पुरुषोत्तमयोग' म्हणतात. हा अध्याय अत्यंत पवित्र मानला जातो. त्याचा रोज पाठ करतात. या अध्यायाला एवढे पावित्र्य का? कारण जीवनाचे संपूर्ण शास्त्र येथे सांगितले आहे.

१. क्षरसृष्टी हा एक पुरुष.

२. शरीरात वावरणारा जीव हा दुसरा पुरुष.

३. आणि या दोन्ही पुरुषांना व्यापून असणारा तो तिसरा पुरुष-पुरुषोत्तम.

क्षरसृष्टी म्हणजे ही नाशिवंत सृष्टी. बदलणारी सृष्टी. नवीन नवीन रूप धारण करणारी सृष्टी. क्षरता हे सृष्टीचे दूषण नसून जणू भूषण आहे. सदैव बदलते तेच सनातन. ''सनातना नित्यनूतनः'' या क्षरसृष्टीतून सेवेची साधने आपणास मिळत असतात. म्हणून ही क्षरसृष्टी पवित्र मानावयाची. तिलाही पुरुष म्हणजे जणू चैतन्यमय मानावयाचे. रोज तीच तीच फुले असती, तर भक्ताला पूजेचा आल्हाद वाटला नसता. म्हणून निरनिराळ्या ऋतूंत निरनिराळी पुष्पे. कधी बकुळीची फुले, तर कधी पारिजातकाची. कधी कमळे फुलली आहेत, तर कधी गुलाब-मोगरे. क्षरसृष्टीचे हे असे भाग्य आहे. सदैव पौर्णिमाच असती तर आपण कंटाळलो असतो. परंतु कधी बीजेची सुंदर चंद्रकोर असते, कधी अष्टमीचा चंद्र. कधी पौर्णिमा तर कधी अमावस्या. पौर्णिमेला चंद्राचे साम्राज्य, तर अमावास्येला ताऱ्यांना संपूर्ण स्वातंत्र्य. चंद्राची ही क्षरता आनंददायक आहे.

कधी रिमझिम पाऊस पडत आहे, कधी मुसळधार पाऊस, नद्यानाले भरले आहेत. खळखळाट पाणी वाहत आहे. कधी सुंदर ऊन, कधी गुलाबी थंडी. कधी वादळ होऊन सारी सृष्टी जणू नाचू लागते, तर कधी केवळ शांत असते. अशी ही सृष्टीची मौज आहे. क्षरतेमुळे हे वैचित्र्यवैभव आहे. समाज बदलतो आहे. साधने बदलत आहेत. जुनी साधने गेली. नवीन आली. बैलगाड्या कमी झाल्या. मोटारी आल्या. सेवेची साधने बदलली, तरी सेवा करायचीच आहे. आपले शरीरही बदलते. लहान होते हे शरीर, मोठे झाले. सात वर्षांत शरीरातील सारे अणुपरमाणू म्हणे बदलतात. म्हणून शरीर सतेज राहते. सेवा करता येते.

क्षरसृष्टी म्हणजे सेवेची साधने. या क्षरसृष्टीला पुरुष माना. तिला तुच्छ नका मानू. तिला पवित्र माना म्हणजे काय? चरखा माझ्या सेवेचे साधन आहे. त्याला मी नीट माळ घालीन, तेल देईन. हे सेवेचे साधन. स्वच्छ ठेवीन. त्याची उपेक्षा करणाराही मोटार माझ्या सेवेचे साधन. मोटारीने मी लोकांना नेतो. ही मोटार नीट ठेवीन. टायर नीट आहेत की नाहीत ते पाहीन. पेट्रोल आहे की नाही पाहीन नाही तर उतारूंचे हाल होतील. ते उतारू म्हणजे माझा भगवान. त्याची सेवा करण्याचे साधन म्हणजे ही माझी मोटार नीट ठेवू दे. हा नांगर माझ्या सेवेचे साधन. हे जाते, ही केरसुणी, ही चूल, हे पुस्तक सारी त्यांची त्यांची सेवेची साधने. ही साधने आपण पवित्र मानतो. ती नीट ठेवतो. अर्जुनाची प्रतिज्ञा होती की, ''समाजाचे रक्षण करणारे जे माझे गांडीव धनुष्य त्याची कोणी निंदा करील तर ते मी सहन करणार नाही.'' अर्जुनाच्या सेवेचे ते साधन होते. बायका चुलीला, केरसुणीला, जात्याला पाय लावू देणार नाहीत. मुलाचा पाय लागला तर नमस्कार कर म्हणतील. पंडित आपल्या पुस्तकांना पाय लावू देणार नाही. दसरा आला तर शेतकरी नांगराची पूजा करील, शिंपी शिवण्याच्या यंत्राला झेंडूच्या माळा घालील, मोटारवाला मोटार सजवील. या सर्वांचा अर्थ काय? याचा अर्थ इतकाच की, क्षरसृष्टी, ही सारी साधने पवित्र आहेत. पुरुषमय आहेत. जणू चैतन्यमय आहेत.

क्षरसृष्टी म्हणजे पुरुष आणि क्षरसृष्टीत वावरणारा हा अ-क्षर जीव हाही पुरुषच. हा अक्षर जीव मागील जन्मी होता, या जन्मी आहे, पुढील जन्मीही उभा असेल. सेवा करता दमणार नाही. तुकाराम महाराज म्हणतात, ''सुखे घालावे जन्मासी.'' पुन:पुन्हा सृष्टीत जन्मून सेवा करण्यासाठी हा जीव उभा असतो. क्षरसृष्टीतील विपुल, विविध साधने पाहून त्याला आनंद वाटतो.

क्षरसृष्टी म्हणजे पुरुष. आणि या सर्वांना व्यापून असणारा तो पुरुषोत्तम. सारे विश्वच जणू पुरुषमय. सारे चैतन्यमय. सर्वत्र एकच पावित्र्य. सर्वत्र एकच सुगंध. सर्वत्र एकच आनंद. अमृतानुभवात ज्ञानेश्वर म्हणतात, ''लेण्यामध्ये दगडाच्या देवाची दगडाचा भक्त दगडाच्याच फुलांनी पूजा करतो असे दिसते. त्याप्रमाणे एकाच चैतन्याचे क्षर, अक्षर, पुरुषोत्तम हे सारे प्रकार.''

सर्वत्र हे असे धन्य होणे याहून पवित्रमय काय? तुकाराम महाराज म्हणतातः

ऐसे भाग्य कई लाहता होईन ।

अवघे देखे जन ब्रह्मरूप ।।

मग तया सुखा अंत नाही पार ।

आनंदे सागर हेलावती ।।

अशी ती परमदशा आहे. ''वृक्षवल्ली आम्हा सोयरीं वनचरे'' असे होते. सर्वत्र आपणच भरून राहिलो आहोत असा अनुभव होतो. डोळ्यांतून आनंदाश्रू घळघळतात. अंगावर रोमांच उभे राहतात.

याहून अधिक थोर विचार तो कोणता? याहून अधिक उदात्तता व ज्ञान ते कोणते? येथे परमावधी झाली. पंधराव्या अध्यायाच्या शेवटी म्हणून भगवान म्हणतात,

''इति गृह्यतमं शास्त्रमिदमक्तमयाऽनघ''

हे सारे गृह्यतम असे शास्त्र तुला सांगितले. गीताशास्त्र जणू येथे संपले.

पंधरावा अध्याय्र कर्म, शक्ती ज्ञान यांची एकरूपता सांगत आहे. कर्माची साधने, जीव, परमात्मा सारे पुरुषमय, सारे परमैक्य, कर्म, भक्ती, ज्ञान ही निराळी नाहीत. कर्म म्हणजेच भक्ती, भक्ती म्हणजेचं ज्ञान, ज्ञान म्हणजेच कर्म. सारी एकमेकांत मिसळावयाची. खऱ्या कर्मांत भक्ती व ज्ञान असणारच. खऱ्या भक्तीत कर्म व ज्ञान असणारा. खऱ्या ज्ञानात कर्म व भक्ती ही येणारच. या वस्तू एकरूपच आहेत. फुलाच्या पाकळी पाकळीत गंध व रंग अविनाभावे असतात. त्याप्रमाणे आपल्या कर्मांत भक्ती व ज्ञान याचा रंग व गंध भरलेला हवा. भक्तीत कर्म व ज्ञान यांचा गंध व रंग हवा. ज्ञानात कर्म व भक्ती यांचा रंग व गंध व्हावा. दुधात ज्याप्रमाणे साखर व केशर आपण घालतो त्याप्रमाणे आपण कर्म, भक्ती व ज्ञान ही एकरूप करू या.

असे हे गीताशास्त्र आहे. हा धन्यतम पुरुषोत्तमयोग आहे.

✦✦✦

अध्याय सोळावा

पंधराव्या अध्यायाच्या शेवटी गीताशास्त्र सांगितले, असा उल्लेख आहे. सोळावा व सतरावा अध्याय हे परिशिष्टरूप आहेत. अठरावा अध्याय म्हणजे उपसंहार आहे.

या सोळाव्या अध्यायात दैवी व आसुरी संपत्तीचे वर्णन आहे. जगाच्या आरंभापासून निरनिराळ्या स्वरूपांत हा झगडा चालला आहे. सर्व धर्मांतून हे द्वैत सांगितले आहे. ख्रिश्चन धर्मात सैतान व परमेश्वर यांचा अखंड झगडा आहे. पारशी धर्मात तेच आहे. येथे गीता तेच सांगत आहे. या सदसंतांच्या झगड्यात आपण कोणत्या बाजूने उभे राहणार, हा प्रश्न आहे. अशा झगड्यांतूनच जगाची प्रगती होत आली आहे. विरोधातून विकास होत आहे. पाऊल पुढे पडत आहे.

दैवी गुणांच्या आरंभीच अभय या गुणाला स्थान दिले आहे आणि शेवटी नम्रता, नीतिमानता हा गुण सांगितला आहे. अभयाशिवाय प्रगती नाही. परंतु नम्रताही हवी. सायकलला जसा ब्रेक असतो तसा नम्रतेचा ब्रेक हवा, म्हणजे नीट पाऊल पुढे पडेल.

निर्भय वृत्तीने पुढे झाल्याशिवाय विकासाचा मार्ग मोकळा होत नाही. जवाहरलाल एकदा म्हणाले, ''निर्भयपणे विचार करा व निर्भयपणे आचार करा.'' लोकमान्य उभे राहिले व म्हणाले, ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. तो मी मिळवणारच.'' आगरकर उभे राहिले व म्हणाले, ''दुष्ट रूढी तोडल्या पाहिजेत. स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे.'' आगरकरांचा छळ झाला. त्यांची जिवंतपणी प्रेतयात्रा

काढली गेली! परंतु आगरकर खचले नाहीत. ते वीराप्रमाणे उभे राहिले. त्यांच्या विचारांचा आज विजय झाला आहे. आज महात्माजी निर्भयपणे उभे ठाकले आहेत. असे हे निर्भय पुरुष उभे राहतात व जगाला पुढे नेतात. जग आधी तयार होत नाही. परंतु या ध्येयवादी व्यक्तींचा त्याग पाहून, त्यांची निष्ठा पाहून जग शेवटी त्यांच्या पाठोपाठ जाते. जगाचे पाऊल पुढे पडते.

जगात एकीकडे अहंकारी लोक आहेत. हे मिळवीन, ते मिळवीन, याला लुटीन, त्याला पिटीन, येथे साम्राज्य स्थापीन, त्या देशाला गुलाम करीन, आम्ही उच्च संस्कृतीचे, बाकी तुच्छ, मी स्पृश्य, ते दुसरे अस्पृश्य; अशा प्रकारचा राक्षसी अहंकार एकीकडे थैमान घालीत असतो. या राक्षसाशी दोन हात करायला सत्प्रवृत्त लोक उभे राहतात. महात्माजींना एकाने प्रश्न विचारला, ''जगण्यात तुम्हाला आनंद का वाटतो?'' त्यांनी उत्तर दिले, ''जगातील अंधार दूर करण्यासाठी धडपडण्यात मला आनंद वाटतो.''

जगात काहींची चैन चालली आहे, कोट्यवधी लोकांची दैना आहे. ती विषमता पाहून जो उठणार नाही, ती दूर व्हावी म्हणून बंड पुकारणार नाही, तो राक्षस आहे. स्वतःजवळ राखतो तो राक्षस. दुसऱ्यास देतो तो देव. कोकणात खोत व शेतकरी यांच्यात झगडे आहेत. खोताला नाना अधिकार. आधी खोताचे गवत कापून दिले पाहिजे. आधी खोताचे हरडे गोळा झाले पाहिजेत. सारे जंगल खोताचे. तिकडे जमीनदारांचे असेच शेकडो मिराशी अधिकार. यत्किंचितही श्रम न करता गाद्यांवर लोळणारी ही ऐतखाऊ बांडगुळे पाहून कोणाचे रक्त सळसळणार नाही? शेतकरी राबराब राबतो. परंतु त्याच्या मुलांच्या अंगावर नीट कपडा नाही. बायकोला नीट लुगडे नाही, घरात उपासमार. ना ज्ञान, ना कला. दरिद्रनारायणाचा हा फाटका संसार कोण सुधारणार? गिरणीचे मालक, कारखानदार बंगल्यातून राहत आहेत. मोटारी उडवीत आहे. परंतु कामगारांची किती हीनदीन स्थिती! राहायला रद्दी जागा. पोटभर खायला नाही. जीवनात आनंद नाही. हे कोठवर सहन करावयाचे?

समाजवादाशिवाय आता तरणोपाय नाही. समाजवादाचे नाव ऐकून घाबरण्याचे कारण नाही. समाजवाद म्हणजे कृतीत आणलेले अद्वैत; समाजवाद म्हणजे जीवनात उतरलेला वेदान्त. गांधीवाद व समाजवाद यांचा समन्वय करता आला तर करा. अहिंसेने समाजवाद आला तर ते महात्माजींना नको आहे असे नाही. स्वर्गीय

महादेवभाईंनी एकदा लिहिले होते की, ''निवडणुकीच्या कार्यक्रमात समाजवादी योजना आखून लोकांनी जर तुम्हाला निवडून दिले तर ती योजना असेंब्लीत तुम्ही पास करायला हरकत नाही.''

कोणताही मार्ग घ्या. लोकांना सुखी करा. जीवनाच्या आवश्यक गरजा सर्वांच्या भागल्या पाहिजेत. अन्न, वस्त्र, ज्ञान, विश्रांती, आनंद सर्वांना मिळाली पाहिजेत. आज अशी परिस्थिती आहे की सर्वांना या वस्तू देता येतील, नीट योजना मात्र हवी. संशोधनाचा मानवी सुखासाठी उपयोग केला म्हणजे हे सारे होईल.

पंडित जवाहरलाल नेहरू एकदा म्हणाले, ''कोट्यवधी लोक अन्नवस्त्रास पारखे असता, ज्ञानानंद व कलानंद यांना पारखे असता, धर्माच्या व संस्कृतीच्या गप्पा हे लोक मारतात तरी कसे?'' खरे आहे. खरा धर्म अद्याप यावयाचा आहे.

''सर्वऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामया :
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखाप्नुयात''

असे नुसते पुटपुटून भारणार नाही. हे मनोहर व मंगल दृश्य जगात प्रत्यक्ष दिसावे, म्हणून सर्वस्वार्पण बुद्धीने झगडायला जो उभा राहिला तो खरा देवाचा लाडका. जो खरा ज्ञानी तो खरा भक्त.

✦✦✦

अध्याय सतरावा

सतरावा अध्यायही परिशिष्टरूप आहे. यज्ञ, दान व तप या तीन गोष्टी येथे सांगितल्या आहेत. गीतेत यज्ञधर्मांचे महान तत्त्व आहे. गीतेतील यज्ञ शब्दाचा अर्थ काय? यज्ञ म्हणजे झीज भरून काढणे. तिसऱ्या अध्यायात

''सहयज्ञाः प्रजाः सृष्टवा पुरोवाच प्रजापतिः ।

अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्ट कामधुक्''

असा सुंदर श्लोक आहे. सृष्टी निर्माण करणाऱ्याने मनुष्याला एकटे नाही निर्मिले. त्याच्याबरोबर यज्ञही निर्माण केला. यज्ञ निर्माण करून प्रभू म्हणाला, ''या यज्ञाची उपासना करा. हा यज्ञ हीच तुमची कामधेनू.'' त्या तिसऱ्या अध्यायात पुढे म्हटले आहे की ''तुम्ही देवांसाठी यज्ञ करा. देव तुमच्यासाठी पाऊस पाडतील.'' याचा अर्थ काय? याचा अर्थ हा की एकमेकांनी एकमेकांची झीज भरून काढावी. देव म्हणजे स्वर्गात राहणारे. ते स्वर्गातील देव कोठे असतील ते असोत. परंतु भूतलावर शेतकरी, कामगार हविर्भाग नेऊन देतात. परंतु देवांनीही या शेतकरी, कामगारांना भरपूर दिले पाहिजे. थेंबथेंब भिकाऱ्यासारखे देऊ नये, तर पाऊस पाडावा. तरच शेतकऱ्या-कामकऱ्यांची झीज भरून येईल. सर्व सृष्टीत हे यज्ञतत्त्व भरून राहिले आहे. नद्या आटतात व मेघांना सजल करतात. परंतु मेघ पुन्हा त्या कोरड्या झालेल्या नद्यांना भरून काढण्यासाठी रिते होतात. असे हे चक्र आहे. तुझी झीज मी भरून काढतो, माझी तू भरून काढा. रामराम असे आपण एकमेकांना म्हणतो. तू राम व

मीही राम. 'देव भूत्वा दें यजेत्' तू देव व मीही देव. एकमेकांना सांभाळू. असा हा यज्ञधर्म आहे.

शेतकरी शेतात पीक घेतो. शेताचा कस गेला. शेताची झीज झाली. ती झीज भरून काढण्यासाठी तो शेतकरी खत घालतो. झीज भरून काढतो. याला यज्ञ म्हणतात.

देह सेवेत श्रमला. त्याची झीज झाली. ती झीज भरून काढण्यासाठी देहाला घास देणे म्हणजे यज्ञकर्म आहे. ते उदरभरण नाही. देह सेवेत राबला. त्याची झीज भरून येण्यासाठी झोप हवी. श्रमलेल्या कर्मयोग्याची ती निद्रा म्हणजे पवित्र यज्ञकर्म होय.

बायका चूल सारवून ठेवतात. मलिन भांडी स्वच्छ करतात. उखळलेली जमीन सारवतात. घामट कपडे धुतात. हे सारे यज्ञकर्म आहे.

सृष्टीत हा यज्ञधर्म नीट चालेल तर आनंद नांदेल. आज जगात दुःख आहे, कारण यज्ञोपासना नाही. इंग्लंडने हिंदुस्थानला लुटावे व स्वतः गलेलठ्ठ व्हावे. हिंदुस्थानची झीज कशी भरून येणार? सर्वत्र हे असे अयज्ञीय प्रकार आज चालले आहेत. आपल्या देशात आपणही तेच पाप करीत आहोत. जमीनदार, खोत, कारखानदार, गिरणीमालक शेतकऱ्या-कामकऱ्यांची झीज भरून यावी, त्यांना आनंद व विश्रांती मिळावी म्हणून काही करीत आहेत. का?

गीता सांगते, एकमेकांची झीज भरून काढा. यज्ञधर्माचे उपासक व्हा. वास्तविक यज्ञधर्म नीट आचराल, तर तुमच्याजवळ संचय होणार नाही. परंतु संचय झालाच तर तो देऊन टाका. समाजातील विषमतेचे खळगे भरून काढण्यासाठी तुमचे साठे-संचय घेऊन जा. वेदातील ऋषी म्हणतो :

''मोघमन्नं विन्दते अप्रचेताः । सत्यं ब्रवीमि वध इत्स तस्य''

जो अप्रचेतस आहे, म्हणजे ज्याचे मन प्रगल्भ नाही, ज्याचे हृदय उदार नाही, अशाला अन्नाच्या राशी उगीच मिळाल्या. त्याने घरात भरून ठेवलेली कोठारे, ती त्याचा प्राण घेतील.

ऋषीची ही वाणी सत्य आहे ही गोष्ट रशियात दिसली. सर्वत्र दिसेल. गरीब लोकांच्या सहनशक्तीला काही सीमा आहे. शंकराला 'दरिद्र' व 'रुद्र' अशी दोन्ही नावे आहेत. हा दरिद्र मनुष्य कल्याणप्रद शिवशंकरही आहे. तो तुम्हाला वाचवील.

तो मृत्यूंजय आहे. परंतु या दरिद्री मनुष्याचा जर अंतच पाहाल, तर हा दरिद्र शेवटी रुद्र होईल व तुमचे भस्म करील.

म्हणून यज्ञधर्म आचरा. जवळ साचले तर ते सेवेसाठी द्या आणि तप आचरा. शारीर, मानसिक व वाणीचे तप आचरून शरीर निर्मळ ठेवा. इंद्रियांवर ताबा ठेवा. मन पवित्र ठेवा. ज्ञान मिळवा. ब्रह्मचर्याचे उपासक बना. नवीन नवीन विचार अभ्यासा. आळस करू नका. असे त्रिविध तप आहे. सेवा करावयास शरीर सतेज हवे. वाणी गोड हवी, विचारांची पुंजी हवी, हृदय उदार हवे या साऱ्या गोष्टी या त्रिविध तपात येतात. वाणीचा संयम ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. एखाद्या कठोर शब्दाने कायमची मैत्री तुटते. मतभेद असूनही गोड बोलता येईल. मुक्तेश्वराने म्हटले आहे :

''फुटले मोती तुटले मन । सांधू न शके विधाता ।।''

फुटलेले मोती सांधता येत नाही. तुटलेले मन जोडता येत नाही, म्हणून जपावे. समर्थांनी म्हटले आहे, ''बहुत असावे तणावे.'' ठायी ठायी मित्रमंडळे असावीत. ओळखी असाव्यात. आधार असावेत. गोड वाणीने हे साधते.

''जगापाशी जगमित्र । जिव्हेपाशी असे सूत्र ।''

हे सूत्र तुटू नये. गोड वाणीने सर्वांना वेड लावावे.

यज्ञ, दान, तप यांचा महिमा सांगून सतराव्या अध्यायाच्या शेवटी भगवान म्हणतात, ''कोणतेही कर्म करताना 'ॐ तत् सत' असे म्हणत जा.'' याचा काय अर्थ? ॐ म्हणजे काय? उपनिषदात सांगितले आहे की सारे वाङ्मय करवून त्यातून ॐ हे सार काढले. ॐ हे परमेश्वराचे नाव. यात सारे तत्त्वज्ञान आले. सारे धर्म आले. ॐचा अर्थ होय, असाही आहे. देव आहे का? ॐ होय, देव आहे. देव म्हणजे काय? देव म्हणजे पूर्णता. देव म्हणजे सर्वत्र सच्चिदानंदाचे साम्राज्य, सर्वत्र सत् म्हणजे मंगल भावना आहेत. चित् म्हणजे ज्ञान आहे आणि जेथे हृदय मंगल आहे व बुद्धी शुद्ध आहे, तेथे आनंद दिसणार नाही तर कोठे? म्हणून आपण ॐ म्हणू या. देव आहे. ती परिपूर्णता आहे. त्या देवाचे स्वरूप कसे आहे? 'सत्.' तो देव मंगलमय आहे. ती परिपूर्णता शिवस्वरूप आहे. ते जे सुंदर ध्येय आमच्या डोळ्यांसमोर दिसत आहे ते सत् आहे. कोठे आहे ते सत् रूप? तर उत्तर आहे, ''तत् ते पाहा. आमच्या डोळ्यांना स्पष्ट दिसत आहे.'' ॐ तत् सत्' या तीन शब्दांचा असा हा अर्थ आहे. न्यायमूर्ती रानडे एका व्याख्यानात म्हणाले, ''तो पाहा हिंदुस्थान मला

दिसत आहे. तेथे अन्न आहे, वस्त्र आहे, ज्ञान आहे, कला आहे, भांडणे नाहीत, रोग नाहीत, दुष्काळ नाहीत. सारे गुण्यागोविंदाने राहत आहेत. उत्तरोत्तर विकास करून घेत आहेत. असा तो हिंदुस्थान पहा. देवाची ही लाडकी भूमी पाहा!'' न्यायमूर्तींच्या या म्हणण्याचा अर्थ काय? ॐ तत् सत् हा त्याचा अर्थ. कोणतेही कार्य करावयास निघताना ''ते माझे ध्येय ध्येय, ते परम मंगल असे ध्येय'' असे म्हणून उभे राहा. हा या ॐ तत् सत् याचा अर्थ. ही श्रद्धा, ही निष्ठा घेऊन उभे राहू तरच कृतार्थ होऊ.

+++

अध्याय आठरावा

आणि आता शेवटचा अध्याय . हा अध्याय म्हणजे उपसंहार. भगवान सांगतात, ''काम्य कर्मांचा त्याग तर करावयाचाच, परंतु जी स्वधर्माचरणाची कर्मे करावयाची त्यांच्या फळांचाही त्याग करावयाचा. काम्य कर्मे सारी निषिद्धच. जी कर्मे मुद्दाम स्वार्थाने सुरू केली, तेथे फलत्याग संभवेल तरी कसा?'' आपल्या देशातील कपड्यांचे दुकान घालणे हा स्वधर्म आहे. परंतु जवळचे लोक उपाशी मरत असता परदेशातील कापडाचे अधिक कमिशन मिळते म्हणून दुकान घालणे हे काम्य कर्म आहे. अशी कर्मे गीता निषिद्ध मानीत आहे. आणि जी स्वधर्माचरणाची कर्मे करावयाची तीही निष्कामबुद्धीने करावयाची.

कर्म म्हटले की थोडा तरी दोष त्यात येतोच. अग्नीजवळ जसा धूर,तसा कर्माजवळ दोष. केवळ निर्दोष असे कर्म जगात शक्य नाही. शेतीचे कर्म करताना पायाखाली किडे तुडवले जातात, म्हणून जर शेतीचेच कर्म टाळू बघू, तर लोक उपासमारीने मरू लागतील. एक दोष टाळू जाल, तर दुसरा त्याहून मोठा पदरी येईल, ईश्वरार्पणबुद्धीनेकर्म करीत जा. शक्य तितके निर्दोष कर्म व्हावे म्हणून खटपट करीत राहणे एवढेच आपल्या हाती.

अशा रीतीने निर्दोष कर्मे करीत जाता जाता पूर्णता अंगी बाणेल. केवळ निरहंकारी दशा अंगी येईल. सर्वत्र आत्मरूप पाहाल. आसक्ती नष्ट होईल. भेद दुरावतील. असा जो कर्मयोगी, निष्काम सेवक, त्याने काही केले तरी मंगलच होते. त्याने

मारले तरी ते तारणे होते. आई मुलाला मारते. परंतु मारता मारता स्वतः रडत असते ते का मारणे असते? ती मुलाला नसते मारीत. जणू स्वतःलाच मारीत असते! संतांचे मारणे हे अशा प्रकारचे असते. रविंद्रनाथांनी म्हटले आहे, ''जो प्रेम करतो त्याला मारण्याचा अधिकार आहे.'' परंतु आपण आधी मारण्याचा हक्क जणू बजावू पाहत असतो.

शिक्षक मुलाला छडी मारतो. परंतु प्रेम देतो का? आधी प्रेम द्या. आणि त्या प्रेमाच्या अधिकारावर शासन करण्याचा अधिकार हवा असेल तर मिळवा.

रामाने रावणास मारले, कृष्णाने कंसास मारले, मग आम्ही का मारू नये. असे आपण म्हणतो. परंतु रामाने रावणास मारले आणि रावण उद्धरून गेला असे आहे. आपण पहिले वाक्य वाचले, पुढचे पाहिले नाही. एक मुसलमान होता. तो दारू पीत असे. त्याला कोणी विचारले, ''अरे, दारू का पितोस? हे धर्मविरुद्ध आहे.'' तो म्हणाला, कुराणात दारू पी असे आहे.''तो गृहस्थ म्हणाला ''दाखव रे.'' त्याने कुराण आणले व दाखवले. तो म्हणाला ;'' हे पाहा. 'तू दारू पी.' असे येथे आहे.'' तो गृहस्थ म्हणाला ''अरे, हे पुढचे वाच की. 'तू दारू पी म्हणजे नरकाचा धनी होशील' असे आहे.'' तो म्हणाला, ''त्या पुढच्या वाक्यापर्यंत अद्याप आलो नाही. जेवढे वाक्य वाचले, तेवढ्याचाच आचार सुरू केला!'' तसे आपले आहे.रामाने रावणास मारले. लगेच आपण मारू लागलो! परंतु रामचंद्राचे ते निष्काम हात. ते परमकारुणी हात. रावणाच्या कल्याणासाठी तडफडणारे ते हात. म्हणून त्या हातांनी मेलेला रावण तरला. आपले तसे हात आहेत का? आपल्या हातांनी मरणारा उद्धरून गेला, असे आपणास म्हणता येईल का?

जगाची सेवा करा. प्रेम करा. हे जग आनंदी होईल असे करा.

''अवघची संसार सुखाचा करीन
आनंदे भरीन तिन्ही लोक''

हे ध्येय ठेवा. ज्ञानेश्वरांनी वर मागितलाः

''जो जे वांछिल तो ते लाहो ।। प्राणिजात।।''

असे आपणही म्हणू या. त्यासाठी लढू या. धडपडू या. अनासक्त वृत्तीने उद्योगात रात्रंदिवस रमू या.

असे हे सांगून भगवान अर्जुनाला म्हणाले, ''अर्जुना. ऐकलेस ना हे सारे गीताशास्त्र ? गेला का तुझा मोह?''

''कच्चिदेतच्छ्तं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा।

कच्छिदज्ञानसंमोह: प्रणष्टस्ते धनंजय।।''

तेव्हा अर्जुन उचंबळून म्हणाला :

''नष्टा मोह: स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्ययाऽच्युत''

देवा, गेला हो मोह. जागृती आली. तुझी ही कृपा.'' भगवान अर्जुनाला म्हणाले, ''मी तुला सांगितले खरे, परंतु तुझ्यावर लादीत नाही. तुझ्या विचारास येईल तसा तू वाग. यथेच्छसि तथा कुरु.''

गीतेचा हा मोठेपणा आहे. भगवंताची ही उदारता आहे. सर्व सांगून पुन्हा ते आचारस्वातंत्र्य देतात. विचारस्वातंत्र्य देतात. परंतु भगवंतांचे अर्जुनावर अपार प्रेम. त्यांना राहावत नाही. दिलेले स्वातंत्र्य ते पुन्हा घेतात व म्हणतात.

''सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं ब्रज''

अर्जुना, सोड इतर सारे विचार, एक गोष्ट लक्षात ठेव. तू मला शरण ये. माझी इच्छा ती तुझी स्वत:ची इच्छा कर. तुझी निराळी इच्छा ठेवूच नकोस.

आपण हा शेवटचा विचार सदैव ध्यानात घ्यावा. समाजवाद का गांधीवाद, का कोणता वाद? कोणता धर्म? भगवान म्हणतात, ''सोड सारे धर्म व मला शरण ये'' कोणतेही कर्म करताना आपण मनाला विचारावे, ''हे माझे कर्म देवाला आवडेल का? त्याच्यासमोर हे माझे कर्म मी घेऊन जाऊ शकेन का?''

माझ्या मनात कधीकधी विचार येतो की घरात एखादी वृद्ध आजीबाई असावी. तिच्या नातवंडांनी तिच्या समोर कांदे, लसूण वगैरे नेऊन ठेवावे. ती आजीबाई म्हणेल, ''हे रे काय आणता? काही न दिलेत तरी चालेल, मी उपाशी राहीन. परंतु असले नका आणू.'' असेच तो पुराणपुरुष म्हणत असेल. ती जगन्माता आज हजारो वर्षे जणू उपाशी आहे. तिला आवडणारा कर्ममेवा कोण देतो? म्हणून तर द्रौपदीच्या एका पानाने त्याला ढेकर आली. प्रभूला आपली कर्मे आवडतील असे ज्याला म्हणता येईल तो धन्य होय.

शेक्सपियर या इंग्रज कवीने म्हणून म्हटले आहे की, ''जे जे तू करू पाहशील ते देवासाठी असो, सत्यासाठी असो. तुझ्यासाठी असो.'' शेक्सपिअरने आधी देश

घेतला नाही. आधी देव घेतला. सत्य घेतले. इंग्रज आपल्या देशाची सेवा करीत आहेत. परंतु हिंदुस्थानची हलाखी करून स्वदेशाची त्यांनी चालविलेली सेवा ही देवाघरी रुजू होईल का? कधीही नाही.

म्हणून आपल्या कर्मांना, मनातील विचारांना एक कसोटी लावावी. त्या भगवंताच्या समोर ही कर्मे, हे विचार न्यायला मला लाज नाही ना वाटणार? त्याच्यासमोर मान खाली घालावी नाही ना लागणार? असे स्वतःला विचारावे. ईश्वराची इच्छा ती स्वतःची इच्छा करावी. आपल्या कर्मांतून प्रभूचे हेतू प्रकट करावेत. मी कोणी नाही. सारे तो. त्याचे संगीत माझ्यातून स्त्रवू दे. त्याच्या इच्छा माझ्यातून मूर्त होऊ देत. त्याचे सूर माझ्या जीवनाच्या बासरीतून बाहेर पडू देत. त्याच्या हातातील मी साधन. दादू पिंजारी पिंजणाचे काम करीत असे. पिंजणाची तार तुई तुई करी. दादू पिंजाऱ्याला त्या तुई तुईमध्ये काय बरे ऐकायला येई? तो म्हणे, ''देवा, तुहिं तुहि'' तूच केवळ आहेस. तूच आहेस.

✦✦✦

साने गुरुजी लिखित अनमोल ग्रंथसंपदा

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुध्द अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे 'साने गुरुजी!' मातृभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्यसमरात त्यांनी स्वत:ला झोकून दिले आणि अखेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सुखासाठी झटत राहिले. समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, एकता निर्माण व्हावी, शेतकरी-कामकरी वर्गाचे दैन्य-दारिद्र्य दूर व्हावे व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतूने ते सर्वत्र जनजागृती करत राहिले. लहान मुले, स्त्रिया, तरुण, दीन-दलित यांना स्वत्त्वाची जाणीव व्हावी व उत्तमोत्तम विचारांची देणगी मिळावी यासाठी अत्यंत संस्कारक्षम असे साहित्य त्यांनी निर्माण केले.

आज साने गुरुजींसारखे उदात्त व्यक्तिमत्त्व आपल्यामध्ये नसले तरीही त्यांचा हा साहित्यरूपी अनमोल ठेवा आपल्याकडे आहे. अत्यंत सोप्या भाषेतील या बोधप्रद कथा, वैचारिक लेख, इतर भाषांमधील महान लेखकांचे अनुवादित साहित्य घरोघरी पोहोचावे या हेतूने साने गुरुजींची सर्व पुस्तके एकूण ५१ खंडामध्ये आम्ही आपणासमोर सादर करीत आहोत. महाराष्ट्रातील प्रत्येक घर गुरुजींच्या विचारांनी पावन व्हावे, हीच एकमेव इच्छा !

मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर

₹ 250

200028

पब्लिकेशन्स् रिया

e mail : riyapublications@gmail.com